


# महाराष्ट्राचे शिल्पकार शंकरराव मोहिते-पाटील

हरिश्चंद्र मगर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# महाराष्ट्राचे शिल्पकार
# सहकारमहर्षी
# शंकरराव मोहिते-पाटील

हरिश्चंद्र मगर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. ३२
प्रथमावृत्ती : जानेवारी २०१०

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्य मंदिर इमारत, २ रा मजला,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५

© प्रकाशकाधीन
मुद्रक :
प्रमोद भोगटे,
स्नेहेश प्रिंटर्स,
३२०-ए, शाह अँड नाहर इंड. इस्टेट अ-१,
धनराज मिल आवार, सीताराम जाधव मार्ग,
लोअर परळ, मुंबई-१३. (दूरध्वनी : २४९४ ५६१५)

मुखपृष्ठ : राजा बडसल, पुणे

किंमत : रू. ५७/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

## निवेदन

विसाव्या शतकात महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये अनेक चमत्कार घडून आले. ते चमत्कार घडविणारी माणसे कुणी इंग्लंड अमेरिकेला जाऊन, अत्युच्च शिक्षण घेऊन आलेली नव्हती. 'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा' म्हटल्या जाणाऱ्या सह्याद्रीच्या कडेपठारावरील गोदा, भीमा, कृष्णा, पंचगंगा यासारख्या लोकमतांच्या काठांवरील साधीसुधी, मराठमोळी माणसेच हा चमत्कार घडवून दाखवित होती. अर्थात त्यांना एकोणिसाव्या शतकामध्ये सुरू झालेल्या, समाज प्रबोधनकार म. ज्योतिबा फुले, लोकहितवादी, श्री छत्रपती शाहू महाराज, न्यायमूर्ती गोखले-रानडे, लोकमान्य टिळक, आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी महापुरुषांनी सुरू केलेल्या सामाजिक-शैक्षणिक-राजकीय परिवर्तनाची पार्श्वभूमी होती. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील अव्वल इंग्रजी राजवटीत जे स्वातंत्र्यलढ्याचे महाभारत सुरू झाले, त्याचाही गडद परिणाम या चमत्कारामागे होता. कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी बहुजन समाजाला प्रबुद्ध करण्याचे व्रत अंगिकारून शिक्षणाचे जाळे महाराष्ट्रभर विणले. मुंबई, पुणे, नाशिकसारख्या शहरांतील नागरीजनांवर तेथील द्रष्ट्या पुरुषांनी सर्वंकश सामाजिक परिवर्तनाचा संस्कार केला. या साऱ्यांचा संकलित परिणाम म्हणजे महाराष्ट्रामध्ये नवकर्तृत्वाचे वारे लागले आणि जनसामान्यांतून विविध क्षेत्रांमध्ये नवे नेतृत्व उदयाला येऊ लागले. म. गांधींच्या प्रेरणेतून स्वातंत्र्याच्या लढ्याबरोबरच सहकार, ग्रामोद्योग, स्वदेशी यांचा मंत्र कामी आला; तर अकलूजचे शंकरराव मोहिते-पाटील, नगरचे विखे-पाटील, सांगलीचे वसंतदादा पाटील यांच्यासारखी बहुजन समाजांतील व्यक्तिमत्त्वे विसाव्या शतकाच्या पहिल्या, दुसऱ्या दशकामध्ये उदयाला आली. थोर लोकनेते स्व. यशवंतराव चव्हाण यांची त्या सर्वांनाच मोठी प्रेरणा होती. त्यातील प्रत्येकाने आपापल्या अतुलनीय

कर्तृत्वाने आजचा समृद्ध महाराष्ट्र घडविलेला आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये सुरू झालेल्या महाराष्ट्राच्या आत्मविकासाच्या चमत्काराची प्रक्रिया विसाव्या शतकामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतच्या काळात शिक्षण, सहकार, उद्योग, कृषी, आरोग्य दळणवळण, जलसिंचन आदी अनेक क्षेत्रांमध्ये अतिशय मनोहारी रूपाने प्रगट झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर या प्रक्रियेच्या बहराचा काळ सुरू झाला.

आजच्या सुसंपन्न महाराष्ट्राचे मनोहर रूपडे ज्या अनेक कर्तृत्वसंपन्न महापुरूषांनी उभे केले, त्यांमध्ये अकलूज येथील सहकारमहर्षी स्व. शंकररावजी मोहिते-पाटील यांचे कर्तृत्व, नेतृत्व विशेषकरून अधोरेखित करावे लागेल. सहकाराची शक्ती ओळखून त्यांनी जनसंघटना केली. ग्रामीण भागांतील शेतकऱ्यांना सहकाराच्या प्रवाहात ओढले आणि ‘सहकारातून समृद्धी’ हा विकासाचा मूलमंत्र खेड्यापाड्यातून रुजविला. त्यासाठी अपार परिश्रम केले. गावच्या सरपंचापासून सुरुवात झालेली त्यांची कारकीर्द पुढे अनेक राज्यव्यापी कार्यामध्ये यशस्वीपणे प्रगट झाल्याचे दिसून आले. ‘सहकारमहर्षी’ हा किताब त्यांना खुद्द जगद्गुरू श्री. शंकराचार्य यांनी प्रदान केलेला असला, तरी त्याआधी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनीही शंकररावजींच्या समाजउभारणीच्या कार्याला हार्दिक आशीर्वाद दिले होते, ‘समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा व दारिद्र्य घालविण्यासाठी झटत राहणे, हीच खरी ईश्वरसेवा आहे’, हे त्यांनी शंकररावांच्या बाबतीत म्हटले होते. महर्षींच्या तपस्वितेला यापेक्षा वेगळ्या शब्दांचे प्रमाणपत्र कुणाकडून हवे होते?

सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांनी महाराष्ट्राला सहकारातून समृद्धीचा राजमार्ग दाखविला. त्याबरोबर महाराष्ट्राची क्रीडा, नाट्य, तमाशासारखी रांगडी लोककला या क्षेत्रांतील महत्त्वाच्या उपक्रमांतून साकार केली. त्यांच्या बहुआयामी, बहुपेडी व्यक्तिमत्त्वाचे यथार्थ दर्शन या पुस्तकातून लेखक श्री. हरिश्चंद्र मगर यांनी परिणामकारक पद्धतीने घडविले आहे.

'महाराष्ट्राचे शिल्पकार' या महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या चरित्रमालेमध्ये स्व. शंकरराव मोहिते-पाटील यांचे स्फूर्तीदायक चरित्र प्रकाशित करता आले, याचा मंडळाला अभिमान आणि आनंद वाटतो.

मधु मंगेश कर्णिक

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# मनोगत

स्वर्गीय सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीचे स्वप्न पाहिले. वयाच्या अवघ्या अठराव्या वर्षी स्वतःला सामाजिक कार्यास जुंपून घेतले. अनेक आघात व अडचणींना ते मोठ्या धीराने सामोरे गेले. क्रांतिसिंह नाना पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वाचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. वसंतदादा पाटील व यशवंतराव चव्हाण यांच्या सहकार्याने शंकररावांनी रचनात्मक कार्यास आरंभ केला. अल्पशिक्षित असूनही संवेदनशील मनाच्या शंकररावांनी ग्रामीण महाराष्ट्रातील भूमिपुत्रांच्या व गोरगरिबांच्या जीवनात प्रकाश आणण्यासाठी अनेक संकल्पना राबविल्या. या संकल्पनांना मूर्त स्वरूप आणत असताना अनंत अडचणी त्यांच्यासमोर उभ्या ठाकल्या, पण न डगमगता ते आपला मार्ग आक्रमत राहिले.

स्वातंत्र्यसैनिक, सरपंच, आमदार, आणि शिक्षण संस्था, साखर कारखाना, दूध संघ अशा अनेक सहकारी संस्थांचे जनक म्हणून त्यांनी भव्य स्वरूपाचे काम उभे केले. क्रीडा क्षेत्र व कलेच्या संवर्धनासाठी त्यांनी योगदान दिले. विकासाचे हे प्रारूप पुढे महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यांत व तालुक्यात सहकारी साखर कारखान्यांच्या स्थापनेनंतर राबविले जाऊ लागले. या प्रारूपाचे जनक सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील होते. महाराष्ट्राच्या सहकार चळवळीला मूर्त स्वरूप देण्यामध्ये शंकररावांचा सिंहाचा वाटा होता. या चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण भागात श्रमजीवी वर्गात जो विकास झाला आहे, त्याचे श्रेय शंकररावांनाच जाते.

अवघे एकसषठ वर्षांचे आयुष्य त्यांना लाभले. त्यांनी सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य उगवत्या पिढ्यांना अनंत काळपर्यंत प्रेरणा व स्फूर्ती देत राहील.त्यांचे जीवनचरित्र सर्वांपर्यंत जावे ही या ग्रंथापाठीमागची भूमिका आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती

मंडळाचे सदस्य प्राचार्य डॉ. सुरेश सावंत यांनी ‘महाराष्ट्राचे शिल्पकार’ या मालिकेसाठी सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांचे चरित्र लिहिण्याची सूचना केली.

सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील स्मरणिका कमिटीचे अध्यक्ष मा. उदयसिंह शंकरराव मोहिते-पाटील तसेच या कमिटीचे ज्येष्ठ सदस्य मा. राजसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ‘परिसस्पर्श’ या ग्रंथांची निर्मिती झाली, त्याचा संदर्भग्रंथ म्हणून मला हे चरित्र लिहिताना उपयोग झाला, किंबहुना ‘परिसस्पर्श’ या ग्रंथामुळे मी माझा चरित्रग्रंथ वेळेत पूर्ण करू शकलो.

हे लेखन पूर्ण करण्यासाठी मा.ना. विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, मा. श्री. जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, मा. मदनसिंह शंकरराव मोहिते-पाटील, मा. श्री. प्रतापसिंह शंकरराव मोहिते-पाटील, सौ. गिरिजादेवी विराज काकडे, यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. ज्यांना शंकररावांचा सहवास लाभला त्या सर्वांनी अत्यंत मोलाची माहिती दिली. स्वातंत्र्यसैनिकी मा. श्री. रघुनाथ रामचंद्र माने गुरूजी, माजी आमदार चांगोजीराव देशमुख, मा. श्री. बी. डी. पाटील, श्री. भगवानराव बोरावके, प्राचार्य डॉ. अरविंद नवले, माजी आमदार निर्मलाताई ठोकळ, मा. कुलगुरू डॉ. शंकरराव मगर, खासदार रणजितसिंह मोहिते-पाटील, माळशिरस पंचायत समितीचे सभापती मा. श्री. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी मौलिक सूचना केल्या. अनेक मान्यवरांचे मोलाचे मार्गदर्शन मला मिळाले. तसेच अनेक नियतकालिके व ग्रंथांचाही उपयोग झाला.

प्रा.विष्णू सुर्वे यांनी अत्यंत मौलिक सूचना केल्या.भाषातज्ज्ञ व समीक्षक प्राचार्य डॉ. महेंद्र कदम यांनी या लेखनाचे अत्यंत आस्थेने वाचन करून ते अधिकाधिक निर्दोष होण्यासाठी मार्गदर्शन केले.त्यामुळे हा चरित्रग्रंथ आशयपूर्ण व वाचनीय झाला आहे असा मला विश्वास वाटतो.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या मालिकेतील सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांचे चरित्र लिहिण्याची जबाबदारी माझ्यावर सोपविली त्याबद्दल मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. मधु मंगेश कर्णिक, मंडळाचे सचिव व सर्व सन्माननीय सदस्य यांचे ऋण व्यक्त करतो. रसिक वाचक या ग्रंथाचे स्वागत करतील अशी आशा बाळगतो.

महाराष्ट्र घडवतानाच देशहित साधणाऱ्या शंकररावांच्या या चरित्रातील त्रुटी माझ्या व चांगले ते सर्व चरित्रनायक व उपरोक्त मंडळांचे होय.

**-हरिश्चंद्र मगर**

# अनुक्रमणिका

१. जन्म, बालपण व शिक्षण..............................१
२. स्वातंत्र्य चळवळीतील योगदान.......................१६
३. नेता गवसला.........................................२६
४. शैक्षणिक योगदान....................................५४
५. ...आणि शंकरराव सहकारी कारखाना उभारतात.....८२
६. संकल्प आणि सिद्धी.................................१२५
७. कौटुंबिक आघाडीवर.................................१५९
८. राजकीय क्षेत्रातील गरूडझेप........................१८१
९. स्वामी वैखरीचा...................................... २२०
१०. नव्या जबाबदाऱ्या, नवी आव्हाने................... २४९
११. कला-क्रीडाप्रेमी शंकरराव........ .................२८२
१२. चेतना चिंतामणीचे गाव............................ ३०१
१३.पैलतीराकडे........................................३११
संदर्भसूची.......................................३१९

# जन्म, बालपण व शिक्षण

सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील म्हणजे गेली अनेक दशकं महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शेती, सहकार, शिक्षण आणि सांस्कृतिक जीवनाला व्यापून राहिलेले नाव. महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीचे शिलेदार असलेल्या सहकारमहर्षींचे जीवनकार्य म्हणजे भविष्यातील अनंत काळापर्यंतच्या पिढ्यांना नवचैतन्य, प्रेरणा आणि स्फूर्ती देणारा चिरंतन झरा. शेतात निढळाचा घाम गाळून श्रम करणाऱ्या शेतकरी, कष्टकऱ्यांपासून स्व. इंदिरा गादी, स्व. यशवंतराव चव्हाण, स्व. वसंतदादा पाटील या सर्वांनाच आपलंसं वाटणारं व्यक्तिमत्त्व. महात्मा गांधींच्या स्वप्नातील आर्थिक व सामाजिकदृष्ट्या प्रगत राष्ट्राच्या निर्मितीसाठी महाराष्ट्रातल्या गोरगरीब शेतकरी, शेतमजुरांना शंकररावांनी सहकाराचा मंत्र दिला. त्यांनी कृषी-औद्योगिक संस्कृतीचा ध्यास घेऊन ग्रामीण विकासासाठी आपले जीवन समर्पित करून ग्रामीण दारिद्र्याचा पराभव केला. स्वातंत्र्य चळवळीतील सच्चा देशभक्त, व्यापक समाजहितांची भूमिका मांडून त्यासाठी नवनवीन संकल्पना सातत्याने मूर्त स्वरूपात साकारणारा समाजसेवक, हाडाचा शेतकरी, शिक्षणतज्ज्ञ, सरपंच, आमदार असणारा असा हा लोकनेता.

१९३० सालानंतर महाराष्ट्रात औद्योगिक वारे वाहू लागले. मुंबई वगळता इतर ठिकाणी मोठे उद्योग अद्याप सुरू झाले नव्हते. पुढच्या काळात किर्लोस्कर, सर जमशेदजी टाटा, शेठ वालचंद हिराचंद यांनी महाराष्ट्रात औद्योगिक क्रांतीची बीजे रोवली; परंतु ती खासगी स्वरूपात असल्याने त्याचा मिळावा तेवढा फायदा सर्व समाजघटकांना मिळत नव्हता.

अशा खासगी भांडवलदारांच्या वैयक्तिक श्रीमंतीवर अवघ्या महाराष्ट्राची आर्थिक सुधारणा होणे शक्य नव्हते. दुसऱ्या बाजूला भांडवलरूपाने पैसा असल्याशिवाय औद्योगिकीकरणही शक्य नव्हते.

यावरचा एक नामी उपाय कै. धनंजयराव गाडगीळ व कै. वैकुंठभाई मेहता या ‘सहकार’ या नव्या तत्त्वाचा अभ्यास केलेल्या सहकारतज्ज्ञांनी लोकांपुढे ठेवला तो म्हणजे शेतकऱ्यांनीच एकत्र येऊन प्रत्येकाने आपला वाटा उचलायचा, ठराविक रक्कम शेअर म्हणून गोळा करायची. थेंबे थेंबे तळे साचे-या म्हणीप्रमाणे मोठी रक्कम भांडवल म्हणून गोळा करायची व त्यातून कारखानदारी विकसित करायची. अशा प्रकारे अनेकांचा हातभार लागून भांडवल गोळा होते. आणखी एक गोष्ट अशी की, सर्वांनी सभासद होऊन हातभार लावल्यामुळे त्यांना अशा कारखान्याविषयी प्रेम वाटते. हा कारखाना आपला आहे अशी भावना निर्माण होते. आपणच आपला विकास करून घ्यायचा हा विचार त्यापाठीमागे होता. प्रवरेकाठच्या कै. विठ्ठलराव विखे-पाटलांना तज्ज्ञांनी तो समजावून सांगितला आणि त्यांना तो लगेच पटलादेखील. अशा प्रकारे एका वेगळ्या चाकोरीतल्या विकासपर्वाला या महाराष्ट्रात सुरुवात झाली. अशा या सहकार चळवळीतल्या एका दीपस्तंभाची ओळख या पुस्तकात आपण करून घेणार आहोत.

सहकारमहर्षी शंकररावांचा जन्म मकर संक्रांतीच्या शुभदिनी १४ जानेवारी, १९१८ रोजी अकलूज येथे झाला. सोलापूर व पुणे जिल्ह्याच्या सीमेवर नीरा नदीकाठी वसलेले, ऐतिहासिक वारसा लाभलेले अकलूज हे गाव. या गावातील आनंदराव माने-पाटील हा एक सामान्य शेतकरी. घरची परिस्थिती हाता-तोंडाची गाठ पडेल अशी बेताचीच. पत्नी कृष्णाबाईबरोबर शेतात कष्ट करून ते संसार चालवीत होते. कृष्णाबाई व आनंदरावांना एकूण सहा अपत्ये. मारुतराव उर्फ बाबासाहेब हे थोरले. त्यांच्या पाठीवरचे शंकरराव, सर्वात धाकटे सदुभाऊ. जिजाक्का, कमलाबाई व सुशीलाताई या तीन बहिणी होत्या.

कृष्णाबाई व आनंदराव हे दोघेही धार्मिक प्रवृत्तीचे व पवित्र मानवतावादी विचारांचे होते. लहान शंकररावांच्या मानवतावादी विचारांचे संस्कार झाले. आजी लक्ष्मीबाई मोहिते यांच्या शिस्तबद्ध पण

प्रेमळ स्वभावाचा प्रभाव त्यांच्यावर बालवयातच पडला. तसेच त्याकाळी गावात होणाऱ्या कीर्तने, भारूडे यांच्या माध्यमातून त्यांच्यावर सामाजिक कार्याचे संस्कार झाले. त्यातूनच आपणही थोर पुरुषांप्रमाणे काहीतरी करावे, लोकांचे दुःख हलके करण्यासाठी आपणही प्रयत्न करायला हवा असे त्यांना वाटू लागले. स्वतःपेक्षा इतरांच्या सुखदुःखाचा विचार महत्त्वाचा आहे ही वडीलधाऱ्यांची शिकवण शंकररावांच्या अंतर्मनात रुजली. नैसर्गिक दुष्काळी असलेल्या अकलूज परिसरातील सर्वांचीच आर्थिक स्थिती बेताचीच होती. स्वतःच्या घरी पाटीलकी असूनही बेभरवशाच्या पावसामुळे अनेकदा न पिकल्यामुळे घर चालविणेही कठीण होऊन बसायचे. काही व्यापारी सोडले तर इतरांना पैसा बघायला मिळवणे मुश्कील. अशातच शंकररावांचे नाव सातवीपर्यंत वर्ग असणाऱ्या शाळेत घातले. स्वभावतःच खेळकर व हरहुन्नरी असणाऱ्या शंकररावांचे बालपणातील शिक्षण सुरु झाले. देश पारतंत्र्यात असल्यामुळे शिक्षणपद्धती जुन्या वळणाचीच होती. शंकरराव चिकित्सक स्वभावाचे होते. हे असे का? ते तसे का? असे प्रश्न विचारून लहानपणी ते सर्वांना भंडावून सोडीत.

लहानपणी वेगवेगळी सोंगे करण्यात त्यांचा हातखंडा होता. सर्व जातींतील बाराबलुत्यांच्या पोरांना एकत्र जमवून आट्यापाट्या, सूरपारंब्या खेळणे व भल्या पहाटे नीरेच्या डोहात जाऊन पोहणे यात त्यांचे बालपण मोठ्या आनंदात चालले होते. सुट्टीच्या दिवशी शाळेतील मित्र, वाड्यातील भावंडांना बरोबर घेऊन ते नीरा नदीत मनसोक्त डुंबायचे. नदीच्या काठावर असणाऱ्या ऐतिहासिक किल्ल्याच्या बुरुजापर्यंत पावसाळ्यात पाणी यायचे. नदीला पूर आला की, शंकररावांच्या बाहूंना स्फुरण चढायचे. ते उंच बुरुजावर चढून नदीच्या पाण्यात उडी मारायचे आणि पोहत पोहत देशमुख घाटात निघायचे. घाटावरून पुन्हा बुरुजावर व बुरूजावरून नदीत, पुन्हा घाटावर.... असा

धाडसी खेळ स्वभावामुळे अनेक मित्र त्यांच्याकडे आकर्षित होऊ लागले. अनेकांशी त्यांची पक्की गट्टी जमली.

शाळेत मास्तरांनी प्रश्न विचारताच उत्तर देण्यासाठी शंकररावांचा हात पहिल्यांदा वर व्हायचा. सोडवायला घातलेले गणित पाटीवर पटकन सोडवून मास्तरांना सगळ्यात पहिल्यांदा दाखविल्यावर त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद व उत्साह ओसंडून वाहत असे. आपल्या मुलाची शिक्षणातली प्रगती पाहून कृष्णाबाई, आनंदरावांबरोबरच कबईआजीला खूप खूप कौतुक वाटे. हा मुलगा शिकून पुढे खूप मोठा साहेब होईल असे असे मास्तरांनाही वाटू लागले. शंकरराव दरवर्षी पास होत होते. ते सातवीपर्यंत पोहोचले. त्या काळी सातवी म्हणजे व्हर्नाक्युलर फायनल. त्याला ‘व्ह. फा.’ असे म्हटले जाई. व्ह. फा. झाल्यावर शाळा मास्तर होण्यात अडचण नसायची. यंदाचे वर्ष पूर्ण झाले की, शंकरराव सातवी पास होणारच होते, पण शाळेची फी भरण्यासाठी खापर्डे मास्तरांनी तगादा लावला, फी न भरलेल्या मुलांना शाळेत व परीक्षेस बसता येणार नाही, असे सांगून अशा मुलांना उभे राहायला सांगितले. शंकररावांच्या छातीत धस्स झाल अंगावर काटा उभा राहिला. पण धाडस करून ते गुरुजींना म्हणाले, “यंदा मोठा दुष्काळ पडलाय. एवढी फी भरणे आम्हा गरिबांना अवघड आहे. थोडी थोडी करून फी भरू शकतो.”

गुरुजी म्हणाले, “हा सरकारी कायदा आहे. कायद्यानुसार फी भरली नाही तर परीक्षेला बसता येणार नाही.”

“गुरुजी, गरिबांना फी भरण्यासाठी पैसे मिळाले नाही तर त्यांनी शिकायचंच नाही काय?”

हे ऐकून गुरुजींचा पारा चढला. ते म्हणाले,

“गरिबांबद्दल एवढा कळवळा असेल तर त्यांच्यासाठी फुकटची शाळा काढून शिकवा.”

स्वाभिमानी शंकररावांना हे शब्द फार झोंबले आणि ते उद्गारले,

“एक काय असा छपन्न शाळा काढेन. तुम्ही फक्त कौरव-पांडवांना शिकवत राहा. मी एकलव्यासाठी शाळा काढेन.”

संतापलेल्या शंकररावांनी शाळेला रामराम ठोकला तो कायमचा आणि जीवनाच्या मुक्त विश्वविद्यालयात प्रवेश घेतला तो उदंड कर्तृत्वाचा पर्वत उभारण्यासाठी!

आनंदरावांना लोक अण्णाकाका म्हणून ओळखायचे. परंपरेने घराण्यात मल्लविद्या जोपासली गेली होती. प्रत्येक मुलाने सुसंस्कारित तर व्हावेच, त्यासोबतच त्यांनी उत्तम शरीर कमवायला हवे, यावर वडीलधाऱ्यांचा कटाक्ष असायचा. शंकररावांनी शक्तीची उपासना करायचे ठरविले. पहाटे उठावे, नदीकाठी जावे, जोर-बैठका माराव्यात, दोरावर चढावे, नदीत भरपूर पोहावे. असा त्यांचा दिनक्रम सुरु झाला. सहजपणे दोन-तीन हजार दंड-बैठकांची मेहनत ते करू लागले.

मुलाचे व्यायामाचे व कुस्तीचे वेड लक्षात घेऊन अण्णाकाकांनी वाड्याजवळच पत्रे ठोकून कुस्त्यांसाठी आखाडा तयार केला. सकाळी-संध्याकाळी मुलांना एकत्र करून शंकरराव तालमीत व्यायाम व कुस्त्या करू लागले. लाल मातीत वरचढ मल्लाबरोबर ते लढत देऊ लागले. प्रतिस्पर्ध्याला अस्मान दाखविणे त्यांच्या डाव्या हाताचा मळ झाला होता. कधीकधी वरचढ जोडीदारांकडून पाठही लागायची. जीवनातील जयपराजय व चढउतार पचवायला ही शाला फार उपयोगी पडली.

त्या काळी परिसरात अनेक कुस्त्यांचे फड भरायचे. आतासारखी रोख रकमांची मोठी बक्षिसे नव्हती. पण शंकररावांनी परिसरातील बोरगावच्या भैरोबाच्या जत्रेत, निमगावच्या खंडोबाच्या चंपाष्टीच्या यात्रेत, नातेपुते, कोंडबावी आदी भागात कुस्त्या मारायला सुरुवात केली. सुरुवातीला बक्षीस म्हणून नारळ मिळे. पुढे मानाचा फेटा, चांदीचे कडे ही बक्षीसे त्यांनी मिळवली.

## ....आणि माने-पाटील, मोहिते-पाटील झाले

नारायणराव मोहिते यांना वारसा लाभला होता, तो छत्रपती शिवाजी महाराजांच्या आप्त स्वकीयांपैकी असणाऱ्या घराण्यांमधील मोहिते वंशजांचा.

छत्रपती शिवरायांचे बंधू तंजावर नरेश व्यंकोजीराजे भोसले यांचा चौथा मुलगा तुळजाराजे हा राजकारणी, मुत्सद्दी व विद्याभीलाषी होता. त्यांना एकूण पाच राण्या होत्या. त्यापैकी मोहिनीबाई या अकलूजजवळील टणू (तणू खेडे) येथील मोहिते घराण्यातील होत्या. यावरून मोहिते घराणे हे व्यंकोजीराजे भोसले यांचे व्याही होते. तसेच व्यंकोजीराजांचा वंशज सरफोजीराजा दुसरा यांचीही सोयरीक मोहिते घराण्यात झाली होती. त्यांची मुलगी राजसबाई या देखील मोहिते घराण्याची सून म्हणून आल्या होत्या. 'सिद्धांत विजय' या म. ग. डोंगरे यांच्या ग्रंथातील संदर्भानुसार साताऱ्याच्या छत्रपती भोसले घराण्याच्या आप्तस्वकीय मंडळींच्या यादीमध्ये मोहितेंचा महत्त्वपूर्ण समावेश झाला आहे. त्याच मोहिते घराणयाचे वंशज नारायणराव यांच्याकडे अकलूजची पाटीलकी होती. त्यांचा विवाह त्यांना बारामतीजवळील सणसरच्या निंबाळकर घराण्यातील लक्ष्मीबाईंशी झाला होता. त्यांना कृष्णाई व मथुरा या दोन मुली झाल्या व ऐन तारूण्यात नारायणरावांचा मृत्यू झाला. लक्ष्मीबाई विधवा झाल्या. पुढे कृष्णाई आनंदराव माने-पाटलांना तर मथुरा गणपतराव माने-पाटलांना दिल्या.

शंकररावांच्या आईची आई लक्ष्मीबाई नारायणराव मोहिते-पाटील यांना सर्वजण आदराने कबईआजी म्हणून हाक मारीत असत. कबईआजींचा शंकररावांवर खूप जीव होता. आयुष्यभर एकाकी जीवन कंठल्यावर दोन मुलींची घरभरून नातवंडे पाहून त्यांचा जीव सुपाएवढा व्हायचा. १९१४ सालच्या तुकाराम बीजेदिवशी बाबासाहेबांचा जन्म झाला. मारुतीरायावरील श्रद्धेपोटी बाळाचे नाव मारुतराव ठेवले. १४ जानेवारी १९१८ रोजी मकरसंक्रांती दिवशी शंकररावांचा तर ६ जून

१९२० रोजी सदुभाऊंचा जन्म झाला. कबईआजींनी शंकरराव व सदुभाऊंची नावं ठेवली ती शंभू महादेवाचीच! थोरले मारुतराव ऊर्फ बाबासाहेब व धाकटे सदाशिवराव या दोन कर्तबगार भावंडांचा शंकररावांना खूप आधार वाटे. बाबासाहेब व सदुभाऊ खूपच धाडसी होते.

कबईआजींनी एका नातवाला दत्तक घ्यायचे मनोमन ठरविले होते. बाबासाहेब थोरले म्हणून त्यांनाच दत्तक घ्यायचे अशी मनाशी खूणगाठ बांधली होती; परंतु आपल्याऐवजी शंकररावांनी दत्तक जावे असे बाबासाहेबांना वाटत होते.

एके दिवशी कबईआजी आजारी पडल्या. उपचार सुरू झाले काही स्वार्थी लोकांना कबईच्या संपत्तीपैकी आपल्याला काय मिळेल, यातच स्वारस्य होते. बाबासाहेबांनी दत्तक विधानाच्या कागदपत्रांची व्यवस्था केली. कबईनं भरलेल्या मनानं शंकररावांच्या डोक्यावरून हात फिरवला. कपाळ हुंगलं. गालावरून बोटे फिरवली. डोळ्यांतून आनंदआश्रू वाहू लागले. चेहऱ्यावर विलक्षण तेज विलसले. कबईआजींना कृतार्थ वाटले. जन्म सार्थकी लागल्याचं समाधान वाटलं. शंकररावांचे कायदेशीर दत्तकविधान पार पडलं आणि शंकरराव माने-पाटलांचे शंकरराव मोहिते-पाटील झाले. दत्तकविधानानंतर मात्र कबईआजींची तब्येत खडखडीत बरी झाली.

## शुभमंगल!

शंकररावांच्या स्वातंत्र्य चळवळीत व समाजकार्यात जोरदार हालचाली सुरू होत्या. आता ते पंचवीस वर्षांचे झाले होते. रूबाबदार दिसत होते. कृष्णवर्णाची तेजस्वी मुद्रा, पारदर्शी व भेदक नजर, मेहनतीने कमावलेले भरगच्च शरीर, रुंद व मजबूत खांदे. धोतर, सदरा आणि काळी टोपी, पायात वहाणा असा त्यांचा नेटका पेहराव होता. त्यांच्या बरोबरीच्या अनेकांचे दोहोंचे चार हात झाले होते, पण चळवळ्या शंकररावांना स्वतःच्या लग्नाची भ्रांत नव्हती.

वडील आनंदराव उर्फ अण्णाकाका आणि आईने शंकररावांना साजेशी नवरी शोधायला सुरुवात केली. कबईआजीने (दत्तक आई) येणाऱ्याजाणाऱ्या प्रत्येकाजवळ लग्नासंबंधी बोलणी सुरु केली.

एके दिवशी निंबूत येथील नातेवाईक आप्पासाहेब काकडे अकलूजला वाड्यावर आले. चहापाणी झाल्यावर गप्पा रंगात आल्या आणि मध्येच पाहुण्यांनी शंकररावांच्या लग्नाचा विषय काढला. तुमचा विचार असेल तर मांजर्ड्याच्या खराडे-पाटलाची मुलगी रत्नप्रभा नावाप्रमाणेच रत्नांची खाण आहे. मुलगी नक्षत्रासारखी लाखात एक आहे. यंदा लग्नाचा त्यांचाही विचार आहे. मुगुटराव काकडे म्हणजे प्रतिष्ठित माणूस. त्यांनी सुचविलेले स्थळ म्हणजे तोलामोलाचेच असणार होते.

मांजर्ड्याला खराडे-पाटलांच्या वाड्यात मुलगी पाहण्याचा कार्यक्रम झाला. शंकररावांच्या मनाने आयुष्याच्या जोडीदाराची निवड केली. घरातील सगळ्यांनाच मुलगी पसंत पडली.

सारी वडीलमंडळी लग्नाच्या बैठकीला बसली. खराडे-पाटलांच्या मनावर काळजीचे सावट पसरले होते, कारण पाहुणे हुंडा किती मागतात याची चिंता त्यांना लागून राहिली होती. पण आनंदराव म्हणाले, “आम्हाला नवरी आणि नारळ तेवढा द्या, लग्नसुद्धा आम्हीच करून घेतो.” मुलगी आणि नारळ यावरच आनंदरावांनी शिक्कामोर्तब केल्याने खराडे-पाटलांना आश्चर्याचा धक्काच बसला. सुपारी फुटली आणि लग्न ठरले. शंकररावांनी नववधूसाठी दागिने तयार करवून घेतले. त्यासाठी माणिकलाल दोशी या मित्राकडून उसने पैसे घेतले.

दरम्यान शंकररावांची धाकटी बहीण सुशीलाबाई हिचे लग्न साताऱ्याजवळील देगावच्या कृष्णराव काळे यांचेशी तर शंकररावांचे चुलते गणपतराव यांची मुलगी शांताबाई हिचे लग्न वाईजवळील केंजळच्या श्यामराव जगताप यांच्याशी जमले. तिन्ही लग्ने एकाच मांडवात करायचे ठरले. तारीख २५ मे, १९४३ रोजी हा विवाहसोहळा अकलूजला मोठ्या थाटात साजरा झाला. पुरोहितांच्या मंत्रघोषात,

सप्तपदीच्या पवित्र बंधनातून भावी आयुष्याच्या जोडीदारांनी परस्परांना पुष्पमाला घातल्या.

उंबऱ्यावरील माप ओलांडून रत्नप्रभादेवी, मोहिते-पाटील घराण्याची गृहलक्ष्मी, शंकररावांची सावली बनून जीवनभराची साथ देण्यासाठी त्यांच्या जीवनात आल्या.

जन्म, बालपण व शिक्षण ७

## स्वातंत्र्य चळवळीतील योगदान

तरूण शंकरराव कमालीचे चिकित्सक स्वभावाचे होते. डोळे उघडे ठेवून सतत चिंतन करायचे. लहानपणापासून आजूबाजूच्या परिसरातील लोकांच्या जीवनमानाविषयी, इंग्रजांच्या अन्यायी व जुलमी शासनव्यवस्थेविषयी ते कमालीचे अंतर्मुख झाले. समाजाच्या पर्यायाने राष्ट्राच्या मागासलेपणामागे एकमेव प्रमुख कारण पारतंत्र्य हे आहे आणि आपला देश स्वतंत्र्य झाल्याशिवाय समाजपरिवर्तन व आर्थिक क्रांती होणे अशक्य आहे हे शंकररावांनी ओळखले.

१९३० साली म. गांधींनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु केली. त्यांनी पुकारलेल्या लढ्याला देशभर प्रचंड प्रतिसाद मिळाला. प्रत्येक खेड्यापाड्यातील तरुणांमध्ये स्वातंत्र्यलढ्यासाठीची प्रेरणा चेतविली गेली. सोलापूरला कापडगिरण्या मोठ्या प्रमाणात होत्या. तेथील कामगारांना जागृत करून स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी करण्याचे काम तुळशीदास जाधव यांनी केले. लोकांमध्ये जागृती झाली. इंग्रजांची सत्ता उलथून टाकण्यासाठी मोर्चे, सभा, घोषणा यांना उधाण आले. सोलापूरच्या इंग्रज अधिकाऱ्यांना देशभक्तांचे हे आंदोलन नियंत्रित करणे आवाक्याबाहेरचे होऊन बसले.

९ मे ते १२ मे, १९३० पर्यंत तीन दिवस म्हणजे देश स्वतंत्र होण्याच्या १७ वर्षे आधीच सोलापूरने स्वातंत्र्य अनुभवले! या तीन दिवसांत देशभक्तांनी शहराचा कारभार चालविला. १२ जानेवारी १९३२ रोजी जगन्नाथ शिंदे, मल्लाप्पा धनशेट्टी, कुर्बान हुसेन व किसन सारडा या क्रांतिकारकांना फाशी देण्यात आले. ब्रिटिशांनी स्वातंत्र्यप्रेमींवर गोळीबार केला. यात ४० देशभक्तांनी मातृभूमीवर रक्ताचा अभिषेक घातला. शेकडो तुरुंगात गेले. सश्रम कारावास भोगला. कित्येकांची घरेदारे, जमिनी व संपत्ती जप्त झाली. बायकामुले उघड्यावर आली. युवावस्थेतील शंकररावांच्या कानावर या साऱ्या गोष्टी येत होत्या आणि मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी काहीतरी करायला हवे ही ऊर्मी दाटून येत होती. पंढरपूर

या तीर्थक्षेत्री स्वातंत्र्याच्या विचाराने भारावलेले अनेक देशभक्त जनजागृती करीत होते. याच दरम्यान शंकरराव खेचले गेले ते क्रांतिसिंह नाना पाटील या तेजस्वी देशभक्ताकडे. तरूण शंकररावांनी क्रांतिसिंहांच्या व म. गांधीजींच्या आवाहनाला अनुसरून ब्रिटिश सत्तेविरोधात काम सुरु केले. गांधीजींची सत्याग्रहाची हाक खेडोपाडी पोहोचविण्याचे काम सुरु केले. 'भारत माता की जय ।' 'वंदे मातरम्।' या घोषणा दिल्या तरी तो गुन्हा होत होता. अशा काळात, शंकररावांनी आपल्या सहकाऱ्यांसह गावोगावी महात्मा गांधी व क्रांतिसिंहांचा संदेश पोहोचविला. जनतेमध्ये देशभक्तीची जाणीव जागृत केली.

अनेक स्वातंत्र्यसैनिक या परिसरात कार्यरत होते. १९४२ साली 'चले जाव'ची चळवळ जोरात सुरू झाली. रघुनाथ रामचंद्र माने यांनी मोरोची, धर्मपुरी, शिंदेवाडी, कुरबावी, दहिगाव आदी गावांमध्ये इंग्रजांच्या दडपशाहीविरूद्ध मिरवणूक काढून पत्रके लावली. सरकारविरूद्ध सभा सुरु केली. याचवेळी पोलिसांनी त्यांना अटक केली. त्यांची रवानगी तुरुंगात केली. नातेपुते येथील घरातून जुनी सायकल, भांडी-कुंडी, धान्य व किडूक-मिडूक यांचा सरकारने लिलाव केला. सोलापूर, विसापूर, विजापूर आदी तुरुंगांत त्यांना कारावास भोगावा लागला.

शंकररावांनीही अकलूज परिसरात सरकारविरोधात रान उठवले. एके दिवशी सांगलीजवळच्या पद्माळे या वसंतदादांच्या गावावरून एक माणूस शंकररावांना निरोप घेऊन आला. वसंतदादांनी शंकररावांना तातडीनं पदमाळ्याला बोलविलं होतं. शंकररावांनी दादांची भेट घेतली. गुप्तपणे इंग्रजांच्या विरोधात संघर्ष करण्याचा मंत्र घेऊन शंकरराव परत आले.

धाकटे बंधू सदुभाऊ, शिवदास कुंभार, नाना गवळी, श्रीधर गवंडी अशी काही मोजकी माणसं घेऊन ते आपल्या नीरेकाठच्या शेतात गेले. ते सहकाऱ्यांना म्हणाले, "आपण सगळेच जर तुरुंगात गेलो तर इंग्रजांच्या

विरोधात कोण लढणार? लोकांना हिंमत कोण देणार?" असा सवाल करून त्यांनी चळवळीचे शिंग फुंकले. पोलिसांच्या हाती न सापडता काम करण्याचे त्यांनी नियोजन केले. इथल्या चळवळीतल्या लोकांना बॉम्ब तयार करणे, बंदुका चालविणे व इंग्रजांच्या विरोधात सशस्त्र संघर्ष करण्यासाठी प्रशिक्षण देण्यासाठी सांगलीहून जयराम कुष्ठे नावाचा एक तज्ज्ञ माणूस वसंतदादांनी शंकररावांना दिला होता. सदुभाऊ शस्त्रे चालविण्यात निपुण झाले.

त्याच दरम्यान सोलापूर व पुणे जिल्ह्यांना जोडणाऱ्या सराटीच्या पुलाचे बांधकाम सुरु होते. त्या ठिकाणी सामान ठेवण्यासाठी जो निवारा केला होता, त्यातच वसंतदादांनी पाठविलेला दारूगोळा व शस्त्रे ठेवली जायची. याकामी शंकररावांनी सरकी अधिकाऱ्यालाच आपलेसे केले होते. याच परिसरात नाना पाटलांचे प्रतिसरकारचेही काम चालू होते. शंकररावांनाही अकलूजमधून ब्रिटिश सत्ता हद्दपार करायची होती. त्यासाठी ते कामाला लागले. शेख हवालदार हा देशभक्तीने भारावलेल्या तरूणांवर करडी नजर ठेवून होता. त्याने एके दिवशी रायचंद गांधी नावाच्या वडीलधाऱ्या माणसाला फरफटत पोलीस चौकीत नेले आणि त्यांना तुरुंगात टाकले. या शेख हवालादाराला चांगली अद्दल घडविण्याचे शंकररावांनी ठरविले. त्यांनी भानुदास खिचडे व नाना गवळी यांना शेख हवालदाराच्या सायकलवर हातबॉम्ब फेकण्यास सांगितले. यात हवालदार जगला पाहिजे व पोलिसांना जरब बसली पाहिजे असा उद्देश होता. ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी त्या दोघांनी हवालदाराच्या सायकलवर हातबॉम्ब फेकला. इकडे शंकररावांनी तिरंगी झेंडे फडकविले व भारतमातेच्या जयजयकाराच्या घोषणा दिल्या. सबंध तालुक्यात इंग्रज सरकारविरोधात चळवळीने जोर धरला. मळोलीचे तुकाराम जाधव, नारायणराव जाधव, निमगावचे बळवंतराव मगर यांच्या बरोबरीने प्रल्हाद मगर व एकनाथ मगर, खंडाळीचे धर्मराज पताळे, माळीनगरचे मारूतीराव कुदळे, अकलूजचे विठ्ठलराव गायकवाड

आदींनी काँग्रेसच्या झेंड्याखाली चळवळ सुरू केली. शंकरराव व त्यांचे बंधू यात अग्रेसर होते. क्रांतिसिंह नाना पाटलांच्या इशाऱ्यावरून इंग्रज सरकारच्या विविध यंत्रणा नेस्तनाबूत करण्याचा चंग सर्वच कार्यकर्त्यांनी बांधला. या परिसरातील इंग्रजांच्या टेलिफोनच्या तारा तोडण्यात आल्या. टपालपेट्या उद्ध्वस्त करण्यात आल्या. देशद्रोही लोकांवर जरब बसविण्याचे काम या परिसरात शंकररावांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. स्वातंत्र्य चळवळीची माहिती देणारी पत्रके, बुलेटिन्स वाटणे, लोकांना चळवळीतील घडामोडींची माहिती करून देणे अशी कामे त्यावेळी हे स्वातंत्र्यसैनिक करीत होते. गावोगावी हातात झाडू घेऊन स्वच्छता करणे व संध्याकाळच्या वेळेस बत्तीच्या किंवा मशालींच्या उजेडात सभा घेतल्या जात होत्या. स्वातंत्र्य चळवळीने गती घेतली होती.

१९४२ ते ४६ या काळात देशभर ब्रिटिशांच्या विरोधात मोठे वादळ निर्माण झाले होते. संपूर्ण देशात साताऱ्याचे बंड अग्रेसर होते. त्याचे मेरुमणी क्रांतिसिंह नाना पाटील हे होते. माळशिरसचा हा परिसर सातारा जिल्ह्याच्या कक्षेतच येत होता. त्यामुळे इथला लढाही तीव्र होता. अकलूज हे भूमिगत देशभक्तांचे आश्रयस्थान बनले.

१९४६ साली प्रांतिक निवडणुका झाल्या. काँग्रेसने सूत्रे हाती घेतली. नाना पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांवरील खटले सरकारने २५/०४/१९४६ रोजी मागे घेण्याचा हुकूम काढला. सर्व भूमिगतांवरील पोलीस चौकशीचे दावे रद्द करण्यात आले, आणि क्रांतिसिंहांचा विजय झाला. ५ मे, १९४६ रोजी कराड तालुक्यातील कोनेगाव येथे सारे भूमिगत स्वातंत्र्यसैनिक व क्रांतिसिंह नाना पाटील जाहीर सभेत प्रकट झाले. त्या दिवशी शंकरराव मोहिते-पाटील आपल्या सर्व सहकाऱ्यांना घेऊन कोनेगावला गेले. तिथे क्रांतिसिंहांची प्रचंड सभा आयोजित केली होती.

शंकररावांनी आपले सहकारी रघुनाथ माने गुरुजींवर नाथाजी लाड यांना भेटून क्रांतिसिंहांना अकलूजला आणण्याची कामगिरी सोपविली.

जिल्हा काँग्रेस समितीचे सेक्रेटरी एम.डी.विभूतेंना घेऊन माने गुरूजी नाथाजी लाडांना भेटले. सर्वांनी मिळून शंकररावांच्या आग्रहाखातर अकलूजला येऊन या परिसरात सभा घेण्याचे निश्चित केले. दिनांक २० मे, १९४६ रोजी अकलूजकडे क्रांतिसिंहांचा दौरा येऊ लागला होता. वीस जीप, सात ट्रक, बऱ्याच मोटारसायकली, सायकली, शेकडो तुफान सैनिक व हजारो कार्यकर्ते यात सामील झाले. अकलूजकडे येताना त्यात भर पडत गेली. ज्या इंग्रजांच्या राज्यावर सूर्य मावळत नव्हता, त्या घमेंडी ब्रिटिश सत्तेविरोधात ज्या नान पाटलांनी तुफान सेनेची उभारणी केली, न्यायदान मंडळ स्थापून ग्रामस्वराज्य उभे केले, चारशे गावांमध्ये चव्वेचाळीस महिने प्रतिसरकारचा कारभार चालविला, इंग्रजांचे खजिने लुटले. देशद्रोह्यांना सळो की पळो करून सोडले, त्या लाडक्या क्रांतिसिंहांना पाहण्यासाठी अकलूजमध्ये जनसागर उसळला होता. मिरवणूक सुरू झाली. ढोल, ताशे, लेझीम वाजू लागले. हजारो लोकांनी क्रांतिसिंहांना पुष्पहार अर्पण केले. एक ट्रक गच्च भरेल इतके पुष्पहार गोळा झाले होते. माळकरी असणाऱ्या व निरपेक्षणे देशसेवा करणाऱ्या क्रांतिसिंहांचे डोळे भरून दर्शन अकलूजकरांनी घेतले. मिरवणुकीचे रूपांतर सभेत झाले. ‘न भूतो न भविष्यती’ अशी तोबा गर्दी पहिल्यांदाच इथे पाहायला मिळत होती. क्रांतिसिंहांचे जोशपूर्ण भाषण झाले. त्यांच्या जयजयकाराने अकलूजचा आसमंत निनादून गेला.

सभेनंतर क्रांतिसिंह नाना पाटील शंकरराव मोहिते-पाटलांच्या वाड्यावर जेवणासाठी गेले. सर्व तुफान सेनेच्या सैनिकांचीही जेवणाची व्यवस्था शंकररावांनी केली होती. सरपंच असणाऱ्या तरूण शंकररावांशी क्रांतिसिंहांनी मनमोकळेपणाने गप्पा मारल्या आणि भावी योजनांविषयी चर्चा केली. त्यांनी शंकररावांच्या पाठीवर थाप टाकून त्यांना समाजरचनेसाठी आशीर्वाद दिला. शंकररावांना नवा हुरूप आला होता.

१५ ऑगस्ट, १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाले याचा सर्वत्र विजयोत्सव साजरा होत होता. शंकररावांनी स्वातंत्र्य चळवळीत मोठे

योगदान दिलेलेच होते. अकलूजमध्ये शंकररावांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. आता इथून पुढे भारतभूमीवर तिरंगा मोठ्या डौलाने फडकू लागला होता.

भारतमाता, महात्मा गांधीजी व क्रांतिसिंह नाना पाटलांच्या जयजयकाराने अकलूज दुमदुमले. प्रभातफेऱ्या काढण्यात आल्या. दीडशे वर्षांच्या प्रदीर्घ पारतंत्र्यातून देश स्वतंत्र झाला होता. बलाढ्य ब्रिटिश साम्राज्याविरोधात महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीयांनी विजय मिळविला होता. स्वराज्य मिळाले होते. शंकररावांचे लक्ष आता स्वराज्याचे सुराज्य निर्माण करण्यावर केंद्रित झाले होते. सर्व दुःखांचे मूळ अज्ञान. या अज्ञानाच्या अंधारात शिक्षणाचा प्रकाश आणायचे आणि समाजाला उजळून टाकायचे शंकररावांनी ठरविले.

## नेता गवसला

सुपरवायझिंग युनियनच्या अध्यक्षपदी

तालुक्यातील विविध सहकारी संस्थांवर नियंत्रण ठेवणारी सुपरवायझिंग युनियन नावाची एक संस्था त्या काळी होती; परंतु ती हवी तितकी प्रभावी नव्हती. १९४३ साली मळोलीचे तुकाराम जाधव, तांबव्याचे लालासाहेब इनामदार, उघडेवाडीचे बाबासाहेब देशमुख, खंडाळीकर धर्मराज पताळे या सर्वांनी शंकररावांचे नेतृत्वगुण हेरून त्यांना सुपरवायझिंग युनियनच्या अध्यक्षपदाचे उमेदवार म्हणून नाव निश्चितच केले. तेव्हा मितभाषी शंकररावांनी या पदासाठी ज्येष्ठ मंडळी असताना आपण अध्यक्ष होणे पसंत नाही, असे नम्रपणे सांगितले. या ज्येष्ठ मंडळींनी बाबासाहेबांना गळ घातली. थोरल्या भावाचा शब्द शंकररावांसाठी प्रमाण होता, हे सर्वांना माहीत होते. बाबासाहेबांनी शंकररावांना अध्यक्षपदाची निवडणूक लढण्यास सांगितले.

फॉर्म भरला गेला. शंकरराव तरूण व निवडणुकीच्या प्रांतात अगदीच नवखे होते. माळशिरस तालुक्याच्या सुपरवायझिंग युनियनच्या अध्यक्षपदाची निवडणूक अत्यंत चुरशीची लढत झाली. त्यात शंकरराव केवळ एक मत जादा मिळवून विजयी झाले.

स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग, पाटीलकी असल्याने समाजातील सर्वांचे प्रश्न सोडविण्यातच शंकररावांचा जास्त वेळ खर्ची पडू लागला. मुळातच चळवळीतील स्वभाव, समाजातील अन्याय, दारिद्य व मागासलेपणाबद्दल सदैव चिंतन केल्यामुळे लोकांसाठी ते जास्त वेळ देत असत. एकूण दुष्काळी परिस्थिती, बेभरवशाच्या शेतीतून पुरेसे उत्पन्न येत नव्हते. त्यामुळे शंकररावांची आर्थिक परिस्थिती खालावली होती. पाटीलकीला शोभेल असं वागावं तर लागत होतं. घरी येणारेजाणारे खूप. त्यांना जेवण केल्याशिवाय परत पाठवायचं नाही हा रिवाज. शिवाय बाराबलुत्यांनाही सांभाळावं लागायचं. सालभर राबूनही पोटापुरतं धान्य पिकणे मुश्कील होतं.

सासवडच्या माळी लोकांनी अकलूजच्या पूर्वेला लागूनच साखर कारखाना काढला होता. त्या कारखान्यात नोकरी करून चार पैसे कमवावे व इतर वेळेत समाजकार्य करावे असा विचार शंकररावांच्या डोक्यात नाइलाजाने आला. त्यांनी काळी टोपी घातली आणि सायकलवर बसून ते माळीनगरला गेले. सायकल फाटकाबाहेर लावून ते मॅनेजरला भेटण्यासाठी गेले. शंकररावांचे नाव पंचक्रोशीत झाले होते, ते एक चळवळीतील कार्यकर्ता म्हणून. अकलूजचा कर्तव्यदक्ष पाटील म्हणून. शंकररावांनी मॅनेजरसाहेबांना स्वतःची ओळख करून दिली आणि मला तुमच्या कारखान्यात नोकरी हवी आहे. मला लेखन, वाचन व हिशेब चांगला करता येतो, हे सांगितले. हे ऐकून मॅनेजरला आश्चर्याचा धक्का बसला आणि त्यांनी शंकररावांना विचारले “म्हणजे तुम्ही आमच्याकडं नोकरी करणार?” शंकररावांनी होकारार्थी मान हलविली. मॅनेजरसाहेब विचारात पडले आणि थोड्या वेळाने म्हणाले, “तुम्ही एक अर्ज करा आणि परवा मला येऊन भेटा. तोपर्यंत तुम्हाला कोणत्या विभागात काम द्यायचं ते मी ठरवून ठेवतो.”

शंकररावांनी वाड्यावर सर्वांना ही बातमी सांगितली. तेवढेच चार पैसे हातात येतील, या हिशेबानं शंकररावांनी नाइलाजाने नोकरी करण्याचा निर्णय घेतला होता. वडील बंधू मारूतराव ऊर्फ बाबासाहेबांना ही गोष्ट समजली. तेव्हा त्यांना धक्का बसला आणि ते व्याकुळ झाले. कारण आपला धाकटा भाऊ खूप गुणी आहे. भविष्यात मोठमोठ्या गोष्टी करून दाखविण्याची क्षमता त्याच्यात आहे. घरालाच काय, साऱ्या समाजाला दिशा देण्याचं अवसान त्याच्यात आहे. ज्या शंकररावांकडून भविष्यात साखर कारखाना काढण्याची महत्त्वाकांक्षा बाळगली होती, तेच आता माळीनगरला कारखान्यात नोकरी करायला जाणार. स्वतःलाच जखडून टाकणार आणि आपण पाहिलेली स्वप्नं विरून जाणार या कल्पनेनंच बाबासाहेबांचं मन विषण्ण झालं. ते शंकररावांना म्हणाले, “शंकरराव, माझी व साऱ्यांचीच तुमच्याकडून खूप मोठी अपेक्षा आहे.

तुम्ही भव्य असं काहीतरी उभं करावं असं मला वाटतं, तेवढी ताकद तुमच्यात निश्चितच आहे.”

शंकरराव म्हणाले, “आपली आर्थिक परिस्थिती खूपच नाजूक बनलीय. काहीतरी काम केल्याशिवाय चार पैसे कसे मिळणार?”

बाबासाहेबांना दुःख झाले, ते बोलते झाले. म्हणाले, “शंकरराव, तुम्ही पाटील आहात. पाटलाने स्वतःची गरिबी हटविण्यापेक्षा गावाची गरिबी हटवायला पाहिजे. काहीतरी केलं पाहिजे. शून्यातून विश्व निर्माण करण्यासाठी काहीतरी करा.” असं बोलून खिन्नपणे बाबासाहेब सोप्यावर झोपायला निघून गेले. पण त्यांचा डोळा लागला नाही. शंकररावांनी खूप विचार केला. दुसरे दिवशी ते बाबासाहेबांना भेटून म्हणाले, “मी नोकरी करण्याचा विचार काढून टाकला आहे. तुमच्या इच्छेनुसार मी काम करीन.” हे ऐकून बाबासाहेबांना खूप आनंद झाला.

सहकाराच्या चळवळीचे वारे खेडोपाडी वाहायला सुरुवात झाली होती. अकलूजमध्ये एक विविध कार्यकारी विकास सेवा सोसायटी स्थापन झाली होती. या सोसायटीमार्फत शेतकऱ्यांची प्रगती करणे शक्य होईल असा त्यांना विश्वास वाटत होता. विचारमंथनातून त्यांच्या डोक्यात अनेक संकल्पना निर्माण होत होत्या. आपल्या विकासासंबंधीच्या कल्पना ते विकास सोसायटीच्या पंचांजवळ बोलून दाखवू लागले. पंचांनाही शंकररावांचे म्हणणे पटू लागले. शंकररावांची आस्था पाहून २० ऑगस्ट १९४४ रोजी सोसायटीची सभा बोलविली आणि शंकररावांना संस्थेचे सभासद तर करून घेतलेच, पण कार्यकारी समितीचे पंच म्हणूनही त्यांची निवड करण्यात आली. पंच म्हणून सहकाराच्या प्रांतात शंकररावांचे पहिले पाऊल पडले होते.

## अकलूजचे सरपंच

अकलूज ग्रामपंचायतीची निवडणूक समोर येऊन ठेपली होती. शंकररावांकडे धनशक्तीचा अभाव होता, पण जनशक्ती प्रचंड होती. सर्व तरुणांना शंकररावांनी बैठकीला बोलविले आणि भावी योजनेची कल्पना

सर्वांना दिली. त्यांनी निवडणुकीसाठी आपले पॅनल उभं करायचे असं मनोमन ठरविले. त्या पॅनलला नाव देण्यात आलं ‘प्रगती पॅनल’. त्यात बापू जैन, शिवदास कुंभार, माणिकलाल शेठ, रमणलाल व्होरा आदी तरूण व उमदे उमेदवार होते. शंकररावांनी आपल्या मोर्चेबांधणीला सुरुवात केली. अवघड समजल्या जाणाऱ्या वॉर्ड क्र. २ मधून त्यांनी आपली उमेदवारी दाखल केली. त्यांना निवडणूक चिन्ह मिळालं ‘दिवा’.

अशिक्षित मतदार निवडणूक प्रक्रिया व मतदान याबद्दल अनभिज्ञ होता. मतदानाबद्दल सर्वांना जागृत करण्यासाठी शंकररावांनी खूप परिश्रम घेतले. मुळातच तरूण शंकरराव लोकांना हवेहवेसे वाटत होते. त्यांना असलेली मातृभूमीबद्दलची तळमळ, सर्वसामान्य समाजाच्या दुःखाची व वेदनांची जाणीव मतदारांना माहीत होती. त्यांनी एकूण अकरा उमेदवारांचे पॅनेल उभे केले होते. मतदानाचा दिवस उजाडला. अकलूजकरांनी मतदानाचे कार्य पार पाडले. दुसऱ्या दिवशीच माळशिरसला निकाल होता.

मतमोजणी सुरू झाली. अकलूजकरांनी प्रगती पॅनेलच्या बाजूने मतदान केले आणि अकरापैकी नऊ प्रगती पॅनेलने जिंकल्या. या विजयाचे शिल्पकार होते शंकरराव! अकलूजमध्ये शंकररावांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. निवडून आलेल्या सर्वांनी शंकररावांनाच सरपंचपदासाठी निवडले आणि शंकरराव अकलूजचे सरपंच झाले.

## हरिजनांस मंदिर प्रवेशासाठी सानेगुरुजींचे उपोषण व शंकररावांचा सक्रिय पाठिंबा

पंढरपूर म्हणजे महाराष्ट्राची आध्यत्मिक राजधानी. उभ्या महाराष्ट्रातील लोकांचे श्रद्धास्थान. शेकडो वर्षांपासून अनेक संतांनी चंद्रभागेच्या वाळवंटात कीर्तनांच्या माध्यमातून जागर उभा केला होता. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, रोहिदास, चोखा, गोरा इत्यादी अनेक संतांनी समाजातील लोकांचे दुःख नष्ट करण्यासाठी भक्तिमार्गाचा संदेश

दिला होता. आजही केवळ महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील अनेक भाविक पंढरपूरला विठूरायाच्या दर्शनाला येतात. आषाढी-कार्तिकीला तर भक्तिसागराला भरती येते. आषाढीवारीला तर खेड्यापाड्यातील लोक शिळ्या भाकरीचे तुकडे खाऊन, अनवाणी पायांनी पांडुरंगाच्या ओढीने शेकडो मैलांचा प्रवास करून येतात. लाखोंच्या संख्येने येणाऱ्या या सर्वच भाविकांना विठूरायाच्या मुखाचे व चरणांचे दर्शन मिळत होतेच असे नाही. हजारो वर्षांपासून दलितांवर अनेक बंधने घातली गेली होती. आपण अस्पृश्य असल्यामुळे इतरांना आपला स्पर्श होऊ नये म्हणून हरिजन जपून राहायचे. जनावरांनादेखील चांगली वागणूक दिली जात होती. पण ही माणसं असून त्यांना देव, धर्म, रूढी व परंपरा बडगा दाखवून तथाकथित सनातन्यांनी व उच्चवर्णीयांनी बंधने घातली होती. माणसांना माणसांपासून अलग करणारा धर्म असूच शकत नाही. खोट्या अहंकारापोटी व श्रेष्ठत्वापोटी अस्पृश्यतेचे स्तोम माजविणारेच खऱ्या अर्थाने मानवतेचे शत्रू असतात.

सानेगुरुजींसारख्या मातृहृदयी माणसाला हरिजनांविषयी अपार कळवळा होता. त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराने सानेगुरुजी संतप्त झाले व त्याविरोधात बंड करायचा सानेगुरुजींनी निश्चिय केला. शंकरराव अंतर्मुख होऊन या साऱ्या व्यवस्थेवर चिंतन करू लागले.

१ मे १९४७ रोजी सानेगुरुजींनी पंढरपूरच्या चंद्रभागेच्या वाळवंटात जाहीर सभा घेतली. तरूण शंकररावांच्या कानावर हा सारा तपशील आला. सनातन्यांनी गुरुजींना, 'जाव साने भीमापार। नही खुलेगा विठ्ठलद्वार।' अशा घोषणा दिल्या. सानेगुरुजींच्या तरूण सहकाऱ्यांनी, 'सानेगुरुजी करे पुकार। खोलो विठ्ठलमंदिर द्वार ।' अशा प्रतिघोषणा दिल्या व त्याच दिवशी तनपुरे मठात सानेगुरुजींनी हरिजनांच्या मंदिर प्रवेशासाठी प्राणांतिक उपोषण आरंभले. वातावरण तापू लागले. अनेक लोक गुरुजींना पाठिंबा देण्यासाठी धावून आले. शंकरराव अस्वस्थ झाले. माणसाला माणूस म्हणून जगायचे असेल तर त्याचा आत्मसन्मान जिवंत

राखला पाहिजे या विचाराचे शंकरराव होते. त्यांनी आपल्या समतावादी व परिवर्तनवादी विचारांच्या तरूणांना बरोबर घेतले व पंढरपूर गाठले. "तुम्ही आरंभलेल्या उपोषणाला व तुमच्या भूमिकेला पाठिंबा देण्यासाठी आपण आलो आहोत." असे त्यांनी गुरुजींना सांगितले. गुरुजींनी या तरूण मंडळींच्या भूमिकेबद्दल आनंद व्यक्त केला. आपल्या सहकाऱ्यांना घेऊन त्यांनी मंदिरात प्रवेश केला व सर्वांना दर्शन घडविले. यावेळी गुरुजींना उपोषण सोडण्याची विनंती केली.

अकलूजला आल्यावर त्यांच्या अंतर्मनात विचारांची वादळे निर्माण झाली. त्यांनी हनुमान मंदिरात सर्व हरिजनांना बोलविले. आतापर्यंत कुणाही हरिजनाने मंदिरात प्रवेश केला नव्हता. ते शंकररावांनी केले व मंदिरातच सर्व हरिजन बांधवांबरोबर सहभोजन केले. सरपंच असणाऱ्या तरूण शंकररावांचे हे वागणे परंपरावादी विचारसरणीच्या लोकांना जरी पटले नव्हते तरी त्यांनी शंकररावांना थोपवले नाही. ते एवढ्यावरच थांबले नाहीत तर त्या काळी हरिजनांसाठी पाण्याचे सार्वजनिक हौद, विहिरी मुक्त केल्या. आपल्या दलित गावकऱ्यांच्या घरी चहापान करायला सुरुवात केली. दलितांसाठी गावातील हॉटेलांमध्ये प्रवेश खुला केला व त्यांना विरोध करणाऱ्यांवर जरब बसविली. हळूहळू शंकररावांची मानवतावादी भूमिका सर्वांना पटू लागली.

मातंग समाजातील बहुतेक लोक त्या काळात केकतीपासून वाख तयार करणे व वाखापासून दोरखंड, कासरे, नाडे, शिंकी, गोफण, मुस्की आणि दावणी इत्यादी उपयोगी वस्तू बनविण्याचा व्यवसाय करीत. त्यांच्यासाठी जमिनी उपलब्ध करून दिल्या. सहकारी बँकेकडून कर्जे उपलब्ध करून दिली. वाख उद्योगासाठी गोडाऊन व कार्यालय उपलब्ध करून दिले.

एकदा अकलूजमधील घोटीच्या मांगवाड्याला आग लागली. शंकरराव धावतच तिथे गेले. आग विझविण्यासाठी स्वतः प्रयत्नांची शिकस्त केली. पण अग्नीपुढे इलाज चालेना. कित्येक दलितांचे संसार

भस्मसात झाले. शंकररावांनी लगेच पदरमोड करून त्यांच्या घरासाठी खिडक्या, दारे, कपडे व धान्य आदी अत्यावश्याक वस्तुंची व्यवस्था केली. दलित बांधवांच्या सुखदुःखात सहभागी होऊन त्यांच्या उत्कर्षासाठी झटत राहण्याचा महात्मा फुले, राजर्षी शाहू व डॉ. आंबेडकरांच्या परिवर्तनाचा वसा त्यांनी घेतला होता.

**शंकररावांना कारावास**

तडफदार शंकरराव अनेक सार्वजनिक कामांमध्ये अग्रभागी होते. सदुभाऊ आणि बाबासाहेब हे दोघेही बंधू शंकररावांच्या वेगवेगळ्या कल्पनांना खतपाणी घालत होते. विधायक उपक्रम करण्यासाठी व सर्वसामान्यांचं जगणं सुसह्य करण्यासाठी हे तिघेही बंधू धडपडत होते. लोकांचा त्यांना मिळत असलेला पाठिंबा न पाहवणारेही काही होतेच. पण सरळमार्गी शंकररावांसमोर येऊन बोलण्याची त्यांची हिंमत होत नव्हती.

स्वातंत्र्य चळवळीत काम करत असताना अनेक चांगलेवाईट अनुभव त्यांच्या गाठीला होते. नुकतेच स्वराज्य मिळाले होते. स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर करण्याचे मनसुबे शंकरराव आपल्या सहकाऱ्यांसमवेत आखत असतानाच नथुराम गोडसे या माथेफिरूने महात्मा गांधींवर गोळ्या घालून त्यांची हत्या केली. शंकररावांवर महात्मा गांधींच्या विचारांचा खूप पगडा होता. देशाच्या स्वातंत्र्यासाठी महात्माजींनी सर्व सुखांचा त्याग करून इंग्रजांच्या विरोधात अहिंसक मार्गाने लढा देऊन अखेर देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले होते. महात्माजींच्या हत्येचे पडसाद देशभर उमटले. देशभर दंगे उसळले. त्याचे लोण ग्रामीण भागात येऊन पोहोचले. अनेकांची घरे पेटवून देण्यात येऊ लागली.

शंकरराव व त्यांचे बंधू अकलूजमध्ये पेटलेला वणवा विझविण्यासाठी धडपडत होते. बाबासाहेब व सदुभाऊंनी समाजसंकटांवर बळाचा वापर करून वचक बसविला होता. गांधींच्या खुनाची संधी साधून या तीन बंधूंच्या विरोधात सरकारकडे तक्रार अर्ज

दिले. त्यांच्यावर दहशतवादी व गुंडगिरीचे नाना आरोप केले गेले. सामाजिक सुरक्षेच्या नावाखाली शासनाने बाबासाहेब, शंकरराव व सदुभाऊ या तीन बंधूंबरोबरच जनार्दन माने, किसन बारटक्के, राम बिटे व याकूब तांबोळी यांच्यावर अटक वॉरंट काढले. सोलापूरच्या मॅजिस्ट्रेटसमोर तिघा भावांना हजर करण्यात आले. पुढील न्यायालयीन चौकशी होईपर्यंत सर्वांनाच वेगवेगळ्या तुरुंगात पाठविण्यात आले. सदुभाऊंना विसापूरला, बाबासाहेबांना पंढरपूरला तर शंकररावांना कर्नाटकात हिंडलग्याला पाठविण्यात आले.

ज्या तुरुंगात शंकरराव होते, तेथे डी. डी. देशमुख नावाचे जेलर होते. त्यांनी शंकररावांकडे पाहिलं. त्यांच्याकडे पाहून हा माणूस विध्वंसक वृत्तीचा मुळीच नाही अशी त्यांची खात्री झाली. शंकररावांची रवानगी राजकीय कैद्यांच्या विभागात केली गेली. तिथे डी. जी. साने नावाचे समाजवादी कार्यकर्ते त्यांना भेटले. ते अभ्यासू व विचारवंत होते. त्यांची शंकररावांशी चांगलीच ओळख झाली. विचार जुळले. ते शंकररावांना म्हणाले, “तुरुंगवासाकडे सकारात्मकतेने बघा. अनेक मोठ्या लोकांना या मार्गातून जावं लागलं आहे”. दत्ता देशमुख, भापकर अशा अनेक चळवळ्या व विचारवंत कार्यकर्त्यांमध्ये शंकरराव सामील झाले होते. तिथे रोज विचारांची मेजवानी सुरू झाली होती. ‘सहकार’ या विषयावर तुरुंगात खूप चर्चा झाली.

पाच महिने हिंडलग्याला ठेवल्यानंतर त्यांची रवानगी येरवडा कारागृहात केली गेली. तिथंही अनेकजण भेटले. दोन्ही कारागृहांत त्यांनी प्रचंड वाचन केले. विविध विषयांवरची पुस्तके, नियतकालिके यांचे खूप वाचन करण्यात पुरेसा वेळ मिळाला. तिथं चार महिने झाल्यावर पुन्हा सोलापूरच्या कारागृहात नेण्यात आले. सकाळी लवकर उठून प्रार्थना म्हणावी. मनन, चिंतन करावे, बौद्धिक चर्चा करावी, असा त्यांचा दिनक्रम चालला होता. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे साहेबांना समोरच्यांवर प्रभाव पडण्यासाठी आपली आपली देहबोली कशी असावी

याचेही शिक्षण अप्रत्यक्षरीत्या मिळाले. एक दिवस जेलरनं त्यांना बोलावून घेतलं आणि लेखी माफी मागून सुटका करून घेण्यास सांगितले.

शंकरराव म्हणाले, “मी जर लेखी माफी मागितली तर त्याचा अर्थ असा होईल की, मी गुन्हेगार आहे. मी गुन्हेगार नसताना अशी माफी मागणार नाही.”

तिघे भाऊ तुरुंगात गेल्यामुळे घराची वाताहत झाली. त्यात पाऊस पडला नाही. त्यामुळे आणखी हाल होऊ लागले. घरातील धान्य संपत आलं. खर्चाला पैसा मिळेनासा झाला. व्याजानेही पैसा मिळेना. आनंदरावअण्णा आपली मुले सोडविण्यासाठी धडपड करू लागले. पण त्याचा उपयोग होईना. त्यांच्या विरोधकांना याचा खूप आनंद झाला. आनंदरावांनी मुगुटराव काकडे व भिकुलाल निंबाळकरांबरोबर खटपटी चालू ठेवल्या.

मुंबई इलाख्याचे मुख्यमंत्री मोरारजी देसाईंच्या हातात सर्व सूत्रे होती. त्यांच्या कानांवर आपली कैफियत घालण्याचा सर्व कुटुंबीयांनी निश्चय केला. पुण्यात कौन्सिल हॉलमध्ये मोरारजी येणार होते. तिथं त्यांना भेटता येईल असं समजलं. चार वर्षांचे विजयदादाही मोठ्या माणसांबरोबर पुण्यात गेले. विरोधकांनी पाटलांचा विजय नावाचा मुलगा गावात बंदूक घेऊन फिरतो व दहशत पसरवितो असा आरोप केला होता. शेवटी मोरारजींना भेटण्यासाठी कृष्णाबाई आणि आनंदरावअण्णा आत गेले. कृष्णाबाईंनी मोठ्या तडफदारपणे सर्व आरोप फेटाळले. त्यांनी लहानग्या विजयला मोरारजींपुढे उभं केलं आणि विचारलं, “हा मुलगा बंदूक घेऊन फिरण्याएवढा आहे का?”

मोरारजींच्या लक्षात आले की, हे प्रकरण वैयक्तिक सूडभावनेने केले गेले आहे. सर्वांच्या मुक्ततेचे आश्वासन मिळाल्यावर आक्कांना खूप आनंद झाला. आनंदरावअण्णांनी आपली बाजू मांडणारा अर्ज केला आणि तिघांच्याही मुक्ततेचा मार्ग मोकळा झाला. तुरुंगातून सुटका झाल्यावर गावकऱ्यांनी आनंदोत्सव साजरा केला. आता शंकरराव मुक्त होऊन

समाजोपयोगी कामांकडे लक्ष पुरविणार होते. त्याचबरोबर कुटुंबालाही सावरणार होते.

## कृषी उत्पन्न बाजार समिती

शंकररावांचे नाव आतापर्यंत सगळीकडे झाले होते. मुळातच प्रसन्न व रुबाबदार व्यक्तिमत्त्व आणि विचारी माणूस. सामाजिक काम सुरू होतेच पण, 'प्रपंच करावा नेटका' हे सूत्र त्यांनी चांगलं जाणलं होतं. लोकांचे प्रश्न सोडविणे हे काम वाटते तितके सोपे नव्हते. पावलोपावली पैसा लागायचा. शंकरराव स्वतः शेतात राबायचे. आपल्या शेतात उसासारखे नगदी पीक घेतल्याशिवाय डोक्यावरचं ओझं कमी होणार नाही असा विचार करून त्यांनी पाच नंबरच्या शेतात ऊस लावला. त्यासाठी पूर्वमशागत, खतं, बेणे, लागवड, खुरपणे व इतर कामे त्यांनी केली. जोमदार पीक पाहून त्यांना खूप आनंद झाला. यंदाच्या वर्षी आपण कर्जातून मोकळं तर होऊच, पण पुढची अनेक कामं मार्गी लागतील असा मनसुबा रचला. बघता बघता ऊस तोडणीला आला. गुऱ्हाळ गाळणे हे काम तोंडाचे नव्हते, म्हणून त्यांनी माळीनगरच्या कारखान्यात ऊस घालावयाचे ठरविले. त्यांनी थेट हरिभाऊ गिरमेंना गाठलं आणि ऊस नेण्याविषयी विनंती केली. परंतु बाहेरचा ऊस घेण्यास त्यांनी असमर्थता व्यक्त केली. त्यांच्या ठराविक सभासद लोकांचाच ऊस ते घेत. शंकररावांचे मन विषण्ण झाले. आतापर्यंत बांधलेले सर्व मनसुबे क्षणात उधळले गेले. शंकरराव विचार करू लागले.

"आपल्यासारखेच असे कितीतरी गोरगरीब शेतकरी असतील की ज्यांनी रक्त आटवून, ढोर मेहनत घेऊन ऊस मोठा केला असेल. त्यांच्यापुढेही असेच प्रश्न असतील. त्यांनी काय करायचं?" असा विचार करीत अकलूजकडे येऊ लागले. डोक्यात विचाराची चक्रे आणि अडचणीची परिस्थीती यामुळे ते आणखीच अंतर्मुख झाले. पण आव्हानांना हार जातील ते शंकरराव कसले? प्रश्न आहे म्हणजे उत्तरही असतेच.

त्यांनी आपल्या ऊसाचे गुऱ्हाळ गाळायचे मनाशी ठरविले. पण गुऱ्हाळ उभारणे ही गोष्ट जिकिरीची व खर्चिक होती. दहाबारा माणसं, चूलवान, सरपण, गुळव्या, जाळव्या, क्रशर, बैलगाड्या, कढई व इतर सामग्री जुळवणं हे काम मोठ्या कष्टानं त्यांनी केलं.

गुऱ्हाळ सुरु झालं. उत्तम प्रतीचा गुळ तयार केला. याकामी सदुभाऊंनी खूप मेहनत घेतली. गूळ विकून लोकांची देणी भागवायची असं त्यांनी ठरविलं. बैलगाड्यांत गूळ भरून बाजारात आणला गेला. व्यापारी शेतकऱ्यांना लुटतात हे शंकरराव ऐकून होते. पण प्रत्यक्ष अनुभव आला नव्हता. अडचणीत सापडलेल्या शेतकला मिळेल त्या किमतीला आपला माल विकल्याशिवाय गत्यंतरच नव्हते. शेतकऱ्याची नाडी व्यापाऱ्यांनी चांगलीच जाणली होती आणि म्हणून त्यांची दिवसाउजेडी लूट चालली होती. व्यापाऱ्यांची एकमेकांची सांगड असायची. शेतकऱ्याला कसा ठकवायचा व त्याचा सोन्यासारखा माल कसा घशात टाकायचा याचे कसब त्यांना चांगलेच जमले होते. पहिल्यांदाच दर पाडून माल ठरवायचा. मग त्याचे वजन करताना घोळ घालायचा. क्विंटलमागे दहा किलोची तर नक्कीच टांग मारायची. बरं एवढं करूनही ते थांबत नव्हते, त्यात पुन्हा सांड, तूट, कचरा, बारदाना यांची कपात होई. अडाणी व निरक्षर शेतकऱ्यांची ही लूट अव्याहतपणे चालू होती. शंकररावांनी नाइलाजाने सोन्यासारखा आपला माल व्यापाऱ्याला पडेल भावाने विकला.

खासगी कारखाने ऊस नेत नसायचे, गुळाला भाव नाही, शेतीच्या सगळ्या मालाची बाजारात हीच गत. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य दर मिळाला पाहिजे, त्यांची लूट थांबली पाहिजे यासाठी काहीतरी करायलाच हवं, हा ध्यास त्यांनी घेतला.

प्रवरानगरच्या विठ्ठलराव विखे-पाटलांनी ठिकठिकाणी शेतमालाच्या खरेदी-विक्रीसाठी कृषी उत्पन्न बाजार समित्या काढायला सुरुवात केली होती. त्यातून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणे शक्य होते.

या पार्श्वभूमीवर ते विचार करू लागले. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निर्मितीसंदर्भात त्यांनी अभ्यास केला. ही कल्पना खूप चांगली होती. यात व्यवहार पारदर्शक होता. लुटालूट, फसवाफसवी याला थारा नव्हता. होतं ते शेतकऱ्यांच्या हितासाठीच. माळीनगरवरून अकलूजला आल्यावर त्यांनी परिसरातील जाणत्या लोकांना विश्वासात घेतलं. बाजार समितीबाबत प्रत्येक मुद्दा पटवून दिला. सर्वांनीच कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापण्यासाठी होकार दिला. अवघ्या दोनच आठवड्यांत धावपळ करून कागदपत्रे जमवून २ मार्च, १९५० रोजी समिती स्थापन झाली आणि पहिले सभापती म्हणून शंकररावांची एकमुखाने निवड करण्यात आली.

## १९५२ ची विधानसभा निवडणूक व विधानसभेत पहिले पाऊल

ग्रामपंचायतीचे सरपंच, शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आदी पदांवर ते स्वकर्तृत्वाने जरी आरूढ झाले असले तरी ही पदे जणू काटेरी मुकुटच होती. या संस्था नीट चालविण्यासाठी शंकररावांची तारेवरची कसरत होत होती. आर्थिक अडचणीतून मार्ग काढणे हे त्यांच्यासमोरील नित्याचेच आव्हान बनून राहिले होते.

विजय वसतिगृहात राहून आसपासच्या खेड्यापाड्यातील बाराबलुत्यांची मुले अभ्यास करत होती. त्यामुळे प्रत्येक गावातील माणूस शंकररावांच्या परिचयाचा झाला होता. वसतिगृहातील मुलांची भावंडे व पालक शंकररावांच्या व्यक्तिमत्त्वावर खूप खूश असायचे. त्यांनीही मुलांना लळा लावला होता.

१९५२ साल उजाडलं. त्यावेळी महाराष्ट्राला मुंबई इलाखा असं म्हटलं जायचं. गुजरात, महाराष्ट्र व कर्नाटकचा काही भाग मिळून हा मुंबई इलाखा होता. मुंबई इलाख्यात विधानसभा निवडणूक जाहीर झाली. गावोगावच्या जाणत्या व गावगाडा हाकणाऱ्या लोकांमधून निवडणुकीची चर्चा सुरु झाली. बहुसंख्य लोकांना शंकररावांनी ही

निवडणूक लढवावी व आमदार व्हावे, असे वाटत होते. त्यामुळे आपल्या भागाचा विकास होईल असा विश्वास त्यांना होता. 'माणूस चिकाटीचा व जिद्दीचा आहे. शेतकऱ्याची दुखणी त्याला कळतात. गोरगरिबांची पोरं शिकावी म्हणून बोर्डिंग काढले, शाळा काढली. शेतकऱ्याच्या शेतमालाला चांगला भाव मिळावा व त्याची फसवणूक थांबावी म्हणून बाजार समिती सुरू केली. हा माणूस पुढं गेल्यास नक्कीच सर्वांचा फायदा होईल,' अशी चर्चा सुरू झाली. तर दुसरीकडे 'आमदारकीचं इलेक्शन म्हणजे काय तोंडाचं काम असतं व्हय? त्याला जीपगाड्या, फटफट्या, मुलखाचा पैका लागतो, शंकररावांकडं ह्यातलं काय तर हाय का? ते त्यांच्यासारख्याचं काम नाही!' अशी चर्चा करणारेही होते.

परंतु शंकरराव स्थितप्रज्ञ होते. लोक वेगवेगळ्या अंगानं चर्चा करताहेत हेही त्यांच्या कानावर आलं होतं. ते स्वतःही निवडणूक लढण्याच्या विचारात नव्हते. कारण तेवढी आर्थिक कुवतच नव्हती. सारी सोंगं आणता येतात पण पैशाचं सोंग आणता येत नाही. वेळापूरची माने-देशमुख मंडळी, बोरगावचे रावसाहेब पाटील, निमगावचे बळवंतराव मगर, खंडाळीचे धर्मराज पताळे, शिवदास कुंभार, सर्जेराव देवकर व इतरांनी शंकररावच आमदारकीसाठी योग्य उमेदवार आहेत असं निश्चित केलं. त्यांनी सर्वांनी मिळून काँग्रेसच्या झेंड्याखाली एकत्र येऊन स्वातंत्र्य चळवळीत योगदान दिले होते. त्यामुळे सर्वांनी समर्थन दिल्यास काँग्रेसचे तिकीट मिळण्यास अडचन वाटत नव्हती. देश स्वतंत्र करण्यात काँग्रेसचे मोठे योगदान असल्यामुले तळागाळातील सर्वांना त्या पक्षाबद्दल आत्मीयता वाटत होती.

शंकरराव निवडणूक लढवायला नकोच म्हणत होते; परंतु मित्रमंडळींनी खूप आग्रह केला. थोरले बंधू बाबासाहेब व धाकटे सदुभाऊ यांनीही सर्वांची बाजू उचलून धरली. शेवटी मोठ्या भावाचा व आईचा आदेश मानयलाच हवा होता. जिवाला जीव देणाऱ्या मित्रांचाही आग्रह योग्यच होता. सोलापूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष छन्नुसिंग चंदेले होते.

त्यांच्यामार्फत शंकररावांनी काँग्रेसकडे उमेदवारीसाठी अर्ज केला. माळशिरस मतदारसंघातून माळीनगरचे जगन्नाथराव गिरमे हे आर्थिकदृष्ट्या प्रबळ असे उमेदवारही इच्छुक होते. मुंबई इलाख्यात काँग्रेसचे तिकीट वाटप प्रामुख्याने बाळासाहेब खेर, रामानंद वाजपेयी, सहजानंद भारती, भाऊसाहेब हिरे आदी मातब्बर मंडळींकडे होते. काँग्रेसच्या वतीने एक झुंझार कार्यकर्ता, स्वातंत्र्य चळवळीतील देशसेवक, वसतिगृह व शाळा काढल्यामुळे शिक्षण चळवळीतील कार्यकर्ता व शेतकऱ्यांसाठी झटणारा अशी प्रतिमा असल्याने शंकररावांचे पारडे निश्चितच जड होते.

सहजानंद भारती व रामानंद वाजपेयी इच्छुकांच्या मुलाखती घेत होते. प्रत्येकजण आपली बाजू व कार्य मांडत होता. शंकररावांनीही आपली बाजू मांडली. त्यांच्यातील दुर्दम्य आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्वातील तेज हेच पुरेसे होते. तिकीट मिळण्यास अडचण नव्हती.

सदुभाऊ साहसी व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी आतल्या गोटातून माहिती काढली की, तिकीट शंकररावांनाच मिळालं आहे. दुसऱ्या दिवशी अधिकृत यादी जाहीर होणार होती. सर्वांनाच उत्कंठा लागलेली, पण रात्रीत सारे वासे फिरले होते. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या शंकररावांना तिकीट नाकारून ते जगन्नाथ गिरमेंना जाहीर झालं होतं. पण निवडणुकीत स्वतःच्या आतापर्यंतच्या सामाजिक योगदानावर निवडून येण्यास हरकत नाही, असा त्यांना आत्मविश्वास होता.

शेवटी त्यांनी स्वतंत्रपणे अपक्ष म्हणून निवडणूक लढवायचं ठरवलं. माळशिरस मतदारसंघातून काँग्रेसचे शक्तिशाली जगन्नाथ गिरमे यांच्या विरोधात उमेदवारी दाखल केली. तोपर्यंत मळोलीकर तुकाराम जाधवांनीही शेतकरी कामगार पक्षातर्फे उमेदवारी दाखल केली होती. जाधवांचे शंकररावांवर खूप प्रेम होते. पण त्यांना आत तांत्रिक कारणाने उमेदवारी मागी घेणे शक्य नव्हते. शेवटी जाधवांनीच मन मोठे केले.

त्यांनी जाहीर सभांमधून आपला पाठिंबा शंकररावांनाच आहे व त्यांनाच मते देऊन निवडून आणा असे सांगायला सुरुवात केली.

काँग्रेसचे चिन्ह होते बैलजोडी.बैलजोडीची पोस्टर्स, गांधी-नेहरूंचे फोटो, मोठमोठे बॅनर्स, शुभ्र परीटघडीच्या पोषाखातील कार्यकर्ते, मोटारी, जीपगाड्या, मोटारसायकली व सायकली यांचे ताफे व लाऊडस्पीकरवरून मोठमोठ्याने प्रचार सुरू झाला. शंकररावांकडे यातलं काहीही नव्हतं. कार्यकर्त्यांकडे सायकली तेवढ्या दिसत होत्या. कार्यकर्त्यांनी व सदुभाऊंनी मुंबईवरून एक जुनी मोटार आणली. शंकररावांचे निवडणूक चिन्ह होते तराजू. गावोगाव शंकररावांची माणसं होती. अनेकांची मोठीच पंचाईत झाली. कारण उमेदवार म्हणून शंकररावांवर जिवापाड प्रेम तर दुसरीकडे पक्ष म्हणून काँग्रेसवर निष्ठा! शंकररावांची नियोजनबद्ध प्रचारावर भिस्त. तालुक्यातील प्रत्येक गावात, वाड्या-वस्तीवर, घरोघरी शंकरराव पोहोचले. जाहीर सभांमधून ते प्रतिस्पर्ध्यावर अजिबात व्यक्तिगत टीका करत नव्हते. आपलं कार्य, विकासाबाबतची भूमिका, शेतकरी, कष्टकरी व बहुजन समाजाची सर्वांगीण प्रगती कशी होईल यासंबंधी ते आपली भूमिका मतदारांसमोर मांडीत. बोलता बोलता ते विनोद, किस्से व अनुभवाच्या गोष्टी सांगून श्रोत्यांना हसवत. त्यामुळे सर्वांची मने त्यांनी जिंकून घेतली. चटणी-भाकरी बांधून शंकरराव व कार्यकर्त्यांचा प्रचार नेटाने सुरू होता.

मतदानाचा दिवस उजाडला. तालुक्यातील जनतेने मतदानाचा हक्क बजावला. मतमोजणीच्या दिवशी सर्वांची उत्कंठा शिगेला पोहोचली होती. शंकररावांनी मतमोजणीत सुरूवातीपासून आघाडी घेतली ती शेवटपर्यंत टिकली. शंकरराव मोठ्या मताधिक्याने निवडून आले. सर्वांना आनंदीआनंद झाला. बाबासाहेब, सदुभाऊंना आनंदाचे भरते आले. ज्यांनी ज्यांनी श्रम घेतले होते त्या सर्वांना खूप समाधान वाटले. शंकरराव आता आमदार झाले होते. जनतेचे आमदार होते ते! त्यांना आपल्यावर पडलेल्या जबाबदारीची अधिकच जाणीव झाली. यशाची एक पायरी तर

चढलो; पण यापुढची समाजातील दुःख, दारिद्य व अज्ञानाचा अंधकार संपविण्यासाठीची दुसरी लढाई शंकररावांनी लगेच सुरू केली.

## शैक्षणिक योगदान

"विद्येविना मति गेली । मतिविना नीति गेली । नीतिविना गति गेली ।
गतिविना वित्त गेले । वित्तविना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले.'

जोतिराव फुल्यांनी शंभर वर्षांपूर्वीच हे सांगितले होते. जोतिरावांच्या या उद्गारात यमक जुळविलेला आहे असे मुळीच नाही. तर त्यात तत्कालीन समाजाची चिकित्सा आहे. शिक्षणाचे महत्त्व सांगणाऱ्या समाजशिक्षकाचा
सार्थ उद्गार आहे त्याच्यामध्ये केवळ 'मती' आणि 'नीति' मत्तेचाच विचार आहे असे नव्हे तर 'गती' आणि 'वित्ताचाही' विचार झालेला आहे. शिक्षणापासून दुरावल्यामुळे अज्ञान, अंधकारात पिचत पडलेला व ज्याला उन्नतीच्या पाऊलवाटाही अजूनपर्यंत दिसल्या नाहीत, अशा तळागाळातील माणसांबाबत त्यांचे वरील उद्गार खूप काही सांगून जातात.

प्रतिकूल परिस्थितीमुळे आपण पुरेसे शिक्षण घेऊ शकलो नाही याची बोचणी शंकररावांच्या मनाला लागून राहिली होती. बोटांवर मोजण्याइतकी मुलं सोडली तर बाकीची सारी मुलं चौथी-पाचवीनंतर शाळा सोडून द्यायची. त्यातली थोडीच सातवीपर्यंत म्हणजे व्हर्नाक्युलर फायनलपर्यंत जाऊ शकत. त्यानंतर मात्र शिक्षणाच्या सुविधा व आर्थिक पाठबळाच्या अभावी मुले पुढे शिकू शकत नव्हती. शंकररावांना समाजातील शिक्षणापासून वंचित असणाऱ्या सर्वांनाच पुढे आणण्यासाठी शिक्षण हे साधन खूप महत्त्वाचे वाटले. शिक्षण ही समाजविकासाची अखंड प्रक्रिया आहे. त्यासाठी सामाजिक बांधीलकी लोकांमध्ये जागृत करायला हवी, हे त्यांनी ओळखले. शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे परिणामकारक हत्यार आहे, त्यासाठी त्यांनी जागृती करायला सुरुवात केली.

## विजय वसतिगृहाची स्थापना

बदलत्या सामाजिक परिस्थितीबरोबरच शिक्षणपद्धतीही बदलत असते. बदलणारी शिक्षणपद्धती समाजाच्या धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनावरही परिणाम करीत असते, त्याची त्यांना जाणीव होती. शंकररावांचे जवळचे मित्र सर्जेराव सोनुजी देवकर यांचे शिक्षण पुण्यात शिवाजी मराठा शिक्षण संस्थेत मॅट्रिकपर्यंत झाले होते. पुढे त्याच शिक्षण संस्थेच्या कार्यकारिणीवर देवकर अण्णांना घेतले होते. शिवाजी मराठा शिक्षण संस्थेचे प्रचारक मोहिते मास्तर म्हणून होते. ते अकलूजला सर्जेराव देवकर यांच्याकडे संस्थेसाठी निधी संकलनासाठी यायचे. त्यावेळी देवकर अण्णा व रघुनाथ माने गुरूजी त्यांना घेऊन शिक्षणाविषयी तळमळ असणाऱ्यांकडून देणग्या गोळा करण्यासाठी फिरत असत. शंकररावांनीही शिक्षणाबद्दल असलेल्या तळमळीपोटी अनेकवेळा देणगी दिली होती.

आपल्या ग्रामीण व मागासलेल्या समाजातील सर्वसामान्यांच्या मुलांना शिक्षण मिळविण्यासाठी आपणच हातपाय हलवायला सुरुवात केली पाहिजे हे शंकररावांच्या मनाने घेतले होते. साताऱ्याला कर्मवीर भाऊराव पाटील यांनी गोरगरिबांच्या मुलांसाठी ४ ऑक्टोबर १९१९ या विजयादशमीच्या दिवशी रयत शिक्षण संस्थेची व वसतिगृहाची स्थापना केली होती. पुढे रयतची व्याप्ती वाढत गेली. केवळ २० मुलांवर भाऊरावांनी वसतिगृह सुरू केले होते. तर बार्शीच्या मामासाहेब जगदाळेंनीही बहुजनांच्या मुलांसाठी वसतिगृह व शिक्षण संस्था सुरू केल्या होत्या. पुढे पुढे सातारा व बार्शी येथील या दोन्ही कर्मवीरांनी केलेले कार्य शंकररावांना प्रेरणास्त्रोत ठरले. शंकररावांच्या अंतर्मनात शिक्षण संस्थेचे बीज अंकुरत होते.

रघुनाथ माने गुरुजी, सर्जेराव देवकर व इतर सहकाऱ्यांनी शंकररावांचा व त्यांच्या बंधूंचा भव्य सत्कार करण्याचे ठरविले. त्यासाठी

देशभक्त तुळशीदास जाधव यांच्याशी पत्रव्यवहार झाला होता. त्यांनी शिक्षणकार्यासाठी शंकररावांना पत्रातून प्रोत्साहन तर दिलेच, पण स्वतः अकलूजला सत्कार करण्यासाठी येणार असल्याचे कळविले. माने गुरुजी सोलापूरला तुळशीदास जाधवांना भेटायला गेले. त्यांनी पुण्याचे शंकरराव मोरे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम घेण्याचे सुचविले.माने गुरुजींनी पुण्याला जाऊन शंकरराव मोरेंची भेट घेतली व अकलूजला येण्याचे निमंत्रण दिले.

विजयादशमी म्हणजेच दसऱ्याच्या दिवशी सीमोल्लंघन करण्याची शिकवण आपली संस्कृती आपणाला देते. शंकरराव एका नव्या सीमोल्लंघनासाठी सिद्ध झाले होते. अज्ञानाकडून सारा समाज ज्ञानाकडे न्यायचे त्यांनी ठरविले. त्याच दिवशी सरपंच असणारे शंकरराव, थोरले बाबासाहेब व धाकटे सदुभाऊ यांच्या भव्य सत्काराचे आयोजन गावातील उत्साही नागरिकांनी केले. त्यासाठी निधी गोळा करण्यात आला. महादेवाच्या मंदिरासमोर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दसऱ्याला २६ ऑक्टोबर १९४७ या दिवशी शंकरराव मोरेंच्या अध्यक्षतेखाली सभा सुरू झाली. तुळशीदास जाधव यांच्या हस्ते तिन्ही बंधूंचा भव्य सत्कार करण्यात आला. त्यावेळी त्यांच्याच हस्ते जनतेने दिलेल्या पाचशे रूपयांची थैली शंकररावांना अर्पण करण्यात आली. शंकरराव मोरे व तुळशीदास जाधव या विचारवंतांनी बाबासाहेब व सदुभाऊंबरोबरच शंकररावांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला. त्यांच्या समाजोद्धाराच्या तळमळीबद्दल कौतुक केले व या महान कार्यास शुभेच्छा दिला.

शंकरराव सत्काराला उत्तर देण्यासाठी उभे राहिले. समाजातील लोकांनी सत्कार केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त कली आणि लोकांनी जी पाचशे रूपयांची थैली त्यांना अर्पण केली होती, त्यात स्वतःजवळच्या पाचशे रूपयांची भर घातली व स्वतःच्या मालकीची अकरा एकर जमीन देऊन शिक्षण संस्था सुरू करण्याचा संकल्प जाहीर केला.

शंकररावांमधील दानत व मुलांच्या शिक्षणाविषयीची तळमळ पाहून लोक भारावून गेले. त्यांनी आपल्या परीने देणग्या देण्यास सुरूवात केली. त्यावेळी एक आण्यापासून लोकांनी आपले योगदान दिले. गोरगरीब लोकही यात मागे नव्हते. बघता बघता आठ हजार रूपये जमा झाले. शंकररावांनी आतापर्यंत जोडलेल्या माणसांमुळेच हे होऊ शकले. यावेळी शंकररावांचे वय पुरे तीस वर्षांचेही नव्हते.

दुसऱ्याच दिवशी पाटील-वाड्यावर त्यांनी जिवाला जीव देणाऱ्या आपल्या कार्यकर्त्यांची सहविचार सभा बोलविली. त्यावेळी अकलूज शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेची कार्यकारिणी तयार केली गेली. शंकररावांनीच संस्थेच्या अध्यक्षपदाची माळ सर्जेराव सोनुजी देवकर यांच्या गळ्यात घातली, तर उपाध्यक्ष म्हणून शंकररावांचे नाव निश्चित केले गेले.

१५ ऑगस्टला ब्रिटिशांविरोधात भारताला मिळालेला विजय, विजयादशमी दिवशी झालेला भव्य सत्कार व शंकररावांचे ज्येष्ठ पुत्र विजय, हा धागा पकडून वसतिगृहाचे नाव निश्चित झाले ‘विजय विद्यार्थी वसतिगृह’. भाऊराव हांगे यांच्या इमारतीतील तीन खोल्या बाबासाहेबांनी पुढाकार घेऊन मिळवून दिल्या पण दरमहा त्याचे भाडे द्यावे लागणार होते.

शंकररावांनी वेताळराव गायकवाड, सर्जेराव देवकर यांना बरोबर घेऊन गिरझणीच्या सरूबाई गुळवे यांना वसतिगृहात स्वयंपाकासाठी येण्याची विनंती केली. सरूबाई स्वतःचाच एक मुलगा, तुकाराम रोमण-पाटील, देवराव माने, रामराव माने आदी सहा विद्यार्थ्यांवर ११ जून १९४८ रोजी वसतिगृह सुरू झाले. शंकररावांचे जवळचे सहकारी स्वातंत्र्यसैनिक रघुनाथ रामचंद्र माने यांनी खरेदी-विक्री संघातील सव्वाशे रूपयांची नोकरी सोडून दिली. केवळ पन्नास रूपयांमध्ये त्यांनी वसतिगृहाचे अधीक्षक म्हणून पूर्णवेळ जबाबदारी स्वीकारली. समाजातील तळागाळातील मुलांना उच्चशिक्षण मिळायला हवे या तळमळीपोटी त्यांनी

वसतिगृहासाठी स्वतःला वाहून घेतले. मुले वसतिगृहात राहून माळीनगरच्या शाळेत शिकू लागली. हळूहळू विद्यार्थी संख्या वाढू लागली. त्यांना जागा अपुरी पड लागली. तेव्हा शंकररावांनी स्वतःच्या वाड्यातील दोन खोल्यांमध्ये जादा मुलांची सोय केली. पोटच्या मुलांप्रमाणे ते काळजी घेऊ लागले. आणखी जागा कमी पडू लागल्यावर नीरेकाठी जामदारांच्या मालकीच्या इमारतीत काही मुलांची सोय केली. वसतिगृह चांगलेच विस्तारू लागले. वसतिगृह चालण्यासाठी पैसा व धान्य यांची खूप आवश्यकता होती. कारण गरीब घरची मुले वसतिगृहात मोठ्या संख्येने होती.

शंकरराव स्वतः, माने गुरूजी व इतर सहकाऱ्यांना घेऊन गावोगावी वाड्या-वस्त्यांवर जाऊन त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊ लागले. संस्थेचा उद्देश समजावून देऊन लोकांना सहकार्य करण्याचे आवाहन करू लागले. लोकांकडे रोख पैसा नसायचा. पण शंकररावांच्या कामाबद्दल त्यांना आदर वाटू लागला. लोकांनी त्यांना शेर-दोन शेर ज्वारी, गहू, गुऱ्हाळवाल्यांनी गुळाच्या ढेपी दिल्या. तर काहींनी रोख पैशाची मदत एक आण्यापासून केली. त्यावेळचा एक आणा म्हणजे रूपयाचा सोळावा भाग. सन १९५२ च्या दरम्यान गावोगावी फिरून ५५ पोती ज्वारी व ६५५ गुळाच्या ढेपी जमा झाल्या होत्या. शेतांवरील खळ्यावरून त्यांनी धान्य गोळा केले. शेतकऱ्यांना ते म्हणत, "मीही शिक्षणाचं तेरावं बलुतंच आहे." विजय वसतिगृहातील विद्यार्थी पहाटे उठून व्यायाम व प्रार्थना करून अभ्यास करू लागले. माने गुरुजींनीही विद्यार्थ्यांना अनेक गोष्टींचे ज्ञान दिले. त्यामुळे विद्यार्थी जोमाने अभ्यास करू लागले. अशा प्रकारे वसतिगृहाची वाटचाल सुरू झाली.

## शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना

शंकररावांनी अकलूज शिक्षण प्रसारक मंडळाच्या नोंदणीसाठी पुणे येथील शिवाजी मराठा शिक्षण संस्था, रयत शिक्षण संस्था व बार्शी येथील मामासाहेब जगदाळे यांची शिवाजी शिक्षण संस्था आदींची माहिती मागवून घेतली. जरूरीप्रमाणे पोटनियम तयार करून घेतले व २३ जून १९४८ रोजी संस्थेची अधिकृत नोंदणी केली. याकामी शंकररावांना रघुनाथ माने गुरुजी यांनी अथकपणे सहकार्य केले. त्यांच्यावरच सेक्रेटरीपदाची जबाबदारी सोपविली. त्याचबरोबर सर्जेराव देवकर, विठ्ठल देशमाने, भाईचंद गांधी, लक्ष्मीकांत देसाई, रमणलाल व्होरा आदींनी काम पाहिले, तसेच चांगोजीराव देशमुख यांनी शंकररावांना मोलाची साथ दिली.

कर्मवीर भाऊराव पाटलांचा साताऱ्याला संत गाडगे महाराज यांच्या हस्ते २७ व २८ नोव्हेंबर १९४८ रोजी भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्या कार्यक्रमाचे निमंत्रण शंकररावांनाही होते; परंतु इतर कामांच्या व्यापामुळे ते साताऱ्याला जाऊ शकले नाहीत. त्यांनी रघुनाथ माने गुरुजींना साताऱ्याला पाठविले व कर्मवीर अण्णांशी शिक्षण संस्थेसंबंधी चर्चा करायला सांगितले. यावेळी सातारा येथे जनतेच्या वतीने कर्मवीर भाऊराव पाटील यांना एक लाख रूपयांची थैली व नवी कोरी शेवरलेट मोटारकार अर्पण करण्यात आली. कर्मवीरांनी लगेच आपणाला मिळालेली देणगी रयत शिक्षण संस्थेला अर्पण केली. प्रचंड जनसमुदाय व भव्य असा हृदयस्पर्शी कार्यक्रम पाहून माने गुरुजी भारावून गेले. यावेळी कर्मवीरांना माने गुरुजी म्हणाले की, "मी अकलूजहून शंकरराव मोहिते-पाटलांचा निरोप घेऊन आलो आहे. तुमच्या कार्याची प्रेरणा घेऊन अकलूजला वसतिगृह सुरू केले आहे व आता हायस्कूल सुरू करायचे आहे." हे ऐकून कर्मवीरांना खूप आनंद झाला. त्यांनी मोठ्या आस्थेने जवळ बसवून चर्चा केली. कर्मवीर अण्णा माने गुरुजींना म्हणाले, "शंकरराव मोहिते-पाटलांना मला भेटण्याचा निरोप द्या."

माने गुरूजींनी तातडीने अकलूज गाठले व शंकररावांना कर्मवीर भाऊराव पाटलांचा निरोप दिला. शंकररावांना खूप आनंद झाला. त्यांनी नुकतीच एक नवी बुलेट मोटारसायकल घेतली होती. तिच्यावर बसून शंकरराव व माने गुरूजींनी दुसऱ्याच दिवशी सातारा गाठले. तो दिवस होता २९ नोव्हेंबर १९४८. वडीलधाऱ्या कर्मवीर अण्णांनी तरूण शंकररावांना कडकडून मिठी मारली व त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप मारली. कर्मवीर शंकररावांना म्हणाले, "जोपर्यंत तुमच्यासारखे तरूण तडफदार कार्यकर्ते शिक्षण प्रसारासाठी पुढे येत नाहीत तोपर्यंत बहुजनांची मुले शिक्षण घेऊ शकणार नाहीत. मी व माझी रयत शिक्षण संस्था तुमच्या शिक्षणप्रसाराच्या कार्यासाठी सदैव तुमच्या पाठीशी आहे."

त्यानंतर कर्मवीर अण्णांनी रयत शिक्षण संस्थेच्या विविध उपक्रमांची तपशीलवार माहिती शंकररावांना दिली. 'कमवा आणि शिका' ही स्वावलंबनाची संकल्पना शंकररावांना जवळून पाहता आली. कर्मवीरांचे कार्य पाहून व विचार ऐकून शंकरराव भारावून गेले. कर्मवीरांचे शिक्षणकार्य पाहून शंकरराव अकलूजला आले. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या भेटी घेतल्या व रयत शिक्षण संस्थेबद्दल माहिती दिली. अकलूजमध्ये २४ डिसेंबर १९४८ रोजी प्रमुख मंडळींची बैठक घेतली. हायस्कूल सुरू करण्याच्या हालचालींनी वेग घेतला.

## अकलूज शिक्षण प्रसारक मंडळ विद्यालय

विजय विद्यार्थी वसतिगृहात मुलांची संख्या वाढत होती. भाऊराव हांगेच्या मालकीच्या जागेतील वसतिगृह कमी पडू लागल्याने शंकररावांनी पाटील वाड्यावर स्वतःच्या घरीच काही मुलांची सोय केली होती. केवळ प्राथमिक शिक्षण घेऊन न थांबता माध्यमिक व उच्च शिक्षण घेऊन ही मुले पुढे आली पाहिजेत ही त्यांची तळमळ होती. मुले माळीनगरच्या शाळेत जाऊ लागली होती.

रघुनाथ रामचंद्र माने हे स्वातंत्र्यसैनिक, शंकररावांचे परमस्नेही. स्वातंत्र्यसंग्रामात क्रांतिसिंह नाना पाटील, वसंतदादा पाटील यांच्या प्रेरणेने झोकून देऊन काम केलेले व तुरुंगवास भोगलेले. वारकरी संप्रदायातील ते एक कणखर तितकेच मायाळू व्यक्तिमत्त्व. गळ्यात तुळशीमाळ, अंगात स्वतः शिवून घेतलेला खादीचा भगवा सदरा, वाढविलेली दाढी यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वी वेगळीच छाप पडते.

शंकरराव आणि माने गुरूजी एकदा बार्शीला जगदाळे मामांच्या शाळेत भूमिपूजनासाठी गेले होते. तिथे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन होते. कर्मवीर आण्णांचे भाषण ऐकून शंकरराव अंतर्मुख झाले. सर्वसामान्य समाजाला शिक्षण मिळणे किती महत्त्वाचे आहे हे त्यांना पटले. बार्शीहून येताना त्यांनी शिक्षण प्रसारासाठी स्वतःला झोकून द्यायचे असा निश्चय केला. वसतिगृह व हायस्कूलच्या विकासासाठी निधी उभारण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रमांचा सपाटा सुरू केला. त्याचाच एक भाग म्हणून जनजागृतीसाठी पंढरपूरच्या नामानंद भारती यांच्या कीर्तनाचे परिसरातील अनेक गावांत आयोजन केले. नामानंदांचे १९५२ व १९५४ असे कीर्तनाचे दोन दौरे झाले.

संस्थेच्या मदतीसाठी 'देवल सर्कस'ची तिकिटे खपविण्याचे काम कार्यकर्ते व विद्यार्थ्यांनी केले. शाहीर जंगमस्वामी यांचे पोवाड्याचे कर्यक्रम आयोजित केले. पुण्यातील आनंद संगीत नाटक कंपनीचे खेळाचे कॉन्ट्रॅक्ट घेऊन अकलूज, महाळुंग, नातेपुते, वेळापूर आदी ठिकाणी नाटकांचे आयोजन केले. त्याचा निधी उभारण्यास मदत झाली. अकलूजच्या बाजारात जनावरांच्या खरेदी-विक्री व्यवहाराच्या पावत्या फाडण्याचे काम विद्यार्थ्यांनी केले. बसस्टँडवर जाऊन विद्यार्थ्यांनी प्रवाशाकडून एक आण्याची देणगी तिकीटे पै अन् पै गोळा केली.

विद्यार्थ्यांचे कलापथक, लेझीमपथक व भजनी मंडळ तयार केले. विद्यार्थी गायन, नाटक सादर करून लोकांकडून थोडे थोडे पैसे गोळा करत. बैलपोळ्यानिमित्त गावोगावी बैलांच्या भव्य मिरवणुका निघत.

लग्नाच्या वराती निघत. त्यापुढे हे विद्यार्थी लेझीम खेळत. लग्नसमारंभात स्वतः शंकरराव व माने गुरूजी हजर राहत व लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत. लोक मग स्वयंस्फूर्तीने देणग्या देत. शंकररावांची ही धडपड पाहून गोरगरिबांमध्ये त्यांच्याविषयी आपुलकीची भावना निर्माण झाली. गावोगावचे लोक त्यांना मान देऊ लागले. धान्याच्या खळ्यावरून धान्य गोळा करताना त्यांनी संकोच बाळगला नाही की, पाटीलकीचा वृथा अभिमानही बाळगला नाही. अज्ञानात खितपत पडलेल्या समाजातील उगवत्या पिढीला ज्ञानरूपी अमृत पाजण्यासाठी हा उमदा पाटील बलुतं होऊन आपले सहकारी व विद्यार्थ्यांना घेऊन दारोदारी फिरला. त्यांच्या या श्रमाचं चीज होऊ लागलं. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात शंकरराव मोहिते-पाटलांनी शैक्षणिक क्रांतीची मशाल पेटविली. शाळा सुरू करण्यासाठी जागा, इमारत, इतर काही गोष्टी व त्या साऱ्यासाठी बराच पैसा लागत होता आणि त्याचीच कमतरता होती. पण इच्छाशक्ती बुलंद होती.

अकलूजच्या बाजारतळाजवळ भांबुर्डेकरांची एक जुनी चाळ होती. तिथं कुणी राहत नसल्यामुळे तिची दूरवस्था झाली होती. शंकररावांनी दूरवस्था झालेल्या त्या चाळीची डागडुजी करून घेतली. स्वतः तिथे राबले. साताऱ्याकडचे रामचंद्र वामन मराठे मास्तर यांना नोकरी दिली होती. मराठे मास्तर हे मुलाखतीसाठी माळीनगर येथे आले होते; परंतु तेथे त्यांना नोकरी मिळाली नाही. खिन्न मनाने ते अकलूजला पायी चालत आले. त्यांच्याजवळ पैसेही नव्हते. त्यावेळचे जिल्हा बँकेचे सचिव श्री. घोटीकर यांची भेट घेऊन मराठे मास्तरांनी त्यांना त्यांची परिस्थिती सांगितली. घोटीकर त्यांना शंकररावांकडे घेऊन गेले. मराठे मास्तरांची ओळख करून दिली व झालेला प्रकार त्यांच्या कानावर घातला. शंकररावांनी मराठे मास्तरांना स्वतःच स्वतःची ऑर्डर लिहायला सांगितली. शाळेसाठी फळा, खडू, घड्याळ, हजेरीपत्रक, घंटा व इतर बारीकसारीक गोष्टींसाठी पाचशे रूपये देऊन टाकले आणि त्यांना काम

करण्याचे स्वातंत्र्य दिले. मराठे मास्तरांना शंकररावांनी जिंकले होते. सरकारी नियमाप्रमाणे पगार देण्याचे वचन त्यांना दिले.

शासनाने शाळा सुरू करण्यास परवानगी दिली. शंकररावांनी इतर कामांच्या व्यापातून शाळेची तयारी केली होती. शंभर मुलांचे दाखले गोळा केले. द्रविड नावाच्या शिक्षकाला मुख्याध्यापक म्हणून नेमले होते. मात्र त्यांनी अचानकपणे येऊ शकत नाही असे सांगितले. फलटणला देसाई नावाचे निवृत्त शिक्षक होते. त्यांना विनंती केली, पण त्यांनीही नकार दिला. पंढरपूरला जाऊन टेबलं, कपाटं आणण्यासाठी एक ट्रक मिळवला. पंढरपूरच्याच नेने सरांचा तपास लागला. सर्जेराव देवकर दोन-तीन जणांना घेऊन ट्रकमध्ये बसून पंढरपूरला गेले. नेने सर तर मिळालेच होते. पण त्यांच्याबरोबर श्री. व सौ. देशपांडे हे शिक्षक दाम्पत्यही मिळालं होतं. सहा शिक्षकांची जुळणी करण्यात आली होती. टेबल, कपाटं आली होती. अकलूजच्या श्री. पालखे यांच्याकडून बाकं करून घेतली होती. आहे त्याच इमारतीला रंगरंगोटी केली. परिसर स्वच्छ केला. पताका लावल्या. ढोल, ताशे वाजू लागले. हलग्या कडाडल्या. लोक जमा झाले. शंकररावांच्या हस्ते शाळेचे उद्घाटन पार पडलं आणि 'शिक्षण प्रसारक मंडळ विद्यालय' हे संस्थेचं पहिलं हायस्कूल सुरू झालं. पाचवी ते सहावीचे वर्ग सुरू झाले होते. शाळेची घंटा वाजली. प्रार्थना झाली आणि अध्यापनाला सुरुवात झाली. शिक्षणाच्या क्षितिजावर अकलूजमध्ये नवा सूर्य उगवला होता तो दिवस होता १ मार्च १९४९!

हायस्कूल व वसतिगृहाचे कामकाज अनेक अडचणींमधून पुढे चालू होते. तर जबाबदाऱ्या सांभाळून शंकरराव शाळेकडे लक्ष द्यायचे. वसतिगृहाच्या शंभर मुलांना घेऊन रात्रीच्या वेळी श्रमदानाने पाया खोदण्यास सुरुवात केली. त्यावेळच्या मुंबई राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते १९ नोव्हेंबर १९५९ साली वसतिगृहासमोरील जागेत कोनशिला समारंभ घेऊन बांधकामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली. बांधकाम दर्जेदार होण्यासाठी त्यांनी खूप परिश्रम घेतले.

दोन वर्षांच्या कालावधीनंतर शाळेचे बांधकाम पूर्ण झाले. त्यासाठी दीड लाख रूपये खर्च आला. आपल्या धाकट्या भावाच्या स्मृती जतन करण्यासाठी म्हणून हायस्कूलला 'सदाशिवराव माने विद्यालय' असे नाव देण्यात आले. २१ नोव्हेंबर १९६१ साली भव्य वास्तूत सदाशिवराव माने विद्यालयाचे वर्ग भरू लागले. शाळेतील शिक्षण दर्जेदार होण्यासाठी शंकररावांचा कल होता. त्यासाठी ते जातीने लक्ष घालत.

यशवंतनगरला कामगार, दुकानदार विविध सेवा पुरवणारे बलुतेदार व निरनिराळे व्यवसाय करणारी अनेक माणसे येऊन राहू लागली. हे नवेच गाव गजबजून गेले. तिथल्या मुलांना शिक्षणाची जवळ सोय होण्यासाठी १९६५ च्या जुलै महिन्यात टेक्निकल हायस्कूलच्या इयत्ता आठवीचा एक वर्ग सुरू करण्यात आला. पुढे ५ वी ते १२ वी चे वर्ग सुरू झाले. पाटीलवस्तीवर त्या परिसरातील मुलांच्या शिक्षणाच्या सोयीसाठी कृष्णानंद विद्यामंदिर सुरू केले. पश्चिमेकडील दुर्गम भागात माणकी, कुरभावी, फोंडशिरस, सदाशिवनगर त्याचबरोबर माढा तालुक्यातील पिंपळनेर येथेही हायस्कूल्स सुरू करण्यात आली. स्वतःला गरिबीमुळे शाळा सोडावी लागली त्यामुळे फीवाचून कुणाचेही शिक्षण थांबू नये यासाठी शंकरराव दक्ष असत. अनेक गोरगरिबांच्या मुलांना फीबरोबरच वह्यापुस्तके व गणवेशासाठी त्यांनी पदरमोड केली.

१०० विद्यार्थ्यांवर सुरू केलेल्या या संस्थेत १९६५ पर्यंत विद्यार्थी संख्या एक हजारावर गेली.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व कर्मवीर भाऊराव पाटलांची भेट

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शंकररावांच्या शिक्षणकार्याला भेट देण्यासाठी १९५२ मध्ये अकलूजला आले. त्यांना अभिप्रेत असणाऱ्या समाजउभारणीचे कार्य पाहून तुकडोजी महाराज आनंदित झाले. त्यांनी शंकररावांना आशीर्वाद दिले. शंकररावांनी आपले सर्व सहकारी मित्र,

शिक्षक व विद्यार्थ्यांना एकत्र बोलावून विजय वसतिगृहात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा भव्य सत्कार केला. यावेळी राष्ट्रसंत म्हणाले की, "समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा व दारिद्र्य घालविण्यासाठी झटत राहणे हीच खरी ईश्वरसेवा आहे. ही सेवा शंकररावांनी या परिसरात करण्यास सुरूवात केली आहे."

शंकररावांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांना अकलूजला येण्यासाठी आग्रह धरला होता. एके दिवशी कर्मवीरांनी अकलूजला येण्याचे मान्य केले. शंकरराव कामाला लागले. त्यांनी कर्मवीरांचे थोर विचार या परिसरातील सर्वांना ऐकायला मिळावेत व ऋषितुल्य अशा कर्मवीरांचे दर्शन मिळावे यासाठी महात्मा थिएटरमध्ये कर्मवीरांच्या भव्य सत्कार समारंभाचे आयोजन केले. परिसरातील झाडून सारे शिक्षक या समारंभासाठी उपस्थित राहिले. सुरुवातीच्या काळात शिक्षण संस्थेच्या उभारणीत शंकररावांनी जे परिश्रम घेतले होते त्याबद्दल कर्मवीरांनी शंकररावांना शाबासकी दिली व पुढील कार्यासाठी आशीर्वाद दिले. ही घटना १९५७ मध्ये घडून आली.

## महाविद्यालयाची स्थापना

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न उराशी बाळगले होते. तेव्हापासून ते राज्यातील अनेक आमदारांशी हितगुज करीत होते. त्यांचा शंकररावांशी अलीकडे जास्तच स्नेह जडला होता. शिक्षण हे समाजाच्या विकासाचे अत्यंत प्रभावी माध्यम आहे, हे शंकररावांनी जाणले होते. "शिक्षणाशिवाय माणूस म्हणजे पशूच, शिक्षणच माणसाच्या जीवनाला आकार देते," असे त्यांना वाटे.

कर्मवीर भाऊराव पाटील तर म्हणायचे की, 'माझा विद्यार्थी हमाल झाला तरी चालेल, पण त्याच्या हातात पदवीचे भेंडोळे असायलाच हवे.' कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शंकररावांवर मोठा प्रभाव

होता. सर्वसामान्यांच्या मुलांना पुण्या-मुंबईत किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन उच्च शिक्षण घेणे ही अशक्य कोटीतील गोष्ट होती. बोटांवर मोजण्याइतकी श्रीमंतांची मुलेच उच्च शिक्षण घेऊ शकतात ही वस्तुस्थिती नाकारता येत नव्हती. शंकररावांच्या संवेदनशील मनाला ही गोष्ट जाणवत होती. त्यांनी मनोमन निर्धार केला तो या मातीतल्या शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या, सर्वसामान्यांच्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी महाविद्यालय सुरू करण्याचा. शिक्षण प्रसारक मंडळ या शिक्षण संस्थेची अनेक माध्यमिक विद्यालये सुरू झाली होती. पण पुढच्या शिक्षणाची सोय नव्हती. सोलापूर जिल्हा हा शिवाजी विद्यापीठाच्या कार्यकक्षेत मोडत असल्याने त्यांनी विद्यापीठाकडे महाविद्यालय सुरू करण्यासाठीचा प्रस्ताव पाठविला. एक दिवस विद्यापीठाकडून परवानगीचं पत्र आलं. सदाशिवराव माने विद्यालयाच्या वरच्या मजल्यावरच दि. २५ जून १९६७ रोजी 'अकलूज कॉलेज'चे उद्घाटन झाले आणि महाविद्यालयीन शिक्षणाच्या गंगेचा प्रवाह शंकररावांनी ग्रामीण भागाकडे वळविला. त्या प्रवाहाचे अमृत पिऊन भविष्यात अनेक सुजाण पदवीधर आणि उच्चपदस्थ तयार होणार होते हे निश्चित.

## ग्रीन फिंगर्स स्कूल

आधुनिक जगाच्या स्पर्धेत आपण कुठेही मागे पडायला नको, ही शंकरररावांची भूमिका होती. परदेश दौरा केल्यानंतर इंग्रजी शिक्षणाचे महत्त्व त्यांनी ओळखले होते. पुण्या-मुंबईसारख्या शहरात इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असल्याने अनेकजण पुढे जात आहेत हे त्यांनी पाहिले. तिथे अनेक इंग्रजी माध्यमाच्या शाळा असून तिथली मुलं हे शिक्षण घेत आहेत, तेव्हा माझ्या ग्रामीण भागातील मुलांनाही इंग्रजी माध्यमातून शिक्षण मिळायला हवं. त्यासाठी त्यांनी इंग्रजी माध्यमाची निवासी शाळा सुरू करण्याचे नक्की केले.

त्यांनी आपले कृषी पदवीधर असलेले चिरंजीव राजसिंह व साहेबराव देशमुख या दोघांवर जबाबदारी सोपविली. महाराष्ट्रातील विविध ठिकाणी असलेल्या रेसिडेन्सिएल स्कूल्सचा त्यांनी सर्व्हे केला. माहिती संकलित केली. आपल्या परिसरात अशा स्वरूपाची शाळा सुरू केल्यास चांगला प्रतिसाद मिळेल असा त्यांना आत्मविश्वास होता.

शिवाजी प्रिपरेटरी स्कूलमधून सेवानिवृत्त झालेले प्राचार्य खानोलकर यांची साहेबांनी भेट घेतली. नोकरी करण्याच्या मनः स्थितीत नसणाऱ्या खानोलकरांवर सहकारमहर्षींच्या व्यक्तिमत्त्वाची छाप पडली आणि त्यांनी होकार दिला.

गिरझणी रस्त्यावर २८ एकर जमीन त्यांनी या शाळेसाठी निश्चित केली. नैसर्गिक उंचसखलपणा लाभलेल्या ठिकाणी सर्व बाजूंनी वृक्षारोपण केले. तोपर्यंत तात्पुरत्या जागेत व आताच्या महर्षी शंकरराव मोहिते प्रशालेच्या आवारात ही शाळा सुरू झाली. शंकरराव ज्या विषयाला हात घालतील तो विषय ते यशस्वीच करून दाखवित. त्यांच्या कल्पनेतून या साऱ्या परिसरात समृद्धी नांदायला लागली होती. त्यांचे हात व बोटे म्हणजे समृद्धीची, हिरवाईची प्रतीके होती. प्राचार्य खानोलकरांनी शाळेचे नाव निश्चित केले 'ग्रीन फिंगर्स स्कूल'. १५ जुलै १९७५ या दिवशी ही शाळा सुरू झाली. तेथे जगाच्या स्पर्धेत सर्वच आघाड्यांवर मुलूखगिरी करण्यासाठी शेतकऱ्यांची मुलं सिद्ध होणार होती. सहकारमहर्षींच्या कल्पनेने मूर्त स्वरूप धारण केले होते. भविष्यातील अनंत पिढ्या वाघिणीचे दूध पिऊन गुरगुरणार होत्या.

## शिवरत्न शिक्षण संस्थेची स्थापना

इंग्रजी शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, हे शंकररावांनी ओळखले होते. राजकारण, अर्थकारण, समाजकारण या साऱ्या क्षेत्रांत काम करीत असताना त्यांनी भारतभर विविध कारणांनी भ्रमंती केली होती. जपान

दौरा केला होता. त्यात त्यांना एक गोष्ट जाणवली की, इंग्रजी ही जगाची ज्ञानभाषा आहे. आता काळ बदलतो आहे. निरनिराळ्या संधींवर स्वार होण्यासाठी माझ्या भागातील मुलांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण मिळायला हवे ही त्यांची महत्त्वकांक्षा होती. त्यापोटी त्यांनी आदल्याच वर्षी म्हणजे १५ जुलै १९७५ रोजी ग्रीन फिंगर्स स्कूल ही निवासी शाळा सुरू केली होती. परंतु अनेक पालकांना आपली मुले निवासी शाळेत ठेवणे परवडत नव्हते तर काहींना आपली मुले आपल्या नजरेखाली असावी असे वाटत होते. म्हणून अनेक पालकांनी शंकररावांना इंग्रजी माध्यमाच्या एका नव्या शाळेची मागणी केली.

शिक्षक दिनाच्या मुहूर्तावर ५ सप्टेंबर १९७६ रोजी 'शिवरत्न शिक्षण संस्थे'ची त्यांनी स्थापना केली. यातूनच इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू झाली. उगवत्या पिढीला नव्या जगात आत्मविश्वासाने विहार करण्यासाठी, जागतिक भाषेच्या ज्ञानाचे बळ त्यांच्या पंखात येण्यासाठी दूरदृष्टीने शंकररावांनी हे केले होते.

**महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थाचालकांच्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे आयोजन**

अकलूज येथे दि. २ व ३ फेब्रुवारी १९७४ रोजी महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थाचालकांच्या राज्यव्यापी अधिवेशनाचे संयोजन साहेबांनी केले होते. अधिवेशनाचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे बॅरिस्टर पी. जी. पाटील यांच्या हस्ते झाले. संघाचे अध्यक्ष गोवर्धनदास पारीख, त्याचबरोबर कार्याध्यक्ष रा. म. नलावडेही उपस्थित होते. स्वागताध्यक्ष म्हणून शंकरराव मोहिते-पाटील आपले छापील भाषण वाचणार होते. परंतु छापील भाषण वाचताना त्यांना मोकळेपणा वाटेना. त्यांनी आपले छापलेले भाषण बाजूल ठेवून दिले आणि आपल्या खास शैलीत ते बोलू लागले. समाजाच्या विकासात शिक्षण क्षेत्राचे महत्त्व विशद करून शंकररावांनी शिक्षण संस्थांबाबत अनेक महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले. न्यायखात्याप्रमाणे शिक्षणखाते शासनाच्या जाचक बंधनापासून मुक्त

असावे असे त्यांनी सांगितले. वेतनपद्धती संदर्भात संस्थाचालकांवर जो अविश्वास दाखविला जातो त्याबद्दल नाराजी व्यक्त केली. सरकारी अनुदानाच्या धोरणावरही ते कडाडले. शेवटी समाजाचा सर्वांगाने विकास होण्यासाठी शिक्षण खूप महत्त्वाचे असल्याने चालकांना संघटित करून शिक्षण क्षेत्राचा निकोप विकास होण्यासाठी त्यांनी आपली भूमिका मांडली. सर्वच शिक्षण संस्थाचालकांना खूप आनंद झाला. त्यांच्या अंगात नवीच शक्ती संचारली, कारण त्यांच्या मागे आता प्रत्यक्ष शंकरराव मोहिते-पाटलांची ताकद उभी होती.

## ... आणि शंकरराव सहकारी साखर कारखाना उभारतात

प्रवरेकाठी विठ्ठलराव विखे-पाटील नावाच्या कर्मयोग्याने प्रयत्नांची पराकाष्ठा करून भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना उभारला

होता. शंकररावांना विठ्ठलराव विखे-पाटलांबद्दल कमालीचा दर वाटायचा. ते स्वतः विखे-पाटलांना लोणी, जि. अहमदनगर येथे भेटले व सहकार या विषयावर जिज्ञासेपोटी सविस्तर चर्चा केली. निरीक्षण व अभ्यास केला. सखोल अभ्यास व बारकाईने निरीक्षण करून अनुकूल-प्रतिकूल बाबींचा आढावा घेऊन मगच पूर्ण तयारीनिशी एखाद्या विषयाला हात घालायचा व ते काम पुरे करायचे असा त्यांचा पिंड होता. उसापासून साखर निर्मिती करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त फायदा मिळवून देण्यासाठी व एकूणच परिवर्तन साधण्यासाठी साखर कारखाना उभारायलाच हवा, असा पक्का विचार शंकररावांनी केला. साखर कारखाना म्हणजे बुद्धी, धन आणि श्रम यांच्या तल्लख उपयोगाद्वारे दारिद्र्य व बेकारी यांच्याविरूद्ध झुंज देण्यासाठी ग्रामीण समाजाने उबे केलेले सामूहिक सृजनकार्य आहे. गरिबी दूर करणे, उत्पादित वस्तूतून विक्री होऊ शकेल असा माल तयार करणे, भागधारक शेतकऱ्यांच्या विकासाच्या योजनांना मूर्त स्वरूप देणे, शेतकऱ्यांच्या मुलाबाळांनी सुसंस्कारित व्हावे यासाठी प्रयत्न करणे, परिसरातील जनतेचा सर्वांगीण विकास साधणे अशा प्रकारची ध्येये साखर कारखान्याच्या स्थापनेमागे आहेत हे शंकररावांनी जाणले होते.

## सहकारी साखर कारखान्याची उभारणी

आमदार म्हणून निवडून आल्यावर थोड्याच दिवसांत त्यांनी आपल्या शेतात वस्ती केली. काही दिवस कोपीत व नंतर गोठ्यात पक्का निवारा केला. आपण आमदार असून असल्या साध्या घरात कसं राहायचं हा विचारही त्यांच्या मनाला शिवला नाही. त्यांच्या आतापर्यंतच्या वाटचालीत त्यांना त्यांच्या सहचरिणी, रत्नप्रभादेवींनी खूप मोलाची साथ दिली. त्यांचा उत्साह टिकवला आपल्या पतीची धडपड, परिश्रम, जिद्द याचे त्यांना भारी कौतुक वाटे. त्यांनी शंकररावांचा उत्साह कधीच मावळू

दिला नाही. एका आमदाराची पत्नी असूनही प्रपंचात अनेक अडचणींना त्या धीरानं सामोऱ्या गेल्या. आपल्या मुलांवर चांगले सुसंस्कार केले. आमदार झाल्यावरही भल्या पहाटे उठावे, गोठ्याची झाडलोट करावी, गुरांची काळजी घ्यावी, शेतातून फेरफटका मारावा, शेतीची नांगरणी कुळवणी करावी, शेतगड्याबरोबर शेतात राबावं हा शंकररावांचा नित्यक्रम बनला होता. शेतातच विहिरीजवळ दगड रचून एक पार तयार केला होता. आपल्या अडीअडचणी घेऊन येणाऱ्यांशी पारावर बसून चर्चा व्हायची, मार्ग काढला जायचा.

शंकररावांनी आता शेतीत चांगलंच लक्ष घातलं होतं. शेतीसाठी हुकमी पाण्याची खूप गरज होती. त्यांनी विहीर खोदायला सुरुवात केली. विहिरीत काम करणाऱ्या गड्यांबरोबर स्वतः पहार घेऊन ते काम करायचे. पाटीलकी, सरपंचपद व आता आमदार होते तरीही मोकळ्या तोंडपाटीलकीचा काहीही उपयोग नाही, त्यासाठी स्वतःच राबलं पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता. तालुक्यातील अनेकजण शंकररावांना आमदारसाहेब म्हणू लागले. लहान असणारे त्यांना आमदारकाका म्हणायचे.

व्यक्ती, कुटुंब आणि पर्यायाने समाजाची खऱ्या अर्थाने प्रगती होण्यासाठी आर्थिक स्थिती भक्कम असणे अत्यंत महत्त्वाचे असते. आर्थिक सुबत्ता आणण्यासाठी लोकांच्या प्रमुख व्यवसायास अर्थात शेतीस चांगले दिवस आणणे आवश्यक होते. पिढ्यान् पिढ्या शेतीत राबणारा शेतकरी दरिद्रीच राहिला आहे. अज्ञानाने पिचला आहे या गोष्टीची शंकररावांना खंत वाटत होती. शेतकऱ्याच्या श्रमाला, त्याने गाळलेल्या घामाला, त्याने रक्त आटवून पिकवलेल्या मालाला मातीमोल किंमत, तर सावलीत बसून हातचलाखी करून मालामाल होणाऱ्या दलालांची व व्यापाऱ्यांचीच खरी चंगळ होती. ही गोष्टी शंकररावांना वारंवार संवेदनशील मनाचे शंकरराव जागृत होते.

आपला हा विचार त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना बोलून दाखविला. वडीलबंधू बाबासाहेब हे तर नवनव्या गोष्टी उभ्या करण्यासाठी शंकररावांना सतत प्रोत्साहन देत तर सदुभाऊ खंबीरपणे पाठीशी उभे राहत.

माणिकलाल दोशी हे श्रीमंत व्यापारी शंकररावांचे जिवलग मित्र होते. शंकररावांच्या कोणत्याही कल्पनेला ते लगेच उचलून धरीत. रघुनाथ इनामके ही एक मोठी आसामी होती. लवंग गावचे रामभाऊ घारमाळकर हे बागायतदार होते. त्यांच्याकडेही उसाची लागवड, पण ऊस गाळायचा कुठे, हा प्रश्न होताच. इनामके व घारमाळकर या आसामींच्या कानावर शंकररावांचा सहकारी साखर कारखाना काढायचा विचार गेला व ते त्वरित शंकररावांच्या शेतावर आले. रघुनाथराव इनामके ,रामभाऊ घारमाळकर व माणिकलाल दोशी यांच्याबरोबर शंकररावांची शेतावरच बैठक बसली. सहकारी साखर कारखाना सुरू करायचा असा पक्का निर्धार करूनच बैठक उठली.

निर्धार केला खरा; परंतु कारखाना सुरू करण्यासाठी अनेक गोष्टी करणं आवश्यक होतं. तीन लाख रूपये भागभांडवल गोळा करणं, त्यासाठी शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करून, त्यांचा विश्वास संपादन करून त्यांना शेअर्स खरेदी करायला लावणे, हे काम त्या काळात कमालीचं अवघड व मुख्य आव्हान होते. सरकारकडून सहकारी साखर कारखाना सुरू करण्याचा परवाना मिळवणं व नोंदणी करणं या गोष्टी पैशाशिवाय होणं कठीण होतं .सहकारी साखर कारखाना म्हणजे काय? हे लोकांना पटवून देणं, फाटका शेतकरीही कारखान्याचा मालक होऊ शकतो हे त्यांच्या मनावर बिंबवणं व त्यांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून भागभांडवल कसं गोळा करावं या विचारात शंकरराव गढून गेले.

शेटेंच्या थिएटरमध्ये बाबासाहेब पाटलांच्या अध्यक्षतेखाली सहकारी साखर कारखाना स्थापनेबाबत पहिली सभा झाली. शंभर-दीडशे लोकच

जमा झाले. बऱ्याच जणांना कारखाना काढणं म्हणजे साधं-सोपं काम नाही असंच वाटत होतं. सभा संपल्यावर मोठ्या प्रमाणात भागभांडवल जमा होईल हा अंदाज फोल ठरला. बोटांवर मोजण्याइतपत मित्रमंडळी सोडली तर इतर कोणीही त्यास प्रतिसाद दिला नाही.

तीन लाख रूपये जमा करायचे म्हणजे किती कठीण काम आहे, याची त्यांना जाणीव झाली. ते खिन्न झाले; परंतु क्षणभरच. त्यांनी आपला आत्मविश्वास कधीच ढळू दिला नाही. आसपासच्या खेड्यापाड्यांमध्ये शंकरराव आपल्या एखाद्या मित्राला बरोबर घेऊन कधी सायकल तर कधी मोटारसायकलवरून फिरू लागले. आमदार असणारे शंकरराव गावोगावी सायकलवरून फिरतात याचे त्या काळी मोठे अप्रूप वाटे. गावोगावचे सरपंच, जाणती मंडळी यांना भेटून सहकारी साखर कारखान्याची कल्पना ते मांडू लागले. हा माणूस आपल्याला फसवणार नाही एवढा विश्वास शंकररावांनी कमावला होता. त्या विश्वासावरच अनेकांनी आपल्या परीने शेअर खरेदी करायला सुरुवात केली. शंकररावांचा उत्साह वाढत गेला. पंचवीस हजार रूपये जमा झाले. तेवढे पैसे भरून नोंदणीसाठी अर्ज करायचा असा विचार केला. विविध कार्यकारी विकास सेवा सोसायटीत पर्वतेमामा नावाचे सचिव होते. त्यांना सरकारी कामांची माहिती होती. त्यांना सोबत घेऊन शंकरराव, घारमाळकर, माणिकलालशेठ व रघुनाथ इनामके ही मंडळी रेल्वेने दिल्लीला गेली. पहाडगंज पोलीस स्टेशनच्या मागे बृहन्महाराष्ट्र लॉज होते. तिथे मराठी माणसांची स्वस्तात राहण्याची व जेवणाची सोय होते, अशी माहिती त्यांना मिळाल्यावर त्यांनी तेथे मुक्काम ठोकला.

त्यावेळी भारताचे कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख हे होते. त्यांची वेळ घेऊन सर्वजण पंजाबरावांच्या कार्यालयात गेले. तिथे गेल्यावर त्यांना समजले की पंजाबराव मिटिंगसाठी बाहेर गेले आहेत. दोन तासानंतर येतील. पंजाबरावांच्या सहाय्यक सचिवाने त्यांना बाजूच्या वेटिंगरूममध्ये बसविले. पंजाबरावांनी परत येताच शंकरराव व सहकाऱ्यांना बोलावून

घेतले. डॉ. पंजाबराव देशमुख पुरोगामी व सुधारणावादी विचारांचा माणूस. शेतकऱ्यांची व विशेषतः ग्रामीण भागाची पूर्णपणे जाण असणारा विद्वान विचारवंत! मराठी मातीतील शंकररावांशी चर्चा सुरू झाली. इकडची तिकडची चर्चा झाल्यावर शंकररावांनी सहकारी साखर कारखाना सुरू करण्याचा विचार बोलून दाखविला. पंजाबरावांना आनंद झाला. सामान्य शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडवून आणण्यासाठी सहकाराशिवाय पर्याय नाही हे पंजाबराव जाणून होते त्यांनी शंकररावांचे अभिनंदन केले.

तीन लाख रूपये भरून अर्ज करा म्हणजे मान्यतेसाठी मी मदत करीन, असे सांगितले. शंकररावांनी पंचवीस हजार रूपयेच जमा झाल्याचे सांगितले. तेवढी रक्कम जमा करून अर्ज स्वीकारण्याची विनंती त्यांनी केली; परंतु सेंट्रल ॲथॉरिटीने पूर्ण रक्कम भरल्याशिवाय अर्जावर विचार होणार नाही, असा निर्णय घेतला असल्यामुळे एवढी रक्कम स्वीकारता येणार नाही असे त्यांनी सांगितले. मार्गदर्शनाबद्दल आभार मानून शंकररावांनी पंजाबरावांचा निरोप घेतला. शंकरराव अंतर्मुख झाले. त्यांनी दिल्लीत काही महत्त्वाच्या माणसांना भेटायचे असे ठरविले. मोरारजीभाई देसाईंना भेटल्यावर त्यांनी या भागात माळीनगर व श्रीपूर येथे आधीच दोन साखर कारखाने असताना तिसरा कारखाना काढणं व तो चालवणं हे कठीणच आहे असं सांगितलं.

योगायोगानं यशवंतराव चव्हाणही दिल्लीतच होते. त्यांची शंकररावांनी भेट घेतली व प्रस्तावाची कल्पना दिली. शंकरराव व सहकाऱ्यांना यशवंतरावांनीही तीन लाखांचे भागभांडवल जमा करण्याचा सल्ला दिला. आता मात्र एकच पर्याय होता, तो म्हणजे जिवाचं रान करून भागभांडवल जमा करायचं. ते परत आले ते दृढ निर्धार करूनच. आता त्यांनी सामान्य शेतकऱ्यांवर लक्ष केंद्रित केलं . प्रत्येक ठिकाणी पावलोपावली प्रश्न उभे राहू लागले. शेतकरी शंकररावांना विचारू लागले. "एवढा ऊस कुठून आणायचा?" तेव्हा शंकरराव उत्तरले "आपण

सर्वांनी आणखी ऊस लावायचा" "पण पाण्याचं काय? उसाला तर बारमाही पाणी लागतं?" कॅनॉलचे पाणी मिळवणं हेही महत्त्वाचं होतं.

शंकररावांनी फलटणच्या मालोजीराजे नाईक निंबाळकरांची भेट घेतली. त्यावेळी ते मुंबई इलाख्याचे पाटबंधारे मंत्री होते. ते सकारात्मक विचारांचे होते. उसासारख्या पिकाला बारमाही पाणी मिळणे आवश्यक असतं. त्याची व्यवस्था होणं अधिक महत्त्वाचं होतं. याची त्यांना जाणीव होती. शंकररावांसाऱखा उमदा माणूस सहकारी साखर कारखाना काढतोय याबद्दल नाईक निंबाळकरांना आनंद झाला व त्यासाठी सहकार्य करण्याचे त्यांनी ठरविले.

कारखाना उभारणीसाठी आलेल्या अडचणींची चर्चाही तिथे झाली. मुख्य प्रश्न भागभांडवलाचाही होता. त्यासाठी नाईक निंबाळकरांनी बावडा भाग जोडून देण्याचा मार्ग सुचवला. जरी माळीनगर, श्रीपूर, चितळेनगरचे कारखाने असले तरी बावडा भागाला जवळ कारखानाच नव्हता. इंदापूरचे आमदार शंकरराव बाजीराव पाटील यांची निंबाळकरांनी भेट घालून दिली. मोहिते-पाटील यांचे बावड्यातील सहकारी दामोदर रामराव घोगरे-पाटील, गणपतराव बाबूराव घोगरे-पाटील व प्रतापराव बळवंतराव सूर्यवंशी यांनी शंकरराव बाजीराव पाटील यांना मोहिते-पाटील यांच्या कारखान्याच्या उभारणीत मदत करण्याचा सल्ला दिला. शंकरराव बाजीराव पाटील यांनी भविष्याचा विचार करून अकलूजकरांना सहकार्यासाठी हात पुढे केला. आता शंकररावांचे बळ वाढले होते. त्यांच्या सहकाऱ्यांनाही नवा हुरूप चढला. पुन्हा नव्या जोमानं भागभांडवल गोळा करण्यास सुरुवात झाली. तसेच नाईक निंबाळकरांनीही बारमाही पाणीपुरवठ्या कामी मदत देण्याचे मान्य केले. कारखान्याबाबत लोकांमध्ये उलटसुलट चर्चा व्हायची. ती शंकररावांच्या कानावर यायची. त्यांनी पुन्हा एकदा मोठ्या सभेचे आयोजन करून सहकारी साखर कारखान्याची संकल्पना अडाणी, निरक्षर लोकांना

पटवून द्यायचे व भागभांडवलासाठी आणि कारखाना उभारणीसाठी त्यांची मने तयार करायचे ठरविले.

क्रांतिसिंह नान पाटलांच्या वक्तृत्वाचा शंकररावांवर खूप मोठा प्रभाव होता. क्रांतिसिंह सभेत लोकांना त्यांच्याच बोलीभाषेत लोकांच्या रोजच्या जीवनातील उदाहरणे देऊन मुद्दे पटवून देत असत. लोकांना हसवत-हसवत अंतर्मुख करायला लावत आणि परिवर्तनासाठीची हाक देत. लोक त्यांच्यामागे एका पायावर उभे राहत... शंकररावांनीही हेच सूत्र अंगीकारले. समाजमनाचा आणि लोकांच्या मानसशास्त्राचा अभ्यास त्यांना चांगलाच झाला होता. शंकररावांची वक्तृत्वाच्या अश्वावरची मांड आता पक्की झाली होती. एक एक मुद्दा स्वतंत्रपणे मांडून तो लोकांना पटवून देण्यात त्यांचा हातखंडा होता.

पुन्हा एकदा शेटेंच्या अशोक चित्रमंदिरमध्ये २० फेब्रुवारी १९५५ या दिवशी शेतकऱ्यांना एकत्र जमवून सभा घेण्याचे ठरले. यावेळी बावडा भागातील शेतकऱ्यांची बेरीज होणार होती. शंकरराव व त्यांचे सर्वच सहकारी ही सभा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेऊ लागले. जेवढे अधिक लोक सभेस येतील तेवढे पुढचे पाऊल अधिक नेटाने पडणार होते याची सर्वांना जाणीव होती. दीड-पावणेदोन हजार लोक या सभेसाठी जमले. थिएटर परिसराला जत्रेचे स्वरूप आले. या सभेसाठी इंदापूरचे मदार शंकरराव बाजीराव पाटीलही आले होते. शंकरराव मोहिते-पाटलांच्या अध्यक्षतेखाली सभेला सुरूवात झाली. शंकरराव सभेत भाषण देण्यासाठी उठले आणि सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट केला. सर्वांनी शंकररावांचे शब्द ऐकण्यासाठी कानात प्राण एकवटले.

शंकरराव बोलू लागले. त्यांनी शेतकऱ्यांच्या दूरवस्थेचे चित्र सर्वांसमोर मांडले, “शेतकऱ्यांना शेतात घ्यावे लागणारे कष्ट, गाळावा लागणारा घाम, ऊन, वारा, पाऊस, थंडी कशाचीही तमा न बाळगता लढत राहणारा शेतकरी स्वतःच्या घामातून मोती पिकवतो. पण त्याची किंमत मातीमोल! ऊस पिकवतो त्यासाठीची नांगरट, मेहनत, खत, बेणे,

पाणी, खुरपण, कच्ची-पक्की बांधणी यासाठी आपणा सर्वांना रक्ताचे पाणी करावे लागते. गुऱ्हाळावर गूळ तयार करण्यासाठी पुन्हा मेहनत. एवढे खपून शेवटी गुळाचा दर कोण ठरवितो? अखेर पदरी काय तर घोर निराशा! पुन्हा कर्ज, पुन्हा सावकार, पुन्हा लाचारी या दुष्ट चक्रामधून आपण बाहेर कधी पडणार? आपल्या घामाला, कष्टाला मोल कधी मिळणार? आपली मुले-बाळे कधी पुढे येणार? प्रश्नच प्रश्न!! त्याला उत्तर आहे. आपण सर्वांनी एकत्र येऊन नियोजनबद्ध काम करूयात. सर्वांनीच थोडा थोडा हातभार लावून आपल्या सगळ्यांच्या मालकीचा एक साखर कारखाना उभा करूया.

शंकररावांनी शेतकऱ्यांच्या काळजालाच हात घातला. सहकार म्हणजे काय? सहकाराचं तत्त्व काय? कारखाना कसा उभारणार, चालणार, समृद्धी व श्रीमंती कोणत्या पावलांनी आपल्या घरात प्रवेश करणार या सगळ्या बाबी शंकररावांनी शाळेत एखादा हाडाचा शिक्षक एखादी संकल्पना विद्यार्थ्यांना मनापासून शिकवितो तद्वत् सर्वांना समजावून सांगितल्या त्यांच्या भाषणाने जमलेला दीड-दोन हजार शेतकऱ्यांचा समुदाय अक्षरशः भारावून गेला. सर्वांना शंकररावांचे म्हणणे मनापासून पटले आणि त्यांच्या हाकेला ओ देण्याचे शेतकऱ्यांनी ठरविले.

त्यानंतर इंदापूरचे आमदार शंकरराव बाजीराव पाटील यांचेही अभ्यासू भाषण झाले. अनेक तरूण कार्यकर्त्यांनीही आपले विचार मांडले आणि सर्वांच्या मनःपटलावर सहकारी साखर कारखाना साकार होऊ लागला. टीकाकार व विरोधकांनी शंकररावांच्या या दृढ निश्चयाची थट्टा केली. त्यांना शंकरराव म्हणजे हवेत इमले बांधणारा माणूस वाटला.

आता शंकररावांनी आपल्या शेतातही अधिक लक्ष घातले. विहिरी व पाईपलाईनसाठी त्यांना सावरकरांकडून कर्ज काढावे लागले. अनेक गोष्टी करण्यासाठी पावलोपावली पैसा लागत होता. कारखान्यासाठी म्हणून भागभांडवलाची मोठी रक्कम जमा झाली होती. तरी स्वतःच्या गरजांसाठी म्हणून त्यांनी त्यातल्या एका रूपयालाही हात लावला नाही.

गावोगावी खंडोबा, मारूती, महादेव आदी देवदेवतांचा श्रावण महिन्यात भंडारा म्हणून एक उत्सव असतो. गावातील सारेच लोक देवाच्या भंडाऱ्यासाठी म्हणून शेर दोन शेर गहू आपापल्या ऐपतीप्रमाणे देत असतात. बघता बघता धान्याचा ढीग लागतो. त्याची भल्यामोठ्या कढईत खीर करतात. गावातील झाडून सारी पोरे-ठोरे, मोठी माणसे, आया-बाया देवदर्शन व भंडाऱ्याच्या प्रसादाला येतात आणि खीर खाऊन तृप्त होता. ज्याप्रमाणे गावातील एकट्या दुकट्या शेतकऱ्याला मोठी कढई भरून साऱ्यांसाठी खीर करणे सोपी गोष्ट नाही, त्याप्रमाणे आपल्यापैकी कुणाही एखाद्याला साखर कारखाना काढणे शक्य नाही. आपण सर्वांनी शेअर दिला तर कारखाना उभा राहू शकेल. असे उदाहरण देऊन ते लोकांना पटवून देऊ लागले. शेर हे धान्य मोजण्याचे एक माप जसे तसाच शेअर! ही संकल्पना शेतकऱ्यांना सहज पटू लागली.

खूपच मोठी रक्कम उभारायची होती. काम सोपे नव्हते. पण शंकररावांचा निर्धार पक्का होता. आत्मविश्वास दृढ होता. इच्छाशक्ती पर्वताएवढी होती. स्वप्न उदात्त होते. भूमिपुत्रांच्या नेत्रातील अश्रू पुसण्याचे आणि चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचे ते स्वप्न होते. साऱ्या परिसराचा सर्वार्थाने कायापालट करण्याचे ते स्वप्न होते. जर कारखाना ही संस्था उभी राहिली तर ती संस्था म्हणजे शेकडो - हजारो लोककल्याणकारी संस्थांना जन्म देणारी मातृसंस्था असेल, हे त्यांनी त्या काळी हेरलं होतं. खासगी कारखानदार साखरेच्या उत्पादनातून प्रचंड नफा मिळवत. त्यांना शेतकऱ्यांच्या सुखदुःखाचं देणंघेणं नसे. त्यांच्या मालाला कवडीमोल किंमत आणि आणि ऊस कुणाचा घ्यायचा, कुणाचा वाळवून टाकायचा याची त्यांना पुरती माहिती होती. शेतकऱ्यांमधील स्वाभिमान जागृत करून त्यांना या उदात्त ध्येयाकडे खेचण्याचे कार्य शंकररावांनी आरंभले होते.

ज्या काळात या भागातील लोकांना दिवसभर राबल्यानंतर दोन आणे मजुरी मिळे, त्या काळात एक रूपयाची बेरीज होण्यासाठी आठ

दिवस घाम गाळावा लागत असे. अशा लोकांना एक रूपया म्हणजे बैलगाडीच्या चाकाएवढा मोठा वाटत असे. अशावेळी तीन लाखांची रक्कम उभारणे म्हणजे शिवधनुष्य उचलण्यासारखे होते. ते नुसते उचलून भागणार नव्हते. ते पेलावे लागणार होते. त्यासाठी शंकररावांचा निर्धार दृढ होता. तालुक्याच्या कानाकोपऱ्यांत जाऊन, शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेतात जाऊन प्रत्येकाला सहकारी कारखाना उभारण्याची कल्पना पटवून देऊन पुन्हा नव्या जोमाने भागभांडवल गोळा करायला सुरूवात केली. शंकरराव आमदार आपल्याकडे आलेले पाहून शेतकऱ्यांचं काळीज सुपाएवढं व्हायचं. त्यांना खूप आनंद व्हायचा. आपल्या लाडक्या नेत्याला कुठं ठेवू अन् कुठे नको अशी त्यांच्या मनाची अवस्था होत असे.

त्यांनी मोठ्या आपुलकीनं दिलेला गुळाचा कोरा चहा ते घेत. क्वचित साखरेचा व दुधाचा चहा मिळे. बऱ्याचदा शेळीच्या दुधाचा चहा त्यांना मिळत असे. त्यांची चटणी भाकरी गोड करून खात व त्यांना आपला संकल्प बोलून दाखवित. त्यांच्या शंकांचं निरसन करावं हे चालूच होतं. बहुसंख्य शेतकरी मुळातच कर्जबाजारी. सावकारी पाशातून त्यांची मुक्तता होणं मुश्कील, कारण त्यांचं अव्वाच्या सव्वा व्याज, चक्रवाढव्याज, दंडव्याज. ते फेडण्यासाठी दुसरं मोठं कर्ज, त्याचीही तीच गत. अभिमन्यूप्रमाणे असणारे शूर शेतकरी अर्धाच चक्रव्यूह भेदू शकत. त्यातून बाहेर पडणं त्यांच्यासाठी मोठं जिकिरीचं होऊन बसलं होतं. त्यातूनही शंकररावांच्या शब्दाला मान देण्यासाठी शेतकरी शेअर देण्यास तयार होतं. पैसे देण्यासाठी मात्र सर्वांनाच मेटाकुटीला यावं लागायचं. कारण त्यांची गतच तशी होती.

अशा अत्यंत कठीण काळात शंकररावांची पायपीट थांबत नव्हती. थांबू शकत नव्हती. गावोगावी रस्त्यांची ओरड, दगडधोंडे, चिखल, काटे यातून जाणारे बैलगाडीच्या चाकोऱ्यांचे रस्ते, त्यातून शंकरराव कधी मोटारसायकल, कधी सायकल तर कधी पायीच गावोगावी जात. बरोबर जिवाभावाचे चार सोबती असायचे. मात्र समाजातील त्यांची प्रतिमा

चांगलीच असे. लबाड व ढोंगी लोकांना शंकररावानी कधी आपल्याजवळ थारा दिला नाही. पैसे जमा होऊ लागले. पण मोठी रक्कम जमविणे गरजेचे होते. बावडा भागातही शंकरराव बाजीराव पाटील यांच्याबरोबर खेडोपाडी जाऊन शंकररावांनी भागभांडवल उभे करण्यासाठी लोकांना तयार केले. आता भागभांडवल आकाराला येऊ लागले. शेतकऱ्यांनी घरातील धान्य, किडूकमिडूक, दारापुढील एखादे जनावर विकून येईल तो पैसा त्यांनी शेअरसाठी दिला. अशा प्रकारे कारखान्याची उभारणी ही त्या काळी एक लोकचळवळ म्हणून उभी राहिली. त्यावेळी शंकरराव लोकांना प्रवरेच्या विठ्ठलराव विखे-पाटलांनी केलेल्या कायापालटाची इत्यंभूत माहिती देत. एक आमदार म्हणून आणि आता सहकारी साखर कारखाना उभारणीसाठी धडपडणारा एक लोकनेता म्हणून त्यांच्या घरी लोकांची खूपच वर्दळ वाढलेली होती. अनेक जिवाभावाची माणसं घरी भेटायला येत. त्यांना जेवू घातल्याशिवाय ते परत पाठवत नसत. आक्का त्यासाठी खूप झटत. आपल्या घरधन्याची चाललेली धडपड पाहून त्यांना भारी कौतुक वाटे. मनातल्या मनात त्या खूप आनंदून जात. साहेबांचा आत्मविश्वास व उत्साह कायम टिकून राहण्यासाठी त्या कायम प्रयत्नशील असत. मोठ्या कुटुंबात येणाऱ्या अडचणींना त्या हसतमुखाने सामोऱ्या जात. त्यांचा आपल्या घरधन्याच्या कर्तृत्वावर विश्वास होता.

वर्षभराच्या पायपिटीनंतर अडीच लाखापर्यंत भागभांडवल गोळा झाले. आणखी पन्नास हजार जमवायचे होते. पुन्हा एकदा दौरा काढला. सभा घेतल्या. बऱ्याच प्रयत्नांनी तीन महिन्यांत त्यात आणखी पंचवीस हजारांची भर पडली. आता मात्र पंचवीस हजार गोळा करणं अशक्य वाटू लागलं. कारण ज्यांचा ज्यांचा शंकररावांवर विश्वास होता त्या सर्वांनी सर्वतोपरी साहाय्य केले होते. राहिले होते फक्त विरोधक आणि ते शेअर्स घेतलेल्या शेतकऱ्यांचा आत्मविश्वास खच्ची करण्याच्या व शंकररावांवर कुरघोडी करण्याच्या कामात गुंतले होते. आता शंकररावांनी आक्कांच्या

अंगावरील दागिने मोडण्याचे ठरविले. आक्कांनी त्या उदात्त ध्येयासाठी आपले दागिने मोठ्या आनंदाने साहेबांच्या हाती ठेवले.

साहेबांनी आक्कांचे दागिने मोडून भर घातल्याचे पाहून त्यांच्या सहकाऱ्यांनी आता झोकून देऊन भागभांडवल गोळा करायचे ठरविले. सर्वांनी चर्चा केली आणि ठरविल,. आता अखेरची लढाई. मिळेल त्या सावकाराकडून मिळेल त्या दराने कर्ज काढायचे. सोसायट्यातून कर्ज काढायचे आणि तीन महिन्यांच्या अथक प्रयत्नांती तीन लाखांची रक्कम जमा झाली. याकामी माणिकलाल शेठ, घारमाळकर काका, भगवानराव बोरावके, सदुभाऊ, दामोदर रामराव पाटील, शंकरराव बाजीराव पाटील, गणपतराव घोगरे-पाटील या साऱ्यांनी परिश्रम घेतले. कारखान्याच्या खात्यावर तीन लाखांची रक्कम जमा झालेली पाहून शंकररावांचं मन हेलावून गेलं. भागभांडवल जमा करण्याचं मोठं काम साहेबांनी पूर्ण केल होत. त्या दिवशी त्यांना खूप हलकं-हलकं वाटू लागल. आता आपला साऱ्यांचा कारखाना उभा होणार असा त्यांना मनोमन विश्वास वाटू लागला. त्यांच्या अंतःकरणात हा कारखाना कधीच उभा राहिला होता. आता तो प्रत्यक्षात साकारणार होता. स्वप्न सत्यात अवतरणार होते.

लगेच त्यांनी दिल्लीला जाण्याची तयारी केली. तीन लाख रूपयांचा धनादेश, कारखान्याचा प्रस्ताव व इतर सर्व कागदपत्रे घेऊन ते सहकाऱ्यांबरोबर दिल्लीत पोहोचले. जाताना प्रवासात त्यांना एक वेगळाच हुरूप व आनंद वाटत होता. तीन लाख रूपये भागभांडवल उभारता-उभारता त्यांची दमछाक झाली होती. पण आता ते मोठे कठीण कामही पूर्ण केले होते याचे त्यांना विशेष समाधान होते. त्यांनी आपला प्रस्ताव कमिटीपुढे ठेवला. परंतु त्याला आधीच सुरुंग पेरून ठेवला आहे, याची त्यांना यत्किंचितही कल्पना नव्हती कमिटीने पुन्हा हा प्रस्ताव स्वीकारण्यास नकार दिला. कारण या परिसरातील खासगी साखर कारखान्यांनी हरकत घेतली होती. त्यांच्या सर्व स्वप्नांचा क्षणार्धात

चुराडा झाला होता. गरीब शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडणारा आनंद त्यांना पाहायचा होता. हेच त्यांचे स्वप्न होते. परंतु भांडवलदारांच्या आक्षेपामुळे त्यांच्या प्रस्तावाला खीळ बसली.

संकटं ही माणसाची परीक्षा पाहण्यासाठीच येत असतात याची त्यांना पुरती जाणीव होती. ध्येय गाठत असताना अशा अडचणी या योणारच असे गृहीत धरून त्यांनी वाटचाल सुरू केली होती. साथीदारांनी आपल्या सेनापातीकडे पुढे काय? असा प्रश्न केला. कारण, खासगी साखर कारखानदार हे मुळातच प्रचंड आर्थिक ताकदवान! त्यांचं ना हरकत प्रमाणपत्र मिळणे म्हणजे केवळ अशक्य गोष्ट, असे त्यांना वाटले.

शंकरराव म्हणजे दुर्दम्य आशावाद आणि नसानसात ठासून भरलेल्या आत्मविश्वासाचे प्रतीकच! हातपाय गाळणे आणि स्वतः बरोबरच सहकाऱ्यांचेही अवसान गळून जाईल असे ते काहीही बोलले नाहीत. त्यांचा स्वतः वर आणि स्वतःच्या इच्छाशक्तीवर प्रचंड विश्वास होता!

माळीनगर, श्रीपूर आणि चितळेनगर म्हणजेच आजचे सदाशिवनगर इथल्या कारखान्यांचे ना हरकत प्रमाणपत्र मिळविणे अवघड असले तरी अशक्य मात्र नव्हते. त्यांनी मनाशी निर्धार केला की, काहीही करून ना हरकत मिळवायचीच! त्यासाठी त्यांच्या भेटी घेऊ, सत्याग्रह करू, उपोषणं करू आणि गरज पडल्यास शेतकरी आणि कामगारांचे आंदोलन करू, न्याय्य मार्गाने जे करता येईल ते करू आणि नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट मिळवूच. त्यांच्या मनातील आंदोलनांनी आता वेग घेतला होता. काहीही करून आपण आपलं उदात्त ध्येय गाठूच असा त्यांनी मनाशी निर्धार केला पण अनेक सहकाऱ्यांनी कारखान्याची आशा सोडून दिली होती. शंकररावांनी दिल्लीहून आल्या आल्या लगेच पुढच्या हालचाली सुरू केल्या. त्यांनी तडक माळीनगर गाठले आणि ना हरकत मागितली. माळीनगरचा कारखाना अनेक जणांनी एकत्र येऊन उभारला होता. जरी तो खासगी असला तरी त्याला सहकाराचे एक अंग होतेच. त्यांनी शंकररावांची मागणी विचारात घेतली, पण बोर्डाची बैठक व्हायला

आणि निर्णय व्हायला वेळ गेला. अखेर शंकररावांच्या मुत्सद्देगिरीला फळ आले. माळीनगर व श्रीपूर येथील ना हरकत मिळाली. चितळेनगरवाल्यांनी दिरंगाई लावली. तिथेही शंकररावांना यश मिळाले आणि तिन्ही कारखान्यांचे नो ऑब्जेक्शन मिळाल्याने पुन्हा ते तीन लाख भागभांडवल, नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेटस् घेऊन ते आपल्या सहकाऱ्यांसह दिल्लीला गेले.

प्रस्ताव घेऊन शंकरराव कार्यालयात गेले तर त्यांच्यावर डोंगरच कोसळला. मधल्या काळात कमिटीने भागभांडवलाची रक्कम वाढवून ती पाच लाख एवढी केली होती. नियतीनं आणखी एक डाव खेळला होता. पण मोठी माणसं संकटांनी डगमगून जात नाहीत. कितीही अडचणी आल्या तरी आपलं उदात्त ध्येय साध्य करण्यासाठी संघर्ष करायला ते सदैव तयार असतात. असाच काहीसा प्रसंग उभा राहिला. शंकरराव काहीसे गंभीर झाले. यातूनही मार्ग काढून पुढे जाऊ असा त्यांनी निर्धार केला.

पैशाचं  सोंग आणता येत नव्हतं. तिथं मात्र केवळ आणि केवळ पैसाच लागतो आणि आता तर तब्बल दोन लाख रूपयांची भर घालायची म्हणजे पर्वत उचलण्यासारखं होतं. आता कारखान्यासाठी पाच लाखांच्या पूर्ततेचे मोठे आव्हान त्यांच्यापुढे होते.

जर पुढे झेप घ्यायची असेल तर मागे सरूनच ती घ्यावी लागते हे त्यांनी मनोमन जाणले. पुन्हा नव्या दमाने त्यांनी वरच्या दोन लाख रूपयांच्या जुळणीला सुरुवात केली. दैवानं आतापर्यंत अनेक परीक्षा घेतल्या होत्या. ही त्यातली शेवटची परीक्षा असावी. त्यांनी पुन्हा सभा, मेळावे, कारखान्याचे महत्त्व पटवून द्यायला सुरुवात केली. सन १९५७ च्या विधानसभेच्या निवडणुकीतील विजयामुळे त्यांच्याबद्दलची लोकांची आत्मीयता वाढली होती. त्यांना आलेल्या अडथळ्यांचीही जाणीव झाली होती. पाच लाखांचा आकडा हळूहळू आकार घेऊ लागला तशा

सर्वांच्याच आशा पल्लवीत झाल्या, बघता बघता पाच लाख रूपये जमा झालेसुद्धा!

मात्र चातकाने मेघाकडे जलबिंदूच्या आशेने पाहावे आणि त्याच मेघातून चातकावर वीज कोसळावी आणि त्या तहानेने व्याकुळ झालेल्या चातक पक्ष्याचा दुर्दैवी अंत व्हावा, अशीच वीज शंकररावांवर कोसळली. ती म्हणजे सरकारने सहकारी साखर कारखान्यांना परवानगी देण्याचं धोरणच बंद करण्यात आल्याची बातमी होय. आता मात्र काम कठीण आहे असं त्यांना वाटू लागलं, पण त्यांनी स्वतःला सावरलं. जीवनाच्या सारीपाटावर आलेल्या अडचणींवर मात करून पुढे जाण्यासाठी त्यांनी नवे डाव खेळायला सुरूवात केली. आता आपण जुनी मशीनरी घेऊन शेतकऱ्यांचा खासगी कारखाना सुरू करावा किंवा सरळ काँग्रेस पक्षात प्रवेश करून आपले ध्येय साध्य करावे असे विचार मनात घोळू लागले.

देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात क्रांतिसिंह नाना पाटलांच्या विचारांनी प्रभावित होऊन काँग्रेसच्या झेंड्याखाली त्यांनी स्वातंत्र्यासाठी चळवळ उभारली होती. गणपतराव सोनवणे, बळवंतराव मगर, रघुनाथ माने गुरुजी, शिवदास कुंभार यासारख्या अनेक साथीदारांबरोबर त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत काम केले होते. देशभक्तीने भारावलेल्या त्या तरूण वयात, 'काँग्रेस पक्ष' हाच 'जीव की प्राण' होता. दुर्दैवाने देशाला स्वातंत्र्य मिळवून देणारी काँग्रेस पुढे ग्रामीण भारताचा गाभाच विसरत चालली. उच्चपदस्थांनी उमद्या कार्यकर्त्यांचे खच्चीकरण करण्याचा खटाटोप केला त्यातच अनेक धडपडे तरुण काँग्रेसपासून दुरावले. शंकररावसुद्धा त्यापैकी एक, मूळचे काँग्रेसचेच. त्यांची जडणघडण व सामाजिक संवेदनाही काँग्रेसमध्येच वृद्धिंगत झाली. त्यांचे अंतर्मन हेलकावे घेऊ लागले. त्यांच्या मनात अनेक भावनांचे कल्लोळ दाटून आले. शंकररावांसारखा मोहरा काँग्रेसच्या बाजूने असणे पक्षासाठी खूप मोलाचे होते. याची जाणीव यशवंतराव चव्हाण यांना होतीच. शंकररावांचे जनसमुदायाच्या मनाचा वेध घेणारे वक्तृत्व, दोन वेळा विधानसभेवर

निवडून येऊन सिद्ध झालेले नेतृत्व यावर यशवंतरावांची बारीक नजर होती. शंकररावांनी काँग्रेसमध्ये यावे यासाठी वरिष्ठ पातळीवरून प्रयत्न चालू होतेच. या परिसरात प्रगती व समृद्धी आणायची असेल तर आपल्याला काँग्रेसमध्ये जाण्याचा निर्णय घ्यायची वेळ आली तरी तो निर्णय घ्यायचा इथपर्यंत त्यांच्या मनाची तयारी झाली होती. सर्व आघाड्यांवर पावले पडत असतानाच एक अघटित घडले.

सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीसाठी आतापर्यंत बऱ्याच खस्ता खाल्ल्या होत्या. सारेच चिंतित असताना अचानक सबरजिस्ट्रारकडून एक पत्र त्यांना मिळाले. त्या पत्रात स्पष्टपणे सांगितले होते की, सहकारी साखर कारखान्यासाठी लोकांकडून जे पैसे जमा केले आहेत ते लोकांना त्वरित परत करा. सारेच चिंतेत पडले. पुढे काय करावे हे कुणालाच सुचेना. सारेच बधिर झाल्यासारखे झाले. पैसे ठेवावेत तरी अडचण, देऊन टाकल्यास या भूमिपुत्रांच्या जीवनात प्रकाश आणण्याचे व परिवर्तनाचे स्वप्न उद्ध्वस्त होणार. आतापर्यंत केलेले सर्व प्रयत्न पाण्यात जाणार आणि गरीब आणखी दारिद्र्याच्या खाईत लोटला जाणार, तर श्रीमंत अधिक श्रीमंत होणार. जेवढी अडचण मोठी तेवढे त्यांचे कार्य उज्ज्वल होते. त्यांच्या मनःपटलावर सारा इतिहास तरळून गेला. बैठकीतील सारेच सुन्न झाले होते. शंकररावांच्या विचारांची चक्रे फिरू लागली. आता निर्णायक असे काहीतरी केले पाहिजे. काही क्षण अंतर्मुख होऊन चिंतन केले आणि त्यांनी लगेच सहकाऱ्यांना सांगितले की, "हे पत्र आलं आहे ही गोष्ट काही दिवसांसाठी गुप्त ठेवा. तशी वेळ आलीच, तर लोकांना पैसे देऊन मोकळे होऊ."

शंकररावांनी आतल्या गोटातून अशी माहिती मिळविली होता की, आज ना उद्या सहकारी साखर कारखान्यांना परवानगी देण्याचं धोरण सुरू होणारच. त्यासाठीचे डावपेच आखायला त्यांनी सुरुवात केली. योगायोगाने माळीनगर कारखान्याच्या रौप्यमहोत्सवानिमित्त यशवंतराव चव्हाण येणार असल्याचे त्यांना समजले. माळीनगर कारखान्याचे

संचालक के. एल. गिरमे हे काँग्रसचे कार्यकर्ते होते आणि ते शंकररावांचे खास मित्र होते. त्यांच्यामार्फत यशवंतरावांनी शंकररावांना काँग्रेसमध्ये आणण्याविषयी खासगीत चर्चा केली होती. माळीनगरच्या कार्यक्रमाला जोडून अकलूजला एक कार्यक्रम घ्यायचा. नियोजित अकलूज-बावडा साखर कारखान्याच्या कार्यालयाचं उद्घाटन यशवंतरावांच्या हस्ते करून घ्यायचं आणि परवानगीची मागणी पुढे करायची, असा निश्चय शंकररावांनी केला. यशवंतराव मोठ्या मनाचे व सुसंस्कृत राजकारणी. तितकेच मुत्सद्दीही. प्रमुख विरोधी पक्षाच्या आमदाराचे निमंत्रण त्यांनी स्वीकारले.

शंकररावांनी कार्यक्रमाची आखणी केली. आपल्या वस्तीवर भोजनाचा कार्यक्रम ठेवला. भोजन झाल्यावर २५१ बैलांच्या भव्य रथामधून मिरवणूक, त्यानंतर शाळेच्या इमारतीचा कोनशिला समारंभ, ग्रांमपंचायत कार्यालयाला भेट व सदुभाऊंच्या फोटोचे अनावरण, त्यानंतर सर्वात महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे कारखान्याच्या कार्यालयाचं उद्घाटन आणि शेवटी बाजारतळावर सत्कार समारंभ व सभेचे आयोजन. सारे नियोजन ठरले.

मुख्यमंत्री शंकररावांच्या वस्तीवर जेवायला जाणार हे कळल्यावर सर्वांनीच मार्गाची स्वच्छता व रस्ता तयार करायला सुरुवात केली. सारी मुले, मोठी माणसे श्रमदान करू लागली. खड्डे बुजवले आणि मुख्यमंत्र्यांच्या गाडीसाठी रस्ता तयार झाला. ठरल्याप्रमाणे १९ नोव्हेंबर १९५९ रोजी यशवंतरावांचं आगमन झालं. वेशीवर शंकररावांनी हार घालून स्वागत केलं. शंकररावांच्या डोक्यावर शे.का.प.ची निशाणी असणारी काळी टोपी होती. तिच्याकडे यशवंतरावांचे लक्ष गेले. त्यांनी फक्त स्मित केले.

आक्कांनी केलेलं जेवण सर्वांनाच आवडलं. जेवणं झाली. शाळेच्या कोनशिला समारंभानंतर २५१ बैलांच्या सजविलेल्या रथात यशवंतराव जाऊन बसले. ते इथं आल्यापासून चकित झाले होते. हजारोंच्या संख्येने

काम करणारी माणसं, त्याचं नियोजन. ढोल, ताशे, लेझीम, हलग्या यांच्या निनादात मिरवणूक पुढे निघाली. यशवंतरावांनी सदुभाऊंच्या फोटोचे अनावरण केले, आणि पुढे कारखान्याच्या उद्घाटनासाठी यशवंतरावांना नेण्यात आलं. त्यांनी फीत कापली आणि या कारखान्याची अधिकृत नोंदणी झाली नसल्याचं त्यांच्या लक्षात आलं. त्यांनी शंकरारावांना याबद्दल विचारलं, शंकरराव म्हणाले, "रजिस्ट्रेशनसाठी तुमची मदत झाल्यावरच ते होणार."

यशवंतराव सभेच्या स्टेजवर आले. एवढी प्रचंड गर्दी पाहून त्यांना शंकररावांच्या सामर्थ्याची जाणीव झाली. साठ हजाराहून अधिक लोक या सभेस हजर होते.

यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची प्रगती साधण्याचा ध्यास घेतला होता. त्यासाठी शंकररावांसारखी माणसं खूप मोलाची कामगिरी बजावतील असा त्यांना आत्मविश्वास वाटला. "सहकारी साखर कारखान्यांना परवानगी देण्याचे धोरण लवकरच बदलले जाईल आणि परवानगी मिळालेला तुमचा कारखाना हा राज्यातील पहिला कारखाना असेल." असे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी यावेळी झालेल्या सभेत जाहीर केले. शंकररावांना मुख्यमंत्र्यांकडून भर सभेत हाच शब्द पाहिजे होता, तोच मिळाला. आशाप्रकारे त्यांचं उद्दिष्ट पूर्ण झालं.

थोड्याच दिवसांत सरकारनं धोरण बदललं, पण पाच लाखांऐवजी दहा लाख भागभांडवलाची अट घातली. यशवंतरावांच्या कार्यक्रमानंतर लोकांचा शंकररावांकडे पाहण्याचा दृष्टिकोन खूपच बदलला. त्यांच्यातील सामर्थ्यांची नव्याने जाणीव झाली. लोकांची शेअर्स घेण्यासाठी झुंबड उडाली. लोक रांगा लावून पैसे भरू लागले. केवळ दहाच दिवसांत नव्याने साडेआठ लाख रूपये जमा झाले. गरजेपेक्षा साडेतीन लाख जास्त!

आता मात्र प्रचंड आत्मविश्वासाने साहेब दिल्लीला गेले. बँकेत भागभांडवलाची रक्कम भरली. कारखान्याच्या नोंदणीसाठी केंद्र

सरकारकडे अर्ज स्वीकारला गेला. कमिटीने लवकरच निर्णय कळवू असे सांगितले. परवानगी मिळण्याची त्यांना खात्री झाली होती.

शंकररावांनी यशवंतरावांची भेट गेतली. यावेळी यशवंतराव म्हणाले, "'तुम्ही कारखान्यासाठी जागा निश्चित करा, तुमच्या भागाला जशी कारखान्याची गरज आहे तशी काँग्रेस पक्षाला तुमच्यासाऱख्या लढवय्यांची गरज आहे."

ते परत अकलूजला आले. विकासकार्यासाठी सत्ताधारी पक्ष महत्त्वाचा असतो ही गोष्ट त्यांच्या मनात अधोरेखित झाली. शंकरराव आणि इतर अनेक शेकापच्या आमदार व प्रमुख कार्यकर्त्यांना पंडित नेहरूंच्या महाराष्ट्र दौऱ्यात काँग्रेसचे सभासद करायचे ठरविले. त्याप्रमाणे २१ एप्रिल, १९६० रोजी त्यांचा काँग्रेस पक्षात प्रवेश झाला. केवळ दहा दिवसांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी ध्वजारोहण केले. मुंबई महाराष्ट्राला मिळाली, याचा जल्लोष महाराष्ट्रभर सुरू होताच. तीच राज्याची राजधानी ठरली. त्याच दिवशी शंकररावांनी माळशिरसला ध्वजारोहण केले. यावेळी त्यांना मंत्रिमंडळात समावेशाबाबत विचारणा करण्यात आली; परंतु त्यांनी, "आधी माझ्या भागाचा विकास करतो, मंत्रिपदाचे नंतर पाहू," असे सांगितले.

शंकररावांना कुस्त्यांचे भारी वेड. चंपाषष्ठीनिमित्त मगरांच्या निमगावात कुस्त्यांचे मैदान होणार होते म्हणून साहेब निमगावात गेले. तिथे त्यांचे जुने जिवाभावाचे मित्र बळवंतराव मगर, प्रल्हादकाका मगर, एकनाथबाप्पा मगर ही ज्येष्ठ मंडळी तर कृष्णात मगर आणि नानासाहेब मगर हे तरूण कार्यकर्ते त्यांचे चाहते होते.

निमगावाला कुस्त्यांची जुनी परंपरा. घरोघरची पोरं लंगोट लावून मेहनत मारणार अन् कुस्त्या करणार हा गावचा रिवाजच. माणदेशातून उगम पावणारा व असंख्य छोटेमोठे ओढे, नाले, ओहोळ आपल्यात सामावून घेणारा घुमेरा ओढा पावसाळ्यात पूर आल्यावर मोठ्याने घुमत,

धीरगंभीर आवाज करीत वाहणारा म्हणून कदाचित त्याचं नाव घुमेरा. ओढा कसला नदीच ती! विस्तीर्ण पात्र. दोहोबाजूला करंज, आंब्याची मोठमोठी झाडं. मधल्या वाळवंटात पाण्याच्या धारेच्या एका बाजूला कुस्त्यांचा फड भरायचा. गावोगावचे पाहुणे मंडळी डोळ्यांचं पारणं फेडणाऱ्या कुस्त्या पाहण्यासाठी वर्षानुवर्षे इथं येत असतात.

शंकररावही फडात आले होते. त्यांचा आशीर्वाद घेऊन अनेक पैलवान कुस्त्यांसाठी शड्डू ठोकत होते. त्यांच्या दंड ठोकण्याने आसमंतात वीज कडाडावी असा भास होत होता. शंकरराव कुस्ती पाहण्यात रमून गेले. इतक्यात अकलूजहून पर्वतेमामा धापा टाकत साहेबांजवळ आले. त्यांनी आपल्या हातातील पत्र साहेबांपुढं केलं. साहेबांनी पत्र वाचलं. कारखान्याला रिजस्ट्रेशन मिळाल्याचं वाचून साहेबांना अपार आनंद झाला. सहकाऱ्यांनी आनंदोत्सव साजरा केला. नोंदणीची तारीख होती २० जून १९६०. लगेच औद्योगिक परवान्यासाठी अर्ज करण्यात आला.

आतापर्यंत नोंदणीच्या कामात यशवंतराव चव्हाणांनी अमूल्य सहकार्य केले होते. यशवंतरावांचा दांडगा अभ्यास, राजकारणावरील पकड व लोकप्रियता पाहता शंकररावांनी कारखान्याला 'यशवंत' सहकारी साखर कारखाना हे नाव दिले. त्यांचे स्वतःचे जन्मनावही 'यशवंत'च होते! कारखान्यासाठी चांगला एम. डी. मिळणे आवश्यक होते. सणसरजवळच्या भवानीनगरचा कारखाना नुकताच सुरू झाला होता. प्रवरेच्या कारखान्यात कामाचा अनुभव असणारा एक तरूण भवानीनगरच्या कारखान्यात मॅनेजर म्हणून पाहत होता. तो तरूण म्हणजे दिनकरराव ऊर्फ आप्पासाहेब पवार हे शरद पवार यांचे बंधू. त्यांचे थोरले बंधू वसंतराव हे शेकापचे मोठे कार्यकर्ते. त्यांचा व शंकररावांचा चांगलाच स्नेह होता. वसंतरावांनी दिनकरराव ऊर्फ आप्पासाहेबांना शंकररावांच्या कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम करण्यास सांगितले. आप्पासाहेबांनी कारखान्याचे पहिले कार्यकारी

संचालक म्हणून कामास सुरुवात केली. टेबल - खुर्च्या, कपाट यापैकी कार्यालयात काहीच नव्हते. फक्त मोकळा हॉल.

कारखान्यासाठी शंकरराव जमिनीच्या शोधात होते. जवळच शंकराच्या देवस्थानची दोनशे पंचावन्न एकर जमीन पडीक होती. त्यांनी सरकारकडे ही जमीन कारखान्यास विकत मिळण्यासाठी अर्ज केला. लवकरच सरकारी किमतीने कारखान्याला हा माळ विकत मिळाला.

त्यांनी पुन्हा कारखान्याच्या कामात स्वतःला गुंतवून घेतले. मशीनरी पुरवठ्याबाबतचा करार वालचंदनगरच्या वालचंद इंडस्ट्रीजशी आधीच झाला होता. कर्जाचा प्रश्नही मार्गी लागला होता. कारखान्याची पै न पै खर्च करताना ते विचारपूर्वक खर्चत असत. सिमेंट खूप महाग होते. शिवाय त्याची उपलब्धता वेळेवर होत नव्हती. म्हणून चुनाभट्ट्या तायर केल्या. परिसरातील चुनखडी गोळा करण्यात येऊ लागली. नीरामाईच्या काठावरील वाळू हवी तेवढी उपलब्ध होतीच. कारखान्याच्या मालकीचे दोन ट्रक खरेदी केले होते. बाकी बैलगाड्यांच्या मदतीनेच सारी वाहतूक सुरू होती. खूप काटकसर करत काम चालू होते. तिथेच ताडपत्रीची राहुटी उभारली. साहेब थकल्यावर या राहुटीत थांबून प्लॅनचा अभ्यास करीत असत. कामाच्या ठिकाणी हजर असल्याने सगळे लोक मोठ्या उत्साहाने काम करत. हलगर्जीपणा व कुचराई होणे शक्यच नव्हते.

वालचंदनगरहून मशीनरीचा ट्रक आला की तो थेट फाऊंडेशनजवळच जाई. मशीनरी जमिनीवर उतरविली जातच नसे. ती जागेवरच बसविली जाई. कामाची गती वाढतच होती. ७३ फूट उंच शेड बांधून पूर्ण झाले. उंच शेड, बॉयलर फाऊंडेशन, स्प्रे टँक, गोडाऊन, टाईम ऑफिस, कामगारांची घरे, अंतर्गत रस्ते, अगदी आराखड्यानुसार प्रत्येक गोष्ट अवतरत होती. स्वप्न सत्यात अवतरत होते. सर्वांनीच रात्रीचा दिवस केला. सर्वांचा उत्साह साहेबांनी वरचेवर वाढवत नेला

होता. स्वतःकाम करण्यासोबत सहकाऱ्यांकडून काम करून घेण्याचे त्यांचे कौशल्य वाखाणण्याजोगं होतं.

दीडशे वर्षांच्या पर्दीर्घ पारतंत्र्यानंतर स्वतंत्र्य झालेल्या भारत देशाला पुढे नेण्याचं काम पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखाली सुरू होतं. इथं लोकांना अंगभर वस्त्र, पोटभर अन्न मिळणं आवश्यक होतं. त्यांनी पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाचा विचार केला होता. युद्ध देशाला व मानवजातीला दुःखाच्या खाईत लोटत असतं हे शांतताप्रेमी नेहरू जाणून होते. म्हणूनच त्यांनी संरक्षणसज्ञतेपेक्षा पायाभूत विकासकामांवर भर देऊन देशाचा चेहरा बदलून टाकण्याचा दृढनिश्चय केला. पण चीनसारख्या शेजारी राष्ट्राने १९६२ मध्ये भारताच्या ईशान्य सीमेकडून हिमालयावर आक्रमण केले. भारतीय फौजांनी प्रतिकार केला. अत्यंत कठीण परिस्थितीत पंडित नेहरूंना आठवण झाली ती महाराष्ट्राच्या सह्याद्रीची म्हणजेच यशवंतराव चव्हाणांची. नेहरूंनी यशवंतरावांवर देशाच्या संरक्षणमंत्रिपदाची धुरा सोपविली. शूर शिवरायांच्या घोड्यांच्या टापांनी पवित्र अशा महाराष्ट्र भूमीतून हा मराठा हिंदुस्थानचा सेनापती म्हणून दिल्लीस धावून गेला. त्यांनी अत्यंत नाजूक परिस्थिती आंतरराष्ट्रीय स्तरावर मुत्सद्देगिरीने हाताळली व चीनचे आक्रमण परतवून लावले.

त्यावेळी मारोतराव कन्नमवार यांनी मुख्यमंत्रिपदाचा पदभार सांभाळला. सारा देश चिंताग्रस्त होता. कारखान्याच्या कामावरही त्याचा अप्रत्यक्ष का होईना परिणाम झालाच. पण त्यामुळे काम मागे पडू दिले नाही. सीमेवरील स्थिती पूर्वपदावर येताच कामाने प्रचंड वेग घेतला. कारखान्याची उभारणी पूर्णत्वाकडे वाटचाल करीत होती. बघता बघता पूर्ण यंत्रणा सज्ज झाली. मकर संक्रांतीदिवशी साहेबांचा वाढदिवस याच दिवशी खरं तर कारखान्याचे उद्घाटन व्हायला हवे होते. पण यशवंतराव चव्हाण यांना या तारखेला येणे अशक्य होते. त्यांच्या उपस्थितीशिवाय उद्घाटन करणं ही कल्पना शंकररावांच्या कृतज्ञ मनाला पटली नाही. पुढे

यशवंतरावांनी १४ जानेवारी ऐवजी १४ फेब्रुवारी १९६३ ही तारीख कारखान्याच्या उद्घाटनासाठी दिली.

उद्घाटन समारंभासाठी जोमाने तयारी सुरू झाली. उद्घाटन समारंभाच्या आदल्या रात्री साहेबांना रात्रभर झोपच लागली नाही. मध्यरात्रीच ते कारखान्यावर चालत आले. लख्ख प्रकाशात दिसणारा हाच तो कारखाना कधीतरी स्वप्नात पाहिला होता. ते स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी आत्तापर्यंत केवढा खटाटोप केला होता. अनेकदा अनिश्चिततेच्या फेऱ्यात हा कारखाना अडकला होता. भागभांडवलाची उभारणी, सभा, दिल्लीच्या वाऱ्या, पुन्हा आशेचा किरण, पुन्हा प्रयत्न, मध्येच निवडणुका; सदुभाऊ, कबईआजी, वडील आनंदराव यांचे जग सोडून जाणे या साऱ्या घटना त्यांच्या मनःचक्षुसमोरून पुढे सरकू लागल्या.

आज १४ फेब्रुवारी १९६३ भारताचे संरक्षणमंत्री माननीय यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन होणार होते. आप्पासाहेब पवारांची सारखी धावपळ सुरूच होती. रस्त्यावर खडी टाकून रोलरने तो पक्का केला होता. दुतर्फा पूर्वीच झाडे लावली होती. ती आता मोठी झाली होती. स्वागत कमानी उभारल्या होत्या. अकलाई देवीच्या मंदिरापासून उसानं भरलेले ट्रक येणार होते. सकाळी दहाच्या दरम्यान गाड्यांचा ताफा कारखाना स्थळावर दाखल झाला. शिंगाड्यानं शिंग फुंकलं, हलग्या कडाडल्या. मुख्यमंत्री मारोतराव कन्नमवार व यशवंतरावांचं आगमन झालं. बाबासाहेब पाटील आणि बाबूराव देशमुख यांनी प्रवेशद्वाराजवळच पाहुण्यांचे स्वागत केले. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते फलकाचे अनावरण झाले. वाजतगाजत उसाने भरलेले अकरा ट्रक ओळीनं गेटजवळ आले. मोळीचं पूजन झालं. यशवंतरावांच्या हस्ते गव्हाणीत पहिली मोळी टाकण्यात आली. तो एक ऐतिहासिक क्षण होता. वाद्ये वाजू लागली आणि माळशिरस तालुक्याच्या विकासाचे नवे द्वार खुले झाले.

शंकरराव मोहिते पाटलांच्या आयुष्यातील हा एक अतीव समाधानाचा क्षण होता, जो ते कधीच विसरू शकत नव्हते, कारण एखादी जबाबदारी स्वीकारल्यानंतर ती पार पडेपर्यंत अनेक अडचणी सामोऱ्या येतात, कसोटीचे क्षण पुढे उभे राहतात, काम अधिक कठीण वाटू लागते, पण याचबरोबर मदतीचे अनेक ज्ञात-अज्ञात हातही पुढे येतात. त्यांचा मोठा आधार मिळतो. आपण एकटे नाही तर मोठा समूह आपल्य बरोबर आहे ही जाणीव होते. स्वीकारलेले काम पार पाडण्यावर तुमची प्रामाणिक श्रद्धा असली, तुमचा ध्यास तेवढा टोकाचा असला आणि जिद्द व कष्ट करण्याची मनस्वी तयारी असली तर मोठे यश मिळू शकते. याचाच थक्क करणारा अनुभव त्यांना कारखाना उभारणी करत असताना आला. नवी आव्हाने, नव्या जबाबदाऱ्या पेलण्यासाठी शंकरराव मोहिते-पाटील तयार झाले.

फाटक्या शेतकऱ्याचं कारखान्याचं मालक होण्याचं स्वप्न शंकररावरूपी भगीरथामुळे आज फळाला आलं होतं. सहकारी साखर कारखानदारीतून आज ग्रामीण भागाचा केवळ कायापालटच झाला नाही तर ग्रामीण विकासाला, राहणीमानाला वेगळी व वेगवान दिशा देण्याचे कार्य केले. त्यामुळे ग्रामीण भागात स्वावलंबी शेतकरी निर्माण झाला.

## संकल्प आणि सिद्धी

जून १९७० च्या दरम्यान मराठा चेंबर ऑफ कॉमर्स या संस्थेमार्फत शंकररावांना एक पत्र आले. त्यात जपानमध्ये एक्स्पो-७० हे जागतिक स्तरावरील कृषि-औद्योगिक प्रदर्शन होणार असून, ते पाहण्यासाठी 'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स' या संस्थेकडून प्रदर्शनासाठी येणाऱ्यांचे व्यवस्थापन करण्यात येणार होते. हे प्रदर्शन पाहण्याची इच्छा असणाऱ्या सोळा व्यक्तींना जपानला जाता येणार होते, अशा आशयाचे ते पत्र होते.

या जगातील कोणीही माणूस आईच्या पोटातून काही शिकून येत नसतो. तर त्याला त्याच्या आयुष्यात अनेक गोष्टी प्रयत्नपूर्वक आत्मसात कराव्या लागत असतात. टप्प्याटप्प्याने व्यक्ती उन्नती साधत असते. आपण आपल्या जीवनात सदैव जागृत असायला हवं. याचा आदर्श वस्तुपाढ शंकररावांनी घालून दिलेला आहे. त्यांनी सतत आपली नजर आणि मन एकाग्र करून अनेक गोष्टी जिज्ञासापूर्वक जाणून घेतल्या आहेत. अगदी लहानपणापासून त्यांची ती सवयच होती. एखादी नवीन गोष्ट पाहिली की, आपणही ती करायला पाहिजे असे त्यांना वाटे. 'केल्याने देशाटन, पंडित मैत्री, सभेत संचार। शास्त्र ग्रंथ अवलोकुनी मनुजा चातुर्य येतसे फार' यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. त्यातूनच त्यांनी राज्यातील व देशातील विविध भागांत काय काय आहे हे जाणीवपूर्वक पाहिले. त्यांचे अनेक मित्र विविध विषयांमध्ये पारंगत होते. त्यांनी अशा लोकांशी मैत्री प्रस्थापित केली होती. सर्वच क्षेत्रातील लोकांशी ते त्यांच्या –त्यांच्या विषयावर गप्पा मारायचे आणि आपली जिज्ञासेची व ज्ञानाची तहान भागविण्यासाठी प्रयत्न करायचे. रूढ अर्थाने त्यांचे शिक्षण अल्पसेच होते. पण जीवनाच्या शाळेत त्यांचे खूप शिक्षण झाले होते.

त्यांचे बोलणे-उच्चार शुद्ध व स्पष्ट असत. त्यांच्याकडे पाहून नीटनेटकेपणा शिकावा इतके ते दक्ष असत. स्वतःचे घर-दार, कार्यालय त्याचबरोबर कपडेही टापटीप असतील याकडे त्यांचा कटाक्ष असे. गबाळेपणा, अस्वच्छता त्यांना मुळीच आवडत नसे. इतरांनी त्यांच्याकडे

पाहिल्यावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप पडत असे. याबाबतही ते दक्ष असत. ते हाडाचे शेतकरी होते. कित्येक वर्षांपासून माणूस शेती करत होता; परंतु पारंपरिक शेती करत असताना शेतकऱ्याच्या पदरात अखेरीस फारसं काही पडत नव्हते. या परिसरातील शेतकऱ्यांची हलाखीची परिस्थिती कशी होती हे त्यांना चांगलेच ठाऊक होते. अजून खूप मोठा पल्ला गाठायचा होता. अनेक स्वप्ने साकारायची होती.

**जपान दौरा**

पुरोगामी विचारांच्या व नवनिर्मितीचा ध्यास घेतलेल्या शंकररावांना जगाच्या क्षितिजावर जाऊन नवनवीन गोष्टी पाहून आपल्या भागात काहीतरी नवीन करता येईल व आपल्या मागासलेल्या ग्रामीण जनतेला त्यातून नवी दृष्टी देण्याकामी जपानच्या जागतिक प्रदर्शनात निश्चितपणे काहीतरी नवीन सापडेलच, असा आत्मविश्वास होता.

हा दौरा पंधरा दिवसांचा होता. त्यासाठी प्रत्येकी साडेसात हजार रूपये एवढा खर्च येणार होता. शंकररावांनी पत्नी रत्नप्रभादेवी आणि ज्येष्ठ चिरंजीव विजयसिंह यांनाही जपानला नेण्याचे ठरविले. त्याचबरोबर त्यांचे सहकारी शिवदास कुंभार, श्रीनिवास राकले व त्यांचे बंधू चंद्रकांत राकले, डॉ. शांतीलाल गांधी व त्यांच्या पत्नी, रतनलाल व्होरा, भाऊराव दातार, ज्ञानेश्वरराव इनामके, रमणलाल फडे, विजयकांत कुदळे, घारमाळकर काका, मच्छिंद्र मामा खुर्द, कारखान्याचे कार्यकारी संचालक दिनकरराव माने आदी सहकाऱ्यांना घेऊन २ जुलै १९७० रोजी शंकररावांनी मुंबईच्या सांताक्रूझ विमानतळावरून परदेश दौऱ्याला सुरुवात केली. साहेबांना देशांतर्गत विमान प्रवासाचा एक-दोन वेळा योग आला होता. पण बाकीच्या बहुतेकांना विमानप्रवासाचा अनुभव नव्हताच. त्यांना एक नवाच अनुभव मिळाला. या परदेश दौऱ्यासाठी साहेबांच्या अनेक मित्रांनी सूट शिवून घेण्यासाठी आग्रह केला. परंतु त्यांनी ठरविले की, आपण आपल्या पारंपारिक मराठमोळ्या पोषाखातच

जपानला जायचे. शुभ्र कडक इस्त्रीची टोपी, नेहरू शर्ट, धोतर आणि पायात कोल्हापुरी चपला; असा खास पेहराव केलेले साहेब परदेशी सुटाबुटातील लोकांचे लक्ष वेधून घेत होते. नऊवारी साडी, मंगळसूत्र, कपाळावरील ठसठशीत लालभडक कुंकू या वेशातील आक्कासुद्धा परदेशात उठून दिसत होत्या. त्यांच्यासमवेत परदेशात अनेकांनी फोटो घेतले. मराठी मातीतील, मराठी माणसाचा हा रुबाबदार पोशाखच त्या दोघांना खास शोभून दिसत होता.

ठरल्याप्रमाणे विमान थायलंडची राजधानी बँकॉक येथे उतरले. त्यांचा बँकॉक शहरात एक दिवसाचा मुक्काम होता. तिथे त्यांना तिथल्या स्थानिक भाषेत एक नाटक पाहायला मिळाले. त्या नाटकात रामायणातील पात्रे व प्रसंग दाखविले गेले. भाषा फक्त वेगळी होती. त्यांनी नाटकाचा आनंद घेतला. थायलंडवर असणारा भारतीय संस्कृतीचा प्रभाव पाहून त्यांचे त्यांना विशेष कौतुक वाटले बँकॉकचा मुक्काम आटोपून ते सारे पुन्हा विमानात बसले, ते हाँगकाँगकडे जाण्यासाठी. चीन देशाला लागून असलेले हाँगकाँग शहर. तिथं चिनी लोकांची वस्ती जास्त. इंग्रजांच्या ताब्यात असलेलं हे ठिकाण. तिथं जगातील कोणत्याही देशातील व्यक्ती व्यापार करू शकत असे. त्यामुळे तिथं अनेक वस्तू स्वस्त भावात मिळत. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचे ठिकाण असल्याने तिथं प्रचंड उलाढाल होत होती. तिथं रात्र असूनही अंधार मात्र नव्हता. सारी नगरी विजेच्या दिव्यांनी लखलखीत दिसत होती. साऱ्या बाजूंनी समुद्र असणारे हे शहर कमालीचे सुंदर होते. हाँगकाँगच्या दोन दिवसांच्या मुक्कामात साहेबांनी अनेक गोष्टी जाणून घेतल्या. त्यांचे डोळे आता जपानच्या ओसाका शहरालगत असलेल्या एक्स्पो-७० या जागतिक स्तरावरील प्रदर्शनाकडे लागले होते.

जपान हे भौगोलिक क्षेत्रफळाच्या दृष्टीने किती चिमुकले राष्ट्र आहे, हे शंकररावांनी आधीच नकाशात पाहिले होते. तरीही या राष्ट्राची साऱ्या जगात कीर्ती पसरली होती. तिथल्या लोकांमध्ये कोही खास गुण

असणारच ते त्यांना आता प्रत्यक्ष पाहायला मिळणार होते. औद्योगिकदृष्ट्या जपान हे जगातील एक अव्वल दर्जाचे राष्ट्र आहे. भूकंप व वादळे अशी संकटे जपानवर वारंवार येत असतातच पण दुसऱ्या महायुद्धात जपानवर अमेरिकेने अणुबॉम्बचा वापर करून त्या राष्ट्राला शरण यायला भाग पाडले. हिरोशिमा व नागासाकी ही प्रचंड शहरे बेचिराख झाली.लाखोंनी आपले प्राण गमावले.असंख्य लोक लुळेपांगळे झाले.लहान मुले, स्त्रिया हेही या संकटातून सुटू शकले नाहीत. प्रचंड बॉम्बस्फोटामुळे इथली पिकाऊ जमीन नापीक बनली. तिचे वाळवंटात रूपांतर झाले. मानवजातीला शरमेने मान खाली घालायला लावणारे अग्निकांड तेथे घडून आले.

राष्ट्राच्या अंगी राष्ट्राभिमान व देशप्रेमाची अस्मिता जागी असेल तर त्याच्यावर कितीही मोठे संकट आले तरीही ते राष्ट्र नष्ट होत नाही. त्या संकटांशी मुकाबला करणारे देशभक्त अशा राष्ट्राच्या भूमीवर उदयास येत असतात. संकटांची तीव्रता जेवढी प्रचंड तेवढी किंबहुना त्याहूनही अधिक उंचीची कर्तबगारी त्या देशातील देशभक्ती नागरिक करीत असतात. ते जपानच्या नागरिकांनी सिद्ध करून दाखविले. पाश्चिमात्यांच्या साम्राज्यवादी संकटानेच हे तेजस्वी राष्ट्र जगात अधिक चमकू लागले. राखेतून उठणाऱ्या फिनिक्स पक्ष्याप्रमाणे हे राष्ट्र अक्षरशः राखेतूनच उभे राहिले.

या देशातील जनतेने भगीरथ प्रयत्नांच्या बळावर विज्ञान व तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रचंड विकास घडवून आणला. तंत्रज्ञानाबरोबरच औद्योगिकीकरणाच्या आधारे एक क्रांतीच तिथे घडून आली. कारखान्यांमधून अत्यंत दर्जेदार अशा विविध वस्तूंची निर्मिती होऊ लागली. उत्कृष्ट दर्जाच्या जोरावर साऱ्या जगातील बाजारपेठांवर आपल्या गुणात्मकतेने प्रभुत्व मिळविले . जगातील प्रचंड संपत्तीचा ओघ जपानकडे आपोआपच सुरू झाला आणि त्यातूनच पुन्हा नव्या जोमाने उभे राहिले ते प्रगत जपान.

तिथली श्रमसंस्कृती शंकररावांनी समजून घेतली. देशाचा प्रत्येक नागरिक देशाबद्दल परम आदर बाळगतो आहे हेही त्यांच्या लक्षात आले. प्रत्येकाचे वेळापत्रक ठरलेले. तेथील मुले घेत असलेले आधुनिक शिक्षण, त्याचबरोबर किशोरवयात त्यांचा राष्ट्रउभारणीतील सहभाग, स्त्रियांची जीवनशैली, एकूणच त्यांची संस्कृती पाहून शंकरराव भारावून गेले.

जपानमधील ओसाका शहरालगत एक्स्पो-७० एक नवेच नगर उभे केले होते. ते भव्य आणि अद्भुत होते. जगातील कुणाचेही डोळे दिपून जातील असे सर्व सोयींनी युक्त असे ते प्रदर्शन पाहून शंकरराव भारावून गेले, स्वतःला भाग्यवान समजू लागले. कारण इथून पुढे अनेक गोष्टी करण्याची नवीच दृष्टी त्यांना मिळणार होती. सुमारे दीडशे एकरांच्या परिसरात हे प्रदर्शन भरले होते. यामध्ये जगातील सुमारे एकशेचाळीस देशांनी सहभाग घेतला होता. विविध देशांची दालने तिथे होती. अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्राने तर आधीच्याच वर्षी चांद्र मोहिमेवरून येताना चंद्रावरून आणलेले दगड व गोटे ठेवले होते आणि त्यांनी स्वतःची अंतराळ क्षेत्रातील प्रगती सिद्ध केली होती. तर दुसरीकडे रशियाने सर्वप्रथम अवकाशात पाठविलेल्या रॉकेटची प्रतिकृती सादर केली होती. ते राष्ट्र साऱ्या जगाला सांगू इच्छित होते की, 'अंतराळ संशोधनात आमचा हात कुणी धरू शकत नाही.' या दोन्ही राष्ट्रांपेक्षा वेगळी गोष्ट जपानने सादर केली होती. ती म्हणजे भूकंपाच्या तीव्र धक्क्यानेही सुरक्षित राहू शकणारी घरे या प्रदर्शनात पाहावयास ठेवली होती. आपला देश मात्र संशोधन व औद्योगिकदृष्ट्या त्यावेळी खूप मागे होता. भारताने त्या प्रदर्शनात ईशान्येकडील प्रदेशात आढळणारा दुर्मिळ पांढरा वाघ या प्रदर्शनात ठेवला होता. भारतातील प्रत्येकजणच वाघ आहे, पण तो 'निद्रिस्त' आहे. तो जागा करायलाच हवा, असे त्यावेळी शंकररावांना वाटले.

युरोपियन राष्ट्रे व पूर्वेकडील राष्ट्रे यांनी प्रामुख्याने यंत्रसामग्रीवर भर दिलेला होता. हजार माणसे दिवसभर राबून जेवढे काम होऊ शकत

होते ते काम यंत्राच्या साहाय्याने तासाभरात सुबकपणे होऊ शकते. त्याचा दर्जाही उत्तम असतो म्हणून विविध वस्तूंच्या निर्मितीसाठी विविध प्रकारची यंत्रे वापरणे किती महत्त्वाचे आहे हे त्यांच्या लक्षात आले. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेती आणि शेतीमालावर प्रक्रिया करण्याची भारतीय पद्धत आणि जपानमधील प्रदर्शनात प्रगत राष्ट्रांनी त्यासंबंधी केलेले संशोधन पाहून शंकरराव प्रभावित झाले. अंतर्मुख होऊन विचार करू लागले. आपल्या देशातील शेतकऱ्याला सुद्धा हे तंत्रज्ञान अवगत व्हायला हवे असे त्यांना वाटले.

रासायनिक खतांचा योग्य वापर, सुधारित बियाणांचा वापर, आधुनिक साधनांचा वापर, पेरणीपूर्व मशागत, आंतरमशागत, कापणी, मळणीसाठीची यंत्रे यामुळे प्रगत राष्ट्रातील शेतकरी खूप मोठ्या प्रमाणात उत्पन्न घेऊन समृद्ध बनला आहे, ही गोष्ट त्यांच्या नजरेतून सुटू शकली नाही. आपण कुठे कमी पडतो आहोत, आपल्या सरकारने काय करायला हवे, तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत हे तंत्रज्ञान कसे पोहचविता येईल अशा विचारांचे तरंग शंकररावांच्या अंतर्मनात निर्माण होऊ लागले. केवळ 'मनोरंजनाच्या ' अंगाने त्यांनी हे प्रदर्शन पाहिले नाही तर एक नवीन दृष्टी घेऊन त्यांनी ते पाहिले. जपानमधील शेतकऱ्यांच्या शेतावर ते गेले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अल्प क्षेत्रातही किती मोठे उत्पन्न घेता येऊ शकते हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले.

जपानमधील संस्कृतीचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला. तेथील भाषा, चालीरीती, लोकांचे कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक व औद्योगिक जीवन यांचे त्यांनी चिकित्सकपणे आकलन करून घेतले. तिथे असणाऱ्या 'एक देव, एक देश, एक भाषा, एक जाती आणि राष्ट्रोन्नतीचे एकच ध्येय' या गोष्टी जपानला जगाच्या स्पर्धेत पुढे न्यायला कारणीभूत ठरल्या हे शंकररावांसारख्या अभ्यासू माणसाच्या ध्यानात आल्या. मधमाशीप्रमाणे सतत कामात गढून गेलेली. जपानमधील माणसे त्यांनी पाहिली. विविध कारखान्यांना त्यांनी भेटी दिल्या. तिथल्या कामात एकरूप झालेले

कर्मचारी  इतरत्र ढुंकूनही पाहत नव्हते. सारेच आपापल्या कामात कार्यमग्न झालेले होते.

भारतातील कुटुंब व्यवस्थेला समांतर अशीच कुटुंबव्यवस्था तिथे त्यांना पाहावयास मिळाली. मात्र मुलांच्या बाबतीत कमालीची काळजी ते लोक घेतात. मुलांच्या शिक्षण, आरोग्य व सर्वांगीण प्रगतीसाठी कुटुंबप्रमुखाबरोबरच सरकारही खूप मेहनत घेत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. आपल्याकडेही मुलांकडे खरीखुरी शाश्वत अशी राष्ट्रीय संपत्ती म्हणून पाहिले जात नाही ही दुर्दैवाची बाब त्यांना कळून चुकली. जपान दौऱ्यात अल्पशा काळातच त्यांनी ज्ञानाचा अमृतकुंभ भरून घेतला आणि ते मायदेशी परतले. मात्र त्यांचे संवेदनशील आणि नवनिर्मितीचा ध्यास घेतलेले मन त्यांना स्वस्थ बसू देणार नव्हते. भारतमातेच्या प्रत्येक भूमिपुत्रास देण्यासारखे असे बरेच ज्ञान त्यांच्याकडे संग्रहित झाले होते. अकलूजला आल्यावर त्यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या जीवनात प्रगतीची पहाट दाखविण्यासाठी, त्यांना दिशादर्शन होण्यासाठी इथेच कृषी-औद्योगिक प्रदर्शन भरविण्याचा निश्चय केला आणि ते त्यासाठी आपल्या सहकाऱ्यांना बरोबर घेऊन कामाला लागले.

## राजहंस कुक्कुट पालन संघ

शंकररावांची नजर रत्नपारख्यासारखी होती. माणसं हेरणं, त्याला जवाहिऱ्याप्रमाणं पैलू पाडणं, त्या हिऱ्यांचा विविध विकासकामात व सामाजिक परिवर्तनात कौशल्यानं वापर करून घेणं. वैयक्तिक, कौटुंबिक आणि पऱ्यायानं सामाजिक अशा विविध स्तरांवर प्रगती साधण्यासाठी साहेब प्रयत्नशील असत. यातूनच अनेकजण पुढे आले. अनेकांच्या अंगभूत कौशल्यांना त्यांनी वाव दिला. शेतकऱ्यांच्या, शेतमजुरांच्या, बाराबलुतेदारांच्या आणि मागास समाजातील बहिष्कृत वर्गाच्या दारिद्य, दुःख आणि वेदनांबाबत साहेब कमालीचे संवेदनशील होते. समस्यांच्या

मुळाशी जाऊन ते विचार करत. सर्वच समाजघटकांचे जीवनमान उंचावले पाहिजे यासाठी अंतर्मुख होत.

आर्थिक दारिद्य आणि अशिक्षितपणा हेच त्यांच्या मागासलेपणाचं प्रमुख कारण होतं. शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून तळागाळातील घटकांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी ते धडपडत होतेच, त्यासोबत प्रत्येकाच्या हाताला रोजगार, स्वयंरोजगार मिळायला हवा यासाठी सहकारी तत्त्वावर जे जे म्हणून करता येईल ते ते करण्यासाठी त्यांनी जिवाचे रान केले.

एके दिवशी आप्पासाहेब पवारांना घेऊन ते मुंबईला गेले. वसंतदादा पाटील यावेळी प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. वसंतदादा म्हणजे कृष्णेचा सुपुत्रच. मराठी मातीतील ढाण्या वाघ. स्वातंत्र्य चळवळीपासून दादांचा आणि साहेबांचा जुना स्नेह. मुंबईत गेल्यावर दादांना भेटल्याशिवाय ते परत येत नसत.

मुंबईहून पुण्याकडे येताना वाटेत तळेगाव भागात त्यांना लांबच लांब पांढऱ्या शेड्स दिसल्या. त्या पाहून त्यांनी आप्पासाहेबांना विचारले, "ते काय दिसते आहे?" "ती तर पोल्ट्रीची शेड्स आहेत." आप्पासाहेब उत्तरले. कृषी पदवीधर असल्याने आप्पासाहेबांना पोल्ट्रीबाबतही माहिती होतीच. गाडी पुण्याजवळ आली. त्यांनी आप्पासाहेबांना परत पोल्ट्रीकडे पाठविलं आणि त्या पोल्ट्रीची तपशीलवार माहिती मिळविण्यास सांगितले. तोपर्यंत पुण्यातील कामे आटोपण्यासाठी ते निघाले.

आप्पासाहेब म्हणजे नवनवीन प्रयोग करण्यासाठी नेहमीच उत्सुक माणूस. त्यात अशा संकल्पनांना एका पायावर उचलून धरणारे शंकरराव भेटले. मग काय? दोघांचीही चांगलीच जोडी जमली होती. त्यांनी अनेक बारीकसारीक मुद्यांचा अभ्यास करून तपशीलवार माहिती शंकररावांना सादर केली. १९६५ च्या सुरुवातीलाच राजहंस सहकारी कुक्कुटपालन संघाची स्थापना करून भागभांडवल उभारायला सुरुवात केली. त्याचबरोबर त्यांनी महाराष्ट्रातील अनेक प्रकल्पांना भेटी दिल्या. या

विषयाचा बारकाईने अभ्यास केला. बारा लाखांचे भागभांडवल उभारून १८ मे १९६५ रोजी भूमिपूजन झाले आणि पोल्ट्री शेडस् उभारल्या. सुरुवातीला सात हजार पिल्ले खरेदी करून या संघाची सुरुवात झाली. लवकरच १३ नोव्हेंबर १९६५ रोजी राजहंस कुक्कुटपालन संघात कोंबड्यांचा आवाज सुरू झाला. उत्तम दर्जाची अंडी उत्पादित होऊ लागली आणि त्यांना चांगला बाजारभावही मिळू लागला. १९७२ साली मोठा दुष्काळ पडल्याने अनेक पोल्ट्रीफार्म बंद पडले. मात्र शंकररावांनी प्रयत्नांची शिकस्त करून, प्रसंगी तोटा सहन करून हा संघ जिवंत ठेवला. नंतर तीनच वर्षांत हा तोटा भरून काढला व मोठ्या प्रमाणात नफा सुरू झाला. भविष्यात शंभर रूपयांच्या एका शेअरला पाचशे रूपयांहून अधिक उत्पादक हिस्सा मिळाला.

पोल्ट्री उद्योगासाठी औषधे आणि खाद्य यावरच ७५ टक्के एवढा खर्च येत असे. धान्यांचे बाजारातील चढउतार, वाहतूक आणि इतर बाबींचा विचार करता खाद्यनिर्मिती संघातच केली तर... असा विचार साहेबांच्या मनात आला. खाद्यनिर्मितीही सुरु झाली. अनेक बेरोजगारांना काम मिळाले. नफ्याचे प्रमाणही वाढले. सुरुवातीला जिल्ह्यातील अनेक प्रमुख शहरांमध्ये अंडी विक्री केंद्रे सुरू केली. राजहंसच्या अंड्यांना मागणीही वाढू लागली.

## जवाहर को-ऑपरेटिव्ह मेकॅनिकल वर्कशॉप

अकुशल कामगारांचे कुशल कामगारांत रूपांतर हळूहळू होत असते; परंतु तांत्रिकदृष्ट्या कुशल कामगार तयार होण्यासाठी त्यांना संधी व वाव मिळणे आवश्यक असते. त्यासाठी त्यांनी तांत्रिक शिक्षण विभागाची टेक्निकल हायस्कूलची स्थापना यापूर्वीच १९६५ साली केली होती. याच परिसरातील शेतकऱ्यांच्या, बाराबलुतेदारांच्या मुलांना तांत्रिक शिक्षण मिळून त्यांच्यातून पुढे छोटे-मोठे उद्योजक निर्माण व्हावेत ही त्यांची भूमिका होती. जगाच्या स्पर्धेत टिकण्यासाठी आपली मुले तयार

व्हायला हवीत असा त्यांचा आग्रह असायचा. हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून १९ जानेवारी १९६८ रोजी त्यांनी जवाहर को-ऑपरेटिव्ह इंजिनियरिंग मेकॅनिकल वर्कशॉपची स्थापना केली. त्यासाठी एक लाख बावन्न हजार चारशे रूपयांचे भागभांडवल उभे केले. पस्तीस कामगारांवर हे वर्कशॉप सुरू झाले.

अपारंपरिक ऊर्जास्त्रोत म्हणून गोबरगॅसचा प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणात होऊ लागला होता. महिलांच्या आरोग्यासाठी व पर्यावरण रक्षणासाठी गोबरगॅसचे महत्त्व साहेबांनी हेरले होते. शेतकऱ्यांकडे जनावरे ही असतातच. त्यांच्या शेणापासून बायोगॅसची निर्मिती होते. त्याचबरोबर काडी-कचरा व चिपाडे लवकर कुजविणारी शेणाची रबडी बाहेर पडते व उत्तम शेणखताची लवकर निर्मिती होते ही गोष्ट त्यांनी चांगलीच मनावर घेतली. शेतकऱ्याचे व त्याच्या कुटुंबीयांचे जीवनमान उंचावण्यासाठी गोबरगॅसचे महत्त्व त्यांनी जाणले आणि गावोगावी लोकांमध्ये त्यासाठी जागृती ते निर्माण करू लागले.

या वर्कशॉपमध्ये गोबरगॅससाठीच्या लोखंडी टाक्यांची निर्मिती सुरू झाली. आसपासच्या परिसरात सुमारे साडेतीन हजार टाक्या पुरविण्यात आल्या. कारखान्यावर ऊस वाहतुक करणाऱ्या हजारभर बैलगाड्यांची निर्मिती झाली. अनेक प्रकारची ग्रील्स, पोल्ट्रीसाठीच्या केजेस, कैच्या कॉलम्स, सिंचनासाठी आवश्यक जलवाहिन्यांचे विविध सुटे भाग आदींची निर्मिती या वर्कशॉपमधून होऊ लागली.

शेती व शेतकऱ्यांशी संबंधित वस्तूंची निर्मिती करणे व त्यांच्या जीवनात क्रांती घडविणे हेच त्यांचे ध्येय होते. केवळ प्रचंड नफा कमावणे हे उद्दिष्ट त्यांनी डोळ्यासमोर ठेवले नाही.

## श्री शंकर सहकारी साखर कारखाना

शिखर शिंगणापूर केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील एक प्रमुख तीर्थक्षेत्र. त्याचा इतिहासही मोठा-त्याच

शिंगणापूरच्या पूर्वेला महादेव डोंगररांगानंतर सुरू होतो काळ्याभोर मातीचा सुपीक भाग. भाटघराच्या पाण्याच्या उपलब्धतेमुळे इथल्या मातीतून अमाप पीक येत होते. याचे आडाखे बांधून चितळे या उद्योगपतींनी 'मे. चितळे शुगर वर्क्स लिमिटेड' या नावाने कंपनी कायद्याखाली नोंदविलेला हा कारकाना सुमारे चौदा वर्ष सुरूच होऊ शकला नव्हता. तो १९६७ मध्ये लिक्विडेशनमध्ये निघाला.

नातेपुते येथील भोजराज ऊर्फ नानासाहेब देशमुख, मांडव्याचे धर्माजी साळुंखे, दहिवागचे बी. डी. पाटील, ज्ञानदेव सालगुडे-पाटील, अण्णासाहेब पाटील, विष्णुपंत कुलकर्णी, जयवंतराव दाते, शहाजीराव मगर त्याचबरोबर कुरबावी, शिंदेवाडी, मोरोची, धर्मपुरी, फोंडशिरस या भागातील गावोगावच्या पुढाऱ्यांनी येऊन शंकररावांना गळ घातली की, "चितळेनगरचा लिलावात निघालेला हा कारखाना शेतकऱ्यांच्या मालकीचा होण्याकामी साहेब तुम्हीच यात लक्ष घालायला पाहिजे." शंकररावांनाही भांडवलदारांपेक्षा शेतकऱ्यांच्या मालकीचाच हा साखर कारखाना व्हावा असे मनोमन वाटत होते. पण प्रश्न पैशांचा होता. हा कारखाना ताब्यात घेण्यासाठी जी यंत्रणा राबवायची होती त्यासाठी शेतकऱ्यांची पुन्हा एकजूट करणे, भागभांडवल उभारणे या गोष्टी नक्कीच वेळखाऊ होत्या. गावोगावचे पुढारी आणि शेतकऱ्यांना हा कारखाना आपला व्हावा असे वाटत होते. पण त्यासाठीचे सामर्थ्य शंकररावांकडेच आहे अशी त्यांची खात्री होती. तालुक्याच्या पश्चिम भागातील लोक दररोज साहेबांना भेटत होते.

१९६५ मध्ये केंद्रीय कृषीमंत्री आण्णासाहेब शिंदे हे शेतकरी परिषदेसाठी अकलूज येथे आले होते. शंकररावांनी चितळेनगरचा कारखाना सहकारी तत्त्वावर चालू करण्याची परवानगी मिळण्याबाबतचा प्रस्ताव, नुकतीच पुणे विद्यापीठातून बी. कॉमची पदवी घेऊन आलेले त्यांचे सहकारी शहाजीराव मगर यांना कृषी मंत्र्यापुढे मांडण्यास सांगितला. या प्रस्तावाला अजितराव राजे माने यांनी अनुमोदन दिले. हा

ठराव या परिषदेमध्ये हजारोंच्या उपस्थितीत मंजूर झाला. हा कारखाना सुरू करण्याच्या प्रयत्नातील हे एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल होते.

साहेबांनी त्याही वेळेस भागभांडवल गोळा करायला सुरुवात केली. दोन लाख गोळा झाले. एवढ्या पैशांत काहीही होणार नव्हतं. चाळीस लाखाच्या आसपास रक्कम हवी होती. शंकररावांनी धाडस केले. नवीन सहकारी संस्था स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून दिवाळखोरीत निघालेला 'चितळे शुगर वर्क्स' हा अर्धवट अवस्थेतील साखर कारखाना संस्थेच्या ताब्यात घेण्याचे निश्चित केले.

अनेकांनी या कारखान्याबद्दल नकारात्मक सूर काढला, "जुना व चौदा वर्षांपासून गंजलेला हा कारखाना ताब्यात घेणे म्हणजे स्वतःच्या हाताने पायावर दगड मारून घेण्यासारखे आहे." असा सल्लाही अनेक जाणकार व तज्ज्ञांनी दिला. परंतु शंकररावांचे स्वतःचे काही आडाखे होते. त्यांना वंचित शेतकऱ्यांच्या विकासाचे ध्येय गाठायचे होते. ही एक लढाई होती. लढाई केवळ हत्यारांनी लढली जात नाही. लढाईत विजय मनोधैर्यामुळे मिळतो. या लढाईत लढण्यासाठी ते उभे ठाकले. साधनांचा जरूर तुटवडा होता. समोर 'बिकट परिस्थिती' नावाचा शत्रू होता. पण शंकररावांनी स्वतःला उच्चध्येयाशी बांधले होते. त्या निश्चयी माणसाला कोणीच निराश करू शकत नव्हते आणि त्यांचा तेजोभंगही होऊ शकत नव्हता. दृढनिश्चयी शंकररावांनी हाती घेतलेले काम तडीस नेण्याचा निश्चय केला. त्यांच्याकडे निखळ प्रामाणिकपणा होता आणि तोच यशाचा पाया होता. चितळे शुगर्स हा कारखाना ताब्यात घेण्यासाठी इतर खासगी उद्योगपती व धनाढ्य लोक टपून बसले होते. त्यांच्या घशात हा कारखाना गेला तर शेतकऱ्यांच्या हिताचे स्वप्न भंगणार होते.

राजधानी मुंबईत 'लिक्विडेटर' यांचे कार्यालय होते. त्या कार्यालयात या कारखान्यासंदर्भात मिटिंग होऊ लागल्या. शंकररावांनी त्यांच्या अकलूज कारखान्यातील एक प्रतिभावान अभियंते गोपाळ काळूरकर यांना मुंबईत आमदार निवासातील स्वतःच्या खोलीत

राहायला सांगितले. दररोज लिक्विडेटर कार्यालय व उच्च न्यायालयात हजर राहण्याची सूचना दिली. दररोजचा रिपोर्ट देण्याची व बारकाईने प्रत्येक गोष्ट तपशीलवार कळविण्याची कामगिरी सोपविली. काळूरकरांनाही त्यासंबंधी अनेक गोष्टींची मुद्देसूद माहिती मिळू लागली व तत्परतेने प्रत्येक मुद्दा ते शंकररावांना कळवू लागले. त्यावेळी फक्त आठ लाख रूपये इतकेच भागभांडवल जमा झाले होते. पहिले पस्तीस लाखांचे टेंडर उच्च न्यायालयाने नामंजूर केले व पुन्हा फेर टेंडर काढण्याचा हुकूम दिला. त्यानंतर साहेबांनी "३५ लाख ते ४४ लाख अशी आठ टेंडर्स तयार करावीत व ऐनवेळी कोणते टेंडर सादर करायचे ते मी सांगेन." असे कळविले. त्याप्रमाणे काळूरकरांनी आठ वेगवेगळी पाकिटे तयार केली. टेंडर देतेवेळी उच्च न्यायालयाचा मान राखला जाईल, तसेच आपल्या शेतकऱ्यांनाही हा व्यवहार जास्त महाग पडू नये असा सुवर्णमध्य साधून ३७ लाख ५० हजार रूपयांचे टेंडर भरायला सांगितले.

...आणि हे टेंडर मंजूर झाले. त्यांना खूप आनंद झाला. अनेक दिवस ते तणावाखाली वावरले होते. मात्र आता अनिश्चिततेचे धुके नाहीसे झाले होते. पण...केवळ 'तीनच दिवसांत ही रक्कम भरायची' अशी अट उच्च न्यायालयाने घातली होती. जवळ फक्त आठ लाख होते. आता एवढे पैसे कसे गोळा करायचे ही चिंता प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसू लागली. बोलणं सोपं असतं, पण करणं कठीण असतं. साहेब एकाग्रचित्त होऊन विचार करू लागले. एखाद्या गोष्टीवर अनेक अंगांनी विचार करायचा व शेवटी योग्य निर्णय घेऊन तातडीने निर्णय घ्यायचा व अंमलबजावणी करायची ही त्यांची कामाची रीतच पडली होती. त्यांनी विचार करून शेवटी निर्णय घेतला की, 'आत्ता अखेरची लढाई, आर या पार, जे होईल ते होईल. आपली सारी जमीन, घर-दार, घरातील वस्तू, दागदागिने या साऱ्या गोष्टी पणाला लावयच्या.'

ते जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन होतेच. त्यांनी बँकेचे मॅनेजर लिगाडे साहेबांना निरोप देऊन बोलावून घेतले. त्यांना अडतीस लाख

रूपये कर्जाची मागणी केली. लिगाडे साहेबांना पेच पडला. स्वतः चेअरमनच कर्ज मागणी करताहेत. हो म्हणावं तरी तारणाचं काय ? नाही म्हणाव तरी चेअरमन होते ते. त्यांची अस्वस्थता शंकररावांनी ओळखली आणि त्यांनी सांगितलं, माझी दीडशे एकर बागायती जमीन, घर-दार, स्थावर जंगम जे जे म्हणून आहे ते सर्व तारण म्हणून बँकेकडे ठेवा आणि कारखान्याला कर्ज मंजूर करा. मी सर्व संचालकांची बैठक घेतो आणि त्यांना याची कल्पना देतो. विकासकामाला बँकेचे सर्व संचालक मदतच करतील याचा मला विश्वास आहे.

त्यांच्या प्रस्तावाला संचालक मंडळाने एकमुखी पाठिंबा दिला आणि कर्ज मंजूर झालं. अशा प्रकारे ३१ डिसेंबर १९६८ ला कारखान्याच्या नव्या व्यवस्थापनाने चितळेनगर साखर कारखान्याचा ताबा घेतला. शंभू महादेवाच्या मार्गावरील हा कारखाना त्याच्याच कृपाशीर्वादाने शेतकऱ्यांच्या मालकीचा झाला. म्हणून आधीच ठरल्याप्रमाणे श्री शंकर सहकारी साखर कारखाना या नावाने कारखान्याचे रजिस्ट्रेशन झाले. चितळेनगरचं नाव बदलून स्वर्गीय सदुभाऊंच्या नावानं सदाशिवनगर असं नाव त्या गावाला द्यायचं ठरलं. जिल्ह्याच्या पश्चिम टोकाकडील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आता कारखान्याच्या रूपाने नवा हुरूप आला होता.

उडी घेण्यात धोका असतो, धाडसही असते. पण नियतीची साथ असेल आणि वेळही अचूक असेल तर यशाचे शिखर दूर राहत नाही. शंकररावांनी, श्री शंकर सहकारी साखर कारखान्याच्या रूपाने मोठ्या धाडसाने यशाचे एक नवे शिखर सर केले. असं वाटतं! साहेबांना गरूडाचे पंख असावेत, कारण सतत नवी झेप घेण्यासाठी ते तयार असत.

## विजय प्रिंटिंग प्रेस

स्त्रीशक्तीबाबत शंकरराव सकारात्मक विचारांचे होते. स्त्रियांमध्येही सामर्थ्य असते. मात्र पुरुषप्रधान संस्कृतीत त्याचे चीज होत नाही ही गोष्ट त्यांच्या ध्यानात आली होती.

खरेतर घर चालविण्यात पुरुषांपेक्षा स्त्रियांचेच योगदान मूलभूत स्वरूपाचे असते. त्या घरातील कित्येक कामे करतात. त्यांना वाव मिळण्यासाठी त्यांच्या मनात एक कल्पना आली. स्त्रिया सहजपणे चालवू शकतील असा प्रिंटिंग प्रेस सुरु करण्याचे त्यांनी ठरविले. कारखान्याच्या आवारातच, कारखान्याच्या द्वारे या प्रेसची उभारणी केली. कंपोझिंग, बाईंडिंग आणि प्रिंटिंग अशी कामे तेथेच होऊ लागली. इतर संस्थांनाही त्याचे साहाय्य झाले. सर्व महिला कर्मचारी या प्रेसचे काम चांगल्या रीतीने पार पाडू लागल्या. दि. २१ सप्टेंबर १९६९ रोजी ही संस्था शंकररावांनी सुरू केली. बचत गटांच्या माध्यमातून आजच्या महिला विकासाच्या धोरणांचा पाया शंकरंरावांनी चार दशकांपूर्वीच घातला होता.

**मृदा पृथक्करण प्रयोगशाळा**

मातीतूनच मोती पिकतात. साऱ्या दुनियेचं भरणपोषण करणारी माती. मातीचंही आरोग्य असतं. ते जितकं उत्तम तितकी पिंक जोमदार येतात. शंकररावांना इथल्या शेतकऱ्याला नवी दृष्टी द्यायची होती. शेतात राबत असताना त्या कष्टांना योग्य दिशा असायला हवी तरच शेतीचं गणित जुळणार होतं. विविध पिकांसाठी जमिनीत कोणकोणते घटक किती प्रमाणात असायला हवेत? अनावश्यक घटक कमी करण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्या लागतील? ज्या घटकांची उणीव होती असे घटक कसे भरून काढता येतील? उसासारख्या पिकांचा साखर उतारा कसा वाढेल? यासारख्या अनेक प्रश्नांवर उत्तर होते ते मातीचे आरोग्य तपासणे व त्या दृष्टीने उपाययोजना करणे. मातीपरीक्षणासाठी शेतकऱ्यांना कृषी विद्यापीठांवर अवलंबून रहावे लागत होते. ते सर्वसामान्य शेतकऱ्यांना शक्य नव्हते. ही बाब साहेबांच्या नजरेतून सुटली

नाही. त्यांनी कारखान्याच्या जवळच १ ऑगस्ट १९७१ पासून मृदा सर्वेक्षण प्रयोगशाळा सुरू केली. यातून शेतकऱ्यांच्या जमिनीची सुपीकता सुधारण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येऊ लागल्या.

## शिवपार्वती सार्वजनिक ट्रस्टची स्थापना व दुष्काळ निवारण्यासाठी प्रयत्न

१९७२ साली फार मोठा दुष्काळ पडला. कधीकधी आस्मानी संकटावर मात करण्यासाठी सरकारही कमी पडत असते. अनेक वेळा नियम आड येत असतात. शंकररावांनी त्याच वर्षी यशवंत कारखान्याच्या माध्यमातून ट्रस्टची स्थापना केली. पाणीपुरवठ्यासाठी नवे कोरे तेरा टँकर्स घेतले. सोलापूर जिल्ह्याच नव्हे तर पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातही टँकरमधून पाणीपुरवठा सुरू केला. त्यासाठी ते स्वतः जातीने फिरून लक्ष घालत असत.

विद्यार्थ्यांना पोटालाच मिळत नव्हते तर शाळेत जाऊन काय उपयोग? अनेक मुलेही शाळा सोडून कामावर जाऊ लागली. तेव्हा शंकररावांनी पुढाकार घेऊन शेकडो विद्यार्थ्यांची जबाबदारी स्वीकारली व त्यांचे शिक्षण सुरू राहिले. जिल्ह्यात ठिकठिकाणी छात्रालये सुरू केली. तिथे विद्यार्थ्यांच्या निवास व भोजनाची सोय करण्यात आली. चाऱ्यावाचून जनावरे तडफडत होती. जनावरांच्या मालकालाच अन्नधान्य नव्हते तर जनावरे जगवायची कशी, हा मोठा प्रश्न होता. अनेकांनी आपली दावणीची जनावरे जड अंतःकरणाने सोडून दिली. पल्या डोळ्यामागे त्यांचे जे व्हायचे ते होईल. आपल्या डोळ्यांनी चाऱ्यावाचून तडफडून मरणारी जनावरे लोकांना पाहवत नव्हती. संवेदनशील मनाच्या शंकररावांनी लोकांना आवाहन केले की, त्यांनी आपली जनावरे चारा छावणीवर आणून सोडावीत. त्यांनी ठिकठिकाणी चारा छावण्या सुरू केल्या होत्या. स्वतः फिरून जनावरांसाठी ते चारा गोळा करू लागले. पाचटाच्या भुश्यावर मळी टाकून जनावर जगविण्यासाठी त्यांनी चारा

तयार करण्याचे नवीनच तंत्र विकसित केले. अखेर माणसांच्या प्रयत्नांपुढं निसर्गाने हात टेकले. इकडची सावली काही काळानं का होईना तिकडे होतेच. दुष्काळ काही घर बांधून कायमचा राहत नाही.

शंकररावांनी लोकांना जगण्याची नवी उमेद दिली होती. दुष्काळ पराभूत झाला होता. शंकरराव मोहिते-पाटील या सेनानीच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांची सेना विजयी झाली होती. साहेब चिंतन करू लागले. पावसाचं प्रमाण कमीजास्त होणं हे नैसर्गिक आहे. दुष्काळामध्ये भविष्यात कधीही माणूस कोलमडून पडू नये यासाठी काय करता येईल यावर ते विचार करू लागले. एकाग्रचित्त होऊन ते अशा समस्यांवर विचार करायचे व त्यांना मार्ग सापडायचा.

यावेळीही त्यांना सुचले की, जेवढा पाऊस इथे पडतो ते सारे पाणी वाहून जाते. भूगर्भात पाण्याचा साठा पुरेसा होत नाही त्यामुळे पावसाळ्यानंतर लगेच जमिनीतील पाणी पातळी खालावते. ती खालावूच नये यासाठी पडणाऱ्या पावसाचा थेंबन् थेंब जमिनीत मुरला पाहिजे. त्यांनी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची भेट घेतली. दुष्काळ निवारण्यासाठी जलसंधारणाच्या मुद्यावर ते आग्रही राहिले. नाईकसाहेबांना शंकररावांची दूरदृष्टी, बारकाई व अभ्यास चांगलाच माहीत होता. त्यांनी अधिकारी व मंत्र्यांना जलसंधारणाच्या संबंधी शंकररावांची संकल्पना बोलून दाखविली. साऱ्यांनीच शंकररावांची जलसंधारणाची भूमिका उचलून धरली आणि उभा महाराष्ट्र पुन्हा येणाऱ्या दुष्काळाशी मुकाबला करण्यासाठी सज्ज झाला.

## महाराष्ट्राच्या सामुदायिक 'विशाल विहीर' योजनेचे प्रणेते

शेतीला शाश्वत पाण्याची अत्यंत आवश्यकता असते हे शंकरराव जाणून होते. अल्प आणि अत्यल्प भू-धारक शेतकऱ्याला खोलवर विहीर खोदणे शक्य नव्हते. उन्हाळ्यात जमिनीतील पाणीपातळी कमालीची खालावते व शेतकऱ्यांची उभी पिके करपून जातात याचा अनुभव

साहेबांना होताच. याला पर्याय म्हणून काहीतरी केले पाहिजे या विचारात ते असतानाच त्यांच्या डोक्यात सामुदायिक विहिरीने आकार घेतला होता.

एकटा-दुकटा शेतकरी अपुऱ्या भांडवलामुळे विहीर मोठी करू शकत नव्हता. अनेकांची ताकद एकवटली तर मोठमोठी कामे सहज होऊ शकतात हे त्यांनी सिद्ध केले होते. त्यांनी स्वतः गणित मांडले आणि त्यांच्या कल्पनेतील पहिली विशाल विहीर पानीवला खोदली गेली. १०० फूट लांब व १०० फूट रूंद तसेच ३० फूट खोलीची ती विहीर होती. खोदाईसाठी ६०,००० इलेक्ट्रिक मोटार, पाईपलाईन, पंप हाऊस व इतर खर्च यावर ९०,००० असा जास्तीत जास्त दीड लाख रूपये खर्च येत होता. त्यावर दोनशे ऐंशी एकर क्षेत्र ओलिताखाली येत होते. याउलट वैयक्तिक विहिरी खोदून एवढे क्षेत्र भिजविण्यासाठी ७० विहिरी खोदाव्या लागत होत्या. बारा हजार रूपयांची एक विहीर म्हणजे सुमारे आठ लाख चाळीस हजार एवढा खर्च येत होता. म्हणजे दीड लाखाच्या खर्चात साडेआठ लाखांचे काम होत होते.

शिवाय वैयक्तिक सत्तर विहिरींसाठी सत्तर गुंठे जमीन, सत्तर ऑईल इंजिन्स किंवा इलेक्ट्रिक मोटारी, श्रमशक्ती लागत होती. तुलनेने सामुदायिक विहीर खूपच किफायतशीर होती. हे शंकररावांनी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना प्रात्यक्षिकातून पटवून दिले.

मुख्यमंत्र्यांनी सामुदायिक विहीर योजना मंत्रिमंडळासमोर मांडली आणि सर्वांनीच या योजनेचे स्वागत केले. महाराष्ट्र सरकारने ही योजना अमलात आणली. केवळ सहा महिन्यांच्या काळात सोलापूर जिल्ह्यातच ३४६ विहिरी खोदल्या गेल्या. महाराष्ट्रभर ही योजना कार्यान्वित झाली होती. भू-विकास बँक व महाराष्ट्र शासनाकडून पंचवीस वर्षांच्या दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देण्यात आले होते आणि या साऱ्या योजनेचे उद्गाते होते शंकरराव मोहिते-पाटील. उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्यासाठी मोठ्या प्रमाणात सिमेंटचे पाईप आवश्यक होते. त्यांचा दर्जा

उत्तम असणे ही आवश्यक बाब होती. एक कल्पना इतर अनेक कल्पनांना व योजनांना जन्म देत असते. शंकररावांनी अकलूजला सहकारी तत्त्वावर आणखी एक युनिट सुरू केले होते. सिमेंट पाईप कारखाना सुरु झाला होता. अनेकांनी या सिमेंट पाईपची मागणी केली. गावोगावी विशाल सामुदायिक विहिरी खोदल्या जात होत्या. त्यातून समृद्धीचे अमृत उपसले जात होते. शंकररावानी महाराष्ट्राला एक नवा मंत्र दिला होता.

**गौरीशंकर महिला सहकारी संस्था**

स्त्रीशक्तीला वाव देण्यासाठी महिलांना एकत्र काम करण्यासाठी काहीतरी करायला हवे असे त्यांना वारंवार वाटू लागले. त्यासाठी या संस्थेची स्थापना केली. सर्वच स्तरातील गरजू महिलांना विविध गृहोपयोगी वस्तू निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण देऊन उत्पादन सुरू केले. लोणची, पापड व इतर अनेक वस्तू महिला तयार करू लागल्या. २८ जानेवारी १९७६ रोजी या संस्थेची स्थापना केली. त्या उद्घाटन प्रसंगी शालिनीताई पाटील सभेच्या अध्यक्षस्थानी होत्या. रत्नप्रभादेवींनी या सभेत भाषण केले, त्याचे शंकररावांना खूप कौतुक वाटले! अशाप्रकारे आजच्या बचत गटाच्या माध्यमातून होत असलेल्या महिला सबलीकरणाच्या व रोजगाराच्या धोरणाची मुहूर्तमेढ शंकररावांनी त्या काळी अकलूजमध्ये रोवली होती.

# कौटुंबिक आघाडीवर

झाडाचा बुंधा घट्ट व कणखर असेल तर झाडाच्या फांद्या, पाने, फुले टवटवीत व डौलदार दिसतात. या पानाफुलांतून कर्तबगार सामाजिक परिवर्तनाचा अखंड प्रवाह देणारे वारे वाहत राहते. असे प्रवाही वारे शंकररावांच्या पुढील पिढीने वाहते ठेवले. शंकररावांना एकूण नऊ अपत्ये. सहा मुले व तीन मुली. विजयसिंह सर्वात मोठे, त्यानंतर राजसिंह, जयसिंह, मदनसिंह, प्रतापसिंह व सर्वात धाकटे उदयसिंह. जयश्रीताई, अरूणामाई व गिरिजादेवी या तीन कन्या. सुना नातवंडांनी त्यांचे घर भरून हसते-खेळते झाले होते.

थोरले चिरंजीव विजयसिंहानी अकलुजचे सरपंचपदापासून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री पदापर्यंत मजल मारली. अत्यंत संयमी व विकासाभिमुख राज्यकर्ता म्हणून त्यांची ओळख उभ्या महाराष्ट्राला आहे. सांस्कृतिक कार्य, सार्वजनिक बांधकाम, पर्यटन, ग्रामविकास या खात्याचे मंत्री म्हणून त्यांनी भरीव कामगिरी केली आहे.

दुसरे चिरंजीव राजसिंह यांनी सहकार महर्षींची धवल क्रांतीची पताका अखंडपणे फडकवित ठेवली. शिवामृत दूध संघाची जबाबदारी स्वीकारून दूध संघास आज देशातील एक अग्रमानांकित दूधसंघ म्हणून नावलौकिक मिळवून दिला आहे. शिक्षणसंस्था, साखरकारखाना यांची जबाबदारी सांभाळतच सहकारमहर्षींनी घालून दिलेला सांस्कृतिक वारसा जयसिंहानी जपला आहे. राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेचे आयोजन करून लोककला जतन करण्यात त्यांनी राज्यपातळीवर मोठे योगदान दिले आहे. या परिसरातील शेतकरी, भटके-विमुक्त, कामगार, यांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करत शेतीउद्योग सांभाळणाऱ्या मदनसिंहांनी सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद भूषविले आहे.

प्रतापसिंह म्हणजे धाडसी व उपक्रमशील नेतृत्व. सोलापूर जिल्हा परिषदेस राज्यातील पहिल्या क्रमांकाची जिल्हा परिषद म्हणून नावलौकिक मिळवून देण्याचा मान प्रतापसिंहांना जातो. राज्याचे माजी सहकारराज्यमंत्री व माजी खासदार म्हणून त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे. सदाशिवनगरच्या श्री शंकर सहकारी साखरकारखान्याची धुरा ही त्यांनी समर्थपणे सांभाळली आहे.

धाकटे चिरंजीव उदयसिंह हे उद्योगशील व्यक्तिमत्त्व 'शिवरत्न'च्या माध्यमातून बांधकाम क्षेत्रात त्यांनी आपले स्थान निर्माण केले आहे. परिसरातील क्रिडा व सांस्कृतिक उपक्रमात ते हिरिरीने सहभागी होतात. राज्याच्या कुक्कुटपालन महासंघाचे अध्यक्षपद ही त्यांनी सांभाळले आहे. साहेबांच्या कन्या जयश्रीताई यांचा विवाह कोल्हापूर येथील पूर्वाश्रमीचे उच्चाधिकारी रघुनाथराव चव्हाण यांचे ज्येष्ठ चिरंजीव कृष्णराव यांच्याशी झाला. दुसरी कन्या अरूणामाई यांचा विवाह महाराष्ट्राचे माजी मंत्री स्वर्गीय बाळासाहेब देसाई यांचे चिरंजीव अरूणराव देसाई यांच्याशी झाला. परंतु काळाने माईंना अकालीच हिरावून नेले. धाकटी कन्या गिरिजादेवींचा विवाह बारामती तालुक्यातील निंबुत येथील प्रतिष्ठित काकडे घराण्यातील श्री. बाबुलाल काकडे यांचे चिरंजीव प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ ॲड. विराज काकडे यांच्याशी झाला.

मोहिते पाटील घराण्याचा वटवृक्ष असा बहरत गेला. नऊ भावंडाची आई म्हणून रत्नप्रभादेवींची भूमिका फार महत्त्वाची ठरली. आपल्या मुलांच्या भवितव्याची स्वप्नं उभयतांनी पाहिली, रंगविली आणि प्रत्यक्षात उतरविली. आईचं शालीन सौंदर्य व वडिलांचे विचारशील नेतृत्व यांचा अनोखा संगम मुलांच्या ठिकाणी पाहवायस मिळतो. उभयतांच्या संस्कारामुळेच मुले कर्तबगार निघाली.

साहेबांच्या आयुष्यात जसे सुखाचे क्षण आले, तसेच दुःखाचे डोंगरही त्यांच्यावर कोसळले. त्यांचे धाकटे बंधू सदाशिवराव असेच अचानकपणे देवाघरी गेले. ते सिंहासारखे तडफदार आणि हिकमती

होते. कुस्ती खेळल्याने त्यांचे शरीर बलवान होते. अकलूजच्या सरपंचपदी तेच होते. शंकररावांना सदुभाऊंचा खूप मोठा आधार होता. त्यांना मोटारसायकलचा सायलेन्सर भाजला म्हणून नाव झालं. जखम बरीही झाली, पण एके दिवशी अचानक सकाळीच भोवळ येऊन ते पडले. बाबासाहेब व शंकररावांनी त्यांना तातडीनं पुण्याला रुबी हॉस्पिटलमध्ये दाखल केलं. डॉक्टरांनी धनुर्वाताचं निदान केल. दोन दिवस मृत्यूशी चिवट झुंज चालूच होती. पण अखेर काळाने डाव साधला. १३ मार्च १९५९ रोजी सदुभाऊ सर्वांना दुःखसागरात लोटून गेले.

भीमेच्या पात्रातील डोहात असणाऱ्या सुसरीला पराभूत करणारा, अनेक तंटे जागीच मिटविणारा, प्रचंड लोकसंग्रह असणारा तरूण धाकटा भाऊ काळाच्या पडद्याआड गेला, याचे शंकररावांना खूप दुःख झाले. आपले दुःख हृदयाच्या कप्प्यात बंद केले. सदुभाऊंच्या जाण्याने त्यांच्या काळजावर झालेली जखम अजून ओलीच होती. तोच काळ पुन्हा त्यांच्या घरावर चाल करून आला. गणपतराव काकांचेही निधन झाले. त्याच वेळी साहेबांचे वडील आनंदराव हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होते. त्यांना आपला भाऊ गेला हे कुणी सांगितले नाही, पण संकेतावरून त्यांनी ते ओळखले आणि काकांच्या मृत्यूच्या दहाव्या दिवशीच त्यांनीही डोळे मिटले. शंकररावांचे पितृछत्र हरपले. आपण पोरके झालो याचे प्रचंड दुःख त्यांना झाले. पण नियतीपुढे कुणाचेही चालत नाही. वेळ आली की जावं लागतं. हतबल होऊन वस्तुस्थितीचा स्वीकार करण्यापलीकडे आपल्या हातात काहीही नसतं, याची जाणीव शंकररावांना होती.

मारूतराव आनंदराव माने-पाटील म्हणजेच बाबासाहेब. बाळगोपाळांचं लाडकं व्यक्तिमत्त्व, याचकांसाठीच कर्ण, मागायला येणाऱ्याला खिशातील हाताला लागतील तेवढे पैसे देणारा, गावातील मुलाबाळांवर खाऊसाठीची खैरात करणारा, अकलूज गावचा थोरला पाटील. निधड्या छातीचा, रोखठोक आणि बाणेदार, तितकाच हळव्या मनाचा संवेदनशील राजा माणूस.

शंकररावांच्या जडणघडणीत त्यांचा सिंहाचा वाटा होता. काहीतरी वेगळं, भव्यदिव्य कार्य शंकररावांनी करावं, मोठी स्वप्नं पहावीत, ती सत्यात उतरवावीत असं त्यांना नेहमी वाटे. त्यासाठी आपल्या धाकट्या भावाच्या अंगात धमक आहे, त्याला वाट मोकळी करून दिलीच पाहिजे, शिवाय त्याच्या वाटेतील काटेही दूर सारले पाहिजेत यासाठी ते झटत राहिले. त्यांनी शंकररावांना सरपंच करण्यात मोठा वाटा उचलला. १९५२ ची विधानसभा निवडणूक लागली तेव्हा गावोगावी असणारे पाटील, सरपंच आणि गावकामगार कोतवालापासून ते गोरगरीब जनतेपर्यंत बाबासाहेबांचा मोठा चाहतावर्ग होता.

त्यांनी अकलूजचे सरपंचपद आणि माळशिरस तालुका पंचायत समितीचे सभापतिपद भूषविले. सर्वसामान्यांसाठी मुक्तहस्ताने त्यांनी अनेक योजना राबविल्या. जनतेचे ते चालते-बोलते न्यायालय होते. जागेवरच ते न्याय देत. एक राजा माणूस म्हणून त्यांची ख्याती होती.

एक दिवस पाहाटेच्या वेळी बाबासाहेबांना हृद्यविकाराचा तीव्र झटका आला. डॉक्टरांना बोलावून घेतलं. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. भल्या पहाटेच शंकररावांना निरोप मिळाला. ते त्वरेने बाबासाहेबांकडे वाड्यावर गेले. त्यांच्या काळजात धस्स झाले. धाकटे सदुभाऊ असेच यापूर्वी ध्यानीमनी नसताना सोडून गेले. वडील आनंदराव, चुलते गणपतराव यांचे नुकतेच निधन झाले होते. आणि आता बाबासाहेबही ४ ऑक्टोबर, १९६८ रोजी सर्वांना सोडून गेले होते. त्यांच्या आईने हंबरडा फोडला. तरूण सदुभाऊ, नंतर सौभाग्य आणि आता वडील मुलगा अचानक गेल्याचे दुःख त्यांना अनावर झाले. स्वतःच्या पोटच्या गोळ्याच्या मृत्यूचे दुःख अक्षरांत बद्ध करणे, शब्दात सांगणे शक्यच नाही. त्या माउलीलाच त्या दुःखाची खोली माहीत. आपण सारे फक्त कल्पनाच करू शकतो. शंकररावांनी शोक आवरला. बाईंना सावरले. सर्वांना धीर दिला.

प्रचंड जनसमुदायाने बाबासाहेबांना नीरामाईच्या काठी अखेरचा निरोप दिला. शंकररावांना प्रेरणा देणारा स्फूर्तीचा झरा अकल्पितपणे नाहीसा झाला, तरी ते आपल्या पाठीशी प्रेरणास्त्रोत बनून उभेच आहेत असे शंकररावांना वाटे.

शंकररावांच्या मातोश्री कृष्णाबाई यांची तब्येत खालावली होती. त्यांचं वयही झालं होतं. आयुष्याच्या वाटचालीत अनेकदा ऊन-सावल्यांचा खेळ त्यांनी पाहिला होता. आपल्या मुलांवर सुसंस्कार केले होते. मातृभूमीचे पांग फेडण्यासाठी त्यांनी पुत्रांना घडविले होते. सदुभाऊ व बाबासाहेब हे दोन्ही पुत्र ऐन उमेदीत काळाने हिरावून नेले होते. पतीच्या जाण्यानं मोठी पोकळी निर्माण झाली होती. नियतीचे आघात सहन करण्यासाठी त्यांना शंकररावांचा सूर्यपराक्रम व कर्तबगारी उभारी देत होती. दि. २५ सप्टेंबर १९७३ रोजी दुपारी कृष्णाबाईंची प्राणज्योत मालवली. अत्यंत कृतार्थ जीवन त्या जगल्या.

आई म्हणोनी कोणी आईस हाक मारी।
मज होय शोककारी आई घरी न दारी।
*स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी।*

या कवी विनायकांच्या काव्यपंक्ती शंकररावांना आठवल्या. आईच्या मृत्यूचं दुःख शब्दांत मांडणं कठीण असतं. त्यांना या आभाळाखाली मायेचं छत्र धरणारं असं कोणी उरलं नव्हतं. नीरामाईच्या काठावर त्यांनी आईच्या चितेला अग्नी दिला. त्या ज्वालांना साक्ष ठेवून त्यांनी भूमिपुत्रांच्या उत्कर्षासाठी आपलं उर्वरित जीवन समर्पित करण्याची प्रतिज्ञा केली.

## अभिष्टचिंतन

आता शंकररावांचे नाव महाराष्ट्रभर झाले होते. सामान्य म्हणून जन्माला एक भूमिपूत्र. समाज उन्नतीचा ध्यास घेतलेले शंकरराव प्रत्येक स्तरावर स्वतःचा ठसा उमटवत आले होते. प्रत्येकालाच ते आपलेसे

वाटत होते. अनेक सहकारी संस्था त्यांनी भगीरथ प्रयत्नांनी उभारल्या होत्या. त्या यशस्वीपणे वाटचाल करीत होत्या. त्यातून शंकररावांचा लोकसंग्रह कमालीचा वाढला होता. शेतात औत-नांगर हाकणारे शेतकरी तर त्यांचे पहिल्यापासून जिवाभावाचे होतेच, त्याचबरोबर राजकीय, कला, क्रीडा, सामाजिक, साहित्यिक या सर्वच क्षेत्रातील लोकांना शंकरराव आपलेसे वाटत होते. शहरी-ग्रामीण, शेजारच्या जिल्ह्यातील अनेक लोकांशी त्यांचा स्नेह प्रस्तापित झाला होता.

१४ जानेवारी हा त्यांचा वाढदिवस, त्यांना ५१ व्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी असंख्य लोक त्यांच्या घरी येत होते. विशेष म्हणजे मकर संक्रांतदिनी साहेबांचा वाढदिवस. तिळगुळाची देवाणघेवाणही वाढदिवसाच्या निमित्ताने होत होती. अकलूजकरांनी वाढदिवसाची जंगी तयारी केली होती. बाबूराव देशमुख हे शंकररावांचे धडाडीचे कार्यकर्ते. एखाद्या कामात स्वतःला झोकून दिले की, मागेपुढे पाहणे त्यांना जमत नव्हते. सत्कार समितीचे तेच अध्यक्ष होते. यापूर्वी बाबासाहेब त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करायला पाय रोवून हजर असत. पण काळानं बाबासाहेबांना अर्ध्यावरच सोबत सोडायला भाग पाडलं होतं. त्याचं दुःख उरातील तळघरात कोंडून सर्वांनी समाजाच्या उत्कर्षांची पताका फडकवत ठेवली होती.

साहेबांचे जिवाभावाचे स्वातंत्र्यलढ्यातील सोबती वसंतदादा पाटील यांच्याबरोबर यशवंतराव मोहिते हे दोघेही शंकररावांना शुभेच्छा देण्यासाठी अकलूजला येणार होते. त्यांची भव्य मिरवणूक व नंतर जाहीर सभेचं आयोजन विजय चौकात करण्यात आलं होतं. फुलांनी सजविलेला रथ तयार होता. वसंतदादा आणि यशवंतराव मोहिते, साहेबांबरोबर रथात विराजमान झाले. सहकाराचे तीनही महामेरू आज एका रथात सर्वांना पहायला मिळत होते. आतापर्यंत साहेब प्रत्येकाच्या घरात-झोपडीत भेटून आले होते. कितीही व्याप असला तरी वेळात वेळ काढून शेतकऱ्याच्या घरी असणाऱ्या कार्याला हजर राहतच. दोन घास खात,

मग पुढे जात. आता त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी सोलापूर जिल्ह्याबरोबरच पुणे, सातारा, सांगली, नगर या भागातूनही हजारो लोक आले होते. अडीच तास चाललेल्या या मिरवणुकीत लोक जागोजागी त्यांना हार घालून शुभेच्छा देत होते व सुवासिनी पंचारतीने ओवाळत होत्या. पुढे लेझीम-गजी ढोल व बँड पथके वाजत-गाजत चालली होती.

मिरवणूक विजय चौकात सभास्थानी आली आणि सभा सुरु झाली. वसंतदादा भारावून गेले. बाबूराव देशमुखांनी प्रास्ताविक केले. जनतेच्या वतीनं गोळा केलेला सव्वालाखाचा निधी व सन्मानपत्र वसंतदादांच्या हस्ते साहेबांना बहाल करण्यात आलं. जनतेनं दिलेली सव्वालाखाची देणगी त्यांनी शिक्षण संस्थेला देण्याचे जाहीर केले. लोकांनी दिलेल्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून थोडक्यात त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. टाळ्यांच्या गजरात व घोषणांच्या निनादात साहेबांनी आसनग्रहण केले.

नंतर यशवंतराव मोहिते व वसंतदादा पाटील यांची भाषणे झाली. त्यात त्यांनी शंकरराव महाराष्ट्राच्या विकासासाठीही खूप काही करणार आहेत, आपण त्यांच्या पाठीशी उभे रहा, असे आवाहन करून साहेबांच्या कार्याचा गौरव केला.

## **'शिवरत्न'ची उभारणी**

स्वकर्तृत्वाने शंकरराव आता आर्थिकदृष्ट्या मजबूत झाले होते. यशवंतराव मोहिते हे त्यांचे परमस्नेही एकदा त्यांच्याकडे आले त्यावेळी ते एका पत्र्याच्या लहानशा घरात राहत होते. यशवंतराव शंकररावांचा हात हातात घेऊन म्हणाले की, "पुढच्या वेळी मी इथे येईन तेव्हा तुमचा बंगला मला दिसला पाहिजे." शंकररावांनाही आपल्या मोठ्या कुटुंबासाठी आणि त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या साऱ्याच लोकांच्या सोयीसाठी एक प्रशस्त बंगला असावा असं वाटत होतं. त्यांनी आपल्या कल्पनेतील वास्तुरचना

कोल्हापूरच्या बेरी या आर्किटेक्टकडून करून घेतला त्यांच्या व आक्कांच्या स्वप्नातील ते घर १९६९ साली साकार झाले. शंकररावांच्या नावातील 'शिव' आणि आक्कांच्या नावातील 'रत्न' या दोन नावांच्या संयोगातून 'शिवरत्न' हे नाव बंगल्याला देण्यात आलं. आता साहेबांना भेटायला येणाऱ्या सर्वांनाच या प्रशस्त बंगल्यात मनमोकळ्या गप्पा मारता येणार होत्या. त्यांच्या समस्या सोडविण्याचं ते केंद्र उभं राहिलं होतं. आयुष्याच्या अर्धशतकानंतर शंकररावांनी हे स्वतःचं घर उभं केलं होतं. जिल्ह्यातील लोकांच्या अडी-अडचणी व समस्या सोडविण्याचे केंद्र म्हणून आजही ते सुरू आहे व अनंत काळापर्यंत सुरूच राहणार आहे.

## विजयदादांचे लग्न व 'लक्षभोजन'

शंकरराव व रत्नप्रभादेवी (आक्का) घरात सून आणण्यासाठी आतुर झाले होते. सामाजिक, सहकार व राजकीय कार्यामध्ये सातत्याने व्यग्र असणाऱ्या शंकररावांना आपल्या थोरल्या मुलासाठी नवरी शोधायला पुरेसा वेळ कुठून मिळणार? पण आक्का व साहेबांच्या प्रेमाखातर त्यांच्या सर्व नातेवाइकांना याची काळजी होतीच. साहेबांचे कडेपूरचे साडू प्रतापराव व त्यांचे मोठे बंधू बबनराव यादव-देशमुख यांनी चिकोडी तालुक्यात मांगूरच्या आप्पासाहेब माने-भीमबहाद्दूर यांची कन्या नंदिनीदेवींचे स्थळ विजयदादांसाठी सुचविले. साहेबांनी हुंडा व इतर कोणत्याही स्वरूपाची अट न घालताच नारळाबरोबर नवरीचे हात आपल्या मुलासाठी मागितले. कन्या जयश्रीताई यांचा विवाह, कोल्हापूर संस्थानचे पूर्वाश्रमीचे उच्चाधिकारी रघुनाथराव चव्हाण यांचे ज्येष्ठ चिरंजीव कृष्णराव यांच्याशी निश्चित केला. आक्कांना व विजयदादांच्या सर्वच भावंडांना खूपच आनंद झाला. सारेच विवाहाच्या दिवसाची वाट पाहू लागले. दादांच्या लग्नाची बातमी वाऱ्याच्या वेगाने इतक्या त्वरेने सगळीकडे पसरली. सर्व कार्यकर्ते व साहेबांचे चाहते आनंदून गेले. विजयदादांना केळवणांची आमंत्रणे सुरू झाली.

साहेबांचे थोरले चिरंजीव विजयसिंह एक लोभस आणि राजस व्यक्तिमत्त्व. सर्वांचं ऐकून घेणार, लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार. सर्वांनाच विजयदादांना आपल्या घरी केळवणासाठी आणायचे होते. लग्नाची तारीख अजून लांब होती. अकलूजमधील चाहते, तालुक्यातील, जिल्ह्यातील स्नेही. एवढेच नव्हे तर साहेबांचा स्नेही परिवार सबंध महाराष्ट्रामध्ये पसरलेला. विजयदादांना केळवणासाटी सर्वांचेच आमंत्रण. कुणाचाच शब्द मोडता येईना. कित्येक ठिकाणी दादांना मोठ्या आदराने केळवणासाठी बोलविले.

साहेबांनी जवळच्या लोकांशी चर्चा करायला सुरुवात केली. लग्नासाठी किती लोक येतील याचा अंदाज सुरू झाला. पाच-दहा हजार येतील असं म्हणावं तर गावातूनच तेवढी माणसं येतील. आतापर्यंत पंचवीस वर्षांच्या काळात जी भ्रमंती केली होती त्यात जिवाला जीव देणारे हजारो कार्यकर्ते जोडले गेले होते. तालुकाच नव्हे तर जिल्हा आणि जिवाला जीव देणारे हजारो कार्यकर्ते जोडले गेले होते. तालुकाच नव्हे तर जिल्हा आणि जिल्ह्याबाहेरही साहेबांची जिवाभावाची असंख्य माणसं, पै-पाहुणे. मांगूर व कोल्हापूरचे वऱ्हाड यांची संख्याही मोठी होती. त्यांनी अंदाज बांधायला सुरुवात केली. आतापर्यंत असंख्य लोकांच्या घरी ते जेवले होते. मोठ्या प्रेमाने लोकांनी त्यांना आपल्या घरी नेऊन जेवू घातले होते. मुलकी पाटील, सरपंच, शिक्षणसंस्थेचे संस्थापक, बाजार समिती, आमदारकीची पहिली निवडणूक, साखर कारखान्याच्या भागभांडवल उभारणीसाठी केलेली अथक भ्रमंती, पुढच्या निवडणुका, पक्षाने टाकलेल्या जबाबदाऱ्या पार पाडत यातून झालेला प्रचंड लोकसंग्रह त्यांच्या लक्षात येऊ लागला. आतापर्यंत त्यांनी याची कल्पना केली नव्हती, पण आता ती करावी लागत होती. तालुक्यातील एकही गाव, वाडी, वस्ती, शेतकऱ्याचं, शेतमजुरांचं, व्यापाऱ्यांचं व कर्मचाऱ्याचं-असं घर नव्हतं की जिथं साहेबांनी त्यांची चटणीभाकरी मोठ्या आनंदानं

खाल्ली नव्हती. अनेकदा एकट्याने नव्हे तर पाच-पन्नास जणांना घेऊन साहेब हजारो लोकांच्या घरी जेवले होते.

शंकरराव आणि त्यांचे सारे जिवाभावाचे मित्र लग्नाच्या तयारीला लागले. साऱ्यांना लग्नाची आमंत्रणे पाठविली. स्वतः साहेब अनेकांच्या घरी जाऊन आले. साहेबांनी सर्व सिद्धता केली. स्वतःच्या दीड-दोनशे एकर बागायती शेतीमधून व शेतीपूरक उद्योगांमुळे मोठ्या कष्टाने त्यांनी भरपूर आर्थिक सुबत्ता निर्माण केली होती. त्यासाठी आयुष्याचं अर्धशतक खर्ची घातलं होतं. ‘आता येऊ देत कितीही पाहुणे, प्रत्येकालाच जेवू घालण्यासाठी मी सिद्ध आहे’ असेच त्यांचे अंतर्मन त्यांना सांगत होते. साहेबांनी विविध समित्या स्थापन केल्या. स्वागत समिती, भोजन समिती, वाढप समिती, पाणीपुरवठा समिती इ. प्रत्येकाला कामे वाटून दिली. साहेबांच्या घरचं कार्य म्हणजे आपल्याच घरचं कार्य असे मानून मोठ्या हिरिरीनं तालुक्यातील प्रत्येक कार्यकर्ता सहभागी झाला होता.

त्या दिवशी आकलूजला दीड लाखांवर लोक जमा झाले होते. केंद्रीय मंत्री यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, यशवंतरावव मोहिते, बाळासाहेब देसाई, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे, पी. के. सावंत, शिवाजीराव गिरीधर पाटील, शरद पवार, र. के. खाडिलकर, शिवराज पाटील-चाकूरकर यांच्यासारखे महाराष्ट्रातील दिग्गज नेतेमंडळी, महाराष्ट्राचं अख्खं मंत्रिमंडळ, आमदार, खासदार, सातारा संस्थानच्या सुमित्राराजे भोसले, कोल्हापुरचे श्रीमंत छत्रपती, सेनापती, कापसीचे श्रीमंत राणोजीराजे घोरपडे सरकार, पूर्वाश्रमीचे अनेक संस्थानिक, अनेक उद्योगपती, लोकनेते, कलाकार, साहित्यिक, मोठेमोठे प्रशासकीय अधिकारी यांच्यापासून ते प्रचंड मोठ्या संख्येने आलेले शेतकरी, शेतमजूर, कामगार, सर्व स्तरातील जातिधर्माच्या माणसांचा महासागर विजयदादांच्या लग्नाला लोटला होता. जेवणाच्या पंगती सुरु झाल्या. माणसांची खरी श्रीमंती त्याची जीवाभावाची माणसं किती यावरूनच ठरते. त्याच्याकडे किती संपत्ती आहे यावरून ती ठरत नसते.

आज शंकरराव सम्राट बनले होते कारण त्यांच्याकडे अमूल्य अशी असंख्य माणसे जमली होती. साहेबांची लोकप्रियता या जनसागरातून सिद्ध होत होती. अफाट संख्येने आलेल्या प्रत्येकाची भोजनव्यवस्था काटेकोर होती. प्रत्येक पंक्तीच्या दोन्ही टोकांना पाण्याचे नळ होते. प्रत्येकाला सर्व पदार्थ तत्काळ पोहचत होते. भटारखान्यातून बुंदीच्या कळ्या भरलेले ट्रेलर विविध भागांमध्ये फिरत होते. लाखाच्या वर लोक जेवत होते, पण कुणालाही काही कमी पडू दिलं नव्हतं. मोठमोठे पुढारीही स्वयंस्फूर्तीने पत्रावळ्या उचलत होते. कुठं काही कमी आहे का याची दक्षता घेत होते.

गोरज मुहूर्तावर १७ मे १९७१ रोजी हा विवाहसोहळा पार पडला. लग्नानंतरही हजारो लोक जेवले. रात्री उशिरापर्यंत पंगती सुरूच होत्या. मध्यरात्रीनंतर नवरानवरीची सजवलेल्या रथातून भव्य वरात निघाली. मोहिते-पाटील घराण्याची लक्ष्मी बनून माने-भीमबहादूर यांची कन्या नंदिनीदेवी विजयदादांना साथ देण्यासाठी आल्या होत्या. लगेच १८ मे च्या सकळी केंद्रीय अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते कारखान्याच्या भव्य व सुसज्ज अशा कार्यालयाचा उद्घाटन समारंभ योजला होता. सर्वच धुरंधर नेत्यांनी शंकररावांची कल्पकता जवळून पाहिली. यावेळी, यशवंतराव चव्हाणांनी “हा शेतकऱ्याचा राजवाडा आहे. शेतकऱ्याला राजा करण्याची किमया शंकररावांनी केली आहे” असे गौरवोद्गार काढले.

लग्नसमारंभाने व कार्यालयाचे उद्घाटन झाल्यानंतर अनेकांना खूप समाधान वाटले. पण काहींची असूया उफाळून आली. आपल्याला जे उभ्या आयुष्यात जमले नाही ते या शंकररावांनी एवढ्यात जमवून दाखविले याबद्दल त्यांच्या मनात द्वेषभावना जागृत झाली आणि काही वर्तमानपत्रांनी शंकररावांनी दिलेल्या लक्ष भोजनांवर टीकेची झोड उठविली. “अकलूजच्या शंकरराव मोहिते-पाटलांनी केले गडगंज श्रीमंतीचे प्रदर्शन ज्येष्ठ मुलाच्या लग्नात एक लाख लोकांना भोजन” अशा मथळ्याच्या व मीठमसाला लावून बातम्या त्यांनी छापल्या.

बी. बी. सी. लंडनहून ही बातमी प्रसिद्ध झालीच. पण अमेरिकेतील इंग्रजी दैनिकांतून महाराष्ट्रातील एक शेतकरी, लाखापेक्षा अधिक लोकांना नियोजनबद्ध जेवण देऊ शकतो याची सचित्र व सकारात्मक बातमी प्रसिद्ध झाली होती. लक्षभोजनामुळे साहेब आणखीनच प्रकाशझोतात आले. साहेबांनी आपल्यावर झालेल्या टीकेला उत्तर देण्यासाठी एक पत्रकार परिषद बोलविली आणि त्यात शंकरराव गरजले, "कोण म्हणतं माझ्याकडे एक लाख माणसं जेवली? माझ्याकडं एक लाख अठरा हजार माणसं जेवली वरची अठरा हजार का कमी करता? बरं जेवली ती माझी बहुसंख्य ग्रामीण माझी जनताच! मी आज आव्हान देतो की कुणीही घालून दाखववावं माझ्यासारखं लक्षभोजन! प्रश्न श्रीमंतीचा नाही. माझ्यापेक्षा कितीतरी श्रीमंत लोक आहेत. कोट्यधीश आहेत. ते सहज कोट्यवधी रूपये खर्चू शकतील. पण त्यांच्याकडे जेवणासाठी आपुलकीनं एवढी माणसं येतील का ? हा माझा खडा सवाल आहे! गेल्या चाळीस वर्षांत मी तर अनेकांच्या घरी जेवलो. ती सारी माणसं माझ्या घरच्या कार्याला आली. मी शेतकऱ्यांचा म्होरक्या. त्यांनी मला अनेकदा जेवू घातलं. त्या सर्वांना न जेवता कसं पाठवायचं? माझ्या मराठधर्माला धरून मी साऱ्याना जेवू घातलं. बरं अमुक इतक्या लोकांना जेवू घालणं हा काही कायद्यानं गुन्हा होत नाही. त्यामुळं माझं काही चुकलं असं मला मुळीच वाटत नाही."

साहेबांनी आपलं सगळं स्पष्टपणे सांगून टाकलं. काही वास्तववादी वृत्तपत्रांनी साहेबांची बाजू मांडणारे अग्रलेख लिहिले. 'नवाकाळ'च्या खाडिलकरांनी गरिबांच्या लक्षभोजनाचं समर्थन करताना, अतिश्रीमंत उद्योगपतींच्या लग्नात होणाऱ्या अनाठायी खर्चावर टीका केली.

लक्षभोजन प्रकरण लोकसभेपर्यंत गाजलं. इंदिरा गांधींनी त्यात आक्षेपार्ह काहीही नाही. असं प्रतिपादन केलं. मात्र मोठा खर्च करू नये हा संकेत आहे असं त्यांना वाटलं. साहेब आपल्या मतांशी ठाम होते, कारण सारं काही पारदर्शक होतं.

## राजकीय क्षेत्रातील गरुडझेप

१९५७ सालच्या विधानसभा निवडणुका लागल्या. १९५२ साली जरी काँग्रेसने तिकीट नागारले तरी त्यांनी स्वतंत्रपणेही लढत जिंकून दाखविली होती. आता संयुक्त महाराष्ट्र चळवळीने जोर धरला होता. राज्यातील काँग्रेस सोडून बाकीचे सर्वच पक्ष संयुक्त महाराष्ट्र समितीच्या झेंड्याखाली एकत्र आले होते. संपूर्ण माळशिरस तालुक्यात शंकररावांनी समितीची चळवळ जोरदारपणे सुरू केली. जनतेचे आंदोलन उभे राहिले.

अनेक ठिकाण शंकररावांनी सभा दणाणून सोडल्या. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे ही भूमिका त्यांनी लोकांना पटवून दिली. अनेक अडाणी लोकांना ही संकल्पना ते मोठ्या कौशल्याने त्यांच्याच भाषेत सांगत. मुंबई महाराष्ट्राला का मिळाली पाहिजे, मराठी भाषा

बोलणाऱ्यांचे राज्य का निर्माण व्हायला हवे, या साऱ्या गोष्टी ते लोकांना उदाहरणे देऊन पटवून सांगू लागले.

माळशिरसच्या तहसील कचेरीवर त्यांनी प्रचंड धडक मोर्चा नेला. त्यावेळ अनेक महिला, मुले यांचाही सहभाग होता. महत्त्वाचे म्हणजे शंकररावांच्या सहचरिणी रत्नप्रभादेवींनीही पुढाकार घेतला. किशोरवयीन विजयदादाही आपल्या सवंगड्यांसह यात सहभागी झाले. लोकनेतृत्वाचे बाळकडू त्यांना मिळायला सुरुवात झाली होती. अनेक सभा, मोर्चे, आंदोलने यामध्ये ते सक्रिय होते. आतापर्यंत शंकरराव लोकनेते झाले होते. कोणत्याही पक्षापेक्षा जनतेची ताकद त्यांच्यामागे उभी होती. त्या बळावरच कोणत्याही आघाडीवर लढत द्यायला ते केव्हाही तयार असत. यावेळी काँग्रेसने माळशिरसच्या शिवाजीराव पाटलांना उमेदवारी दिली आणि निवडणुकीला रंग भरू लागला. त्यांच्या विरोधकांकडे कारखान्याचा प्रमुख मुद्दा होता. भागभांडवल म्हणून शंकररावांनी नुसतेच पैसे गोळा केले. कुठाय कारखाना? यावर त्यांचा प्रमुख रोख होता.

शेतकरी कामगार पक्ष हा त्यावेळी जिल्ह्यातील प्रबळ पक्ष होता. तो पक्ष आता संयुक्त महाराष्ट्र समितीचाच एक प्रमुख घटक पक्ष होता. शंकररावांना हे मैदान नवखे नव्हते. त्यांनी विरोधकांचे मुद्दे तर वरच्यावर फिरवून टाकले. पहिल्यासारख्या प्रचारात अडचणी नव्हत्या. आर्थिक परिस्थिती पूर्वीपेक्षा सुधारली होती. स्वतः आमदार असूनही त्यांनी आपल्या शेतीतील बागायतीचे क्षेत्र वाढवून स्वतः मेहनत करून मोठे उत्पन्न घेतले होते. अखेर मतदानाचा दिवस उजाडला. मतदारांनी आपला पवित्र हक्क बजावला. मतमोजणीत शंकरराव मोठ्या मताधिक्याने निवडून आले आणि सर्वांनीच शंकररावांना डोक्यावर घेतले.

पुढे १९६२ च्या विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या. यापूर्वी दोन निवडणुकांचा अनुभव पाठीशी होताच मात्र यावेळी त्यांना काँग्रेस पक्षाने अधिकृत उमेदवारी दिली होती. काँग्रेसचा प्रभाव होताच, त्याहून

शंकररावांची पकड मजबूत होती. विरोधी पक्षातर्फे हणमंतराव पाटील हे होते. विधानसभेच्या निवजणुका २२ फेब्रुवारी १९६२ ला होऊन २४ फेब्रुवारीला निकाल लागला. शंकरराव मोठ्या मताधिक्याने निवडून आले. त्यांचा हा सलग तिसरा विजय होता.

यशवंतरावांच्या मुत्सद्देगिरीमुळे साऱ्या महाराष्ट्रात काँग्रेसला घवघवीत यश मिळाले, स्पष्ट बहुमतात असणाऱ्या काँग्रेसचे नेते अर्थातच यशवंतराव चव्हाण होते. तेच नव्याने पुन्हा मुख्यमंत्री झाले. त्यांच्या मंत्रिमंडळात सहकारमंत्री म्हणून कारखान्याचे व्हाइस चेअरमन शंकरराव बाजीराव पाटील यांचा समावेश झाला. साहेबांना यावेळीही मंत्रिमंडळात येण्याविषयी विचारणा झाली, पण त्यांनी कारखान्याच्या उभारणीला प्राधान्य दिले व नम्रपणे मंत्रिपद नाकारले.

१९६७ साली जेव्हा विधानसभेच्या निवडणुका लागल्या त्यावेळी साहेबांची जिल्ह्याच्या राजकारणावर चांगलीच पकड निर्माण झाली होती. शंकरराव एक वादळ बनून वावरत होते. यसवंतराव चव्हाण देशपातळीवरील काँग्रेसची आघाडी सांभाळत होते. त्यांनी महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाची जबाबदारी काही मोजक्या नेत्यांवर टाकली, त्यात शंकररवांचा समावेश होता. त्यांनी सोलापूर बरोबरच राज्याच्या इतर भागातही वादळी प्रचार दौरा केला. काँग्रेसला घवघवीत यश मिळाले. त्यांना स्वतःच्या माळशिरस मतदारसंघात फारशी ताकद लावावी लागली नाही. त्यांचे ज्येष्ठ पुत्र विजयसिंह आणि इतर कार्यकर्त्यांनीच हे घरचे मैदान मारून नेले. मळोलीचे नुकतीच कायद्याची पदवी संपादन केलेले तरूण ॲड. जयसिंगराव जाधव यांनी ही निवडणूक लढविली, यावेळीह शंकरराव मताधिक्याने निवडून आले. हा त्यांचा सलग चौथा विजय होता.

पुढे १९७२ सालच्या विधानसभा निवडणुकीमध्ये पक्षांतर्गत डावपेचाचा भाग म्हणून काँग्रेस पक्षाने त्यांना तिकीट न देता त्यांच्या पसंतीचा उमेदवार सुचविण्यास सांगितले. तेव्हा त्यांनी आपले विश्वासू

सहकारी श्री. चांगोजीराव ऊर्फ बाबुराव देशमुख यांचे नाव सुचवले आणि या निवडणुकीत बिनविरोध आमदार करून दाखविले.

कोणतीही गोष्ट करताना थोडी माघार घ्यावी लागते ती बऱ्याचदा नव्या जोमानं चढाई करण्यासाठी हे साहेबांनी या प्रसंगाने दाखवून दिले.

## 'सहकारमहर्षी' उपाधी

आतापर्यंत शंकररावांनी शेतकऱ्यांना, कष्टकऱ्यांना एका धाग्यात गुंफून सहकाराची माला बनविली होती. अनेक छोट्या-मोठ्या सहकारी संस्था साहेबांनी सर्वांची ताकद एकवटून उभ्या केल्या होत्या. त्यातून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या अनेकांचे संसार उभे राहिले होते. सहकार हाच त्यांचा श्वास होता. श्री सच्चिदानंद अभिनय विद्याशंकर भारतीस्वामी, श्री संत कल्याणसेवक महाराज जगद्गुरू शंकराचार्य, संस्थान मठ संकेश्वर, करवीर बेळगाव यांचे सन १९६६ मध्ये या सहकारनगरी अकलूजमध्ये आगमन झाले. शंकररावांनी या परिसरात सहकाराच्या माध्यमातून केलेल्या परिवर्तनाची कल्पना शंकराचार्यांना आली. स्वामींचे अकलूजमध्ये भव्य स्वागत करण्यात आले. विजय चौकात एका भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्वामींचे विचार ऐकण्यासाठी प्रचंड जनसमुदाय लोटला होता. सोबत शंकररावांच्या भाषणाची मेजवानी मिळणारच होती. श्री शंकराचार्यांनी या सभेत शंकररावांना 'सहकारमहर्षी' या उपाधीने गौरविले. त्यांनी समाजासाठी केलेल्या सेवेचाच गौरव 'श्रीं'च्या मुखातून प्रकटला.

साहेबांना अनेकजण आमदारसाहेब म्हणत असत. आता त्यांना 'सहकारमहर्षी' या उपाधीने सारेजण संबोधू लागले. ही घटना १९६६ साली घडून आली.

## भू-विकास बँकेच्या अध्यक्षपदी

शेतकऱ्याला वेळच्या वेळी अर्थसाहाय्य मिळणे अत्यंत आवश्यक असते. अनेक मूलभूत गोष्टी करण्यासाठी त्याच्याकडे पैसा नसतो आणि दारिद्र्याच्या दुष्ट चक्रातून त्याची सुटका होत नाही. सिंचनासाठी विहिरी खोदणे, वीजजोडणी घेणे, पाणी एका ठिकाणाहून दुसरीकडे नेणे, जमिनी सपाटीकरण करणे, बैलजोडी व अवजारे खरेदी करणे, दुरूस्त करणे याच त्या मूलभूत गोष्टी होत्या, याची शंकररावांना जाणीव होती. शेतकऱ्यांना वेळेवर व कमी व्याजाचे कर्ज उपलब्ध होण्यासाठी ते प्रयत्नशील होते. या स्वरूपाची कर्जे प्रामुख्याने भू-विकास बँक देत असे.

मंगळवेढा तालुक्यात एका मोठ्या शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत शंकररावांनी अत्यंत प्रभावी भाषण केले. सभेच्या अध्यक्षस्थानी करमाळ्याचे नामदेवराव जगताप हे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात नामदेवराव म्हणाले की, “शंकररावांसारख्या कर्तबगार व्यक्तिमत्त्वाला साजेशा पदी म्हणजेच जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अध्यक्षपदी यावेळेस बसवायचं आम्ही ठरवलं आहे.” या अगोदरही नामदेवरावांनी अकलूजला कारखान्यावर हे बोलून दाखवलं होतं.

थोड्याच दिवसांत जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक लागली आणि नामदेवराव स्वतःच बँकेचे अध्यक्ष झाले. याचे शंकररावांच्या चाहत्यांना खूप वाईट वाटले. मंगळवेढ्याचे किसनलाल मर्दा वकील हे साहेबांचे चाहते. त्यांना खूप वाईट वाटलं. ते स्वतः भू-विकास बँकेचे चेअरमन होते. त्यांनी तातडीने भू-विकास बँकेच्या संचालक मंडळाची बैठक बोलाविली. स्वतः अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आणि भु-विकास बँकेचे अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती करण्यासाठी ही सारी मंडळी अकलूजला शंकररावांकडे गेली. सर्वांनी त्यांची अध्यक्षपदासाठी एकमताने निवड केलीच होती. आता मात्र साहबांना सर्वांच्या विनंतीचा सन्मान केला आणि शंकररावांनी भू-विकास बँकेचे चेअरमनपद १९६३ मध्ये स्वीकारले. जिल्ह्यातील नेक शेतकऱ्यांना त्यांच्या गावोगावी जाऊन विहिरीवरची ऑईल इंजिन, नांगर, पाईप, मोटारी पंप थेट त्यांच्यांसाठी

जाऊन देण्याचा सपाटा लावला. त्यामुळे कर्जाची रक्कम शेती उत्पन्न वाढण्यासाठीच खर्च होऊ लागली. ते शेतकऱ्यांचे प्रबोधन करू लागले.

गणेश चतुर्थीला साऱ्या कामगारांनी मिळून विजय गणेश मंडळाची स्थापना केली. या मंडळाला विविध उपक्रम राबविण्यासाठी पैसा तर पाहिजे. त्यासाठी कामगारांची वर्गणी गोळा करत फिरणे योग्य होणार नाही, त्यासाठी त्यांनी ९ एकर जमीनच मंडळाला देऊन टाकली. त्याचे एक विश्वस्त मंडळ केले आणि निधीचा प्रश्न निकालात काढला. लागूनच गौरींचे आगमन. महालक्ष्मीच्या या सणाची आक्कांना खूप हौस. यावर्षी आक्कांना वेगळाच हुरूप होता. त्यांनी आरास करण्यासाठी कारखान्यावरून वीस-पंचवीस विटा व सात-आठ फळ्या कामगारांकडून आणल्या. ही गोष्ट शंकररावांच्या नजरेतून सुटली नाही. ते म्हणाले, मी कष्टकऱ्यांच्या, शेतकऱ्यांच्या पैशांचा राखोळ्या आहे, त्यांच्या पैशातून आणलेल्या वस्तूंचा वापर मी माझ्या घरातील सणात कसा करू? यावर आक्कांनी साहेबांकडे चुक मान्य करून आणलेले सर्व साहित्य परत पाठविले. आपल्या पतीच्या या मनाच्या मोठेपणाबद्दल त्यांचा अभिमान व आदर अधिकच वाढला.

भू-विकास बँकेमुळे साहेबांच्या कार्यकक्षा रूंदावण्याच्या मार्गावर होत्या. साखर कारखान्याच्या संचालक मंडळाने साहेबांना जिल्हाभर फिरण्यासाठी व कामाची गती वाढवण्यासाठी एक जीप देण्याचा निर्णय घेतला. आता त्यांना जलद कामे करणं सोपं होणार होतं.

कारखान्यापुढं ऊस वाहतुकीचा मोठा प्रश्न होता. बैलगाड्यांनी ऊस आणण्यावर मर्यादा होत्या. त्यासाठी ट्रक आणि ट्रॅक्सर्सची गरज होती. शेतकऱ्यांकडे ट्रॅक-ट्रॅक्टरसारखी वाहने आल्यास त्यांच्या आर्थिक प्रगतीलाही हातभार लागणारच होता. त्यासाठी १९६५ साली ट्रक-ट्रॅक्टर वाहतूक संघाची स्थापना केली. त्यावेळी वाहन खरेदीशाठी त्यांनी काही बँकांकडे प्रस्ताव सादर केले. बँकांनी अल्पसा प्रतिसाद दिला. मात्र जिल्हा मध्यवर्ती बँकेने याकामी काहीही प्रतिसाद दिला नाही. त्यावेळी

त्यांना जाणवले की, जिल्हा मध्यवर्ती बँक जर आपल्या अधिपत्याखाली असती तर विकासाची गती आणखी तीव्र करता आली असती. वाहतूक संघाची २०-२५ वाहने ऊस वाहतुकीसाठी धावू लागली आणि ही सुरुवातच खूप महत्त्वाची ठरली. आता संघाने चांगलेच बाळसे धरले. हळूहळू वाहने वाढू लागली.

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष

१९२२ साली स्थापन झालेली, सुरुवातीला शंभरच्या आसपास सभासद असणारी व एकच शाखा असणारी ही बँक आता चांगलीच विस्तारत होती. विशेषतः स्वातंत्र्योत्तर काळात बँकेला विशेष गती मिळाली होती. जिल्ह्याच्या आर्थिक जडणघडणीत या बँकेची भूमिका महत्त्वपूर्ण मानली  जात होती. बँकेच्या सात जागांसाठी निवडणूक लागली. शंकररावांनी या रणांगणात उतरायचे ठरविले. मतदान सोलापूरलाच होणार होते. त्यासाठीची सर्व तयारी व बांधणी साहेबांनी आधीच केली होती. शंकररावांनी मतदारांना मिरवणुकीने वाजत वाजत येण्याचे आवाहन केवले होते. जिल्ह्यातील सर्वत्र मतदारांनी मतदान केले.

नियोजनबद्ध केलेल्या प्रयत्नांना यायचे तेच यश आले. साहेबांच्या नेतृत्वाखाली सर्वच्या सर्व म्हणजे सातही जागा जिंकल्या होत्या. सन्मानाने त्यांनी जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रावर आपले पाऊल टाकले होते.

शंकररावांची सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली होती. आता त्यांच्याकडे विकासरथाचे सारथ्य आले होते. २२ ऑक्टोबर १९६५ ते ३० मार्च १९७७ या काळात त्यांनी या बँकेचे अध्यक्षपद भूषविले.

## सोलापूर जिल्हा परिषदेत सत्तापरिवर्तन

जिल्हा पातळीवर विकासकामांचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्यासाठीची जिल्हा परिषद ही अत्यंत महत्त्वाची संस्था होती. परंतु जिल्हा परिषदेत मूलगामी परिवर्तनाची दृष्टी असणारे व शंकररावांच्या कार्यपद्धतीचा अवलंब करणाऱ्यांपैकी सत्तेवर कुणी नव्हते. जिल्ह्यातील काँग्रेसच्या अनेक कार्यकर्त्यांनी याबद्दल प्रदेश काँग्रेस कमिटीपुढे उघड नाराजी व्यक्त केली होती. शंकररावांनी वसंतदादांची भेट घेऊन कार्यकर्त्यांच्या मनातील मत व्यक्त केले. वसंतदादांना त्याची पुसटशी कल्पना होतीच. त्यांनी शंकररावांना विद्यमान अध्यक्ष राजीनामा देत नसतील तर अविश्वास ठराव आणावयास सूचित केले. शंकररावांनी बहुसंख्य जिल्हा परिषद सदस्यांना विकासकामासंबंधी, नियोजनासंबंधी, विद्यमान सत्ताधाऱ्यांच्या कार्यपद्धतीबद्दल वस्तुस्थिती लक्षात आणून दिली व अविश्वासाचा ठराव घेण्याची तयारी केली. हा ठराव दाखल होऊन चर्चेला येण्याअगोदरच अध्यक्ष नामदेवराव जगताप यांनी राजीनामा दिला. शंकररावांनी हे करत असताना वैयक्तिक महत्त्वाकांक्षा अथवा सूडबुद्धीने मुळीच केले नाही, ही गोष्ट नमूद करण्यासारखी आहे.

१९६८ साली शहाजीराव पाटील यांना जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदावर विराजमान केले, तर आधी दिलेल्या शब्दानुसार विरोधी पक्षाचे सदस्य रामभाऊ वाघमोडे यांना बांधकाम समितीचे सभापतिपद देण्यात आले. विकासकामांचा रथ पुढे नेण्यासाठी साहेबांनी जिल्हा परिषद आपल्या अधिपत्याखाली आणली. आता भू-विकास बँक व जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या जोडीला जिल्हा परिषददेखील साहेबांचे संकल्प तडीस नेण्यासाठी साहाय्यभूत ठरणार होती.

## १९७१ ची लोकसभा निवडणूक

१९७१ च्या लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. महाराष्ट्र हा काँग्रेसचा बालेकिल्ला, पण अलीकडे विरोधकांचा जोर वाढला होता. इंदिरा गांधींच्या कणखर नेतृत्वाखाली देशाची वाटचाल दमदारपणे सुरु

होती. देशाच्या प्रत्येक विभागात जे जे प्रभावी नेते होते त्यांच्यावर प्रचारकार्यासाठी जबाबदाऱ्या टाकण्यात आल्या.

आता शंकरराव म्हणजे महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाकडे असलेली मुलूखमैदान तोफ होती. त्यांच्या वक्तृत्वाला कर्तृत्वामुळे कमालीची धार चढली होती. मतदारांच्या अंतर्मनाचा ठाव घेण्याची क्षमता त्यांनी प्रयत्नपूर्वक विकसित केली होती. विकासासाठीची काँग्रेसची ध्येयधोरणे, वसंतदादा पाटील, यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या देशभक्त नेत्यांनी समाजाला पुढे नेण्यासाठी केलेले कार्य हे खूप मोठे होते. काँग्रेस पक्षाने शंकररावांवर सोलापूर, पंढरपूर, पुणे आणि बारामती या चार लोकसभा मतदारसंघात काँग्रेसची बाजू मांडून या जागांवरचे सर्व काँग्रेस उमेदवार निवडून जबाबदारी टाकली.

अनेक नवनवी आव्हाने आपल्या अंगावर घेऊन त्यांना सामोरे जाण्याची त्यांची जुनीच पद्धत होती. निधड्या छातीने अत्यंत आक्रमकपणे तितक्याच मुद्देसूदपणे आपला एकएक विचार समाजातील सर्व स्तरांतील लोकांमध्ये ते रूजवू लागले. काँग्रेसचा ध्वज शंकररावांच्या नेतृत्वाखाली आगेकूच करू लागला. प्रचारात या चारही लोकसभा मतदारसंघात शंकररावांचा हात धरण्याची हिंमत कोणी दाखवू शकत नाही. बारामती मतदारसंघांत शंकररावांची पक्षनिष्ठेची कसोटी पाहणारी अशी लढत होती. निंबूतचे त्यांचे जवळचे पाहुणे रामराव काकडे हे काँग्रेसचे उमेदवार र. के. खाडिलकरांच्या विरोधात उभे होते. एकीकडे पाहुणे तर दुसरीकडे पक्ष अशी स्थिती होती. पण एकदा एका फळीवर उभे राहिले म्हणजे समाजाच्या व राष्ट्राच्या विकासासाठी त्याच विचारांच्या फळीची पाठराखण करायची हा त्यांचा बाणा होता. बारामती मतदारसंघातील इंदापूरचा पूर्व भाग तर साहेबांना खूप मान देत होता. त्यांच्या शब्दाला खूप किंमत होती, कारण आतापर्यंत त्यांनी केलेले कार्य, भावी योजनांसंबंधी त्यांची तळमळ सर्वांना ज्ञात होती. आपल्या जवळच्या नातेवाइकाविरोधात त्यांनी मोठी प्रचार आघाडी उघडली होती.

काँग्रेसच्या निष्ठेच्या कसोटीत शंकरराव पूर्णपणे उतरले होते. निवडणुकीच्या काळात सत्तेच्या राजकारणाचा खेळ असाच रंगवावा लागतो हे त्यांनी आपल्या कर्तृत्वाने दाखवून दिले.

पुण्यात रेसकोर्स मैदानाजवळ इंदिरा गांधींच्या भव्य सभेचे आयोजन करण्यात आले. ती सभा यशस्वी होण्यासाठी शंकरराव अहोरात्र झटले. दीड लाखांचा प्रचंड जनसमुदाय गोळा झाला. माळशिरस तालुक्यातून एकशे पंचावन्न ट्रक भरून लोक पुण्याला इंदिराजींच्या सभेसाठी स्वयंस्फूर्तीने गेले. ही सभा महाराष्ट्रातील एक प्रमुख सभा म्हणून पार पाडली. या सभेत त्यांचे भाषण ऐकून इंदिराजी प्रभावित झाल्या. सभेचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल इंदिराजींनी साहेबांचे कौतुक केले. त्यावेळी आक्का व सर्व कुटुंबीय साहेबांबरोबर होते. त्यांचा इंदिराजींबरोबर साहेबांनी परिचय करून दिला. कामाचा व्याप असतानाही इंदिराजींनी शंकररावांच्या कुटुंबासाठी पुरेसा वेळ दिला व मनमोकळ्या गप्पा मारल्या.

साहेबांनी इंदिराजींना या सर्व जागा जिंकून आणण्याचा शब्द दिला. पंढरपूर तर त्यांच्या घरचाच मतदारसंघ होता. सोलापूर मतदारसंघात गावोगावी साहेबांचे चाहते आणि कार्यकर्ते होते. या दोन्ही ठिकाणी मैदान मारणे हे साहेबांना सहज शक्य होते. पुणे, बारामती भागातील मतदार खूप चाणाक्ष होता. तिथे काँग्रेसची बाजू मांडण्यात शंकरराव यशस्वी झाले. मतदारांनी मतदानाचा पवित्र हक्क बजावला आणि शंकररावांनी केलेल्या पेरणीच्या उगवणीची वाट पाहू लागले. मतमोजणी सुरू झाली आणि सुरुवातीपासूनच काँग्रेसच्या सर्व उमेदवारांनी आघाडी घेतली. मोठ्या फरकाने त्यांनी प्रचार केलेले सर्व उमेदवार निवडून आले होते. त्यांनी मतदारांबद्दल अंतर्मनातून कृतज्ञता व्यक्त केली आणि ते पुढच्या कामाला लागले.

## जिल्हा परिषदेची ऐतिहासिक निवडणूक

विधानसभा निवडणुकीनंतर लगेचच पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेची निवडणूक जाहीर झाली. साहेबांनी जिल्हा परिषदेवर निवडून यावे यासाठी अनेक गावचे लोक त्यांना गळ घालू लागले. त्यांनी त्याला नम्र नकार दिला. शेवटी लोकांनी विजयसिंहांना उभे करण्याची गळ साहेबांना घातली. त्यांनी जनतेचा शब्द मानला आणि विजयसिंह नातेपुते गटातून जिल्हा परिषद सदस्य म्हणून बिनविरोध निवडून आले. संपूर्ण जिल्ह्यात त्यांनी काँग्रेसचा प्रचार करून सोलापूर जिल्हा परिषदेवर काँग्रेसचा झेंडा फडकविला. जिल्हा परिषदेच्या पक्षाच्या सभेत बहुतांश सदस्यांनी विजयसिंहांना अध्यक्षपदासाठी आग्रह धरला आणि जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदीही विजयसिंह बिनविरोध निवडले गेले. १९७२ साली विजयदादा अवघे अठ्ठावीस वर्षांचे तरूण होते.

सोलापूरच्या जाहीर सत्कार समारंभात भाषण करताना शंकरराव म्हणाले, "जिल्हा परिषदेचे अध्यक्ष माझे चिरंजीव जरी असले, तरी जनसेवेचे व्रत समजून लोकांची सेवा त्यांनी करावी. त्यात त्यांनी हयगय करू नये. अन्यथा आम्ही त्यांची गय करणार नाही. माझ्या मुलाला प्रेम व आदराने आपण सगळे 'दादा' म्हणत आहात; त्यांनी दादा जरूर व्हावं. पण मुंबईत गुंडगिरी करणारा दादा न होता सांगलीचा वसंतदादा व्हावं हीच माझी त्यांच्याकडून अपेक्षा आहे."

घरी आल्यावर आक्कांचं हृदय भरून आलं. त्यांनी आपल्या थोरल्या मुलाचं कौतुक डोळे भरून पाहिलं. विजयसिंहांना जरी जिल्हा परिषदेचं अध्यक्षपद मिळाल होतं तरी हे पद एक आव्हान घेऊन त्यांच्यापुढं उभं राहिलं होतं. आधीच अवर्षणग्रस्त जिल्हा. खरिपावर लोक कसंबसं जगायचे. यंदा पावसाचा थेंबही पडला नव्हता. लोकांचे हाल होऊ लागले जनावरांना, माणसांना प्यायला पाणी मिळेना. पोटाला अन्न मिळेना, हातांना कामही मिळेना अशी साऱ्या जिल्ह्याची दुर्दशा झाली. शंकरराव आणि विजयसिंह अस्वस्थ झाले. या संकटांवर नियोजनानं मात करायलाच हवी, असा त्यांनी निश्चय केला. पाणीपुरवठ्यासाठी कित्येक

टँकर्स धावू लागले. गावोगावी, खेडोपाडी, वाड्यावस्त्यांवर पाणीपुरवठ्याची व्यवस्था केली अन् लोकांची पाण्यासाठीची वणवण बऱ्याच प्रमाणात कमी झाली.

अन्नधान्याची प्रचंड टंचाई निर्माण झाली. मोठमोठ्या जमीनदारांकडचे धान्य संपले, मग गोरगरिबांच्या विवंचनांना पारावार राहिला नाही. त्यांना तातडीनं रोजगार उपलब्ध करून देणं गरजेचं होतं. सोलापूर जिल्ह्याचे सर्व्हे एस्टिमेट तयार नसल्यामुळे रोजगार हमीची शासकीय कामे अडकून पडली होती. त्यांनी धडपड करून खासगी सर्व्हे करण्यास परवानगी मिळविली व ताबडतोब कामे सुरु केली. पाझरतलाव, नाला-बंडिंग, जमीन सपाटीकरण, रस्ते दुरुस्ती यासारखी कित्येक कामे नव्याने सुरु केली. कित्येक हातांना काम मिळवून दिले.

दुष्काळाशी दोन हात करण्यासाठी शासनाने आखलेल्या योजना लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी व त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी होण्यासाठी साहेबांबरोबर विजयदादा रात्रंदिवस झटत होते. गावोगावी शासकीय योजना, लोकांना मिळणारी मजुरी, अन्नधान्य व इतर सोयी-सुविधा यांची माहिती भर सभेत ते सांगत. त्यानुसार कार्यवाही होते की नाही यावर त्यांची बारकाईने नजर होती. त्यामुळे शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना भ्रष्टाचारास वावच मिळत नसे. सरकारकडून आलेला बंदा रूपया जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी ते झटत होते. त्यावेळचे जिल्ह्याचे पालकमंत्री शरद पवार यांच्यासमवेत ठिकठिकाणी सभा घेऊन, लोकांशी चर्चा करून त्यांचे दुःख हलके करण्यासाठी त्यांनी शिकस्त केली. अन्नधान्याच्या टंचाईमुळे लोकांना शासनाने सुकडी वाटप केले होते. कधीकधी निकृष्ट दर्जाची सुकडी लोकांना दिली जाई. ही गोष्ट साहेबांच्या नजरेतून सुटू शकली नाही. एके दिवशी प्रत्यक्ष अधिकाऱ्यालाच ती सुकडी त्यांनी खायला लावली व त्यांची चूक त्याच्या लक्षात आणून दिली.

## प्रदेश काँग्रेसच्या खजिनदारपदी निवड (१९७७)

इंदिरा गांधींनी आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर साऱ्या देशाला धक्का देणारा निर्णय जाहीर केला. १९७८ पर्यंत लांबलेल्या निवडणुकीची घोषणा झाली. लोकसभेची निवडणूक १९ मार्च १९७७ ला होणार असे जाहीर झाले. विरोधी नेत्यांना लगेच तुरुंगाबाहेर सोडण्यात आले. लोकांना आश्चर्य वाटले. 'इंदिरा गांधी लोकशाही संपविणार' असे ओरडून ओरडून विरोधक सांगत असतानाच त्यांनी लोकशाही जिवंत ठेवण्याचा निर्णय घेतला होता. संपूर्ण देशभरात इंदिरा गांधींच्या विरोधात रान तापविले गेले होते. विरोधकांनी बोट क्लबवर प्रचंड मेळावा घेऊन जबरदस्त शक्तिप्रदर्शन केले. महाराष्ट्रात काँग्रेस कार्यकारिणीने सावध पवित्रा घेतला. सर्व मतभेद विसरून सर्वांना एकत्र येण्याचा व पक्षातील सामर्थ्यसंपन्न कार्यकर्त्यांना प्रदेश कार्यकारिणीवर घेण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रतिभावान व सामर्थ्यवान अशा शंकररावांवर पक्षाने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या खजिनदारपदाची महत्त्वाची जबाबदारी सोपविली. निवडणुका जवळ येऊन ठेपल्या होत्या.

कोणतेही आव्हान निधड्या छातीने स्वीकारण्याची ताकद त्यांच्यात भरली होती. पक्षासाठी भरीव निधी उभारणं, प्रचारकार्यासाठी उमेदवारांना सर्व प्रकारची मदत पुरवणं, पक्षाच्या राज्यशाखेचं आर्थिक धोरण आखून त्याची पूर्तता करण्यासाठी शंकररावांनी उभा महाराष्ट्र अक्षरशः पिंजून काढला. पक्षाने सोपविलेली कामगिरी चोखपणे बजावण्यासाठी तहानभूक विसरून ते कामाला लागले.

केंद्रात नाट्यमय घडामोडी घडल्या. अनेक ज्येष्ठ राजकारण्यांनी पक्षांतर केले. जनता पक्ष बहुमत मिळवून सत्तेवर आला. जनता पक्षाचे सरकार स्थापन झाले. काँग्रेस पक्षात दोन गट पडले. शंकररावांनी आणीबाणीच्या काळात स्वतःच्याच सरकारच्या धोरणांवर कडाडून टीका केली होती. त्यामुळे अनेकांना शंकररावही काँग्रेस पक्ष सोडून जातील

असे वाटत होते, पण तसे झाले नाही. त्यांनी विधायक ध्येयासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी टीका केली होती. महाराष्ट्रात नेतृत्व बदलाची चाहूल त्यांना लागली. प्रत्येक राजकीय हालचालींवर शंकरराव बारीक नजर ठेवून होते. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदी वसंतदादांसारखा सच्चा राष्ट्रभक्त असावा, ही त्यांची खूप दिवसांपासूनची इच्छा होती. सांगलीच्या भर सभेत त्यांनी दादांना महाराष्ट्राच्या सिंहासनावर बसविण्याची गर्जना केली होती.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या जोखमीच्या खजिनदारपदावर काम करीत असताना त्यांनी पक्षाच्या प्रत्येक आमदारांवर आपल्या व्यक्तिमत्त्वाची छाप पाडली होती. अनेकांना शंकरराव आपल्या घरचा व हक्काचा माणूस वाटत होते. प्रत्येकाच्या मनात आदराचं स्थान त्यांनी निर्माण केलं.

**बॉंबहल्ल्यातून बचाव**

सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील म्हणजे महाराष्ट्रातील साधंसुधं व्यक्तिमत्त्व राहिलं नव्हतं. अनेक मोठमोठी अधिकारपदं त्यांच्या कर्तृत्वानं त्यांच्याकडे आपणाहून चालत आली होती. त्यांचं सामर्थ्य अफाट वाढलं होतं. ज्याला ज्याला म्हणून त्यांनी हात लावला त्याचं सोनं होत होतं. त्यांच्या शब्दाला सर्वत्र वजन प्राप्त झालं होतं. सरकारही त्यांना सल्लागाराच्या नजरेतूनच पाहत होतं. ही उत्तुंग भरारी घेत असताना त्यांनी अडथळे निर्माण करणाऱ्यांवर, टीका करणाऱ्यांवर कधी आकस धरला नाही. कारण त्यांना माहीत होते की, आज माझा द्वेष करणारा उद्या माझाच होणार आहे. तरीही काहींना त्यांचं मोठेपण पाहवत नव्हतं. शंकररावांना संपविण्यासाठी काहीजण टपून बसले होते. याची यत्किंचितही जाणीव त्यांना नव्हती.

दिल्ली येथील नॅशनल शुगर फेडरेशनची मिटिंग आटोपून २६ जुलै १९७५ रोजी ते विमानाने मुंबईच्या सांताक्रुझ विमानतळावर उतरले. त्यांचा मुंबईत कार्यक्रम ठरलेला होता. जहांगीर आर्ट गॅलरीत शंकररावांच्या अध्यक्षतेखाली व सध्याच्या राष्ट्रपती मा. प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते सुनीता कुदळे यांच्या चित्रप्रदर्शनाचा उद्घाटन कार्यक्रम आटोपून साहेब पुण्याच्या पथिक हॉटेलमध्ये आयोजित सभेसाठी आले. तिथली मिटिंग आटोपून रातोरात अकलूजला. सकाळी संचालक मंडळाची मिटिंग घेण्यासाठी साहेबांनी मध्यरात्रीच्या सुमारास पुणे सोडले. शिवदास कुंभार व टी. एम. काले हे दोन सहकारी सोबत होते. सरदार नावाचा त्यांचा ड्रायव्हर गाडी चालवत होता.

गाडी पाटस घाट चढू लागली. गाडीच्या उजेडात काही अंतरावर मोटारसायकल लावून उभे राहिलेले दोघेजण त्यांनी पाहिले. साहेबांना वाटले मध्यरात्री त्यांच्या गाडीचा काहीतरी घोटाळा झालेला दिसतोय. त्यांच्यातला देवमाणूस जागा झाला. त्या दोघांना मदत करण्यासाठी साहेबांनी गाडी हळू घ्यायला ड्रायव्हरला सांगितले. थोडी पुढे जाऊन गाडी थांबणार इतक्यात मागच्या काचेवर स्फोटाचा प्रचंड आवाज झाला. सरदार ड्रायव्हरने गाडी भरधाव वेगात पुढे दामटली. लगेच मागे आणखी एक स्फोट झाला. साहेबांच्या गाडीवर बॉंब टाकण्यात आले होते. त्यांचं दैव बलवत्तर होतं. गाडीच्या मागच्या काचांचा चुराडा झाला. खांद्याला किरकोळ जखम झाली, एवढ्यावरच निभावलं होतं. पुढे बऱ्याच अंतरावर येऊन गाडी थांबविली साहेबांनी स्वतःच्या भावनांवर नियंत्रण ठेवले होते. ते फक्त हसले.

दुसऱ्या दिवशी सर्व कुटुंबीयांना साहेबांनी ही गोष्ट सांगितली. हा हा म्हणता बातमी सगळीकडे पसरली. लोकांचे लोंढे साहेबांना भेटण्यासाठी येऊ लागले. त्यांनी सर्वांना शांत राहण्याचे आवाहन केले. साहेबांच्या दौऱ्याची सर्व माहिती आधीच घेऊन विघ्नसंतोषी लोकांनी हा कट रचला

होता. त्यांनी सर्व ओळखले होते तरीही ते भविष्याचा वेध घेण्यासाठी आपल्या कामात गढून गेले.

**वसंतदादांचे राजकारणसंन्यासापासून मतपरिवर्तन**

वसंतदादा म्हणजे सच्चा देशभक्त, स्वातंत्र्यसंग्रामात इंग्रजांच्या विरोधात बंड पुकारून देशसेवेसाठी त्यांनी लढा उभारलेला. तुरुंगवास भोगलेला आणि तुरुंगाच्या तटावरून कृष्णा नदीत उड्या ठोकून इंग्रजांच्या शृंखला तोडणारा एक क्रांतिवीर. पोलिसांनी गोळ्या झाडल्यावर एक गोळी खांद्याला लागलेली असतानाही पोहून नदीपार जाणारा आणि मातृभूमीसाठी रक्त सांडणारा एक शूर मराठा.

स्वराज्य मिळाल्यावर त्याचे सुराज्यात रूपांतर करण्यासाठी अविरतपणे धडपणारा एक नेता. अल्पशिक्षित असूनही राजकारणावर पकड मिळविणारा एक धुरंधर राजकारणी. शंकरराव मोहिते-पाटील आणि वसंतदादा स्वातंत्र्य चळवळीपासून एका प्रेमाच्या धाग्याने बांधलेले. एकाच्या पायात काटा रूतला, तर दुसऱ्याला त्याच्या वेदना होत, इतके ते विचाराने जवळ आले होते. काँग्रेससाठी उभी उमेद खर्ची घालूनही अलीकडे काँग्रेसमध्ये त्यांना दुय्यम ठरविण्याचा खटाटोप काहींनी सुरू केला होता. स्वाभिमानी वसंतदादांना यामुळे दुःख झाले व त्यांनी १९७६ साली राजकारण संन्यास घेण्याचा निर्णय जाहीर केला. शंकररावांना या निर्णयाचा धक्काच बसला. त्याच दरम्यान दादांच्या साठाव्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्रातील अनेक धुरंधर लोक सांगलीला दादांना शुभेच्छा देण्यासाठी आले. दादांची भव्य मिरवणूक काढण्यात आली आणि मिरवणुकीचे रूपांतर सभेत झाले. अनेकांनी शुभेच्छा दिल्या. सर्व कार्यकर्त्यांना दादांच्या राजकारण संन्यासाबद्दल दुःख झाले.

त्यानंतर शंकरराव भाषण करण्यासाठी उठले. सर्वच श्रोत्यांच्या कानात प्राण एकवटले. शंकरराव बोलू लागले, "दादा, तुम्ही महाराष्ट्राचं भूषण आहात. शेतकऱ्यांच आशास्थान आहात. तुम्हाला महाराष्ट्र विसरणार नाही. आम्ही विसरणार नाही. तुम्ही संन्यासाची भाषा बोलू नका. तुम्ही घ्यायचा म्हटला तरी हा मराठी माणूस तुम्हाला संन्यास घेऊ देणार नाही; हे अवघ्या मराठी जनतेचा प्रतिनिधी म्हणून हा शंकरराव

मोहिते-पाटील तुम्हाला सांगतोय. आज मी इथे कृष्णामाईला साक्षी ठेवून सांगतो, दादांना एका वर्षाच्या आत महाराष्ट्राच्या सिंहासनावर बसवून अभिषेक केल्याशिवाय आम्ही शांत राहणार नाही.”

टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला आणि शंकररावांनी आपले भाषण आटोपले. श्रोतृवर्गातून प्रचंड आनंद व उत्साह ओसंडून वाहू लागला आणि वसंतदादांच्या अंतर्मनानं पुनर्विचार केला.

**वसंतदादा मुख्यमंत्रिपदी!**

महाराष्ट्रात नेतृत्वबदलाविषयी खलबते सुरू झाली. अनेक इच्छुकांनी आपापल्या परीने रान बांधयला सुरुवात केली. योग्यता व सामर्थ्य असूनही वसंतदादा मात्र मुख्यमंत्री होण्यास फारसे उत्सुक नव्हते; पण शंकररावांसारख्यांना वसंतदादा मुख्यमंत्री व्हावेत असे तीव्रतेने वाटत होते. शंकररावांनी तर सांगलीच्या भर सभेत तशी प्रतिज्ञाच केली होती.

नेतृत्व बदलाची ही संधी दवडायची नाही या निर्धाराने ते कामाला लागले. वसंतदादांना मुख्यमंत्रिपदावर बसविण्यासाठी शंकररावांनी मोर्चेबांधणी सुरु केली. प्रत्येक आमदाराला शंकररावांनी वैयक्तिक भेटायला सुरुवात केली. गोंधळलेल्या मनःस्थितीतील अनेक आमदारांशी त्यांनी चर्चा करून त्यांचे मन वळविण्यासाठी प्रयत्न सुरु केले आणि वसंतदादाच्या बाजूने बहुसंख्य आमदारांचा पाठिंबा मिळविण्यात शंकरराव यशस्वी झाले होते. महाराष्ट्राच्या समकालीन राजकारणात त्यांची भूमिका नेहमीच किंगमेकरची होती. ते वसंतदादांना भेटले. दादांवर प्रेम करणाऱ्या शंकररावांसारख्या माणसाचा आग्रह दादांनी मोडला नाही. आता दादांची मुख्यमंत्री होण्याची औपचारिकताच बाकी उरली होती. दादांची चर्चा करून दुसऱ्या दिवशी रीतसर राज्यपालांकडे जाऊन पुढील बाबींची पूर्तता करायची असे ठरवून शंकरराव आपल्या मुक्कामी आले.

सकाळी सकाळीच फोनवरून धक्का देणारी एक बातमी त्यांना समजली. यशवंतराव मोहितेही मुख्यमंत्रिपदाच्या मैदानात उतरल्याची ती बातमी होती. त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. यशवंतराव कित्येक वर्षांपासूनचे जिवाभावाचे मित्र असूनही त्यांनी अचानकपणे मला कल्पना न देता असे कसे काय केले? असा प्रश्न त्यांना पडला. साहेबांनी यशवंतराव मोहितेंचा बंगला गाठला. यशवंतरावांनी त्यांना आतल्या खोलीत नेले आणि सांगितले की, "पक्षांतर्गत लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी मी हे केलं आहे, तुम्ही काही काळजी करू नका." आणि लगेच शंकरराव बंगल्याबाहेर पडले. पत्रकारांच्या प्रश्नांना मुत्सद्दीपणे उत्तरे देत गाडीत बसून थेट वसंतदादांकडे आले. दुसऱ्या दिवशी सर्व प्रसारमाध्यमांमध्ये बातम्या प्रसिद्ध झाल्या, 'शंकरराव मोहितेंचा यशवंतराव मोहितेंना मुख्यमंत्रिपदासाठी पाठिंबा.' सारेच चक्रावून गेले. लोकांमध्ये संभ्रमाचे वातावरण झाले. राजकारण्यांची चांगलीच करमणूक झाली.

...आणि तो क्षण जवळ आला. काँग्रेस विधिमंडळ सदस्यांची बैठक सुरू झाली. निवडणूक पद्धतीने बहुसंख्य आमदारांनी वसंतदादांना मुख्यमंत्रिपदी निवडले होते. यशवंतराव मोहितेंनी दादांचे अभिनंदन केले. दि. १७ एप्रिल १९७७ रोजी सायंकाळी राजभवनावर वसंतदादांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून राज्यपालांकडून शपथ घेतली आणि अर्थखात्याचे कॅबिनेट मंत्री म्हणून यशवंतराव मोहितेंनीही शपथ घेतली होती. शंकररावांनी मात्र स्वतःहून मंत्रिपदास नम्रपणे नकार दिला. वसंतदादांना महाराष्ट्राच्या सिंहासनावर बसविण्याची कृष्णाकाठची प्रतिज्ञा पूर्ण केल्याचे अपूर्व समाधान त्यांच्या अंतर्मनाला सुखावत होते!

## डावा कौल

मुख्यमंत्री झाल्यावर वसंतदादांना अकलूजला येण्याचे निमंत्रण शंकररावांनी दिले. त्यांनी येण्याचे मान्य केले. माळशिरस तालुक्याचा

पश्चिम भाग पाण्यावाचून तहानलेला होता. त्यांनी वसंतदादांच्या हस्ते नीरा उजवा कालवा फाटा क्रमांक ४४चे उद्घाटन केले व दुष्काळाने भाजलेला भाग भिजू लागला. निष्प्राण जीवन जगणाऱ्या कोरडवाहू शेतकऱ्यांच्या जीवनात या कालव्यामधून वाहणाऱ्या पाण्याच्या माध्यमातून प्राण फुंकण्याचे अभूतपूर्व संजीवक कार्य शंकररावांनी केले.

काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी काँग्रेस पक्षाची नव्याने बांधणी करून निवडणुकीला सामोरे जाण्याची तयारी सुरु केली. आता वरिष्ठ पातळीवर शंकररावांचे वजन खूप वाढले होते. चाळीस वर्षांहून अधिक काळ समजासेवेसाठी खर्ची घातला होता.

शंकरराव साठी गाठत आले होते. पण मजबूत देहाचे व प्रचंड उत्साहाने वावरणारे शंकरराव यांच्यात वार्ध्यक्याचे एकही लक्षण दिसत नव्हते. १४ जानेवारी १९७८ हा दिवस उगवला. शंकररावांवर सर्वांनीच वाढदिवसाच्या शुभेच्छांचा वर्षाव केला.

१९७८ च्या निवडणुका जाहीर झाल्या. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या बैठकांना वेग आला. साहेबांवर अनेक जबाबदाऱ्या येऊ लागल्या. संपूर्ण महाराष्ट्राची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली होती. पक्षाचे खजिनदार या नात्याने सर्व उमेदवारांना सर्वतोपरी साहाय्य करण्याची कामगिरी त्यांनी अंगावर घेतली. राज्यभर पक्षाची धोरणे पटवून सांगणे, प्रचारयंत्रणा राबविणे, प्रचारसभांचे आयोजन करणे यात ते गढून गेले. यावेळी पक्षाने स्वतःहून शंकररावांना तिकीट दिले. माळशिरस मतदारसंघातील प्रचाराची जबाबदारी आपल्या सहकाऱ्यांवर सोपवून त्यांनी राज्यात काँग्रेसला सत्तेवर आणण्यासाठी स्वतःला झोकून दिले.

केंद्रातील सत्ता जनता पक्षाने काबीज केल्यामुळे काँग्रेसचा बालेकिल्ला असणारा महाराष्ट्र गिळंकृत करण्यासाठी विरोधक टपून बसले होते. काँग्रेसकडेही एकाहून एक दिग्गज नेते होते. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, यशवंतराव मोहिते, शंकरराव मोहिते-

पाटील, वसंतराव नाईक आदींनी जनता पक्षाच्या आक्रमणाचा मुकाबला करण्याची तयारी केली. प्रतिस्पर्ध्यांच्या आक्रमक भाषणांना शंकररावांनी तोडीस तोड भाषणे करायला सुरुवात केली. रणांगण तापू लागले. संपूर्ण महाराष्ट्रात शक्य तितक्या सभा त्यांनी घेतल्या. त्याचवेळी त्यांच्यावर पक्षाचे खजिनदार म्हणूनही जबाबदारी होतीच.

माळशिरस तालुक्यात एक दिवस ते येऊन गेले. प्रचारकार्य चालू आहे हे पाहून ते पुन्हा पक्षाच्या इतर उमेदवारांच्या प्रचारासाठी निघून गेले. काल बीड तर आज निलंगा, तर उद्या लातूर. मराठवाड्यात झंझावाती दौरा काढून ते खानदेशात उतरले. उभ्या महाराष्ट्रातील शंकररावांच्या प्रचारसभांना मतदारांनी भरभरून प्रतिसाद दिला. एक दिवस शिल्लक असताना ते अकलूजला आले. आपल्या मतदारसंघात धावता दौरा काढला. मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.

माळशिरसचा मतदारराजा यावेळी शंकररावांच्या पदरात माप घालायचे विसरून गेला होता. जमताजनार्दनाने शंकररावांना डावा कौल दिला होता. संपूर्ण महाराष्ट्राला आश्चर्याचा धक्का बसला. समुद्राची रेती हाताने उचलून मूठ भरण्याचा कितीही प्रयत्न केला तरी स्वतःच्याच हातातून नकळत निसटून जाते. जीवनातील आशा-निराशेचे, सुखदुःखाचे क्षण आपली अनुभवसंपन्नता व प्रगल्भता वाढवित असतात. मतदारांनी दिलेला निर्णय प्रगल्भ विचारांच्या शंकररावांनी मोकळ्या मनाने स्वीकारला. तर दुसरीकडे शंकररावांनी अविरतपणे मेहनत घेऊन ज्या ज्या उमेदवारांचा प्रचार केला होता ते सारेच उमेदवार विजयी झाले होते.

जनतेने दिलेल्या या निर्णयाने शंकरराव अंतर्मुख झाले. त्यांना सारा भूतकाळ आठवला. मातृभूमीच्या उत्कर्षासाठी व भूमिपुत्रांच्या जीवनात प्रकाश आणण्यासाठी काय केलं नव्हतं त्यांनी? अगदी किशोरवयात आल्यापासून समाजोद्धारासाठी अविरतपणे परिश्रम घेतले होते. देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी धडपड केली. ग्रामपंचायतीची पहिली

निवडणूक, वसतिगृहाची सुरुवात, शिक्षण संस्थेचा व्याप, सहकारी साखर कारखान्यासाठी जिवाचे रान केले. अनेक अपमान व अवहेलना पचविल्या. राजहंस कुक्कुटपालन, शिवामृत दूध संघ, जवाहर वर्कशॉप, इंग्रजी माध्यमाच्या शाळा, कृषी औद्योगिक प्रदर्शनाचे आयोजन, कृषी उत्पन्न बाजार समिती, खरेदी-विक्री संघ, गो-पैदास केंद्र, शिवपार्वती सार्वजनिक ट्रस्ट या साऱ्या गोष्टी कुणासाठी केल्या आपण? १९७२ च्या दुष्काळात रात्रंदिवस झटून काम केले ते कुणासाठी? असंख्य प्रश्नांची वादळे त्यांच्या अंतर्मनात उठू लागली. हे सारं करत असताना स्वतःच्या सुखाचा त्याग केला होता. कुटुंबासाठीही त्यांनी पुरेसा वेळ दिला नव्हता. समाजकार्यासाठी, समाजातील तळागाळातील लोकांच्या सुखासाठी स्वतःला झोकून दिलं होतं.

त्यांनी स्वतःला व सर्व सहकाऱ्यांनाही सावरलं. डोंगर समोर असेल तर नदीचा प्रवाह डोंगराला वळसा घालून पुढे जातो; पण तो कधीच खंडित होत नाही. परिस्थितीपुढे हताश होऊन थांबून राहणे हे वाहणाऱ्या प्रवाहाला कधीच ठाऊक नसते. निवडणूक आली आणि गेली होती. वसंतदादा पुन्हा एकदा मुख्यमंत्री झाले होते. शंकरराव जरी आता आमदार नव्हते तरी आमदारकीवाचून त्यांचं काहीही अडत नव्हतं. निवडणुकीनंतर अनेकांनी येऊन शंकररावांच्या पायावर पश्चात्तापाचे अश्रू ढाळले. त्यांना शंकररावांनी समजावलं. त्यांनी कुणाचंही काम अडवलं नाही. आपल्या घराची कवाडं गोरगरिबांसाठी सदैव उघडी ठेवली. त्यांनी कुणावर रोष धरला नाही की, राजकीय आकस धरला नाही. त्यांच्याकडून कामे करून घेणाऱ्या मतदारांना स्वतःच्या चुकीबद्दल पश्चाताप होत होता.

यातच डाव साधता येतो का म्हणून विरोधकांनी सहकारी साखर कारखान्यावर आपले लक्ष केंद्रित केले. हा कारखानाही आपल्याला सहज गिळंकृत करता येईल असा त्यांचा डाव होता. ज्या विरोधकांना एकही सहकारी संस्था उभी करून ती यशस्वीपणे चालवता आली नव्हती

त्यांना आता शंकररावांनी रक्ताचं पाणी करून उभारलेल्या या मातृसंस्थेच्या नरडीचा घोट घेण्याची बुद्धी सुचली होती. राजकारणातला शंकररावांचा वाढता प्रभाव न पाहवणाऱ्या जिल्ह्यातीलच नव्हे, तर महाराष्ट्रातील काही राजकारण्यांनी साहेबांचं पॅनेल पराभूत करण्यासाठी गुप्तपणे रसद पुरविली होती. सबंध महाराष्ट्राचे लक्ष या निवडणुकीकडे लागले होते.

मतदान पार पडले आणि मतमोजणी सुरु झाली. शंकररावांच्या नेतृत्वाखालील पॅनेलने सर्वच्या सर्व जागा प्रचंड फरकाने जिंकून घेतल्या. साहेबांचं व्यक्तिमत्त्व तेजोवलयांकित झालं होतं. सन्मानानं यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदावर आरूढ झाले होते.

# स्वामी वैखरीचा

*शतेषु जायते शूरः सहस्त्रेषु च पंडितः ।*
*वक्ता दशसहस्त्रेषु दाता भवति वा न वा ॥*

शंभरात एखादा शूर जन्माला येतो, हजारांतच एखादा विद्वान पंडित निर्माण होतो. दहा हजारात एखादाच वक्ता असतो. मात्र दाता निर्माण होणे अतिदुर्लभ आहे.

काही माणसांना रुबाबदार व्यक्तिमत्त्व, रसाळ व अमृतमधुर वाणी यांची देणगी निसर्गतःच लाभलेली असते. खरेतर वाणीच्या साह्याने केलेले सरस्वतीचे पूजन म्हणजे वक्तृत्व. वक्तृत्व हा अनेक गुणांचा समुच्चय असतो. त्यात भाषाप्रभुत्व असते, धारदार व दमदार आवाज असावा लागतो. सहजसुंदर विषय मांडणी करावी लागते. अनेक प्रश्नांचा सखोल अभ्यास असेल, सांगण्याची ऊर्मी मनात दाटून आली असेल तर असे भाषण चांगले होते. ज्या भाषणामुळे वक्त्याला स्वतःला एक प्रकारची प्रसन्नता व मानसिक समाधान मिळते ते खरे उत्तम भाषण असते. ते श्रोत्यांना मनापासून आवडते. वक्त्याला प्रसिद्धीच्या झोतात आणून सोडते. वक्तृत्व हा बहरून आलेल्या मनाला फुटलेला शब्दांचा मोहर असतो.

शिक्षकी पेशा, न्यायालयातील वकील ही वक्तृत्वकलेच्या विकासासाठी सदैव उपकारक ठरलेली क्षेत्रे आहेत. म्हणूनच बहुतेक गाजलेले वक्ते शिक्षक किंवा वकील असलेले दिसतात. पण शेतकरी वक्ता कुणी पाहिला आहे का? काळ्या आईची सेवा करत राहायच्या, फळाफुलांच्या राशी फुलविणाऱ्या शेतकऱ्याला सुंदर वक्तृत्वाच्या साहाय्याने आपल्या समस्या जगापुढे मांडता आल्या तर किती बरे होईल? पण सगळे दुःख पदरात घेऊन तो आपला सगळे सोसत राहतो. अशा समस्यांनी त्रस्त असलेल्या समस्त शेतकऱ्यांचा आवाज एकेकाळी या महाराष्ट्रात व्यासपीठावरून गरजला. शंतकऱ्यांची, कष्टकऱ्यांची दुःखे

या वक्त्याने गल्लीपासून दिल्लीपर्यंत सर्वांना ऐकवली. त्यांना समाजाला काही सांगायचे होते. आयुष्यात स्वतःला व इतरांना येणारे अनुभव चर्चेसाठी मांडायचे होते. लोकांना ते पटावेत म्हणून उपमा, अलंकार, किस्से, विनोदाचा वापर या वक्त्याने भरपूर केला. यातून जिवंत, रसरशीत, उत्स्फूर्त वक्तृत्व साकारले. या वक्त्याचे नाव शंकरराव मोहिते-पाटील. केवळ दहा हजारातलाच नव्हे तर लाखातला एक वक्ता!

कोणतीही कृती किंवा कार्यक्रम अमलात आणणारा माणूस जेव्हा त्या कृतीचा भ्यास करतो, साधक-बाधक गोष्टीने कृती करू लागतो, तेव्हा त्याचे जीवन वैचारिक जीवन बनते. त्यातच नेतृत्वाचे बीज रोवले जाते. यातूनच विचारांबरोबर वक्तृत्वाची कला शंकररावांना संपादन करता आली. वडाला पारंब्या फुटाव्यात तशा त्यांच्या व्यासंगवृक्षाला वक्तृत्वाच्या पारंब्या फुटल्या. वक्तृत्व हे त्यांच्या साधनेचे फलित होते. प्रसन्न व्यक्तिमत्त्व, आरोग्यसंपन्न अंगकाठी, सुस्पष्ट वाणी, सुसंगत विचार, स्थिर व अगविक्षेपरहित विवेचनशैली, श्रोत्यांच्या मनात विचारांची रूजवण करण्याची त्यांची भाषाशैली हे त्यांचे खास वैशिष्ट्य होते. ग्रामीण जनतेत वावरत असताना त्यांना सामान्य लोकांचे अपार कष्ट दिसत होते. त्याबरोबरच सामान्य लोकांचे अथांग प्रेमही त्यात होते. या जनतेच्या प्रेमाने त्यांच्या वक्तृत्व कलेला वेगळा असा आकृतिबंध दिला. आपल्या माणसाशी आपण विचारविनिमय करत असतो तेव्हा अगदी ह्रदयातून बोलतो, हितगुज करतो. जिव्हाळ्याच्या माणसांशी बोलणाऱ्याची रीत त्यात दिसत होती. त्यांना फड जिंकायचा नव्हता, जनतेवर मोहिनी टाकून तिला वाहवत न्यावयाचे नव्हते. जनतेला शिक्षण देणारा शिक्षक म्हणून शंकरराव सभासंमेलनामध्ये बोलत असत.

**पंढरपूर येथील विश्व हिंदू धर्मपरिषदेचे स्वागताध्यक्ष**

एके दिवशी सकाळीच माळशिरसचे विष्णुपंत कुलकर्णी शंकररावांच्या बंगल्यावर भेटायला आले. त्यांच्याबरोबरच अत्यंत विद्वान व तेजस्वी व्यक्तिमत्त्व असलेले विश्व हिंदू परिषदेचे महामंत्री दादासाहेब आपटेही आले होते. त्यांच्याविषयी विष्णुपंतांनी दोन दिवसांपूर्वीच साहेबांना कल्पना दिली होती. दादासाहेब आपट्यांसारखा विद्वान माणूस आपल्याकडे चर्चेसाठी आला आहे. याचा शंकररावांना फार आनंद झाला.

शंकररावांच्या अगत्यशील बोलण्याचा आपट्यांवर खूपच प्रभाव पडला. पहिल्याच भेटीत साहेबांनी आपट्यांना जिंकले होते. विश्व हिंदू परिषद म्हणजे हिंदू धर्माची परिषद होती; परंतु साहेबांना स्वतःच्या धर्माचा जसा अभिमान होता तसा इतर धर्माबद्दलही आदर होता. सगळ्या धर्मांमध्ये जगाला व्यापून राहिलेला मानवता हाच श्रेष्ठ आहे यावर त्यांचा ठाम विश्वास होता.

*जे का रंजले-गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ।*
*तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।*

या संत तुकारामांच्या पंक्तीमध्ये जो आशय आपणाला दिसून येतो त्याप्रमाणे साहेब आपला जीवनमार्ग आक्रमत होते. जगातील दीनदुबळ्या गरीब जनतेच्या जीवनात प्रकाश आणण्याचे, त्यांचा आत्मविश्वास वाढविण्याचे, त्यांच्या हातून राष्ट्रउभारणीचे महान कार्य घडवून आणण्याचे त्यांचे ध्येय होते. त्यासाठीच ते अहोरात्र झटत होते. याची समाजातील सर्व जातिधर्मातील लोकांना कल्पना होती. म्हणून साऱ्या जातिधर्मातील लोक त्यांच्यावर प्रेम करीत होते. अनेकांना असे वाटत होते की, 'शंकररावांसारखा काँग्रेसचा राजकारणी माणूस या धार्मिक कार्यक्रमात येणे कठीण आहे'; परंतु शंकरराव सकारात्मक विचार करणारे होते. नकारात्मक विचारांनी त्यांना कधी ग्रासले नाही. जे चांगले, उदात्त आणि मानवतेला धरून आहे ते करण्यात ते मागेपुढे पाहत

नव्हते. इतरांच्यासारखे ओठात एक आणि पोटात एक असे ते करीत नव्हते. आपली भूमिका त्यांनी निःसंदिग्धपणे विश्व हिंदू परिषदेच्या पदाधिकाऱ्यांना कळविली आणि ते यशस्वी करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे अभिवाचन दिले. विश्व हिंदू परिषदेच्या अधिवेशनाचे 'स्वागताध्यक्ष' म्हणून येण्याचे त्यांनी जाहीर करून टाकले. त्यांना माहीत होते की, या अधिवेशनात अनेक लोकांशी संवाद साधण्याची एक संधी यानिमित्ताने मिळणार आहे. धर्मातील अधोगामी रूढी परंपरा-चालिरीती, याबाबत सर्वसामान्य समाजाला काही विचार देता येतील. परिवर्तनाचे एक साधन म्हणून त्यांनी या परिषदेच्या अधिवेशनाकडे पाहिले.

काँग्रेस पक्षाच्या मोठ्या पदावर काम करत असतानाही विश्व हिंदू परिषदेचे स्वागताध्यक्ष होण्याचा त्यांचा निर्णय त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे श्रेष्ठत्वच सिद्ध करतो.

## कमाल जमीन धारणा कायद्यास विरोध व शेतकरी परिषदेतील भाषणे

१९६९ साली कमाल जमीन धारण कायदा (म्हणजेच सिलिंग) लागू झाला. हा कायदा शेतकऱ्यांनी मान्य केलेला असतानाच नंतर दोनच वर्षांत आणखी जमीन धारणा मर्यादा कमी करण्याचा प्रस्ताव मध्यवर्ती काँग्रेस सरकारसमोर आला. आमदार-खासदार ही मंडळी खरे पाहता बहुतांश शेतकऱ्यांची मुले असतात. शेतकऱ्यांच्या या ज्वलंत प्रश्नावर, 'पक्षाचे धोरण आहे' म्हणून सारेच प्रतिनीधी पक्षशिस्तीच्या नावाखाली मूग गिळून गप्पा बसले होते; परंतु शंकरराव हे त्यापैकी नव्हते. ते मूळचे शेतकरी असल्याने त्यांनी सिलिंग कायद्यामधील अनेक उणिवा व दोष जाणले. त्यासाठी शेतकऱ्यांची जागती करून सरकारविरोधात दंड थोपटण्यास ते सिद्ध झाले. त्यांनी आक्रमक पवित्रा घेऊन आपल्याच पक्षाच्या म्हणजेच काँग्रेसच्या धोरणांनाच आव्हान देण्याचे नक्की केले. सध्याचा काँग्रेसप्रणीत समाजवाद हा पहिल्यांदा समृद्धी व नंतर वाटप असा आहे. तो मला पटत नाही. जर पक्षाला समाजवादी रचना निर्माण

करायचे कार्य करायचे असेल तर प्रथम श्रमजीवी, शेतकरी व कामगारांचा विश्वास संपादन केला पाहिजे. त्याचाच एक भाग म्हणून शेतकऱ्यांना एका धाग्यात गुंफणारी, त्यांच्या समस्या, व्यथा, वेदनांना वाचा फोडणारी अशी एक संघटना साहेबांना अभिप्रेत होती. त्यांनी शेतकरी परिषदेची बांधणी केली. गावोगावचे अनेक तरुण व तडफदार शेतकरी यात सामील झाले. त्याचबरोबर जाणकार मंडळीही होतीच.

दि. १९ नोव्हेंबर१९७१ रोजी सदाशिवनगरच्या मैदानावर शेतकरी परिषदेचे पहिले अधिवेशन घेण्याचे त्यांनी निश्चित केले. तो दिवस उजाडला. शंकररावांच्या शेतकरी हिताच्या भूमिकेला पाठिंबा देण्यासाठी सबंध जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने शेतकऱ्यांचे लोंढेच्या लोंढे येऊ लागले आणि भूमिपुत्रांच्या प्रचंड उपस्थितीत अधिवेशनाला सुरुवात झाली. के. एल. गिरमेंनी प्रास्ताविक केले. शहाजीराव पाटील, नारायणराव जाचक, भगवानराव बोरावके, शिवदास कुंभार, शहाजीराव मगर आदी वक्त्यांची भाषणे झाली आणि साहेब भाषण करायला उठले. सर्वांनीच टाळ्यांचा कडकडाट केला. साहेब बोलू लागले, "सरकारने पहिल्यांदा सिलिंग कायदा आणला तेव्हा भूमिहीनांना जमिनी मिळाल्या पाहिजेत, त्यांना वाव मिळून त्यांचे जीवन स्थिर झाले पाहिजे, अशी सरकारची भूमिका होती. शेतकऱ्याकडून जादा जमिनी काढून घेऊन भूमिहीनांना देण्याचे व जादा झालेल्या जमिनी मूळ मालकाला परत करण्याचे ठरले. सरकारने भूमिहीनांना योग्य न्याय दिला तर नाहीच आणि जादा जमीन मूळ मालकालाही परत दिल्या नाहीत. १९३० च्या दरम्यान काही शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी खंडाने दिल्या होत्या. पुढे सरकारने त्या जमिनी स्टेट फार्मिंगला जोडल्या. कारण काय तर उसाचा निश्चित पुरवठा व्हावा. आता स्टेट फार्मिंगकडे पडीक व नापीक जमिनी आहेत. त्या जमिनींची अवस्था अशी झालं आहे की, तिथे झाडांसाठी खड्डे खोदले; पण झाडेच लावली नाहीत. आता खड्ड्यांचं क्षेत्रफळ जमिनीच्या क्षेत्रफळांपेक्षा अधिक झालंय! या अशा जमिनी बाजूला काढून

त्या म्हणे शेतकऱ्यांना देणार असं सरकारच धोरण आहे. या जमिनी धड भूमिहीनांना मिळू शकत नाहीत आणि धड शेतकरीही कसू शकत नाही; हे चाललंय काय? हा शेतकऱ्यांवर अन्याय आहे. तो खपवून घेतला जाणार नाही.” शासनाच्या या सिलिंग धोरणांवर शंकररावांच्या शब्दांचे आसूड कडाडत होते आणि दुसरीकडे त्यांना प्रतिसाद देण्यासाठी टाळ्यांचा कडकडाट होत होता.

“पूर्वी १८ एकरांवर सिलिंग होतं. आता ९ एकरांवर आणलं. उद्या आणखी खाली येईल. जमीन कमी आणि माणसांची संख्या वाढते आहे. मुलं होतील, मुलांना आणखी मुलं होतील. नातवंडं होतील आणि एक वेळ अशी येईल आजचा शेतकरी उद्या भूमिहीन होईल. ज्यांना भुईमुगाच्या शेंगा जमिनीत येतात का वर येतात, हे माहीत नाही असेच उंटावरचे दीडशहाणे या प्रश्नांवर मोठ्या अधिकारवाणीने बोलू लागले आहेत आणि सरकार निराळच काहीतरी करून बसतं. लोकशाही, समाजवाद या देशात जरूर आणा, पण सरकारला फक्त शेतकऱ्यांच्या जमिनीच तेवढ्या दिसतात काय? शहरी भांडवलदार आणि उद्योगपतींकडे कोट्यवधींची उलाढाल होते. त्यांना अमाप नफा मिळतो. त्यांच्या फॅक्टऱ्यांवर आणा ना सिलिंग! मोरीला बोळा अन् दरवाजा मोकळा असं हे धोरण आहे. राजधानीपासूनच सिलिंगची सुरुवात करा. मुंबईत शेकडो उद्योग असणारे करोडपती आहेत. त्यांच्या मालमत्तेवर पहिल्यांदा निर्बंध घाला. ही शेतकरी परिषदेची आता कुठे सुरुवात आहे. महाराष्ट्रातील शेतकरी पेटून उठणार आहे. आम्हाला आंदोलन करावं लागलं तरी ते करणार आहोत. लाखोंच्या संख्येने शेतकरी रूमणे घेऊन विधान भवनावर ‘रुमणेमोर्चा’ काढतील हा माझा इशारा आहे.” प्रचंड टाळ्यांमध्ये साहेबांनी भाषणाला पूर्णविराम दिला होता. त्यानंतर शेतकऱ्यांच्या प्रमुख अकरा मागण्या असलेले ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. ते ठराव सरकार व प्रदेश काँग्रेस कमिटीकडे पाठविण्याचे ठरले.

सदाशिवनगरच्या शेतकरी परिषदेचे तरंग उभ्या महाराष्ट्राच्या भूमीवर उठले. सबंध राज्यातून साहेबांच्या भूमिकेला पाठिंबा मिळू लागला. अनेक कार्यकर्ते त्यांना येऊन भेटले आणि त्यांनी साहेबांना मुंबईत मेळावा घेण्याची विनंती केली. मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात डिसेंबर १९७१ मध्ये महाराष्ट्रातील प्रमुख शेतकऱ्यांची परिषद भरविली गेली. महत्त्वाचे म्हणजे राज्याचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक स्वतः या परिषदेसाठी हजर होते. यावेळी शंकररावांनी शेतकऱ्यांच्या अनेक समस्या मांडल्या. शेतमालाला हमीभाव, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, कमी व्याजाने कर्जपुरवठा, आदी मुद्दयांवर शंकररावांनी ते सभागृह दणाणून सोडले.

## पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेतील व्याख्यान

शंकररावांचे पुण्यातील वसंत व्याख्यानमालेत, सुशिक्षित, चिकित्सक तसेच ज्ञानी व विचारवंत श्रोत्यांसमोर 'ग्रामीण भागातील शेती व शेतकरी यांच्याविषयी शहरवासीयांच्या मनात असलेले समज व गैरसमज' या विषयावर २६ एप्रिल १९७६ रोजी एक अत्यंत प्रभावी व्याख्यान झाले.

याप्रसंगी अध्यक्षस्थानी रंगराव पाटील हे होते. व्याख्यानमाला संयोजन समितीचे श्री. बापट यांनी शंकररावांची ओळख करून दिली. साहेबांनी आपल्या खास शैलीत व्याख्यानाला सुरुवात केली.

"आज या ठिकाणी माझ्यासारख्या अल्पशिक्षित शेतकऱ्यांचे व्याख्यान आयोजित केल्याबद्दल मी प्रथमतः संयोजकांचे आभार मानतो. माझ्यासमोर बसलेले या ठिकाणचे सर्व श्रोते अभ्यासू, सुज्ञ व शिकलेले आहेत. त्यामुळे माझ्या मनावर या व्यासपीठावरून बोलताना थोडेसे दडपण आले आहे. मी कमी शिकलेला असल्यामुळे माझ्याकडून फार शुद्ध भाषेची अपेक्षा करू नका. अडाणी माणूस ओढूनताणून शुद्ध बोलायचा प्रयत्न करू लागला की, त्याच्या हातून भलत्याच चुका

होण्याची शक्यता असते. एका खेड्यातल्या अल्पशिक्षित पुढाऱ्याच्या घरी एकदा मामलेदार आला. त्या मामलेदाराची भाषा अगदी शुद्ध होती. तो शेतकऱ्याला प्रश्न विचारून माहिती घेत होता. सगळे झाल्यावर पान खाताना त्या शेतकऱ्याने विचार केला की, मामलेदार साहेबांनी आपल्याला भरपूर प्रश्न विचारले. आपण आता त्यांना एखादातरी प्रश्न विचारला पाहिजे. आपण साहेबांना "तुम्हाला किती मुले आहेत?" एवढे तरी विचारूया. पण साहेबांसारखे शुद्ध भाषेत विचारले पाहिजे. त्या शेतकऱ्याने मामलेदार साहेबांना विचारले, "तुम्हाला तीर्थरूप किती आहेत?" प्रश्न ऐकून मामलेदार साहेब घाबरून गेले. (श्रोत्यांमधून हशा) शेतकरी चुकला होता. वास्तविक त्याला "तुम्हाला चिरंजीव किती आहेत?" असे विचारायचे होते. पण त्याने चिरंजीव ऐवजी तीर्थरूप शब्द वापरला होता. अशिक्षित माणूस शुद्ध बोलायला लागला की, कसा चुकतो हे पटवून देण्यासाठी मी तुम्हाला हा किस्सा सांगितला. आणखी एक महत्त्वाची गोष्ट अशी की, एखाद्या व्याख्यानमालेत विषयाला धरून बोलण्याचा माझा हा पहिलाच प्रयत्न आहे. त्यामुळे काही चुकले माकले तर मला आपण माफ कराल अशी मी आशा व्यक्त करतो.

"माझ्या अगोदर प्रास्तविक करणाऱ्यांनी मी दिलेल्या लक्ष भोजनाचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, एक लाख लोकांना जेवण दिले म्हणून, पण माझा आरोप आहे की, १८ हजारांनी हा आकडा तुम्ही कमी का सांगता? प्रत्यक्षात मी एक लाख अठरा हजार लोकांना जेवण दिले होते. वर्तमानपत्रवाल्यांनी त्या भोजन समारंभाचे चुकीचे वार्ताकन केले होते. माझ्या बदनामीचा त्यामागे एक प्रयत्न होता. त्यामागे वेगळेच राजकारण होते; पण सामान्य वाचकांना ते राजकारण माहीत नव्हते. लक्षभोजनाच्या अतिरंजित बातम्या देणाऱ्या वर्तमानपत्रांनी त्याच वर्षभरात केलेल्या इतर गोष्टींना प्रसिद्धी का दिली नाही? उदा. गेल्यावर्षी सोलापूर जिल्ह्यात मोठा दुष्काळ पडला होता. त्यावेळी दुष्काळग्रस्तांच्या ४५०० विद्यार्थ्यांना दररोज दोन वेळचे जेवण आम्ही मोफत दिले होते.

४५०० मुलांना २ वेळा जेवण म्हणजे रोज ९००० विद्यार्थी आम्ही जेवू घालत होतो. त्यावर आम्ही ४ लाख ९० हजार रूपये खर्च केला. त्याची कसलीही दखल वर्तमानपत्रांनी घेतली नाही. मुलाच्या लग्नातल्या लक्षभोजनाची मात्र विनाकारण चर्चा केली गेली. वास्तविक पाहता मी तालुक्याचा प्रतिनिधी आहे. गावोगावचे हजारो लोक माझ्यावर प्रेम करतात. त्यांच्या मुलाबाळांच्या लग्नासारख्या शुभकार्याला आवर्जून मला बोलवतात. प्रेमाने जेवू घालतात. तालुक्यात गावोगावी अनेकांच्या घरी मी प्रमाने जेवलो होतो. त्यांचे असंख्य उपकार माझ्यावर होते. आता मी माझ्या घरातल्या पहिल्या लग्नात माझ्यावर प्रेम करणाऱ्या असंख्य लोकांना जेवणासाठी आमंत्रित करून त्यांना जेवण दिले. इतकी वर्षे त्यांनी केलेल्या पाहुणचाराची मी भारतीय संस्कृतीप्रमाणे परतफेड केली. यात कुणाला वावगे का वाटावे हे मला समजत नाही.

"आम्हा ग्रामीण भागातील ऊस बागायतदारांविषयी शहरवासीयांच्या मनात बरेच गैरसमज आहेत. त्यामुळेच आम्ही ऊस बागायतदार जिरायत शेतकऱ्यांचे अजिबात हित पाहत नाही असे अनेक वेळा म्हटले जाते. पण हे खरे नाही. आपला भारत देश हा शेतीप्रधान आहे. अगदी ७५ टक्के लोक या व्यवसायावर अवलंबून आहेत. तर उर्वरित २५ टक्के लोक इतर व्यवसाय उद्योग करतात. मुळातच शेती व्यवसायाशिवाय देशाला भवितव्य नाही. महत्त्वाची गोष्ट अशी की, ऊस बागायतदार शेतकऱ्यांनी जिरायत शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी बरेच काही केले आहे. मी अकलूजला साखर करखाना काढला तेव्हा सभासद संख्या २००० इतकीच होती. उसाचे क्षेत्र त्यावेळी ४००० एकर होते. आज १० वर्षांनंतरचे तालुक्याचे चित्र पाहिले तर सभासदांची संख्या ७५०० तर उसाचे क्षेत्र ८००० हजार एकर एवढे वाढवलेले आहे. हे सभासद व उसाचे क्षेत्र वाढले कसे? साधारणपणे १० वर्षांच्या काळात ५००० सभासद व ४००० एकर ऊस वाढला कसा? याचे कारण असे की, मूळच्या ऊस बागायतदारांनी इतर पिके घेणाऱ्या जिरायत शेतकऱ्यांना

प्रेरणा दिली. कारखान्यांमार्फत शक्य ती मदत दिली. त्यांनी विहिरी खोदण्यासाठी पैसा उपलब्ध करून दिला, ऊस लागवडीसाठी कर्जे उपलब्ध करून दिली. छोटे छोटे अनेक शेतकरी आम्ही असे उभे केले आहेत. आज माझ्या कारखान्याकडे २ एकराच्या आतले ८५ टक्के ऊस उत्पादक शेतकरी आहेत. आम्ही आणखीही शेतकरी उभे करणारच आहोत. पण आता तज्ज्ञ लोक सांगू लागले आहेत की, याला मर्यादा आहेत. नुकताच सादर झालेला 'बर्वे कमिटीचा रिपोर्ट' सांगतो की, राज्यात जेवढा पाऊस पडतो त्याचा प्रत्येक थेंब जरी शेतीसाठी वापरला तरी एकूण जमिनीच्या फक्त २५ टक्के शेतजमीन कायम जिरायत राहणार आहे."

"आम्हा ऊस बागायतदारांविषयी व सहकार चळवळ चालवणाऱ्या नेत्यांविषयी आणखी एक गैरसमज तुमच्या मनात आहे, तो म्हणजे आम्ही फक्त ऊस उत्पादक सभासदांचेच हित पाहतो. इतरांचा विचार करत नाही. खरे तर हा गैरसमज चुकीचा आहे. जिथे कारखाना निघतो तेथे सभासदाबरोबरच कामगार, नोकरवर्गाची संख्यासुद्धा मोठी असते. असे म्हणता येईल की जेवढे सभासद आहेत तेवढेच इतर लोकही जोडलेले असतात. उदा. माझ्या कारखान्यात ७५०० सभासद आहेत. म्हणजे तेवढ्या सभासदांच्या कुटुंबांचे आम्ही भले केले आहे. त्याचबरोबर कारखाना व काम करणारे प्रत्यक्ष कामगार १००० ते १२०० च्या दरम्यान आहेत. शिवाय ऊसतोड करणारे, वाहतूक करणारे अशा लोकांची संख्या ५००० च्या आसपास आहे. म्हणजे माझा कारखाना १२००० लोकांच्या कुटुंबाचे भवितव्य घडवतो. आणखी एक गोष्ट अशी, कारखान्याच्या परिसरात हॉटेल, किराणा दुकाने, नाभिकांची, कपड्यांची, पंक्चरवाल्यांची, लोहार, सुतारांची, पानपट्टीवाल्यांची इत्यादी दुकाने चालतात. कारखान्यामुळेच अशा अनेक व्यवसायांना उत्तेजन मिळते. अशा व्यावसायिकांची संख्या ३००० धरली तर एका कारखाना १५०००

कुटुंबांचे जीवन घडविण्याचा प्रयत्न करतो. मग हे कारखाने केवळ सभासदांचे हित पाहतात असे कसे म्हणता येईल?"

आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात शंकरराव मोहिते-पाटील यांनी सहकारी साखर कारखान्यावरील सरकारच्या विविध बंधनांचा उल्लेख केला. विशेषतः लेव्ही साखर व एक्साईज ड्युटी यामुळे सभासदांना कमी पैसे मिळतात. हे त्यांनी स्पष्ट केले. हे सांगताना त्यांनी सविस्तर आकडेवारीच प्रेक्षकांपुढे ठेवली. ( आर्थात हे दर व आकडे ३३-३४ वर्षांपूर्वीचे आहेत हे गृहीत धरून वाचकांनी योग्य तो मथितार्थ समजून घ्यावा.) ते म्हणाले, "सरासरी एक क्विंटल साखर तयार करण्यासाठी एक टन ऊस लागतो. या एक टन उसासाठी आम्ही शेतकऱ्यांना १५० रूपये दर देतो. कारखान्यात उसापासून साखर तयार करायला क्विंटलला ८२ रु. ५० पैसे प्रोसेसिंगचा खर्च येतो. म्हणजे एक पोते तयार होण्याचा आमचा खर्च २३२ रु. ५० पैसे असा आहे. आम्ही तयार केलेल्या साखरेपैकी ६५ टक्के साखर सरकार लेव्ही म्हणून आमच्याकडून घेते. या लेव्ही म्हणून घेतलेल्या साखरेसाठी सरकार आम्हाला १५९ रु. प्रति क्विंटल दर देते. थोडक्यात आमचा उत्पादन खर्च २३२ रु. ५० पैसे व लेव्ही साखरेसाठी सरकार आम्हाला देते १५९ रु. म्हणजे प्रत्येक पोत्यामागे कारखान्याला ७३ रुपये तोटा होतो. राहिलेली ३५ टक्के साखर आम्हाला फ्री सेल म्हणून खुल्या बाजारात विकता येते. पण ती विकतानाही केंद्र सरकार एक्साईज ड्युटी आकारते. तुम्हाला आश्चर्य वाटेल, केंद्र सरकारची एक्साईज ड्युटी प्रति क्विंटलला १४० रु. भरावी लागते; म्हणजे साखरेचा उत्पादन खर्च २३२ रु. (शेतकऱ्याचे १५० अधिक प्रक्रिया खर्च ८२ रुपये बरोबर २३२ रु.) व त्यावर केंद्र सरकारची एक्साईज ड्युटी १४० रु. याचा सरळ अर्थ असा की, एका पोत्याला उत्पादन खर्च ३७२ रु. येतो. शेतकऱ्याला मात्र एका टनासाठी १५० रु. मिळतात. हा एक टन ऊस निर्माण करण्यासाठी शेतकऱ्याला १२५ रु.उत्पादन खर्च येतो. म्हणजे शेतकऱ्याला टनाला केवळ २५ रु.

मिळतात. एकरात ४० टन सरासरी उत्पादन धरले तर शेतकऱ्याला एक एकर उसाचे (१०००/-रु.) एक हजार रूपये मिळतात. तेही दीड वर्ष खपून कष्ट केल्यानंतर! त्यासाठी त्याचे संपूर्ण कुटुंब शेतात खपत असते. रात्रंदिवस त्यांना कष्ट करावे लागतात. शेतकऱ्यांना कसली सुट्टी नाही, आजारी रजेची सोय नाही, महागाई वाढल्यानंतर मिळणारा महागाई भत्ता नाही की वेळेची मर्यादा नाही. तुमच्याकडचा सरकारी नोकरी करणारा शिपाईसुद्धा कितीतरी सोयीसुविधा उपभोगतो. शिपायाला पगारसुद्धा महिन्याला ५०० रूपये मिळतो. म्हणजे शेतकऱ्यांचे संपूर्ण कुटुंब वर्ष दीड वर्ष कष्ट केल्यानंतर एक एकरापोटी एक हजार रूपये मिळवणार. तुमचा शिपाई मात्र तेवढीच रक्कम केवळ दोनच महिन्यात मिळवतो.

"एक्साईज ड्युटी म्हणून राज्यातल्या सर्व कारखान्यांनी गेल्या वर्षी केंद्र सरकारला २०० कोटी रूपये दिले. शिवाय राज्य सरकारला पर्चेस टॅक्स म्हणून आम्ही दरवर्षी २० कोटी भरतो. केंद्र सरकार लेव्ही म्हणून आमच्याकडून घेतलेली ८० टक्के साखर निर्यात करते. यातूनही केंद्र सरकारला २०० कोटी रूपयांचे परकीय चलन दरवर्षी मिळते. या निर्यातीच्या व्यवहारात तोटा आला तर मात्र तो तोटा साखर कारखान्यांकडून वसूल केला जातो. म्हणजे निर्यातीत सरकारला नफा झाला तर तो सरकारी तिजोरीत जमा होणार आणि तोटा झाला तर आम्हीच तो भरून देणार. हा सरकारचा अजब न्याय आहे. पण साधारणपणे साखरेची निर्यात करून केंद्र सरकार दरवर्षी सुमारे २०० कोटी मिळवते. आमचे म्हणणे असे आहे की, हे सरकारला आयते मिळणारे पैसे आम्हाला नाही दिले तरी चालेल, पण या पैशांचा वापर सरकारने शेती व शेतकऱ्यांच्या सुधारणेसाठी विविध उपक्रम राबवण्यासाठी वेगळे काढून ठेवावेत व तुम्हीच ते शेतीसाठी खर्च करावेत. असे केले तरी शेतकऱ्यांना थोडेसे तरी चांगले दिवस येतील."

आपल्या भाषणात पुढे ते म्हणाले, "लोकशाहीचे एक महत्त्वाचे तत्त्व म्हणजे समानता. हे समानतेचे तत्त्व सहकारात आम्ही खऱ्या अर्थाने

पाळतो. येथे एका सभासदाला एकच मत देता येते. याऊलट जॉईंट स्टॉक कंपनीमध्ये सभासदाने जेवढे शेअर्स घेतले असतील तेवढी मते देता येताता. त्यामुळं ठराविक भांडवलदार व्यक्तींचा प्रबाव तेथे असतो. पण सहकारी साखर कारखाना जेथे असेल तेथे एखाद्या सभासदाने कितीही शेअर्स घेतले असले तरी त्याला निवडणुकीच्या वेळी एकच मत देण्याची परवानगी असते. याचाच अर्थ असा की, आमच्याकडे भांडवलशाहीचा प्रभाव नाही.

"आणखी एक मुद्दा असा की, आम्ही सहकारी चळवळीत काम करणारी माणसे केवळ साखर कारखाना काढून गप्प बसलेलो नाही. साखर कारखान्याच्या बरोबरच आम्ही इतर अनेक पूरक उद्योगधंदे काढले आहेत. उदाहरणार्थ, कुक्कुटपालन, शिक्षण संस्था, दूध संस्था इत्यादी. मी स्वतः अकलूज परिसरात शिक्षण संस्था काढली असून ६ हायस्कूल्स, १ कॉलेज चालवतो. पुढच्या वर्षी आम्ही अकलूजला पब्लिक स्कूल काढायचे ठरवले आहे. हे सर्व ऊस उत्पादक सभासदांच्या मदतीमुळेच घडले ना? सर्वसामान्य लोकांच्या हितासाठी आम्ही आणखी कितीतरी गोष्टी केल्या आहेत. उदाहरणार्थ, माती परीक्षण प्रयोगाशाळा, शेती नसणाऱ्या लोकांना ट्रक, ट्रॅक्टर घेण्यासाठी मदत केली. क्रॉस ब्रीडिंगचा प्रयोग सुरु केला. भारतीय देशी गायी कमी दूध देत म्हणून आम्ही होस्टन, जर्सी गाय खरेदी करण्याचा प्रयोग केला. त्या गायी आम्ही लहान शेतकरी, शेतमजुरांना दिल्या. हा प्रयोग केवळ इथेच यशस्वी झालाय हे कौतुकास्पद आहे. एक गाय सांभाळणाऱ्या शेतकऱ्याला रोज १० रु. मिळतात. चार गायी सांभाळल्या तर ४० रु. मिळतात. मग हे साखर कारखानदार गरिबांसाठी काही करत नाही हा गैरसमज तुम्ही का बाळगता? सहकारी चळवळीने काढलेले पूरक उद्योग, राबवलेले उपक्रम पाहिल्यानंतर विचार करा की, साखरसम्राट, संस्थानिक आहेत का?

"आम्हा ऊस उत्पादकांविषयी आणखी एक गैरसमज आहे. तो म्हणजे हे शेतकरी केवळ उसासारखी नगदी पिके घेतात. अन्नधान्य पिकवत नाहीत. जीवनावश्यक अन्नधान्ये, पिके सोडून संपत्ती वाढवणारी पिके घेतो, असा तुमचा नेहमीचा आक्षेप असतो. खरे तर सध्या राज्यातील एकूण लागवडीच्या केवळ एक टक्का जमीन उसाखाली तर ९९ टक्के अन्नधान्याखाली आहे. बागायती शेतकऱ्याला एक एकर उसाबरोबर इरिगेशनकडून ३ एकरांना पाणी मिळते. त्यापैकी दोन एकरात अन्नधान्याच्या पिकासाठी खते, विशेषतः रासायनिक खते घालणे परवडत नाही. म्हणून जेमतेम खर्च करून शेतकरी अन्नधान्य पिके घेतो. एकरी चार-पाच क्विंटलला उतार पडायचा. उसासाठी मात्र शेतकरी भरपूर खते वापरतात. त्यामुळे जमिनीची प्रत सुधारते, पोत वाढतो. त्यामुळे जमिनीची उत्पादन शक्ती वाढते. अशा जमिनीत ऊस गेल्यानंतर जर अन्नधान्य पिके घेतली तर १० ते १२ क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते. म्हणजे सुमारे तिप्पट फायदा होतो. तुम्ही एक गोष्ट लक्षात घ्या की, नुसते अन्नधान्य उत्पादन करून भागणार का? नगदी पिके घेतल्याशिवाय शेतकऱ्यांची व देशाची परिस्थिती सुधारणार नाही.

"मध्यंतरी सरकारने सिलिंगचा कायदा केला. या सिलिंगच्या कायद्यावर मी माझे मत मांडले. पण व्यस्थित विचार न करता व माहिती न घेता माझ्यावर टीका करण्यात आली. १९६२ साली प्रथम हा कायदा करण्यात आला. त्यानुसार वैयक्तिक जमीन धारणेवर मर्यादा घालण्यात आल्या. एका शेतकऱ्याला पूर्णपणे बागायत असेल तर १८ एकर व केवळ विहीर बागायत असेल तर २७ एकर व जिरायत १०८ एकर जमीन बाळगता येईल असे निश्चित करण्यात आले होते. मात्र १९७२ ला असा सिलिंगचा दुसरा कायदा आणण्यात आला आहे. त्यानुसार कॅनॉलसह पूर्ण बागायती १८ एकर, विहीर बागायत २७ एकर असे पूर्वीचेच प्रमाण निश्चित करण्यात आले आहे. मात्र जिरायत जमिनीची मर्यादा ५८ एकर अशी निश्चित करण्यात आली आहे. म्हणजे या नव्या कायद्याचा परिणाम

फक्त जिरायत शेतकऱ्यांवर होणार, बागायती शेतकऱ्यांवर हा अन्याय आहे. कोल्हापूर भागात सुमारे १२० ते १५० इंच पाऊस पडतो. सातारा भागात ७० ते ८० इंच तर मराठवाड्यात ४० ते ५० इंच पाऊस पडतो. मात्र सिलिंगची ५८ एकरांची मर्यादा सर्वांना सारखीच हे कसे काय? शिवाय शेतकऱ्याला वार्षिक ६००० रु. उत्पन्नाची अट या कायद्यानुसार घालण्यात आली आहे. माझे म्हणणे असे की, मग व्यापारी, उद्योजकांना उत्पन्नाची अशी अट का नाही? प्रॉपर्टी सिलिंगचा कायदा व्यापारी, शेतकरी, उद्योगपती सर्वांनाच का नाही? गरिबी हटवण्याचे काम आम्ही सहकार चळवळीतल्या माणसांनीच केले आहे."

बोलता बोलता शंकरराव मोहित-पाटील व्याख्यानाच्या शेवटच्या टप्प्यात आले. ते म्हमाले, उसाची शेती ही नगदी पिकाची शेती असल्यामुळे आम्ही ग्रामीण भागातील ऊस बागायतदार फार श्रीमंत झालो आहोत. संस्थानिकांसारखी वागू लागलो आहोत असा एक गैरसमज तुम्हा शहरी मंडळीच्या डोक्यात आहे. खरे तर हे चुकीचे आहे. प्रत्यक्षात वस्तुस्थिती अशी आहे की, आम्ही ऊस उत्पादक कर्जाखाली बुडत चाललो आहोत. हे मी अगदी आकडेवारी देऊन स्पष्ट करतो, कारखाना निघण्यापूर्वी म्हणजेच १९६२ पूर्वी या परिसरातील शेतकऱ्यांनी बँकेकडून एकूण १८ लाख रूपये कर्ज घेतले होते. १९६२ साली या परिसरातील शेतकऱ्यांचे बँकेकडून घेतलेले कर्ज ३८ लाख रुपये झाले. १९६८ साली हे कर्ज ८७ लाख रुपये झाले. या वर्षी माझ्या परिसरातील उत्पादकांचे बँकेकडून घेतलेले एकूण कर्ज १ कोटी २० लाख रुपये इतके झाले आहे. आता मग मला सांगा, आम्ही खरेच सधन झालो आहोत काय?

"ग्रामीण भागात आम्ही अतिशय प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगतो. खेड्यात आम्हाला किती सुविधा आहेत? साधा सिनेमा बघायचा झाला तरी आम्हाला गावच्या यात्रेतल्या तंबूत बघावा लागतो. तुम्हासारखे चांगले कपडे आम्हाला घालायला मिळत नाहीत. कुणी आजारी असेल तर सुसज्ज दवाखाने नाहीत; तुम्हासारखी हौसमौज

आम्हाला करता येत नाही. ग्रामीण भागात कुठेतरी एखादी जीप किंवा ॲम्बॅसॅडर दिसायला लागली म्हणजे ऊस उत्पादक शेतकरी समृद्ध झाला असे जे तुम्ही म्हणता ते खरे व्हे.

"उलट तुम्ही शहरी मंडळींनी आमचे आभार मानायला पाहिजेत. कारण सध्या राज्यात ५९ साखर कारखाने चालतात. प्रत्येक कारखान्यात ४ हजार कामगार व इतर कर्मचारी धरले तर सुमारे अडीच लाख लोक ग्रामीण भागातल्या साखर कारखान्यांनी अडवून ठेवले आहेत. आम्ही त्यांना रोजगार दिला, त्यांना उभे केले. हे कारखाने नसते तर हे अडीच लाख लोक नोकरी-व्यवसायासाठी शहरात येऊन धुसले असते. तुमचे नोकरी-व्यवसाय मिळविण्यातले ते स्पर्धक झाले असते. एवढेच नव्हे तर ग्रामीण भागातल्या या कारखान्यांमध्ये अनेक अधिकारी, तंत्रज्ञ, संशोधक आम्ही तुमच्या शहरांमधून आणून त्यांना नोकऱ्या देऊन सांभाळत आहोत. ते आमच्याकडची मानाची पदे भूषवत आहेत.

"मला वाटते मी जरा जास्त वेळ बोललो असेन. आता भाषण थांबवायला पाहिजे. (दरम्यानच्या काळात श्रोत्यांतून आपण बोला, बोला म्हणून ओरडून विनंती केली जाते.) असो, माझ्यासारख्या एका सामान्य शेतकऱ्याला या प्रसिद्ध व्याख्यानमालेत भाषण करायला बोलावल्याबद्दल मी संयोजकांचे आभार मानतो."

भाषण संपल्यानंतर श्रोत्यांकडून बराच वेळ टाळ्यांचा कडकडाट चालू राहिला. श्रोत्यांना हे भाषण आवडल्याची ती पोहोच पावतीच होती.

शंकरराव केवळ राजकारणी नव्हते, साहित्य, संगीत, कला यांचे ते जाणकार होते. याचा प्रत्यय त्यांच्या भाषणातून येतो. माझ्यासारख्यांनी इतरांकडून ऐकलेले साहेब या तोलामोलाचे होते. ज्या भाग्यवंतांना त्यांच्याजवळ वावरण्याची, राहण्याची व चार शब्द देवाणघेवाण करण्याची संधी लाभली त्या सर्वांना शंकररावांबद्दल किती आदर, आपुलकी वाटत असेल याची कल्पना करणे अवघड आहे.

# नव्या जबाबदाऱ्या, नवी आव्हाने

अकलूज ग्रामपंचायतीच्या 'सरपंच'पदापासून सामाजिक व राजकीय जीवनाला सुरुवात केलेल्या शंकररावांनी अनेक पदे भूषविली, अनेक नव्या जबाबदाऱ्या आव्हान म्हणून स्वीकारल्या. कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन, भू-विकास बँकेचे चेअरमन, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर महासंघाचे अध्यक्ष, डेक्कन शुगर इन्स्टिटयूट पुणेचे चेअरमन, राज्य कुस्तिगीर परिषदेचे अध्यक्ष व महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रसचे खजिनदार या सर्व जबाबदाऱ्या एक आव्हान म्हणून स्वीकारल्या आणि या सर्व ठिकाणी आपल्या समाजाभिमुख विचारांचा आणि कार्यपद्धतीचा ठसा उमटविला.

भारतात सर्वात प्रथम सहकारी साखर कारखाना काढणारा मराठी मातीतील एक झंझावात म्हणजेच पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील. ज्यांनी चटणीभाकरी बांधून दिल्लीला हेलपाटे मारले. शेतकऱ्यांचे भागभांडवल उभारताना व कारखान्याची उभारणी करताना जी लढत दिली त्या उत्तुंग कामाला मुजरा करण्यासाठी शंकररावांनी मुंबईत साखर संघाच्या वतीने मुख्यमंत्र्यांच्या हस्ते त्यांचा भव्य सत्कार केला. सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटलांनी, वसंतदादा पाटलांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांच्या कार्यकर्त्यांना एकत्र आणले.

## साखर संघाच्या अध्यक्षपदी

वसंतदादा पाटील, शंकरराव मोहिते-पाटील, शंकरराव कोल्हे यांसारख्या सहकार क्षेत्रातील मंडळींना मुंबईत साखर संघाची प्रशस्त व अद्ययावत इमारत असावी असे मनोमन वाटत होते. त्यासाठी या दिग्गज नेत्यांनी प्रयत्नपूर्वक नरिमन पॉईट या मोक्याच्या ठिकाणी एक प्लॉट संघासाठी सरकारकडून मिळविला होता. साखर संघाची व्याप्ती वाढत

होती व जुनी वास्तू अपुरी पडत होती. ऊस क्षेत्रात संशोधन, प्रशिक्षण व विकास कार्य करणारी डेक्कन शुगर इन्स्टिटट्यूट ही संस्था १४ ऑक्टोबर १९७५ रोजी सुरू केली. शंकरराव संस्थापक सदस्य तर वसंतदादा मुख्य प्रवर्तक होते.

सहकारमंत्री वसंतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या शुभहस्ते २३ एप्रिल १९७५ रोजी साखर भवनाच्या बांधकामाचा कोनशिला समारंभ पार पडला. त्याच ठिकाणी महाराष्ट्रातील सर्व सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन आपापल्या कार्यकर्त्यांसह जमा झाले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष वसंतदादा पाटील यांनी घोषणा केली की, “महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे नूतन अध्यक्ष म्हणून शंकरराव मोहिते-पाटील यांची निवड करण्यात येत आहे.”

आता मात्र शंकररावांच्या नावावर आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला. अकलूजच्या मातीतला एक शेतकरी महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाच्या अध्यक्षपदी स्वकर्तृत्वाने विराजमान झाला होता. अध्यक्षपदी निवड झाल्यावर स्वतः जातीने लक्ष घालून नरिमन पॉईंटवरील ऑफिसची उभारणी केली. कारखान्यांच्या अनेक प्रश्नांवर चर्चा करून उपाययोजनांची आखणी करण्यात येऊ लागली.

१९७५ च्या ऑक्टोबर महिन्यात कारखान्याच्या उदय सभागृहात डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन या संस्थेची वार्षिक सभा आयोजित करण्यात आली. संस्थेचे विद्यमान अध्यक्ष तात्यासाहेब कोरे, सदस्य श्री. गुंडूराव, शंकरराव काळे, वसंतदादा पाटील आदी नामवंत मंडळी सभेसाठी जमली होती. यावेळी सहकारमहर्षींची संस्थेचे नूतन अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी शंकरराव काळे यांची निवड करण्यात आली. सहकारी साखर कारखान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी साहेबांना एक नवे व्यासापीठ उपलब्ध झाले होते.

## शेतकरी संघटनेची मुहूर्तमेढ

शेतकऱ्यांचा विकास हाच शंकरराव मोहिते-पाटील यांचा ध्यास होता. त्यांच्या समस्या सुटल्या पाहिजेत. त्यांना चांगले दिवस आले पाहिजेत यासाठी त्यांनी आपली शक्ती वापरली. शेतकऱ्यांना, त्यांच्या मुलाबाळांना शिक्षण, आरोग्य या सोबतच सुखाचे दिवस यावेत. हे करताना त्यांनी पक्षीय किंवा इतर कुठलाही विचार गौण मानला. शेतकरी सुखी तर जग सुखी हा मंत्र डोळ्यांपुढे ठेवला. त्यावेळी शेतकऱ्यांचे अनेक मार्गांनी शोषण होत असे. शेतमालाला भाव, वेळेवर पाणीपुरवठा, सुधारित बी-बियाणे, सरकारी अनुदान या बाबतीत दुर्लक्ष होत असे. शंकररावांनी ही गोष्ट जाणून शेतकऱ्यांना संघटित करायचे ठरविले. त्या काळी आजच्यासारखी शेतकरी संघटना नव्हती. म्हणून त्यांनी शेतकरी संघटना स्थापन करण्याचे ठरवले. त्या दिशेने पहिला प्रयत्न निमगाव (मगराचे) या ठिकाणी १९७८ साली करण्यात आला. शेतकऱ्यांच्या कल्याणाचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून शेतकरी संघटनेच्या पहिल्या शाखेचे उद्घाघाटन करायचे निश्चित केले. निमगाव (म.) शाखेचे अध्यक्ष म्हणून तरूण शेतकरी गोरख विठोबा मगर यांची निवड केली. आपल्या उदङाटनपर भाषणात शंकरराव म्हणाले, “ही केवळ सुरुवात आहे. यापुढे आपण गावोगावचे शेतकरी संघटित करून राज्यभर मोठा लढा उभारायचा आहे. शाखांची व्याप्ती महाराष्ट्रभर वाढवायची आहे. राज्यभर लढा उभारायचा आहे आणि शेतकऱ्यांचे प्रश्न वेशीवर मांडायचे आहेत. गरज पडली तर शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आपण सरकारविरोधात मोर्चे, रास्ता रोको आंदोलने व सनदशीर मार्गाने संघर्ष करायचा आहे. शेतकऱ्यांच्या आयुष्यात औताला फार महत्त्व आहे. औताला असलेले ‘रूमणे’ हे शेतकऱ्यांच्या हातात असते. रूमण्याला धरून आपण शेतीची मशागत करतो. हे रूमणे आपण हातात घेणार आहोत. आपल्या लढ्यातले ते एक शस्त्र असणार आहे. सरकारला जाग आणण्यासाठी आपण रूमणे मोर्चा काढणार आहोत. यावेळी मी सर्व शेतकऱ्यांना

आवाहन करतो की, त्यांनी या शेतकरी संघटनेच्या लढ्यात तन-मनाने सामील व्हावे.”

## राजस्तरीय कृषि व औद्योगिक प्रदर्शनाचे भव्य आयोजन

‘जे जे आपणाशी ठावे ते ते इतरांशी सांगावे, शहाणे करून सोडावे सकल जन’ या आशयाप्रमाणे शंकररावांना जपानचे प्रदर्शन पाहिल्यापासून देशातील लोकांना नवी दृष्टी देऊन त्यांची प्रगती होण्याकामी काहीतरी भव्यदिव्य प्रदर्शनाचे आयोजन करावे असे मनोमन वाटू लागले. त्यासाठी ते अस्वस्थ झाले. आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा व विचारविनिमय करून त्यांनी अकलूजला कृषी औद्योगिक प्रदर्शनाचे आयोजन करण्याचा निर्धार जाहीर केला व ते तयारीला लागले. कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना नवी दृष्टी देणे सोपे आहे. यावर त्यांचा दृढविश्वास होता. एखादी ऐकलेली गोष्ट माणूस विसरून जाऊ शकतो; पण प्रत्यक्ष पाहिल्यावर सहजासहजी विसरले जात नाही हे त्यांना पक्के ठाऊक होते. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना प्रगत जगातील नवनवीन गोष्टी पाहावयास मिळाल्या पाहिजेत. त्याशिवाय तो जगाशी स्पर्धा करण्यासाठी सिद्ध होणार नाही, ही त्यांची भूमिका होती.

हजारो वर्षांपासून आपण पारंपारिक पद्धतीने जी शेती करत आहोत त्यात बदल केलाच पाहिजे. या देशातील शेतकऱ्यांनी आधुनिकतेची कास धरायलाच हवी शेतीची नवी तंत्रे आत्मसात करायला हवीत. कमी श्रमात अधिक उत्पादन घेण्याची त्यांची क्षमता विकसित झाली पाहिजे. कमी क्षेत्रातही मोठे उत्पन्न घेता आले पाहिजे. नवनवीन अवजारे, यंत्रे यांचा शेतीच्या कामी उपयोग करायला हवा. सुधारित बी-बियाणे, बीज प्रक्रिया, कीडनाशकांचा योग्य वापर, आधुनिक लागवड पद्धती, मशागत व आंतरमशागतीची आधुनिक साधने यांची माहिती होऊन विविध रासायनिक खते व जमिनीतील सूक्ष्म अन्नद्रव्यांची उणीव भरून काढून पिकांची जोमदार वाढ करण्यासाठी भूमिपुत्र सिद्ध व्हायलाच पाहिजे.

यासाठी कृषी औद्योगिक प्रदर्शनाचे आयोजन करायचा त्यांनी निश्चय केला.

मनोरंजनातून महिलांच्या विविध प्रश्नांना हात घालता येणे शक्य होते. समाजातील अनिष्ट रूढी - परंपरांना तिलांजली देऊन नव्या युगातील सुधारलेला ग्रामीण भारत त्यांना पाहायचा होता. कृषी औद्योगिक प्रदर्शनाच्या माध्यमातून अनेक मूलभूत गोष्टी साध्य करणे सहजशक्य आहे हे त्यांनी ओळखले होते. अकलूजच्या दक्षिणेला पर्वतीच्या बोडक्या टेकडीवर एक शंभू महादेवाचे देऊळ होते. तिथे भरदिवसा मंदिरात दिवा लावायला जाण्यासही लोक कचरत होते. त्या मंदिराचा साहेबांनी जीर्णोद्धार केला. त्या टेकडीवर एक मंदिर उभारले. चोहोंकडून उंच बांधकाम करून घेतले. किल्ल्याप्रमाणेच प्रवेशद्वार केले आणि बाहेरून पाहताक्षणी दिसेल असा 'शिवरायांचा अश्वारूढ' पुतळा बसविला. प्रवेशद्वारावर कारंजी बसविली. निवांत बसण्यासाठी एका बाजूला एक पॅगोडा तयार केला. चारही बाजूंनी विविध प्रकारची असंख्य झाडे लावली आणि उघड्याबोडक्या टेकडीचे रूपांतर एका आकर्षक पर्यटनस्थळात करून टाकले. एखादी गोष्ट मनात आणली की, ती सिद्धीस जाण्यासाठी चक्रे त्यांच्या डोक्यात लगेच फिरत आणि त्या कल्पनांना मूर्त स्वरूप येण्यासाठी ते तहानभूक विसरून कामाला लागत. 'भान ठेवून योजना आखायच्या आणि बेभान होऊन अमलात आणायच्या' असा सपाटा त्यांनी लावला होता. दर महाशिवरात्रीला आता याच पर्वतीच्या परिसरात यात्रा भरू लागली होती. आजूबाजूचे अनेक लोक दर्शनासाठी रांगा लावू लागले होते. माणासांच्या गर्दीने हा परिसर यात्रेत फुलत होता. याच पर्वतीच्यासमोर एक विस्तीर्ण पटांगण आहे. तिथे प्रदर्शनाचे आयोजन करण्याची कल्पना त्यांच्या डोक्यात आली आणि ते कामाला लागले.

मार्च १९७१ च्या पहिल्या आठवड्यात महाशिवरात्रीनिमित्त सहा दिवसांचे कृषी औद्योगिक प्रदर्शन आयोजित करण्यात आले. याकामी

श्रीपूर व माळीनगरच्या कारखान्यांनीही सहकार्य केले. अनेक संशोधक व्यक्ती, संस्था, विविध कृषी व औद्योगिक यंत्रांचे उत्पादन घेणाऱ्या संस्था, बीजनिर्मिती करणाऱ्या कंपन्या, मनोरंजनात्मक खेळासाठी भव्य पाळणे व इतर खेळणीवाले या साऱ्यांच्या शोधात माणसे पाठविली गेली. सर्वांनीच येथे सहभागी होण्यास होकार दिला. नियोजन झाले. प्रदर्शनाचा नकाशा तयार केला गेला. अंतर्गत मार्ग, पार्किंगची सोय, मेवामिठाईची दुकाने, खेळण्यांसाठीच्या जागा आणि प्रदर्शनाचा मुख्य गाभा असणारे प्रमुख उद्योग, यंत्रे, अवजारे यांचे स्टॉल्स सोबतच जास्त दूध देणाऱ्या संकरित गायी-म्हशी, शेळ्या व जातिवंत खिलार बैल, देशी पाळीव प्राणी यांच्यासाठीही स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली. मुख्य प्रवेशद्वारावर एका बाजूला लाकडी नांगराने पारंपरिक शेती करणारा व प्रगतीची झेप न घेऊ शकलेला तर त्याच्या विरूद्द बाजूला ट्रॅक्टरच्या साहाय्याने शेतीची मशागत करणारा व क्रांतीसाठी सिद्ध झालेला शेतकरी असे तफावत दाखविणारे चित्र सर्वांचेच लक्ष वेधून घेत होते. संपूर्ण तयारी झाली. त्यांच्या कल्पनेतील एक एक गोष्ट त्यांनी करवून घेतली. उद्याच्या भावी शेतकऱ्यांच्या पंखात नवे बळ निर्माण करण्यासाठीच हा सारा आटापिटा त्यांनी केला होता. त्यावेळचे सहकारमंत्री यशवंतराव मोहिते यांनी आपल्या सहचारिणीसमवेत या भव्यदिव्य कृषी औद्योगिक प्रदर्शनाचे उद्घाटन केले.

प्रदर्शनाची जाहिरात सगळीकडे झालीच होती. पहिल्या दिवशी ज्यांनी ज्यांनी प्रदर्शन पाहिलं त्या प्रत्येकाने दाही दिशांना याबद्दल भरभरून सांगायला सुरुवात केली अन् दुसऱ्या दिवसापासून हजारोंच्या संख्येने जनसागर प्रदर्शन पाहण्यासाठी लोटू लागला. पायी, सायकलवर, मोटारसायकल, बैलगाड्या जुंपून, ट्रॅक्टर, ट्रक मिळेल त्या वाहनाने शेतकरी आपल्या कुटुंबासह प्रदर्शन पाहण्यासाठी येऊ लागले. त्यांनी आपापल्या आप्तस्वकीय, मित्र परिवाराला भरभरून सांगितलं आणि सोलापूर जिल्ह्यासह सांगली, सातारा, पुणे नगर या जिल्ह्यांतील

अनेक शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाला भेट दिली. शेतकरी इथं प्रत्येक गोष्ट जाणीवपूर्वक पाहू लागला. त्यातून नवनवीन गोष्टी करून पाहायला शेतकरी राजी झाला होता. परंपरा भेदण्यासाठी त्याच्या मनाची मशागत झाली होती. त्याच्या कुटुंबातील प्रत्येक सदस्य नवी स्फूर्ती घेऊन परतत होता. हे प्रदर्शन शंकररावांच्या कल्पनेपेक्षा कितीतरी अधिक पटीने यशस्वी झाले होते. शेतकऱ्यांचा भरभरून प्रतिसाद मिळाला होता. त्याबद्दलच्या प्रतिक्रिया त्यांना मिळाल्या होत्या. इथून पुढे अशाच स्वरूपाची प्रदर्शने पुनःपुन्हा भरविण्यासाठीचा पाया त्यांनी रचला.

शेतकऱ्यांचा आपल्या जीवनात नवी पहाट उगवल्यासारखे वाटत होते आणि शंकरराव अतंर्मनातून सुखावले होते.

## दुसरे भव्य कृषी प्रदर्शन व कुस्त्याचा आखाडा

एक्स्पो-७० हे जपानमधील कृषी औद्योगिक प्रदर्षन पाहिल्यापासूनच शंकररावांनी नवनवीन संकल्पना व प्रकल्प राबविण्यास प्रचंड गती घेतली होती. जपान दौऱ्यानंतर १९७१ मध्ये भव्य कृषी औद्योगिक प्रदर्शनाचं आयोजनही केलं होतं.

पुन्हा नव्याने भव्य कृषी औद्योगिक प्रदर्शन भरविण्याचं त्यांनी निश्चित केले. महाशिवरात्रीच्या मुहूर्तावर २ ते १३ मार्च १९७५ या काळात प्रदर्शनाचं आयोजन झालं. महात्मा फुले कृषी विद्यापीठाबरोबरच इतर अनेक कंपन्यांनी या प्रदर्शनात सहभाग घेतला. प्रदर्शनाचे उद्घाटक होते मुख्यमंत्री वसंतराव नाईक.

उद्घाटनाच्या चार-दोन दिवस आधीच वसंतराव नाईकांनी मुख्यमंत्रिपदाची सूत्रे खाली ठेवली. परंतु ठरल्याप्रमाणे ते उद्घाटनाला आले. आपल्या उद्घाटनाच्या भाषणात नाईकसाहेब म्हणाले, “मी शंकररावांना सांगितलं की, मी आता मुखंयमंत्री नाही तरी येऊ म्हणता?” त्यावेळी त्यांनी मला खूप छान उत्तर दिलं. हा तुमचा नेता मला म्हणाला,

“साहेब, मी मुख्यमंत्र्यांना बोलावलं नव्हतं. मी वसंतराव नाईकांना बोलावलं होतं. त्यातल्या ‘शेतकऱ्याला’ बोलावलं होतं.” नाईकसाहेबांच्या नंतर शंकरराव भाषणाला उठले आणि म्हणाले, “मी उगवत्या सूर्याला नमस्कार करणारा माणूस नाही नाईकसाहेब! कारण त्याचं कर्तृत्व अजून सिद्ध झालेलं नाही. मी मावळत्या सूर्याला नमस्कार करतो; कारण त्याचा कार्यकाल सिद्धीला गेलेला असतो. त्याचं कार्य जगापुढं आलेलं असतं त्यानं आपल्या कारकीर्दीत जगाला प्रकाशमान केलेलं असतं. म्हणून कृतज्ञतेनं मावळत्या सूर्याला नमस्कार करणारा मी आहे!”

प्रदर्शन सगळ्यांसाठी खुले झाले. त्यात शेतकऱ्यांना प्रेरणा देतील अशा कित्येक गोष्टी होत्या. नवनवीन यंत्रे, अवजारे, शेती पंप, पिकांचे नवीन संकरित वाण, संकरित गायी अशी दोनशे दालने उभारली होती. ज्ञानाचे भांडारच शेतकऱ्यांसाठी खुले केले होते. आषाढीला पंढरीत जशी वारकऱ्याची झुंबड उडते तद्वत या प्रदर्शनासाठी जिल्हा व जिल्हाबाहेरील पाच-सहा लाख लोकांची झुंबड उडाली. आपल्या पदरात उत्कर्षाचे नवे माप घेऊन शेतकरी परतत होते.

वसंतदादा पाटील यांच्या उपस्थितीत ९ मार्च १९७५ रोजी भव्य शेतकरी मळावा पार पडला. पिके व पशू प्रदर्शनात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला. १२ मार्च १९६५ रोजी केंद्रीय मंत्री आण्णासाहेब शिंदे यांच्या हस्ते भव्य कुस्ती आखाड्याचे उद्घाटन झाले. प्रदर्शनातील लोकांचं प्रबोधन व्हावं हा मुख्य हेतू होताच, पण मनोरंजनाचीही साधनं होती. जाएंट व्हील  व छोटी रेल्वे सर्वांचंच आकर्षण ठरत होती. प्रमुख पाहुण्यांनीही त्याचा आनंद लुटला.

केंद्रीय मंत्री व ज्येष्ट नेते यशवंतराव चव्हाण यांच्या उपस्थितीत या प्रदर्शनाची सांगता झाली. यशवंतरावांनी शंकररावांचं सामर्थ्य यापूर्वीच जाणलं होतं. हा परिसर व सुनियोजित प्रदर्शन पाहून ते भारावून गेले. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत शंकरराव करीत असलेल्या कार्याबद्दल यशवंतरावंनी समाधान व्यक्त केले.

## सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन

सामुदायिक दारिद्याचा व मागासलेपणाचा चिकित्सकपणे शोध घेऊन त्यावर उपाय शोधण्याचे व गोरगरिबांना नवी प्रकाशवाट दाखविण्याचे जणू शंकररावांना वेडच लागले होते. त्यांच्या पाटीलवाड्याच्या सभोवताली लोहार, कुंभार, सुतार. कासार, न्हावी, आदी समाजाचे लोक अजूनही राहतात, त्या सर्व बलुतेदारांबद्दल त्यांना कळवळा वाटत असे. ते त्यांच्या हाकेला धावून जायचे. सुखदुःखात सहभागी व्हायचे.

लग्नाकार्यावर गोरगरीब लोक ऐपत नसताना कर्ज काढून खर्च करायचे व पुन्हा सावकराचे व्याज फेडता फेडता नाकीनऊ यायचे, ही गोष्ट त्यांच्या नजरेतून सुटू शकली नाही.

१९७६ च्या मे महिन्यात शंकररावांनी लोहार समाजातील वधूवरांचा सामुदायिक विवाह सोहळा आयोजित केला. तो यशस्वी होण्यासाठी स्वतः पदरमोड केली. यावेळी मोतीराम थोरात यांनी परिश्रम घेतले. सहकाराच्या माध्यमातून समृद्धी निर्माण केलेल्या शंकररावांचा हा उपक्रम महाराष्ट्रभर गाजला. नवनिर्मितीचा ध्यास घेतलेल्या साहेबांची दूरदृष्टीच यातून प्रतीत होते. पुढे महाराष्ट्र शासनाने समुदायिक विवाहास प्रोत्साहन देण्याचे व त्यासाठी भरघोस अनुदान देण्याचे धोरण राबविले ते आजही सुरू आहे.

## जिल्हा देखरेख संघाचे संकल्पक

१९६३ साली भू-विकास बँकेचे व १९६५ मध्ये सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे शंकरराव चेअरमन झाले होते. तेव्हापासून त्यांना या व्यवस्थेतील अनेक बारकावे लक्षात आले होते. त्यांनी जिल्हाभर विकास सोसायट्या उभ्या केल्या. त्या माध्यमातून विकासाला गती मिळू लागली. सोसायट्यांचे सचिव हे बँक व जनता यातील महत्त्वाचे दुवे होते. त्या

सचिवांचे अनेक प्रश्न प्रलंबित होते. त्यांचे पगार, फंड, सुट्ट्या, सेवाकपाती यासारख्या अनेक गोष्टींसाठी जिल्हा केडर स्थापन करावा हे त्यांना जाणवलं.

त्यांनी सहकारमंत्री यशवंतराव मोहिते यांची भेट घेऊन केडर स्थापण्यामागची भूमिका सांगितली. त्यातूनच सेक्रेटरींचे प्रश्न मार्गी लागतील व त्यांच्यावर शासनाचे नियंत्रण राहून सर्व संस्था शासनाशी निगडित होतील हे पटवून दिले. यशवंतरावांनी लगेच तात्यासाहेब कोरे यांच्या अध्यक्षतेखाली कोरे समितीची स्थापना केली. त्यात शंकरराव अग्रभागी होतेच.

समितीने अभ्यासाअंती एक योजना आखली. ९ जुलै १९७७ रोजी या योजनेचा शुभारंभ अकलूजपासून झाला. महाराष्ट्रातील पहिले केडर सोलापूर जिल्ह्यासाठी सुरु झाले आणि पुढे महाराष्ट्रभर ही संकल्पना रूजली.

## सहकारी पाणी उपसासिंचन संस्थेची सुरुवात

नीरेकाठी त्यांची स्वतःची शेती होतीच, पण हुकमी पाणी नव्हतं. पायथ्यालाच नीरेच्या पात्रात पाणीच पाणी आणि तिच्या काठावरची काळी कसदार जमीन मात्र कोरडवाहू, पावसाच्या पाण्यावरच पिके येणार, क्वचित विहिरी होत्या. साहेबांच्या डोक्यात एक कल्पना चमकून गेली. नीरा नदीतील पाणी साऱ्या शेतकऱ्यांची एकजूट करून बाहेर आणायचं आणि बागायत शेती वाढवायची उसासारख्या पिकाला महिना-चार महिने पाणी मिळून उपयोग नसतो. त्यासाठी बारमाही पाण्याची गरज असते. शिवाय उसाचे क्षेत्र वाढणे हे शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी आवश्यकच होते.

अकलूजच्या पश्चिमेला आनंदनगर परिसरातील लहान-मोठे म्हणजेच एकर दोन एकरापासून दहा-वीस एकर क्षेत्र असलेले शेतकरी गोळा केले. त्यांना सर्वांना एकत्र करून उपसा सिंचन योजनेची माहिती दिली. साहेबांचा शब्द खाली पडू न देण्याची सारेच काळजी घेत होते.

कारण त्यातच आपले कल्याण आहे हे ते जाणून होते. उपसासिंचन योजना कार्यान्वित झाली आणि सुमारे चारशे एकर कोरडवाहू जमिनीचे रूपांतर ऊस पीक पिकविणाऱ्या बागायतीत झाले.

ऊस पिकविणारा शेतकरी म्हणजे प्रतिष्ठित बागायतदार म्हणून उभा राहिला. स्वप्नातदेखील न आलेली गोष्ट शंकररावांनी प्रत्यक्षात करून दाखविल्याने शेतकरी खुशीत होते. हे सर्व सहकारी पाणी उपसासिंचन संस्थेच्या माध्यमातून केले.

## शेतकरी सहकारी बँकेची सुरुवात

या परिसरात सर्वांगाने समृद्धी उभी राहत होती. अकलूज केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर साऱ्या देशात एक मॉडेल म्हणून उभं राहत होतं. ते साकारण्यात शंकररावांचा सिंहाचा वाटा होता. हळूहळू अकलूजच्या विकासाची प्रसिद्धी सगळीकडे होत होती. अनेकजणांची अकलूजला भेट देण्यास सुरुवात झाली होती. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील अभ्यासक, मंत्री, शास्त्रज्ञ, प्राध्यापक, समाजसेवक, पर्यटक अकलूज पाहण्यासाठी येऊ लागले. प्रेरणा आणि स्फूर्ती घेऊन जाऊ लागले. भारताचे माजी सरन्यायाधीश स्व. यशवंतराव चंद्रचूड यांनीही शंकररावांच्या अकलूजला भेट दिली.

लोकांच्या हातात पैसा खेळू लागला होता. तो पैसा विधायक कामाला व लोकांच्याच विकासासाठी उपयोदी यावा अशी त्यांची इच्छा होती. शेतकरी सहकारी बँकेची कल्पना त्यांच्या मनात आली. सर्वांनी थोडी थोडी बचत केल्यास जो पैसा जमा होईल तो गरजूंना अल्प व्याजदराने कर्जाऊ देणे व आणखी विकास साधणे शक्य होते. त्यासाठी २८ फेब्रुवारी १९७६ रोजी शेतकरी सहकारी बँकेची सुरुवात केली. उद्योगधंद्यांच्या भरभराटीसाठी एक नवा आर्थिक स्त्रोत सुरु झाला होता.

# धवल क्रांती

शिखर गाठल्यावर तिथं थांबायचं नसतं, नवीन शिखरे धुंडाळायची असतात, पण शिखरावर थांबणे म्हणजे अधोगतीचा प्रारंभ असतो याची जाण साहेबांना होती. कोणत्याही गोष्टीत केवळा काठावर उभं राहून कसातरी अनुभव घ्यायचा हे त्यांच्या वृत्तीत नव्हते, तर प्रत्येक गोष्टीच्या थेट बुडाशी जायचं. परिणामाची भीती बाळगायची नाही. एक काम संपलं की तिथं थांबायचं नाही. दुसरं कामही तितक्याच उत्कंठतेने हाती घ्यायचं या स्वभाववैशिष्ट्यामुळे त्यांनी कधीही मागे वळून पाहिलं नाही. शेतकऱ्याला शेती उत्पन्नाबरोबर इतरही उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करायला पाहिजेत असे विचार शंकररावांच्या मनात घोळू लागले. गहू-ज्वारी यासारखी हंगामी पिके व उसासारखी नगदी पिके शेतकरी घेत होते. त्यातून जे उत्पन्न मिळत होते ते शेतकऱ्यांच्या हातात पडायला काही महिने उलटावे लागत होते. तोपर्यंत त्याला येणाऱ्या पैशांची एक तर वाट पाहत बसावे लागे. अन्यथा उसनवारी आणि सावकाराकडून वारेमाप व्याजाने पैसे घेणे याला पर्याय नव्हता. दर दहा-पंधरा दिवसांनी शेतकऱ्याच्या हातात चार पैसे पडले तर त्याचा संसार आणखी नेटाने चालणार होता याची त्यांना जाणीव होती. परंपरेनं शेतकरी जनावरे पाळत होता. पण शेतीच्या मशागतीसाठी, शेणखतासाठी व घरगुती दुधासाठी एवढाच त्यांचा उपयोग होता. अधिक दूध देणाऱ्या संकरित गायी शेतकऱ्याने पाळल्या तर दूध धंद्याला चांगला काळ येईल असा त्यांना आत्मविश्वास होता.

## संकरित गो-पैदास केंद्राची स्थापना

अशा प्रकारचा एक प्रयोग पद्मश्री मणिभाई देसाई यांनी पुण्याजवळ उरळी कांचनला केला होता. तो त्यांनी स्वतः जाऊन पाहिला, चर्चा केली. पण तिथल्यापेक्षा वेगळ्या पद्धतीने माळशिरस तालुक्यात

राबवण्याचा निर्णय घेतला. आपल्या सहकाऱ्यांना बरोबर घेऊन शंकरराव बंगलोरला गेले. त्या अगोदरही त्यांनी या गायींचा अभ्यास केला होता. बंगलोरहून आठ संकरित गायी त्यांनी आणल्या. सुसज्ज गोठ्यामध्ये त्यांची चांगली व्यवस्था केली. प्रत्येक शेतकऱ्याच्या दारात अधिक दूध देणारी ही संकरित गाय असायला हवी, असा शंकररावांनी निश्चय केला. संकरित गायींची पैदास इथेच केली तर भविष्यात होणाऱ्या गायींची रोगप्रतिकार क्षमता आपोआपच वाढलेली असेल. इथल्या हवामानात इथेच पैदास झालेल्या गायी तग धरतील, त्यांच्यावर औषधोपचारासाठी जास्त खर्च येणार नाही असे आडाखे त्यांनी बांधले.

इथल्या देशी गायींना कृत्रिम रेतन करून टप्प्याटप्प्याने या संकरित गायींची संख्या वाढवत न्यायची असे नियोजन झाले. पशुवैद्य डॉ. हातोळकर यांच्याशी अनेक बारीकसारीक मुद्दयांवर त्यांनी चर्चा केली. अनेक अनुकूल-प्रतिकूल बाबींचा आढाव घेतला. कारखान्याच्या जवळच संकरित गो-पैदास केंद्राची स्थापना केली. काही काळातच एक नवा अध्याय सुरू होणार होता.

## संकरित गोपालन व दुग्धव्यवसायाचा प्रचार आणि प्रसार

प्रत्येक क्रांतीला प्रथम नेता लागतो. त्या नेत्यानं लोकांच्या मनात शिरून त्यांची मनं जिंकावी लागतात. प्रजेची मनोभूमी तयार करावी लागते. म्हणूनच क्रांतीसाठी प्रथम जनजागृती करण्याची गरज असते. शंकररावांना ग्रामीण भागातील सर्वच स्तरातील लोकांना आर्थिकदृष्ट्या समृद्ध करायचे होते, स्वयंपूर्ण बनवायचे होते. त्यासाठीच्या धवल क्रांतीसाठी निरनिराळ्या कल्पना त्यांच्या डोक्यात पिंगा घालत असत. एखादी कल्पना पटली की, लगेच तिच्या अनुकूल - प्रतिकूल बाबींचा आढावा घेऊन गणित मांडण्यात ते गर्क असायचे. एकदा निर्णय पक्का झाला की, मग तहानभूक हरपून, झोकून देऊन ते त्या कामासाठी तन-मन-धन अर्पण करायचे. शहरे व महानगरे यामध्ये राहणाऱ्या लोकांना

दूध, अंडी, फळे, भाजीपाला या जीवनावश्यक गोष्टी होत्या. त्याचा पुरवठा केला तर मोठ्या प्रमाणात फायदा मिळणार होता याबाबतची जनजागृती शंकररावांनी केली.

दुधाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात करणे शक्य होते. त्यासाठी लोकांची मानसिकता तयार करणे आवश्यक होते. साहेबांनी एखादी कल्पना मांडली की, त्यावर टीका करणारे कपाळकरंटेही होतेच. आदळआपट करून साहेबांचा प्रयत्न अयशस्वी करण्यासाठी ते धडपडायचे. रामायण-महाभारतापासून अशी माणसं समाजात होत आली आहेत व पुढेही होत राहणार तेव्हा अशांकडे दुर्लक्ष करणंच चांगलं या विचाराने ते त्याकडे कानाडोळा करीत.

संकरित गो-पैदास केंद्र त्यांनी सुरू केलंच होतं; परंतु ज्या अपेक्षित गतीने प्रचार व प्रसार व्हायला हवा होता तेवढी गती मिळाली नव्हती. आता शंकररावांनी यात झोकून देऊन काम करायचे ठरविले आणि एक नवाच प्रयोग सुरू केला. तालुक्यातील पिलीव, नातेपुते, तांदूळवाड, वेळापूर यासारख्या मोठ्या गावांबरोबरच छोट्या छोट्या गावांमध्ये आठवडे बाजाराच्या दिवशी त्यांनी ट्रकमधून ह्या गायी न्यायला सुरुवात केली. साहेब गावात आले म्हटलं की तुडुंब गर्दी व्हायची. ‘पाळाल जर्सी तर जीवनात सरशी’, ‘ज्याच्या घरी जर्सी गाय त्याच्या घरी लक्ष्मीचे पाय’, ‘शेतात खत, घरात ऐपत व बाजारात पत’ असे फलक रंगविलेले होते. आता साहेब कोणतीतरी नवी योजना घेऊन आले आहेत हे लोकांनी ओळखले.

साहेबांची सभा सुरू होई. रूबाबदार पोषाख आणि लोकांच्या अंतर्मनाचा ठाव घेणाऱ्या आवाजात साहेब बोलू लागले की सारेचजण कानात प्राण आणून त्यांचा प्रत्येक शब्द ऐकू लागत.

संकरित गायीची पैदास कशी होते ती दिवसाकाठी वीस लीटर दूध कशी देते, तिचं संगोपण कसं करावं, दूध संस्था तुम्ही उत्पादित केलेलं दूध कसं संकलित करेल, गायीला आजार झाल्यास त्यावर उपचार कसे

होतील, अशा अनेक मुद्दयांवर साहेब इत्थंभूत माहिती देत. दुधाचा धंदा स्वतःच केल्यामुळे व त्याचा काटेकोर हिशेब ठेवल्यामुळे ते अधिकारवाणीने बोलत. त्यामुळे लोकांना त्यांचं म्हणणं पटत असे.

गायीपासून वर्षाचं सरासरी दूध उत्पादन, मिळणारं शेणखत व वासरे, त्यासाठी येणारा खर्च, मिळणारा निव्वळ नफा या साऱ्या गोष्टी ते गावोगावी सभा घेऊन पटवून देऊ लागले. बरोबरच एका ट्रकमध्ये संकरित गाय ते घेऊन यायचे व जमलेल्या सर्वांसमक्ष ते त्या गायीची धार काढून ती दहा लीटरहून अधिक दूध देते हे दाखवून देत. त्यामुळे लोकांना त्यांची संकल्पना पटू लागली.

ते सांगत, एका गायीच्या दुधापासून मामलेदाराएवढा पगार, दोन गायींपासून प्रांतसाबेहाएवढा तर तीन गायींपासून कलेक्टरएवढा पगार. आता सांगा, तुम्हाला मामलेदार व्हायचं? का प्रांत व्हायचं? का कलेक्टर? साहेबांच्या या वाक्यांनी सारे श्रोते प्रभावित व्हायचे. त्यांच्या मनात आता संकरित गाय पाळण्याच्या कल्पना घर करू लागल्या.

खेडोपाडी जाऊन साहेबांनी प्रोजेक्टरच्या मदतीने ‘संकरित गायीचा सिनेमा’ दाखवायला सुरुवात केली. लोकांना तो पाहायला आवडू लागला आणि संकरित गायींची संख्या झपाट्याने वाढू लागली. काही गावात तर घरटी गाय ही योजना सुरू झाली. तांदूळवाडी व पुरंदावडे ही गावं दत्तक योजनेत आघाडीवर होती. लोकांना बँकोमार्फत कर्ज मिळवून दिलं. शेकडो गोबरगॅस संयंत्रे सुरू झाली. लोकांना बँकेमार्फत कर्ज मिळवून दिलं. अपारंपारिक ऊर्जा निर्माण होऊन पर्यावरण संवर्धनासाठी साहेबांनी कंबर कसली होती. मायभगिनींची चुलीच्या धुरापासून सुटका होऊ लागली होती. शेतीला उत्तम खत मिळू लागले होते. दुसरीकडे विविध ठिकाणी दूध संकलन केंद्रावर दूध गोळा होऊ लागले होते. आता कुठे दररोज एक हजार लीटर दूध पुण्याच्या शासकीय दूध योजनेला पुरविले जाऊ लागले होते.

साहेबांच्या मनात ‘दूधाचा महापूर’ ही संकल्पना मूळ धरू लागली. त्यातूनच उभ्या महाराष्ट्रातील प्रत्येक ग्रामीण शेतकरी, शेतकरी, शेतमजूर व बलुतेदार यांच्या जीवनात नवा प्रकाश येणार होता.

## दुधाचा डेस्क प्लँट

शंकररावांनी दुग्ध व्यवसायाच्या वृद्धीसाठी अविरत मेहनत घेतली होती. लोकांना संकरित गायीचे महत्त्व पटले होते. अनेकजण या गायी खरेदी करून दूध उत्पादनासाठी प्रेरित झाले होते. गायींची संख्या झपाट्याने वाढू लागली आणि दुधाचे संकलन एक हजार लीटरवरून पाच हजार लीटरपर्यंत झपाट्याने गेले. निर्जंतुक दूध ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पाच हजार लीटर क्षमतेचा डेस्को प्लँट राजहंस पोल्ट्रीच्या शेजारीच सुरू केला. बंगलोरहून गायींचे लॉट आणले गेले. कारखान्यातील कामगारांना गायींचे संगोपन करणे सुलभ व्हावे यासाठी सामुदायिक गोठ्यांची नवीन संकल्पना राबविली. ठिकठिकाणी पशुसेवा केंद्रे सुरू केली. पशुवैद्य शेतकऱ्यांच्या घरोघरी जाऊन औषधोपचार करू लागले. दुधाचं संकलन दिवसागणिक वाढू लागलं.

याच दरम्यान राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. हरिश्चंद्र पाटील यांनी अकलूज परिसराला भेट दिली. शंकररावांचे शेतकऱ्यांसाठीचे अभिनव प्रयोग पाहून ते भारावून गेले. “आम्ही व आमच्या कृषी विद्यापीठातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी धडे घ्यावेत असे उपक्रम शंकररावांनी या परिसरात राबविले आहेत. खरं म्हणजे शंकरराव मोहिते-पाटील हे एक चालतंबोलतं कृषी विद्यापीठच आहे” असे ते त्यावेळी म्हणाले.

## शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ

दूध धंद्यातील फायदा शंकररावांच्या लक्षात फार पूर्वीच आला होता. संकरित गायीचे महत्त्वही ओळखलं होतं. त्यासाठी १९७१ सालीच

संकरित गो-पैदास केंद्राची सुरुवात केली होती. या गायींचा प्रचार व प्रसार करण्यासाठी त्यांनी अविरत मेहनत घेतली होती. एक हजार लीटरवर सुरू झालेले दूध संकलन झपाट्याने वाढू लागले होते. १९७४ साली ते पाच हजारांवर जाऊ पाहत होतं. त्यासाठी त्यांनी त्याच वर्षी प्लँट सुरू केला. निर्जंतुक दूध. शासकीय डेअरीला देण्यासाठी हा प्रयोग होता. पुढे दूध संकलनात मोठी वाढ सुरू झाली. त्यांनी सर्व बाबींचा आढावा घेतला आणि धाडस करून महाराष्ट्रातील एकमेव असा तालुकास्तरावरील 'शिवामृत' दूध उत्पादक सहकारी संघ स्थापन केला तो तो दिवस होता २७ जानेवारी १९७६.

सुरुवातीला फक्त पाच दूध उत्पादक संस्थांवर सुरू झालेला हा संघ विस्तारत गेला. पुढेपुढे दूध संकलन संस्थांची भरभराट होऊ लागली. त्या संस्थांच्या माध्यमातून दुधाची गंगा वाहू लागली होती. गावोगावच्या लोकांमध्ये संकरित गायींचे फायदे प्रात्यक्षिकांमधून पुन्हा नव्याने त्यांनी दाखवून दिले. स्वतःच्या शेतातच एक आदर्श गोपालन प्रकल्प उभारून त्याचा अर्थशास्त्रीय दृष्टीने पै न् पै हिशेब त्यांनी ठेवला होता. त्यामुळे 'आधी केले मग सांगितले', या सूत्रामुळे लोकांनी शंकररावांच्या शब्दावर भरवसा ठेवला व दूध उत्पादनासाठी त्यांनी कंबर कसली.

शेतकऱ्यांना घरपोच पशुसेवा मिळू लागली. गाय आजारी पडली किंवा माजावर आली की, दूध संकलन संस्थेच्या नोंदपुस्तकात नोंद केली की, दूध संकलन करणाऱ्या गाडीतून ती नोंद मुख्य केंद्रावर म्हणजे दूध संघावर यायची. विविध विभागांवर पशुवैद्यांची नेमणूक केली. पशुवैद्य दारोदारी जाऊन उपचार करू लागले.

यापूर्वी उरुळी कांचनच्या मणिभाई देसाईंनी शंकररावांना संकरित गायी सांभाळणे जोखमीचे कसे आहे हे सांगितले होते. त्यात प्रामुख्याने गायींची रोगप्रतिकारक शक्ती कमी असल्याने उपचार वेळेवर न मिळण्याचा धोका ही प्रमुख बाब होती. इतरही किरकोळ अडचणी होत्या, पण शंकररावांनी त्या सर्वांवर मात केली आणि शेतकऱ्याला स्वतःच्या

पायावर उभे करण्याचा चंग बांधला. पशूसेवेची ही संकल्पना पुढे 'अकलूज पॅटर्न' म्हणून भारतभर स्वीकारण्यात आली. शेतकऱ्यांचे दूध उत्पादन वाढले. पर्यायाने दूध संघाचे संकलन वाढत राहिले.

दूध उत्पादकांची संख्या फक्त एक्कावन्न होती, ती वास हजारांवर गेली. वार्षिक उलाढाल एक कोटीवरून शंभर कोटींच्या घरात गेली. दूध संकलनाने पाच हजार लीटरवरून दीड लाखांवर उड्डाण केले. एकशेएक कामगार संख्येवरून  सुरू झालेल्या या दूध संघात पुढे दोन हजार कामगारांना रोजगार मिळाला. सुमारे चाळीस हजार लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे लाभ मिळायला सुरुवात झाली. गुजरातमधील आनंद पॅटर्नला अकलूज पॅटर्नने मागे टाकले, आणि 'शिवामृत'ने महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. शंकररावांच्या या कल्पकतेमुळे शेतकऱ्यांच्या घरात लक्ष्मी नांदू लागली.

त्यांचे पुत्र राजसिंह यांनी दूध संघाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. दुधापासून सुगंधी दूध, पेढे, टेबल बटर, श्रीखंड, आम्रखंड, तूप, पनीर, लस्सी, बासुंदी बर्फी इत्यादी उपपदार्थ निर्माण होऊ लागले. आय. एस. ओ. ९००१, आय.एस. ओ. १४००१, एच. ए. सी. टी. व एच. एस. पी. आदी मानांकने मिळविणारा भारतातील 'शिवामृत' हा एकमेव संघ आहे. पुढे पुढे शासनाने निर्धारित केलेल्या दरापेक्षा जादा दर देण्याची किमया उत्कृष्ट व्यवस्थापनाने साधली. शेतकऱ्यांना पशुसेवा, चारा बियाणे, चाफकटर व इतर सुविधा उपलब्ध करून दिल्या.

दारिद्र्याच्या अंधारात सहकाराची मशाल पेटवून समृद्धीचा प्रकाश सर्वदूर पसरला होता. शंकररावांनी दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा व मागासलेपणाविरुद्ध युद्ध पुकारले होते. युद्धाच्या या रणांगणावर ते आपल्या सहकाऱ्यांसह व भूमिपुत्रांसह शत्रूंवर चढाई करीत होते. त्यात यश मिळत होते.

## कला-क्रीडाप्रेमी शंकरराव

अकलूजला मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. इ. स. १२११ साली यादव राजघराण्यातील सिंघन राजांनी येथे नीरेकाठी भुईकोट किल्ला बांधला. या किल्ल्यात दिलेरखानाबरोबर संभाजीराजे १६७९ साली ४ महिने मुक्कामास होते. पुढे मुकर्रबखानाने छत्रपती संभाजीराजांना कैद केल्यावर १६८९ साली औरंगजेबाची छावणी अकलूजलाच होती. संभाजीराजांच्या हत्येनंतर महाराणी येसूबाई व शाहूराजे मुघलांच्या कैदेत सापडले तेव्हा २४ ते २६ डिसेंबर १७०४ हे तीन दिवस त्यांचा मुक्काम येथेच होता. पुढे स्वातंत्र्य चळवळीत क्रांतिसिंह नाना पाटील, वसंतदादा पाटील यांचे अनेक सहकारी भूमिगत असताना येथेच आश्रयास होते.

काळाच्या ओघात या किल्ल्याची दुर्दशा झाली. तटबंदी व अनेक बुरूज ढासळले. किल्ल्यात मोठी झाडे व काटेरी झुडुपे वाढली. अकलूजच्या इतिहासाचा वारसा असणाऱ्या या किल्ल्याची जीर्णोद्धार करण्याचे व अंतर्बाह्य रूप पालटून टाकायचे त्यांनी ठरवले. १४ नोव्हेंबर १९७४ साली त्यांचे चिरंजीव जयसिंह यांची अकलूजच्या सरपंचपदी निवड झाली. त्यांना साहेबांनी किल्ल्याच्या जीर्णोद्धारासंबंधी मार्गदर्शन केले. पिरश्रमपूर्वक त्यांनी या किल्ल्याला नवे रूप दिले. मधल्या बुरूजावर छत्रपती शिवरायांचा भव्य अश्वारूढ पुतळा बसविला. किल्ल्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीला धक्का न लावता, सुंदर असे उद्यान, विद्युत रोषणाई व कारंजे निर्माण केले. पुढे विजयदादांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागामार्फत १६ जून २००८ रोजी भव्य शिवसृष्टी उभारली. आज अकलूज हे एक प्रमुख पर्यटनाचे क्षेत्र म्हणून नावारूपास आले आहे.

## १९७४ चा त्रिशत्सांवत्सरिक शिवराज्याभिषेक सोहळा

छत्रपती शिवराय म्हणजे उभ्या महाराष्ट्राचं स्फूर्तिस्थान. शिवरायांची कीर्ती अनंत काळापर्यंतच्या पिढ्यांना संघर्ष व देशसेवा करण्याचे बळ देणार आहे. शंकररावांचे जे जे प्रेरणास्त्रोत होते त्यामध्ये छत्रपती शिवराय सर्वप्रथम होते. शंकररावांनी शिवजयंतीचे कार्यक्रम मोठ्या उत्साहाने आत्तापर्यंत पार पाडले होते. जनजागृती करण्याचे हे प्रभावी माध्यम होते अशी त्यांची श्रद्धा होती. जून १९७४ मध्ये शिवराज्याभिषेकाला तीनशे वर्ष पूर्ण होणार होती; म्हणून महाराष्ट्र शासनाने अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

साहेबांनी अकलूजमध्ये भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले. गावोगावच्या लोकांना चित्ररथामध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. शिवचरित्रातील एक-एक प्रसंग सादर होऊ लागले. शिवजन्म, स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा, तोरणा किल्ला, अफजलखान वध, शाहिस्तेखानाची फजिती, शिवाजी-संत तुकाराम भेट, गड आला पण सिंह गेला, यासारखे अनेक चित्ररथ सादर झाले. हजारो कलाकारांनी विविध भूमिका सादर केल्या. शेवटचा चित्ररथ होता तो शिवराज्याभिषेक सोहळ्याचा. शिवाजीच्या भूमिकेत राजबिंडे व्यक्तिमत्त्व लाभलेले विजयसिंह होते. तर युवराज संभाजीच्या भूमिकेत प्रतापसिंह होते.

साहेबांचे कित्येक कार्यकर्ते अष्टप्रधान मंडळात सहभागी झाले होते. असंख्य लोक सरदारांच्या वेशात होते. मदनसिहांनी भगवा ध्वज उंच धरला होता. समोर लेझीम, गजी, ढोल, ताशा लाठीहल्ला, तलवारबाजी असे विविध खेळ सादर होत होते. स्त्रिया मराठमोळ्या वेशात मिरवणुकीत सहभागी झाल्या होत्या. शिवरायांना त्या औक्षण करीत होत्या. मिरवणूक सदाशिवराव माने विद्यालयाच्या भव्य प्रांगणात आली. तिथे भव्य रंगमंच साकारला होता. त्या ठिकाणी शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहाने पार पडला. सर्वांनी केलेली 'क्षत्रिय कुलावतंस, राजाधिराज गो-ब्राह्मण प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज की....जय!' ही गर्जना आसमंतात

दुमदुमली... शंकररावांचे मन तीनशे वर्षे मागे गेले. त्यांनी मनोमन शिवरायांच्या स्मृतींना मुजरा केला.

**प्रताप क्रीडा मंडळ**

समाजाच्या विकासाचे यथार्थ मोजमाप केवळ आर्थिक समृद्धी आणून होत नसते. चोहोकडून झालेला सर्वांगीण विकास शंकररावांना अभिप्रेत होता. विविध प्रकारच्या खेळांवर शहरी लोकांचीच मक्तेदारी होती. अनेक कलांचा आस्वाद घेण्यात ग्रामीण भाग मागे होता, ही बाब साहेबांच्या मनाला लागत होती. इथल्या लोकांनी खऱ्या अर्थानं समृद्ध जीवन जगावं अशी त्यांची इच्छा होती. या भागातील तरुणांना विविध उफक्रम राबविण्यासाठी शंकररावांनी १९७६ साली प्रताप क्रीडा मंडळाची स्थापना केली आणि अनेक विधायक अशा सांस्कृतिक व खेळांच्या उपक्रमांची पहाट झाली. त्यांचे कर्तबगार सुपुत्र जयसिंह मोहिते-पाटील यांनी पुढे प्रताप क्रीडा मंडळाची धुरा स्वतःकडे घेऊन राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले. भव्य अशा रौप्यमहोत्सवी क्रीडास्पर्धांचे यशस्वी आयोजन केले. राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा १९८२ साली, तर महाराष्ट्र राज्य महोत्सवी स्पर्धा १९८५ साली यशस्वीरीत्या पार पाडून त्यामध्ये अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांचे व विविध स्पर्धांचे आयोजनही यशस्वीपणे केले. १९९२ साली राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन व खेळांच्या पायाभूत सुविधांचा विकास यामुळेच झाला. शंकररावांनी लावलेले हे रोपटे आज विविध उपक्रमांनी झळाळून निघत आहे.

## महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद व महाराष्ट्र केसरीची निवड

कुस्ती म्हणजे ग्रामीण महाराष्ट्राचा श्वास. रामायण-महाभारतापासून चालत आलेले मर्दानी खेळ. गावोगावी कुस्त्यांसाठी तालमी. त्या तालमींमध्ये मुलांना लहानपणापासूनच कुस्तीचे धडे देण्याचा जुना रिवाज. पहाटे उठून मुलांनी व्यायाम करावा, कुस्ती खेळून नदी किंवा विहिरावर पोहून यावं, दूध प्यावं, मोड आलेली मटकी नाष्टा म्हणून खावी, मग इतर कामांना लागावं हाच रिवाज जुन्या माणसांनी सुरु ठेवला होता. शंकररावांना कुस्तीची भारी हौस. लहानपणात व पुढे तारुण्यातही अनेक कुस्ती मैदानांमध्ये ते कुस्त्या खेळले होते. पुढे पुढे आपल्या गावातील पैलवानांना घेऊन ते गावोगावच्या कुस्त्यांच्या फडावर जायचे. एकदा बैलपोळ्याच्या सुमारास सणसरला त्यांच्या बहिणीच्या गावीच कुस्त्या होत्या. शंकरराव आपले थोरले चिरंजीव विजयदादा व इतर मुलांना घेऊन सणसरला गेले. दादा अगदीच लहान होते ते गोरेपान, नाजूक व दिसायला सुंदर. त्यांच्या गळ्यात सोन्याचा गोफ व कमरेला काळा करदोडा. त्यामुळे लहान विजयदादा खूपच खुलून दिसायचे. बारामतीचे आप्पासाहेब पवार यांनाही कुस्ती व व्यायामाची खूप आवड होती. त्यांनीही अनेक मुलांचा व्यायाम घेतला होता. त्यांचे धाकटे बंधू प्रताप यांचीही कुस्तीची तयारी आप्पासाहेबांनी करून घेतली होती. विजयदादा व प्रतापराव पवारांची कुस्ती लावली गेली. त्यावेळी तयारीने मैदानात उतरलेल्या प्रतापरावांनी विजयदादांना लगेच आस्मान दाखवले.

पुढच्या वर्षी त्याच मैदानावर कुस्त्या होत्या. शंकरराव आपल्या पठ्ठ्यांना घेऊन सणसरला गेले. यावेळी मात्र विजयदादांनी कसून मेहनत घेतली व कुस्तीचा सराव केला होता. पुन्हा एकदा या छोट्या पैलवानांची कुस्ती लावली गेली. यावेळी मात्र विजयदादांनी चांगलीच तयारी केल्यामुळे त्यांनी प्रतापरावांवरच लगेच डाव केला व कुस्ती

मारली. ही आठवण प्रतापराव पवारांनी आपल्या 'वाटचाल' या पुस्तकात खुमासदारपणे नोंदविली आहे.

शंकरराव गावोगावच्या कुस्ती मैदानात हजर राहत. अनेकदा त्यांनी कुस्तीचे पंच म्हणूनही काम केले होते. त्यामुळे पुढे त्यांनी कुस्तीच्या प्रेमाखातर कोल्हापूरच्या खासबाग मैदानाप्रमाणेच पर्वती मंदिराजवळ एक प्रशस्त असे कुस्तीमैदान तयार करून घेतले. हजारो शौकिनांना समोर चाललेल्या कुस्त्या सहज पाहता येतील अशी रचना केली. मध्यभागी गोलाकार लालमातीचा भव्य आखाडा, त्याभोवती पैलवानांना फिरविण्यासाठीचे गोल रिंगण व त्याबाहेर प्रेक्षकांची बैठक व्यवस्था. पूर्वेकडे स्टेज व्यवस्था. दक्षिणेकडे मैदानाचे प्रवेशद्वार, देखणे असे कुस्ती मैदान त्यांनी बांधून तयार केले. सगळीकडे वृक्षारोपण करून भविष्यातील सावलीची सोय केली. केंद्रीय मंत्री अण्णासाहेब शिंदे यांच्या हस्ते १२ मार्च १९७५ रोजी त्या आखाड्याचं उद्घाटन करून कुस्त्यांचा फड भरविण्यात आला होता. हे कुस्तीमैदान कुस्ती शौकिनांचं आकर्षणाचं केंद्र बनलं होतं. 'शिवतीर्थ आखाड' असं नामकरण झालं होतं.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष मामासाहेब मोहोळ हे होते. परिषदेचे अधिवेशन तोंडावर येऊन ठेपलेले असतानाच यजमानपद घेतलेल्या नांदेड जिल्हा तालीम संघाने आयोजन करण्यास असमर्थता दर्शविली. ऐनवेळी परिषदेचे आयोजन करणं म्हणजे एक मोठं आव्हान होतं. मामासाहेब मोहोळ यांना गेल्या वर्षी उद्घाटन झालेलं अकलूजचं मैदान आठवलं, शंकरराव मोहिते-पाटील त्यांच्या डोळ्यांसमोर उभे राहीले. आणि त्यांनी ताबडतोब साहेबांची भेट घेतली.

सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील १९७६ च्या महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे स्वागताध्यक्ष झाले. डिसेंबरमध्ये अधिवेशन होणार असे त्यांनी जाहीर केले आणि साहेब तयारीला लागले. २२ ते २६ डिसेंबर या काळात विविध गटांतील कुस्ती स्पर्धा होणार होत्या. महाराष्ट्रातील २६ जिल्ह्यांतील तालीम संघांचे सदस्य व मल्लांची अकलूजला यात्राच

भरली. साहेबांनी स्वतः सर्वांच्या मुक्काम व भोजनाची उत्तम सोय केली, सहर्ष स्वागत केलं.

२२ डिसेंबर रोजी कुस्तीगीर परिषदेला सुरुवात झाली. सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष विजयसिंह मोहिते-पाटील यांनी आखाड्याचं पूजन केलं. जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष बाबूराव पाटील अनगरकर, मामसाहेब मोहोळ यांच्याबरोबर साहेबांनी उद्घाटनाचे नारळ फोडले.

महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेच्या अधिवेशनात कुस्त्यांना सुरुवात झाली. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून विविध वजनी गटांतून आलेल्या पैलवानांच्या कुस्त्या सुरु झाल्या. सर्व पैलवान आपले कौशल्य, चापल्य व सामर्थ्य पणाला लावून खेळू लागले. 'महाराष्ट्र केसरी' या सर्वात मोठ्या गटात, गादी विभागातून भुईज (सातारा) येथील शिवाजी पाचपुते व माती वाभागातून पुण्याचा हिरामण बनकर हे अव्वल जोडीतील मोहरे अंतिम फेरीत दाखल झाले. 'महाराष्ट्र केसरी' या मानाच्या किताबासाठी दोन्ही मल्ल लढतीसाठी सज्ज झाले. साऱ्या महाराष्ट्रातील कुस्तीप्रमीचे लक्ष अकलूजच्या या लढतीसाठी सज्ज झाले. साऱ्या महाराष्ट्रातील कुस्तीप्रेमींचे लक्ष अकलूजच्या या लढतीवर लागले. दोन्ही मल्लांचे कुस्ती महाराष्ट्राचे अर्थमंत्री यशवंतराव मोहिते व शंकरराव मोहिते-पाटील यांनी लावली.

दोन्ही मल्ल तोडीस तोड होते. पण अटीतटीच्या या लढतीत पुण्याच्या हिरामण बनकरने शिवाजी पाचपुतेवर विजय मिळवला. यशवंतराव मोहितेंच्या हस्ते 'महाराष्ट्र केसरी' हिरामण बनकरला चांदीची गदा, रोख रक्कम बहाल करण्यात आली.

१९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिकमध्ये भारताला पहिलेवहिले वैयक्तिक खेळाचे पदक मिळवून देणारे खाशाबा जाधव, 'हिंद केसरी' मारूती माने, गणपतराव आंदळकर, 'रुस्तुम-ए-हिंद' हिरिशचंद्र बिराजदार गणपत  खेडेकर यांच्यासोबत गुरू दीनानाथ हेही उपस्थित होते. सर्व मल्लांचा शंकररावांनी सत्कार केला.

कुस्तीगीर परिषदेचे स्वागताध्यक्ष या नात्याने त्यांनी यावेळी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. गुणवंत खेळाडूंना साखर कारखान्यांनी दत्तक घेऊन त्यांचा खर्च भागवावा असे ठरले. शासनाकडून कुस्तीगीरांना मानधन मिळावे, व्यायामशाळांना अनुदान मिळावे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत आपला देश चमकण्यासाठी नवीन प्रशिक्षण केंद्रे व प्रशिक्षकांची नेमणूक आदी ठराव संमत करण्यात आले. आपल्या परिसरातील पैलवानांनी 'महाराष्ट्र केसरी', 'हिंद केसरी' तसेच राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय स्पर्धेत नाव कमवावे अशी त्यांची तीव्र इच्छा होती. त्यांच्या पश्चात १९८७ साली सदाशिवनगरचा तानाजी बनकर व १९८८ साली निमगावचा छोटा रावसाहेब मगर यांनी 'महाराष्ट्र केसरी' हा मानाचा किताब पटकाविला. मोठे रावसाहेब मगर यांनी उपमहाराष्ट्र केसरी पदापर्यंत मजल मारली तर ज्ञानेश्वर पालवे, तानाजी बोडरे, सोमनाथ मगर आदींनी राष्ट्रीय पातळीवर आपल्या नावाचा व या परिसराचा दबदबा निर्माण केला.

**तमाशा परिषदेचे अध्यक्ष**

कला माणसाला जीवनाचा आस्वाद घ्यायला व जगायला शिकविते. रोजच्या रहाटगाडग्यात कामाने शिणून गेलेल्या माणसाच्या मनाला विरंगुळा मिळणे ही त्याची खरी भूक असते. त्यासाठी अनेक कलाप्रकार या मराठी मातीतून जन्माला आले. कित्येकांनी आपले उभं आयुष्य कलेच्या संवर्धनासाठी व आविष्कारासाठी समर्पित केलं. अनेकांनी अनेक कलाप्रकारांना जन्म दिला. संगीत, नृत्य, गायन, अभिनय, नाट्य आदी कला विकसित झाल्याच होत्या. त्याच्याच बरोबररीने ग्रामीण भागात गजी-ढोल, लेझीम हे मर्दानी हे खेळ मध्ययुगीन काळापासून खेळले जात होते. त्यातूनच लढाई करण्याचे अप्रत्यक्षपणे शिक्षण दिले जात होते. मनोरंजनाबरोबरच शारीरिक व्यायाम सहजपणे होत होता. नव्या पिढ्यांवर संस्कार बिंबविण्यासाठी यांचा खूप उपयोग होत होता.

शंकरराव व त्यांचे दोन्ही बंधू यांनाही खेळांची लहानपणापासून आवड होती. तिघांनाही मल्लविद्या अवगत होती. तसेच लेझीमसारखा खेळ ते मोठ्या आवडीने खेळत. अनेक सवंगड्यांसोबत हा खेळ पाटीलवाड्यावर रात्री उशिरापर्यंत चाले.

मोठे झाल्यावर स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होऊन पुढे सहकार व राजकारणाच्या धावपळीत काळ खूप वेगाने धावला. आता शंकररावांची सत्तेवरची मांड पक्की झाली होती. त्यांच्या कल्पना व स्वप्नांनी मूर्त स्वरूप धारण केले होते. लोकांनाही समृद्धीची फळे चाखायला मिळत होती.

महाशिवरात्रीनिमित्त जंगी यात्रा भरू लागली होती. पर्वती मंदिराच्या पूर्वेला भव्य असा शिवतार्थ आखाडा तयार केला होता. तिथे दरवर्षी भव्य कुस्ती स्पर्धा होत होत्या. पर्वतीसमोरच्या मैदानात प्रदर्शने भरविली जात होती. रात्रीच्यावेळी नेक लोककलांचे कार्यक्रम आयोजित केले जात होते. प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात साहेब सक्रिय होते.

बाळासाहेब देसाई मंत्री असताना रंगराव पाटील हे महाराष्ट्र राज्य तमाशा परिषदेचे अध्यक्ष होते. रंगराव पाटलांनी बाळासाहेब देसाईंच्या मदतीने तमाशातील कलाकारांसाठी अनेक मार्गांनी भरीव मदत मिळवून दिली होती. त्यामुळे कलावंतामध्ये एक सुरक्षिततेची भावना होती. तमाशा परिषदेचे चिटणीस म्हणून बाळासाहेब गोरे काम पाहत होते. अचानकपणे रंगराव पाटील यांचे निधन झाले. सर्व तमाशा कलावंतांना धक्का बसला. ही लोककला जिवंत ठेवण्यासाठी ज्यांनी खूप महत्त्वाची भूमिका पार पाडली होती त्यां रंगराव पाटलांनंतर आपल्याला तारणारा कोणी नाही अशी असुरक्षिततेची भावना महाराष्ट्र तमाशा परिषदेतील सर्व कलाकारांमध्ये निर्माण झाली.

परिषदेचे सर्व प्रमुख लोक बाळासाहेब गोरेंकडे जमा झाले. रंगरावबापूंच्या रूपाने आपला सर्वांचा आधार तुटला आहे. आता आपल्याला समजून घेणारा व तारून नेणारा असा समर्थ नेता कोण मिळू

शकेल अशी चर्चा सुरू झाली. अनेकांनी अनेक नावे सुचविली. अचानक पुण्याचे आप्पासाहेब गायकवाड यांनी शंकरराव पाटलांचे नाव सुचविले. तोच सर्वांनी एकच जल्लोष केला आणि महाराष्ट्र तमाशा परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती करण्याचे सर्वानुमते ठरले. प्रमुख मंडळींनी शंकररावांची भेट घेऊन अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती केली. अडीअडचणीत सापडलेल्यांच्या मदतीला धावून जाण्याचा व मदत करण्याचा गुण त्यांच्या रक्तातच होता. शंकररावांनी सर्वांची विनंती मान्य केली आणि ते महाराष्ट्र तमाशा परिषदेचे अध्यक्ष  झाले.

पुण्यातील आर्यभूषण थिएटरमध्ये शंकररावांच्या भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. सत्काराल उत्तर देताना आपल्या भाषणात ते म्हणाले, 'कलावंत' हा कलेचा भोक्ता असतो. त्यास आपल्या कलेपुढे धनाचीही तमा नसते, कारण त्याला माहीत असते, श्रीमंत माणूस धन देऊन तलवार घेऊ शकतो पण हिंमत घेई शकत नाही. धन देऊन नोकर मिळू शकतो, पण सेवक नाही. आज कला व कलावंत श्रेष्ठ आहेत, त्याची कदर करायला हवी. त्यांच्या उद्धारासाठी व उदरनिर्वाहासाठी थोरामोठ्यांच्या सहकार्याने आपण झटूयात. त्यासाठी मी जे प्रयत्न करीन त्यास सर्वांनी सहकार्य करावे. उपेक्षित कलावंतांना समजून घेऊन त्यांच्या वेदनांवर फुंकर घालण्यासाठी साहेब तत्पर होते. कलावंतांना सन्मान प्राप्त करून देण्याचे त्यांनी ठरवले.

कारखान्याजवळ टेक्निकल हायस्कूलच्या भव्य मैदानावर तीन दिवसांच्या तमाशा परिषदेचं आयोजन केले. तीनही दिवस भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. परिषदेच्या पदाधिकारी व कलावंतांशी साहेबांनी सुसंवाद साधला. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. कलाकारांच्या मुलांचे शिक्षण, वृद्ध कलाकारांना मानधन, निवासी आश्रमशाळा आदींची चर्चा यावेळी झाली. शंकरराव केवळ बोलणारे कृतिशून्य पुढारी नव्हते. त्यांनी थेट मुख्यमंत्र्यांकडे या कलाकारांच्या मुलांसाठी आश्रमशाळेची मागणी केली. कमलाबाई कळंबकर यांनी

परभणीत आश्रमशाळेसाठी जागेचा प्रश्न सोडवला, तर अनुदानाचा प्रश्न शंकररावांनी निकालात काढला. तमाशातील ढोलकी व चाळ यांच्या ठेक्याचे शंकरराव जरी दर्दी रसिक होते, तरी टाळमृदंगाच्या निनादात होणाऱ्या विठूनामाच्या गजरात व पालखी सोहळ्यातील भजनांमध्ये ते सहभागी होत. विठ्ठल जामदार हे साहेबांचे वर्गमित्र होते. त्यांना भजनाची आवड होती. त्यांच्यासोबत साहेब अभंग गायनात तल्लीन होत. भजनी मंडळाला शंकररावांनी सर्वतोपरी सहकार्य केले.

## शिवपार्वती बाल वाद्यवृंद

वेगवेगळ्या कामांच्या निमित्ताने शंकररावांनी महाराष्ट्र पिंजून काढला होता. जिथे जाईल तिथून माझ्या परिसरात काही करण्याजोगं आहे का? असा प्रश्न त्यांच्या मनात निर्माण होई. कोल्हापूर म्हणजे कलेचं माहेर. अनेक लोककलांना छत्रपती शाहूंनी राजाश्रय तर दिलाच, त्याचबरोबर कलांचा प्रसार होण्यासाठी प्रोत्साहन दिले. कोल्हापूर परिसरात शंकररावांचे अनेक स्नेही होते. वारण्याचे तात्यासाहेब कोरे त्यापैकीच एक. पुण्यातल्या डेक्कन शुगर असोसिएशनच्या वार्षिक अधिवेशन प्रसंगी उपस्थित सदस्यांच्या मनोरंजनार्थ वारणा वाद्यवृंदाचा कार्यक्रम पाहून शंकरराव मंत्रमुग्ध झाले. 'देवांनी पुष्पवृष्टी करावी असे ते संगीत!' शंकररावांची दानत अव्वल नंबरची होती. त्या बालकलाकारांना त्यांनी उत्स्फूर्तपणे बक्षीस दिले व कौतुक केले. ते तात्यासाहेब कोरेंना म्हणाले, "तुमच्या वाद्यवृंदाचा जागतिक दौरा करून आणायची परवानगी मला द्या. या स्वर्गीय संगीताच्या स्वरलहरींवर मी तुम्हाला कोटभर रूपये मिळवून देतो."

अकलूज परिसरात संगीतकलेच्या संवर्धनासाठी शिवपार्वती ट्रस्टच्या माध्यमातून बाल-वाद्यवृंदाची सुरुवात १९७८ च्या जानेवारी महिन्यात केली. त्यासाठी कोल्हापूरहून शंकरराव कुलकर्णी या संगीत शिक्षकाची नियुक्ती केली. पंधरा वर्षांपर्यंतची मुले पेटी, तबला, ड्रमसेट, संतूर,

सिथेसायझर, बेंजो, खंजिरी, मेंडोलिन इत्यादी अनेक वाद्ये वाजवू लागली. पंढरपूरच्या विठ्ठलमंदिरात या बालवाद्यवृंदाचा पहिला कार्यक्रम आयोजित केला होता. भक्तिगीतांचे गायन यावेळी बालकलाकारांनी केले व शंकरराव मोठ्या कौतुकाने मुलांकडे पाहू लागले.

# चेतना चिंतामणीचे गाव

नीरेकाठच्या मातीत वाढलेले, एका शेतकरी कुटुंबातील शंकरराव राज्य व देशपातळीवर कीर्ती मिळवू शकले, ते अंगी असलेल्या निःस्वार्थी व निःस्पृह सामाजिक बांधीलकीमुळेच. त्यांच्यात नव्या-जुन्यांचा अपूर्व संगम होता. त्यांचे नीरेवर प्रेम होते, त्यांचे भीमेवर प्रेम होते, त्यांचे अकलूजच्या भुईकोट किल्ल्यावर प्रेम होते, त्यांचे नीरा-भीमा काठच्या शेतमळ्यातील डोलणाऱ्या हिरव्यागार पिकांवर प्रेम होते, असा हा अपूर्व प्रीतीचा सोहळा तर दुसऱ्या बाजूला गरिबांच्या कणवेचा महापूरही होता. शेकडो भाषणातून साध्या-साध्या शब्दातून ते लोकांशी चर्चा व संवाद करीत. अशिक्षित भोळ्याभाबड्या जनतेला ते थोरल्या भावाच्या मायेने समजावून सांगत होते.

शंकररावांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत रुबाबदार होते. सह्याद्रीच्या शिलाखंडासारखा देह, विलक्षण बोलके डोळे, धिप्पाड देहयष्टी, पांढरेशुभ्र कपडे, लाखातही नजरेस भरेल असे व्यक्तिमत्त्व, सतत मनात नावीन्याचा ध्यास घेतलेले, नवे विचार, नव्या संकल्पना, नव्या योजना राबविणारा एक कर्मयोगी. कष्टकरी व श्रमजीवींना हा माणूस आपला वाटे. शंकररावही त्यांना जवळ घेत. दुसऱ्या बाजूला ज्येष्ठ साहित्यिक मृत्युंजयकार स्व. शिवाजी सावंत, स्व. डॉ. सरोजिनी बाबर, भारताचे न्यामूर्ती स्व. यंशवंतराव चंद्रचूड, महाराष्ट्राचे वैभव प्राचार्य शिवाजीराव भोसले, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यासारख्या अनेक सृजनशील, विद्वान व विचारवंतांचाही सहवास त्यांना हवाहवासा वाटे.

शंकररावांच्या प्रवासात अनेक अडथळे आले, अनेक जन त्यांच्या सोबत आले काही सोडून गेले. पण सामान्य माणूस शेतकरी, कामगार, सदैव त्यांच्या बरोबर राहिले. सर्व जातिधर्मांच्या माणसांना त्यांची हाताळण्याची पद्धत, व शेतकरी व कामगार यांच्या उन्नतीचा विचार घेऊनच ते सर्वत्र फिरले व त्यामुळेच स्वतःचे गाव, तालुका, जिल्हा

ओलांडून संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचा संचार होता. महाराष्टात कोठेही त्यांची सभा असो, आजुबाजूच्या जिल्ह्यातील हजारो शेतकरी, कामगार, कार्यकर्ते तेथे उपस्थित असत. चावडीपासून वेशीपर्यंत चालत जाण्याची त्यांची तयारी असल्यामुळेच ते शंकररावांचे 'सहकारमहर्षी' झाले.

## प्रसन्न व रुबाबदार व्यक्तिमत्त्व-चालते बोलते न्यायालय

अत्यंत संयमी, पण कणखर वृती, शेतकऱ्यांच्या विकासासाठी प्रमाणिक प्रयत्न, त्यांच्यासाठी अविचल निष्ठा, अभ्यासू व विचारी वृत्ती, आतिथ्यशीलता, स्वभावात गोडवा, विरोधकांबद्दल मनात कटुता नाही. केवळ वेळ पाहून वागण्याची पद्धत, स्वाःच्या चारित्र्याला जपणारा, सुसंस्कृत मनाचा, कलांविषयी व कलाकारांविषयी आदर व प्रेम बाळगणारा, पुढे जाणाऱ्याचे पाय न ओढता त्यास पुढे डाण्यास मदत करणारा, भ्रष्टाचारी, दंगेखोर व विध्वंसक प्रवृत्तीला कधीही खतपाणी न घालणारा असा हा नेता महाराष्ट्राचे 'भूषण' होते.

माणूस म्हटले की, चुकाही आल्याच पण एक चूक पुन्हा होणार नाही याची दक्षता ते घेत. स्वतःमधील उणिवा शोधण्यासाठी ते सतर्क असत. खूशमस्करे व भाटगिरी करणाऱ्यांना त्यांनी कधी जवळ केले नाही. आज जातिधर्माचा आधार घेऊन राजकारण होताना दिसून येते. साहेबांनी हा संकुचित विचार कधीच केला नाही. माणूस हीच जात व विकास हाच धर्म त्यांनी मानला.

साहेबांनी स्थापन केलेल्या प्रत्येक संस्थेच्या प्रशासनावर त्यांची अतिशय घट्ट पकड होती. ते नेहमी म्हणत, "घोडं कसं चालतं ? घोडं चालत ते घोडेस्वाराची मांड ओळखून. मांड पक्की पाहिजे. म्हणजे घोडं हा हा म्हणती आपला पल्ला गाठतं. " प्रत्येक माणसाच्या जीवनात असा एखादा प्रसंग घडतो की, त्यामुळे त्या माणसाच्या जीवनाला एक नवं अनपेक्षित असं वळण मिळतं. तो क्षण पकडण्यासाठी ज्याला बुद्धी असते तो माणूस असामान्य कर्तृत्वाचा धनी होतो असे त्यांना वाटे. समाजात

नाना स्वभावाचे व प्रवृत्तीचे लोक असतात. कधीकधी कुटुंबातील नात्यांतही वाद निर्माण होत असतात. शेजारी-शेजारी राहणाऱ्यांमध्ये किरकोळ कारणांवरून संघर्ष होतात, तर शेताच्या बांधावरून होणारी भांडणे व मारामाऱ्या ही गोष्ट शेतकऱ्यांच्या पाचवीलाच पुजलेली.

समाजस्वस्थासाठी आपापसातील तंटे मिटविणे आवश्यक होते. शंकरराव ही गोष्ट जाणून होते की, समृद्धी व विकास साधायचा असेल तर भांडणांमध्ये लोकांची शक्ती वाया जाता कामा नये. किरकोळ भांडणांचे रूपांतर मोठ्या भांडणात होते. त्याचे अनेक दुष्परिणाम होतात. व्यक्ती, कुटुंब, समाज या सर्वच घटकांवर भांडणांचे दुरगामी विपरीत परिणाम होऊन पर्यायाने प्रगतीला खीळ बसते. चिंतनशील व द्रष्ट्या शंकररावांनी गावोगावच्या भांडखोर मंडळींना बोलावून घेऊन नीट वागण्याबद्दल समजून सांगितले. त्यांच्याकडे विविध प्रकारचे तंटे मिटविण्यासाठी येत असत लबाड व ढोंगी माणसे साहेबांच्या नजरेतून सुटूच शकत नसत. चेहऱ्यावरच्या रेषा वाचून अंतर्मन ओळखण्याची शक्ती त्यांना उपजत प्राप्त झाली होती. जागेवरच न्यायनिवाडा करून ते भांडणे मिटवत. लोकांनाही त्यांच्या तोंडातून मिळालेला न्याय मान्य होत असे. पोलीस ठाणे व न्यायालयात जाण्यापूर्वीच शंकररावांनी परस्परच हजारो तंटे मिटवले होते. त्यांनी दिलेला न्याय लोक श्रद्धापूर्वक पाळत असत. लहानपणापासून हा त्यांचा गुण त्यांचे बालमित्र गजानन रेळेकर यांनी नोंद करून ठेवला आहे.

साहेबांना लहान मुले खुप आवडत. या परिसरात त्यांनी उभारलेले विविध विकास प्रकल्प व केलेले प्रयोग हा सर्वांच्या जिज्ञासेचा व कुतूहलाचा भाग होता त्यामुळे जिल्ह्यातील व राज्यातील विविध भागातून सहली अकलूजला येऊ लागल्या होत्या. येणाऱ्या पाहुण्याचे ते मोठ्या आस्थेने स्वागत करीत व मोठ्या उत्साहाने आपण साकारलेली विकासाची तीर्थस्थळे सर्वांना फिरुन दाखवित. सहलीला आलेल्या

पाहुण्यांना-विद्यार्थ्यांना घरी नेऊन त्यांचे चहापान व जेवणखाणं करण्यात साहेबांना व त्यांच्या पत्नी रत्नप्रभादेवींना मोठा आनंद वाटे.

आपण एकत्र राहिलो तर भक्कमपणे उभे राहून इच्छित पल्ला यशस्वीपणे सहजरीत्या गाठू शकतो, पण विभक्त झालो तर मागे पडतो, हे तत्त्व कोणत्याही राजकीय व सामाजिक क्षेत्रातील नेतृत्वाला लागू पडते. हे तत्त्व जिथे जिथे पाळले गेले, तेथील राजकीय नेतृत्वाने यशाची गरुडभरारी घेतल्याचे जाणवते. याच तत्त्वाने मोहिते-पाटील घराण्याने प्रवास केल्याने महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला. याचे श्रेय शंकररावांनी घालून दिलेल्या एकोप्याच्या परंपरेला जाते.

**शेतकऱ्यांच्या आत्मसन्मानासाठी......**

त्यावेळच्या परिस्थितीत सर्वसामान्य गरीब शेतकरी, शेतमजूर यांची नावे बऱ्याचदा असंस्कृत व असभ्य पद्धतीने लिहिली आणि उच्चारली जात. यावरुन त्याचे समाजातील अस्तित्वा किरकोळ किंवा नगण्या स्वरुपाचे आहे याची जाणीव होई. याउलट बडे बागायतदार, श्रीमंत किंवा धनिक व्यापारी, प्रतिष्ठित राज्यकर्ते यांची नावे घेताना किंवा उच्चारताना त्यांच्या नावापुढे राव किंवा तत्सम उपपद लावले जाई. त्यातून त्यांचा पत, प्रतिष्ठा आणि सन्मान दिसून येते असे. शंकरराव अशा विषमतेविरुद्ध होते. त्यांनी आयुष्यभर सर्वसामान्यांच्या कल्याणाचा ध्यास घेतला होता. खेड्यापाड्यातील शेतकरी व शेतमजुरांना त्यांनी उभे होते. आपण सहकारी साखर कारखाना काढतो आहोत म्हणजे सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मालकाचा हा कारखाना आहे. तळागाळातील हे लोक कुणी गुलाम किंवा लाचार नाहीत, तर ते मालक आहेत आपल्या बरोबरीने आपण त्यांना सन्मानाने वागवायचे आहे असा विचार ते करीत. सर्वांगाण समतेचा विचार त्यांच्या डोक्यात सतत घोळत असे. माझ्या कारखान्याचा सभासद हा कुणी हीन दर्जाचा, टाकाऊ, गरीब नाही असा विचार ते

करीत. त्यातून एक वेगळा विचार त्यांनी लोकांपुढे मांडला. तो म्हणजे कुणाही सर्वसामान्य शेतकरी, शेतमजूर सभासदाच्या नावाचा उल्लेख करताना तो सन्माननीय उपपद लावण्याचा त्यांनी निश्चय केला. (उदा. येसू-यशवंतराव, विठू-विठ्ठलराव इ.) हा निश्चय त्यांनी कृतीतही आणला. व्यासपीठावरुन बोलताना, कागदोपत्री नोंदी करताना किंवा संवाद साधताना ते स्वातःतर हे सूत्र पाळतच, पण आपल्या अधिकाऱ्यांनाही त्यांनी तशी सक्त ताकीद दिली होती. समतेचा व शेतकऱ्यांच्या आत्मसन्मानाचा हा आगळावेगळा प्रयोग त्यांनी एककाळी या भूमीत रुजविला होता.

**पालखी सोहळा**

शंकररावांऱ्यांच्या जावनाला आध्यात्मिक अधिष्ठान होते. पूर्वेकडचे पंढरपूर, पश्चिमेकडील शिंगणापूर ही त्यांनी श्रद्धास्थाने होती. साधनशुचिता व परमेश्वरावरील श्रद्धा यामुळे त्यांना आत्मिक बळ मिळत असे. पंढरीची वारी आणि पालखी सोहळा हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक लोकप्रवाह, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचं वैभव. श्री विठ्ठल हे लोकदैवत असल्यामुळे पांडुरंगाविषयी श्रद्धा बाळगणारा वारकरी हा त्यांच्या मनातील आदराचे स्थान. शेकडो वर्षांपासून संत ज्ञानेश्वर व संत तुकारामांच्या पालख्या माळशिरस तालुक्यातून पंढरपूरकडे जात होत्या. तुकारामांची पालखी अकलूजमधून पुढे जायची. तर संत ज्ञानेश्वर माउलीची पालखी नातेपुते-माळशिरस-वेळापूर मार्गे पुढे जायची. दोन्ही पालख्यांसमवेत असणाऱ्या वारकऱ्यांना मोठ्या श्रद्धेनं दरवर्षी शंकररावांची पंगत असायची. पालखीच्या प्रमुखांची, सोहळ्यातील वारकऱ्यांची यथायोग्य सोय व्हावी ही अत्यंत महात्त्वाची बाबच साहेबांनी विचारात घेतली. पाणी, आरोग्यसुविधा, सावली याची मोठ्या प्रमाणावर त्यांनी सोय केली. श्री शंकर सहकारी साखर कारखाना सुरु केल्यानंतर तिथं पालखीच्या स्वागताची परंपरा साहेबांनी सुरु केली. आळंदीहून

निघाल्यानंतर पहिलं गोल रिंगण सदाशिवनरलाच! आक्कांच माहेरच मुळी वारकरी सांप्रदायिक. त्यांच्यावर भागवत साप्रदायाचे संस्कार झालेले. पंढरपूच्या वाटेवरचं सासर मिळावं हे त्यांचं विठूरायाला मागणं होतं आणि विठूरायानं पूर्ण केलं होत. वारकऱ्यांसाठी त्या स्वताः जेवणाची तयारी करायच्या.

कारखान्यातर्फे वारकऱ्यांसाठी पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य सुविधा या गोष्टी मोठ्या तळमळीने ते स्वतः जातीने लक्ष घालून करत. पालखी सोहळा प्रमुखांशी सोयीसुविधांविषयी चर्चा करीत. पंढरपूरपर्यंत अनेक सुविधा उपलब्ध करण्यासाठी ते धडपडत. विठूनामाच्या गजरात ते सहभागी होत. सारे मोहिते-पाटील कुटुंबीय भागवत धर्माची पताका उंचा फडकविण्यासाठी वारकऱ्यांना सहकार्य करीत होते. त्यातच त्यांना सात्त्विक आनंद मिळत होता. इतरांच्या सेवेसाठी आपल्या हातून काहीतरी काम दररोज व्हायलाच पाहिजे असा नियमच त्यांनी स्वतःला घालून घेतला होता. आजही दोन्ही पालख्यांचे आतिथ्य मोहिते-पाटील कुटुंबायांकडून मोठ्या अस्थेने होते.

# पैलतीराकडे...

## महाराष्ट्राचा मोहरा हरपला

शंकरराव एकसष्ठ वर्षांचे झाले होते. पण त्यांच्यातील तडफ तरुणाईलाही लाजवेल अशीच होती. बालपणापासूनच व्यायामाची आवड असल्याने व तरुणपणात कुस्ती खेळून स्वतःचं रुबाबदार व्यक्तिमत्त्व घडविणाऱ्या शंकररावांमध्ये अजून प्रचंड उत्साह होता. कामाचा उरक व आवाका दांडगा होता. आपल्या कामात दिरंगाई त्यांना ठऊक नव्हती. पण अलीकडे अचानक त्यांच्या पोटात दुखू लागलं, म्हणून ते अकलूजच्या डॉ. शांतीलाल गांधींकडे गेले. डॉक्टरांनी त्यांना तपासून औषधे दिली. त्यावेळी त्यांना प्रवास व खाण्यातील बादलांमुळे दुखत असेल असे वाटले. डॉक्टरांनी विश्रांती घ्यायला सांगितले, पण शंकररावांनी ते ऐकले नाही. त्यांना डॉक्टरांनी दिलेल्या इंजेक्शनमुळे वेदना कमी जाणवू लागल्या व ते सोलापूरला कामासाठी निघून गेले.

अशातच महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींनी नाट्यमय वळण घेतले होते. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे विभाजन होऊन शरद पवारांच्या नेतृत्वाखाली पुलोद सरकार सत्तेवर आले होते. काँग्रेस पक्षाच्या बळकटीसाठी महाराष्ट्रभर शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्याचे ठरले.

डिसेंबर १९७८ मध्ये नागपूरला शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी शंकररावांना डॉक्टरांना नागपूरला न जाण्याचा सल्ला दिला, पण साहेबांनी तो मानला नाही. ते नागपूरला गेलेच. तिथल्या मेळाव्यात प्रभावी भाषण केले. पण प्रवासात त्यांना आणखी त्रास झाला. डॉक्टरांना थोडीशी पाणथरीची गाठ जाणवली होती. सोलापूरच्या डॉ. जोग यांनीही साहेबांना तपासलं. त्यांना पाणथरीची गाठ खूप वेगात वाढत असल्याचं लक्षात आलं. तापामुळे किंवा मलेरियामुळे ही वाढ होत असते. पण पुढचं कारण म्हणजे भयानक ब्लडकॅन्सरचं होतं. त्यांना तातडीनं मुंबईला हलविण्यात आले.

पॅथॉलॉजिस्ट डॉ. देखणेंचा रिपोर्ट नील असल्याचा आला होता. पण पाणथरीच्या वाढीचा वेग संशयात भर घालत होता.

३ जानेवारी १९७९ रोजी त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यावेळी भेटायला येणाऱ्यांना ते बोलता-बोलता म्हणाले, " यावेळी जगलो वाचलो तर ठीक, नाहीतर पुढच्या जन्मी देवानं मला बैलाच्या जन्माला घालावं म्हणजे मुकाट्यानं शेतकऱ्यांची व शेतीची सेवा करता येईल!"

ऑपरेशन यशस्वी पार पडलं होतं. त्यांचा एकसष्ठावा वाढदिवस साधेपणानं साजरा झाला. मुंबई हॉस्पिटलमध्ये लोकांची रीघ लागली होती. १५ जानेवारीला डॉक्टरांनी विश्रांती घेण्याच्या अटीवर त्यांना दवाखान्यातून घरी सोडले.

घरी आल्यावर लोकांचे लोंढेच्या लोंढे साहेबांना भेटण्यासाठी येऊ लागले. डॉक्टरांनी बोलायला बंदी घातली होती. पण त्यांनी लोकांशी संवाद सुरुच ठेवला होता. मुंबईहून येऊन आठ दिवस झाले तोच ३० जानेवारीला सोलापूरला भव्य शेतकरी मेळाव्याचं आयोजन केलं होतं. हे आयोजन त्यांनीच यापूर्वी केलेलं होतं त्यामुळे डॉक्टरांनी विश्रांती घ्यायला सांगितले असतानाही ते सोलापूरला शेतकरी मेळाव्यात भाषण करण्यासाठी गेलेच. आंबेडकर मैदानावरील या मेळाव्यात वसंतदादा पाटील, प्रभा राव, नरेंद्र तिडके, रामराव आदिक, यशवंतराव मोहिते आणि या मेळाव्याचे संयोजक शंकरराव मोहिते-पाटील ही मंडळी उपस्थित होती.

दोन-तीन भाषणं झाल्यावर शंकरराव भाषण करायला उदाहरणे, किस्से आणि कोट्या यांनी ओतप्रोत भरलेलं. उपस्थित शेककऱ्यांना संघटनेचं महत्त्व पटवून दिलं. शेवटी ते म्हणाले, '' माझ्या शेतकरी मित्रांनो, तुम्हाला हा हाडाचा शेतकरी शंकरराव मोहिते-पाटील या भव्य मेळाव्यात जाहीर आवाहन करतो की, तुम्ही संघटित व्हा. तुमच्या कुठल्याही प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी हा मोहिते-पाटील

अर्ध्यारात्रीसुद्धा ठामपणे उभा राहील." आणि टाळ्यांच्या गजरात साहेब खुर्चीवर येऊन बसले. त्याच दिवशी डॉ. चिडगुपकरांच्या दवाखान्यात डॉ. डी. पी. कुलकर्णी यांनी शस्त्रक्रिया केली आणि गाठी काढल्या. त्यांची तपासणी करण्यात आली. त्यात ब्लडकॅन्सरच्या अस्तित्वाची चिन्हे दिसून आली. चार फेब्रुवारीला साहेबांना मुंबईला नेण्यात आले. त्यांच्यावर उपचारासाठी एक आशेचा किरण होता. अमेरिकेतील बोस्टन हॉस्पिटलमध्ये ब्लड ट्रात्स्फ्युजनचे नवेच तंत्र विकसित झाले होते. त्यासाठी चौदा फेब्रुवारीच्या आत तिथे पोहोचायचे होते. तोपर्यंत आठ तारीख उजाडली. व्हिसा-पासपोर्ट या बाबींसाठी वेळ गेला.

बाळासाहेब देसाईच्या मेघदूत बंगल्यावर त्यांचा मुक्काम होता. येईल त्यांच्याशी साहेब मुक्तपणे बोलत होते. परवा १२ फेब्रवारी अमेरिकेला विमानाने जाण्याची तयारी पूर्ण झाली होती. १० फेब्रवारीला रात्री साहेब आत खोलीत झोपयला गेले. त्यांना झोप लागलीच नाही. ते फक्त पडून होते. बाहेरच्या हॉलमध्ये विजयदादा, राजाभाऊ, अरुणामाई, आक्कासाहेब व इतर कुटुंबीय चर्चा करत होते. मध्येच त्यांच्या पत्नी आक्कासाहेब त्यांचा डोळा लागला की नाही ते पाहायल्या गेल्या. त्यांनी पाणी मागितलं. काळजीभरा चेहरा त्यांनी पाहिला. ते खिन्नपणे हसले.

रात्रभर डोळा लागलाच नाही. त्यांच्या मनःपटलावर स्वतःच्या आयुष्याची चित्रफीत पुढे पुढे सरकत होती. त्यांच्या नजरेसमोरुन त्यांनी भगीरथ प्रयत्नांनी साकारलेलं आधुनिक भूमिपुत्राच चित्र सरकू लागलं. शाळा, वसतिगृह, कारखाना, दुध संघ, मोठमोठ्या प्रचार सभा, बालपणापासून सवंगडी, पत्नी, मुले, सारे कुटुंबीय त्यांच्या अंतर्मनाच्या गाभाऱ्यात सामावले होते.

पहाटे त्यांना छातीत तीव्र कळ दाटून आली. तेवढ्यात सर्वजण धावून आले. पण तोपर्यंत शंकरराव अनंतात विलीन झाले होते. शंकरराव मोहिते-पाटील नावाचा झंझावात ११ फेब्रवारी १९७९ रोजी सकाळी सहा

वाजता शांत झाला होता. सहकारमहर्षी निघाले. भूमिपुत्रांचा, भूमिहीनांचा वाली निघाला.

आता कैचे येणे जाणे? आता खुंटले बोलणे।

हेचि तुमची अमुची भेटी। येथुनिया जन्मतुटी।।

साहेबांनी डोळे मिटले, श्र्वासोच्छवास संपला। चैतन्य निघून गेले. साहेब गेले. सोलापूर जिल्हाच नव्हे तर उभ्या महाराष्ट्रातील शेतकरी पोरका झाला. शंकररावांच्या निधनाची बातमी महाराष्ट्राला. शंकररावांच्या निधनाची बातमी महाराष्ट्रभर लगेच पसरली. आकाशवाणीवरुन बातमी प्रसारित झाली. उभ्या महाराष्ट्रात धक्का बसला. अकलूजकडे लोकांचा ओघ सुरु झाला. मुंबईहून शंकररावांचे व पुष्पहार अर्पण केले जात होते. त्यांचे सर्वच क्षेत्रातील लोकांनी जिवाभावाचे संबंध होते. अकलूजला लोकांचा महापूर लोटला.

सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास ॲम्ब्युलन्समधून त्यांचा पार्थिव देह अकलूजला पोहचला. अंतिम दर्शनासाठी 'शिवरत्न' समोर उंच चौथऱ्यावर पार्थिव देह ठेवण्यात आला. लोक मोठमोठ्याने आक्रोश करीत होते.

आक्कांच्या दुःखाला पारावार नव्हता. विजयदादा, जयश्रीतीई, राजसिंह, जयसिंह, अरुणामाई, मदनसिंह, प्रतापसिंह, उदयसिंह, उदयसिंह व गिरिजाताई ही सारी भावंडे दुःखावेगाने शोकाकुल झाली होती. वडीलांच छत्र हरपल्यामुळे ती पोरकी झाली होती. विजयदादांनी व राजाभाऊंनी सर्वांना धीर दिला.

लोक पायांना मिठी मारुन ओरडत होते. अकलूजमध्ये एकाही घरात चूल पेटली नव्हती. गावाचा कुटुंबप्रमुखच गेला होता.

'माणसाची खरी किंमत कळते ती त्याच्या अंत्यायात्रेला जमलेल्या लोकांच्या संख्येवरुनच', असे साहेब नेहमी म्हणत. साहेबांची अमूल्य किंमत अफाट गर्दीने दिसून येत होती.

फुलांनी सजवलेल्या रथावरुन साहेबांची अंत्ययात्रा निघाली. लोकांनी पुनःपुन्हा ओल्या नेत्रांनी आपल्या लाडक्या नेत्याचं अंतिम दर्शन घेतलं.

जड अंतःकरणाने विजयदादांनी अग्नी दिला. कृष्णाबाईंच्या पोटी जन्म घेऊन नीरामाईच्या कुशीत अनंत काळाची विश्रांती घेण्यासाठी शंकरराव गेले. होते. 'सहकारमहर्षी अमर रहे!' या घोषणांनी सारा परिसर निनादला. एक सामान्य शेतकरी आपल्या शक्तीनुसार अजरामर असे कर्तृत्व गाजवून गेला. आपल्या चिमुकल्या अकलूजचे नाव त्यांनी देशाच्या नकाशावर आणले. त्यामुळे आई कृष्णाईची कूंस धन्य झाली. वादळवाऱ्याचे ताडाखे सहन करीत कर्मयोगाचा पर्वत उभा करणाता, ध्येयवादी निर्मितीची स्फुल्लिंगे मनामनात फुलवणारा शेतकऱ्यांचा राजा अनंतात विलीन झाला.

# संदर्भसूची


१. परीसस्पर्श
लेखक-प्रमोद जोशी
२. मी पाहिलेले यशवंतराव
संपादिका-डॉ. सरोजिनी बाबर
३. मी एक कार्यकर्ता
लेखक- तात्यासाहेब कोरे
४. महाराष्ट्राचे शिल्पकार स्वातंत्र्यसेनानी तुळशीदास जाधव
लेखक- व्यंकटेश कामतकर
५. जीवनसंग्राम(क्रांतिवीर नागनाथ आण्णा नायकवडी यांचे चरित्र)
लेखक- साहेबजी बाळा सनदे
६. महाराष्ट्राचे शिल्पकार-साने गुरुजी
लेखक- राजा मंगळवेढेकर
७. सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील
लेखक- प्रा. मोहनराव काळे
८. लोकराज्य- सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील,
प्रकाशन वर्ष-जानेवारी १९९३
मुख्य संपादक- अरुण पाटणकर
९. स. म. शंकरराव मोहिते-पाटील सह. साखर कारखाना
रौप्यमहोत्सवी स्मरणिका
प्रकाशक- मा. श्री. जयसिंह मोहिते-पाटील
१०. स. म. शंकरराव मोहिते-पाटील अमृतमहोत्सवी जयंती समारंभ
समिती, स्मरणिका
११. सागरी लाटा
लेखक-मा. कुलगुरु डॉ. शंकरराव मगर
१२. सोलापुर जिल्हाचा इतिहास-मराठा कालखंड

लेखक-मा. श्री. गेपाळ देशमुख

१३. महाशिवरात्री यात्रा महोत्सव समिती स्मरणिका

प्रकाशक- मा. श्री. विलासराव देशमुख, माजी मुख्यमंत्री (महाराष्ट्र राज्य)

१४. लढत (पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील यांचे चरित्र)

लेखक – 'मृत्युंजय' कार स्व. शिवाजी सावंत

१५. वाटचाल

लेखक-प्रताप पवार

१६. विकासगंगा स्मरणिका-पंचायत समिती, माळशिरस

प्रकाशक-मा. धैर्यशील राजसिंह मोहिते- पाटील

१७. परीसस्पर्श ग्रंथ परिचय पुस्तिका

लेखक-प्राचार्य डॉ. अरविंद नवले

१८. स्वातंत्र्य सैनिक रघुनाथ रामचंद्र माने गुरुजी

लेखक-श्री. बी. टी. शिवशरण

१९. महात्मा फुले

लेखक-धनंजय कीर

२०. दीपमाळ

लेखिका-सुचित्रा घोगरे-काटकर

२१. कर्मवीर भाऊराव पाटील

लेखक-प्राचार्य विठ्ठल कडियाळ

२२. क्रांतिसिंह नाना पाटील

लेखक – राघव शिवणीकर

# महाराष्ट्राचे शिल्पकार योजनअंतर्गत मालिकेतील चरित्रग्रंथ

| | | | |
|---|---|---|---|
| १) | एस. एम. जोशी | श्री. ग. प्र. प्रधान | रू. ४०/- |
| २) | साने गुरुजी | श्री. राजा मंगळवेढेकर | रू. ४०/- |
| ३) | दादा धर्माधिकारी | श्रीमती तारा धर्माधिकारी | रू. ४०/- |
| ४) | क्रांतिसिंह नाना पाटील | श्री. भारत पाटणकर | रू. ४०/- |
| ५) | डॉ. विठ्ठलराव विखेपाटील | श्री. शिवाजी सावंत | रू.३५/- |
| ६) | शंकरराव किर्लोस्कर | श्रीमती शांता किर्लोस्कर | रू. ४०/- |
| ७) | मामासाहेब जगदाळे | श्री. व. न. इंगळे | रू. ४५/- |
| ८) | तंट्या भिल्ल | श्री. बाबा भांड | रू. ४५/- |
| ९) | यशवंतराव चव्हाण | श्री. विठ्ठलराव पाटील | रू. ४०/- |
| १०) | दादासाहेब फाळके | श्री. बापू वाटवे | रू.३५/- |
| ११) | ताराबाई शिंदे | श्री. इंद्रजित भालेराव | रू.२५/- |
| १२) | तेजस्विनी अहिल्याबाई होळकर | सौ. विजया जहागीरदार | रू.४५/- |
| १३) | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | डॉ. अरूंधती खंडकर | रू. ४०/- |
| १४) | स्वातंत्र्यवीर सावरकर | श्री. सुधाकर देशपांडे | रू.३६/- |
| १५) | बॅ. राजाभाऊ खोब्रागडे | श्री. व्ही. डी. मेश्राम | रू.३५/- |
| १६) | स्वामी रामानंद तीर्थ | श्री. प्रकाश मेदककर | रू.४५/- |
| १७) | पठ्ठे बापूराव | श्री. चंद्रकुमार नलगे | रू.४५/- |
| १८) | भाई उद्धवराव पाटील | श्री. व. न. इंगळे | रू.५५/- |
| १९) | धोंडो केशव कर्वे | डॉ. न. म. जोशी | रू. ४०/- |
| २०) | लोकहितवादी | डॉ. निर्मलकुमार फडकुले | रू. ५०/- |
| २१) | यदुनाथ थत्ते | डॉ. मु. ब. शहा | रू. ४०/- |
| २२) | गोविंदभाई श्रॉफ | डॉ. विजय दिवाण | रू. ४५/- |
| २३) | लोककवी शाहीर रामजोशी | श्री. शिरीष गंधे | रू. ४५/- |
| २४) | वसंतराव नाईक | डॉ. उत्तम रुद्रवार | रू. ३५ /- |
| २५) | महात्मा फुले | श्री. श्रीराम गुंदेकर | रू. ४०/- |
| २६) | स्वातंत्रसेनानी तुळशीदास जाधव | श्री. व्यंकटेश कामतकर | रू. ४६/- |
| २७) | ना. ग. गोरे | श्री. ग. प्र. प्रधान | रू. ३५/- |
| २८) | शंकरराव चव्हाण | डॉ. सुरेश सावंत | रू. ४५/- |
| २९) | पंडिता रमाबाई | डॉ. सिसिलिया कार्व्हालो | रू. ४५/- |
| ३०) | बॅ. नाथ पै | जयानंद मठकर | रू. ३५/- |
| ३१) | विनोबा भावे | प्रा. किसन चोपडे | रू. ४५/- |

मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे
सर्व शासकीय ग्रंथ भांडार
मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद व
महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते

अधिक मिहिती/चौकशीसाठी
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
पु. ल. देशपांडे कला अकादमी,
दुसरा मजला, रवींद्र नाट्य मंदिर इमारत,
सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०० ०१४
दुरध्वनी - २४२२६१५६/२४३२५९२९

# हरिश्चंद्र मगर

या चरित्राचे लेखक हरिश्चंद्र मगर हे विद्यार्थीदशेपासून एक उपक्रमशील युवक. कुमार अवस्थेत बाबा आमटे यांचे 'भारत जोडो' अभियान त्यांनी जवळून पाहिले. या अभिनयातील अग्रणी व सेवा दलाचे कार्यकर्ते महादेव रा. मगर यांच्यासमोर सेवा दलाच्या पुणे येथील शिबिरात ग. प्र. प्रधान, ना. ग. गोरे, निळू फुले, एस. एम. जोशी या थोरांबरोबर ते सहभागी झाले. व्यासपीठावरून बोलायला लागल्यानंतर सतत ऐकत राहावे अशी ओघवत्या वक्तृत्वाची देणगी त्यांना लाभली आहे. महाविद्यालय व पदव्युत्तर शिक्षण शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथून घेत असताना विविध ठिकाणच्या नावाजलेल्या वक्तृत्व स्पर्धा त्यांनी लीलया जिंकल्या आहेत. निमगाव (म.) गावातील लोकांचे प्रबोधन व्हावे म्हणून गेले सोळा वर्षापासून ते नेताजी सुभाषचंद्र बोस व्याख्यानमाला चालवित आहेत. गावात रणजितसिंह सार्वजनिक वाचनालय व स्वांतत्र्यसैनिक स्व. देशभक्त बळंतराव मगर ग्रामविकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून ते अनेक सामाजिक उपक्रम राबवित आहेत. सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे संचालक व दैनिक 'सकाळ'चे वार्ताहर म्हणून उल्लेखनीय काम ते करत असून, त्यांची पहिली साहित्यकृती या चरित्राच्या रूपाने वाचकांपुढे आली आहे.